ब्रह्मविद्वरिष्ठ सद्गुरु श्रीरामकृत

श्री पंचीकरण

त्यावरील

सद्गुरु ब्रह्मनिष्ठ श्रीजयकृष्णकृत
गुजराती भाषेंतील जी टीका वेदधर्मसभेनें छापिली,
तिचें हें मराठींत भाषांतर

वेदधर्मसभेनें मुमुक्षूजनहितार्थ

रा. रा. विष्णु गणेश नेने

यांजकडून तयार करून घेतलें

* * *

देहाभिमाने गलिते विज्ञाते परमात्मनि ।
यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः ॥

तुकाराम बुक डेपो

बुकसेलर्स, माधवबाग मुंबई ४००००४

प्रकाशक :

मधुकर शिवराम कस्तुर

मॅनेजर :– तुकाराम बुक डेपो,

बुकसेलर्स, माधवबाग

मुंबई नं ४००००४

आवृत्ति चोवीसावी

(शके १९१४ सन १९९२)

मुद्रक :

बा. ज. नाईक

वसुंधरा आर्ट प्रिन्टर्स

तांबड्या मारुतीच्या मागे

नागाव-हटाळे

ता. अलिबाग, जि. रायगड

दुरध्वनी (०२१४३ ८५) ५४३



सद्बोधप्रवर्तक पण्डित श्री जयकृष्णजी

ग्रन्थप्रशस्ति

।। वसंततिलका वृत्तम् ।।

व्यासावटंकधरजीवनरामपुत्रो
मुद्रापयत्प्रथमतः प्रभुरामनामा ।
श्रीवेदधर्मपरिषत्परमानुमत्या
सत्पुस्तकं यदिदमस्तुं मुदे विदां तत् ।। १ ।।

अथार्याष्टकं प्रारभ्यते

देशीकचरणद्वंद्वं वंदे ऽ हं कमलशोभया ऽ ऽ श्लिष्टम् ।।
अस्तु कल्मषमीषं तीर्थीकर्तुं च जन्हुतनयावत् ।। १ ।।

ननु किं देशिकचरणैः पठ निगमं बा शृणुष्व शास्त्रार्थम् ।।
इति चेच्छृणु मद्वचनं किं गुरुणेति त्वया न बाच्यं भोः ।। २ ।।

निगमावनानवाचं वदतु ह्यथवापि सर्वशास्त्रार्थम् ।।
देशिककृपाविहिनो वास्तवमर्थं न कीरवन्मनुते ।। ३ ।।

तस्माद्गुरुं दयालुं राम स्वात्मस्थमीशमद्वैतम् ।।
शांत दांतममन्युं वदे वेदावसानवेत्ताराम् ।। ४ ।।

यद्वाग्गलितैर्वर्णनाहं देहो ऽ यमन्नमयकोशः ।।
नाह सूक्ष्मशरीरं कोशैग्रंथितं न चाहमज्ञातम् ।। ५ ।।

शुद्धो बुद्धो मुक्तश्चित्सुखरुपो ऽ ह्मेवमज्ञातम् ।।
त देशिक महांतं वंद्रे ऽ हं शकर लसन्मूर्तिम् ।। ६ ।।

स्वामिंस्तवोपकारं प्रतिकर्तृं कः प्रभुर्भवे ह्यस्मिन् ।।
तस्मात्त्वां नत्वाहं भवदीयाङ्घ्रिद्वये दधामि शिरः ।। ७ ।।

क्कासौ तिष्ठति गुरुरिति पृच्छसि चेत्त्वं शृणुष्व भो वादिन् ।।
हृदयगुहायां घनतरतिमिरं शमयन्सदैव सुस्वामास्ते ।। ८ ।।

पठंत्यालोड्य ये ते वै नायांतहि पुनर्भवम् ।। ९ ।।

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमदखंडानंदसरस्वती सद्देशिकशिष्य जयकृष्णाविदुषा विरचितमिदं

आर्याष्टकं संपूर्णम्

मूळ पुस्तकांतल्या गुजराती प्रस्तावनेचे मराठी भाषांतर

श्रुती, स्मृती व पुराणें यांत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा चार पुरुषार्थाचे मुख्यत्वेकरून निरूपण केलेले आहे. गर्भवासादि, म्हणजे जन्ममरणादि दुःखाची निवृत्ति जीवानें करून, परमानंदरूप परमात्म्याची प्राप्ति करून घेणें हा त्या पुरुषार्थांतला चवथा पुरुषार्थ आहे, आणि यालाच मोक्ष असें म्हणतात. हा पुरुषार्थ सर्वात श्रेष्ठ आहे म्हणून या सर्व ग्रंथात त्याचे विशेष वर्णन केलेले आहे. मोक्षाचे खरें साधन केवळ भेदरहित आत्मज्ञान आहें हे वेदांनी मान्य केलें आहे, त्यासंबंधाने कोणत्याही प्रकारचा वाद नाही. अभेद आत्मज्ञान मुख्यत्वे 'तत् आणि त्वम्' या दोन पदाच्या शोधनावर अवलंबून आहे. 'तत्' पदाच्या उच्चाराने समजला जाणारा ईश्वर, आणि 'त्वम्' पदाच्या उच्चाराने समजला जाणारा जीव, या दोघांची स्वरूपे कोणती आहेत त्यांचे यथार्थज्ञान होण्यासाठी वेदांतप्रकरणांत वर्णिलेल्या सर्व प्रक्रिया समजल्या पाहिजेत. त्या समजल्यावांचून जीवाचे वास्तविक स्वरुप कसें आहे, व ईश्वराचे वास्तविक स्वरुप कसे आहे याचा निर्णय होऊं शकत नाही. वा यथार्थज्ञानाचे संपादन करण्यासाठी, ज्या वेदांतशास्त्रांत परमात्म्यासंबधी अद्वैतज्ञानाचे निरूपण केलेले आहे. त्याचे साधनसंपन्न होऊन, कोणत्याही विशिष्ट मतासंबधाचा आपला दुराग्रह सोडून, श्रद्धापूर्वक निःपक्षपाताने, श्रवण, मनन व निदिध्यास मुमुक्षू पुरुषाने करणे अगदी अवश्य आहे. या विषयावर अनेक विद्वान पुरुषांनी उपनिषदाच्या आधाराने

संस्कृत भाषेत पुष्कळ ग्रंथ रचून ठेवलेले आहेत. परंतु या संस्कृत भाषेचा प्रचार सांप्रत फारच थोडा असल्यामुळे संस्कृतभाषा न जाणणाऱ्या मुमुक्षूला त्यांच्यापासून घेतां यावा तितका लाभ करून घेतां येत नाही, हे मनांत आणून अशा संस्कृत न जाणणाऱ्या सर्व लोकांची जिज्ञासा तृप्त करण्यास समर्थ असे पुष्कळ वेदांतग्रंथ अनेक **संस्कृत** ग्रंथांच्या आधारानें अनेक विद्वान् महात्म्यांनी **मराठींत** त्याचप्रमाणे **हिंदुस्थानींत** रचून ठेवलेले आहेत. पण हे ग्रंथ ती ती भाषा जाणणाऱ्यांच्याच मात्र उपयोगी आहेत. परंतु गुजराती भाषेंत वेदांतविषयांसंबधी प्रक्रिया ज्यांच्या योगानें सरळ रीतीनें समजतील असा एकही ग्रंथ आजपर्यंत न झाल्यामुळे संस्कृतसारखी उच्च भाषा तर येत नाही, पण वेदांतजिज्ञासा तर पूर्ण आहे. **अशा गुजराती** लोकांच्या उपयोगासाठी **'पंचीकरण'** नांवाचा हा सटीक ग्रंथ **गुजरातींत** तयार झालेला आहे. वेदांत-प्रकरणग्रंथांचा ज्यांच्या योगानें सहज समज पडेल अशा उपयोगी प्रक्रिया विस्तारानें गोवलेल्या आहेत कीं, त्यांचे विचारपूर्वक **अध्ययन** केले असतां वेदांत विचारसंबंधाचा कोणताही ग्रंथ सहज उमजून, ब्रह्मात्म्याचें एकतानिश्चयरूप यथार्थ अपरोक्षज्ञान मुमुक्षूस होईलच होईल. अशा प्रकारचा हा सरस ग्रंथ असून, मुमुक्षू जनांस दुस्तर संसाररूप सागर अनायसें तरून जाण्यास जणूं काय ही बोधरूप नौकाच आहे असे म्हणण्यास कोणत्याहि प्रकारची हरकत नाही. या **पंचीकरणांत** दोहा आणि चौपाई मिळून सदतीस पद्यें, स्थूल व सूक्ष्म या दोन देहांची दोन कोष्टके व **वाक्यवृत्ति** वगैरे ग्रंथांतील प्रमाणवचनें म्हणून ७ श्लोक आहेत. या ग्रंथाचे कर्ते **कठियावाड, कच्छ, गुजरात,** वगैरे प्रांतांत प्रसिद्धीस पावलेले, वेदांत शास्त्र पूर्णपणे जाणणारे ब्रह्मनिष्ठ **श्रीरामगुरु** या नावाचे

एक महान् सत्पुरुष होऊन गेले. त्या महात्म्याच्या जन्मचरित्रांचे वर्णन **श्रीपंचदशीग्रंथाचे हिंदुस्थानी** भाषेंत भाषांतर करणारे **पंडितपीतांबरजी** यांनी यथार्थ व विस्तारपूर्वक आपल्या सदरील ग्रंथांत केले आहे. पण याप्रसंगी त्याचा थोडाबहुत पुनरुल्लेख करणें योग्य होईल असें समजून तसे करतो.

या ब्रह्मनिष्ठ सत्पुरुषाचा जन्म संवत १८४० व्या वर्षी **दक्षिण हैद्राबाद शहरी** झाला. ते जातीने **यजुर्वेदी महाराष्ट्रीय ब्राह्मण** होते. त्यांनी आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षापासून ब्रह्मचर्य धारण केले होते. त्यांच्यामध्ये बोध करण्याची विलक्षण शक्ति असून महात्म्यास सर्वथैव साजतील असे पुष्कळ गुण होते. त्यांच्या शरीराचा वर्ण तेजस्वी होता. ज्या ज्या स्थळी ते आपला वास करीत त्या त्या सर्व स्थळी, आपल्यापाशी येऊन सत्संग करणाऱ्या मुमुक्षू आत्म्याचे दृढ ज्ञान होईल अशारीतीने अद्वैत ब्रह्माचा उपदेश करून "अहं ब्रह्मास्मि" हा दृढ निश्चय त्यांच्या ठिकाणी ते अद्भुत रीतीनें उत्पन्न करीत असत. ते ज्या ज्या ठिकाणी स्वतः गेले त्या त्या सर्व ठिकाणी. त्यांच्या प्रतापाने व अनुभवाने, जिज्ञासू जनांस महावाक्याचा यथार्थ अनुभव येऊन अद्वैतमार्गाने स्थापन झालेले आहे या ब्रह्मनिष्ठ महात्म्याच्या प्रतापाने व अनुग्रहाने त्यांस शिष्यपणाने शोभणारे, अनुभवयुक्त आणि सदुपदेश करण्याच्या कामांत अति चतुर व प्रतापी असे पुष्कळ शिष्य निपजले आहेत. त्यात विशेष प्रसिद्धिस आलेले असे चार शिष्य आहेत, ते हे :--- **सुदामपुरीत व्यास श्रीजयकृष्ण, जामनगर शहरांत विश्वनाथजी, बडोद्यांत बापूजी, व कच्छमांड-**

वीत सुखलाल गिरजी, ते श्रीराम महाराज बडोदे शहरांत संवत् १९०६ वर्षाच्या भाद्रपद तृतीयेच्या दिवशी समाधिस्त झाले त्या परमप्रतापी ब्रह्मनिष्ठ **श्रीराम गुरुचे** शिष्यवर्ग विद्यमान काली फार प्रसिद्धिस आलेले **पंडित श्रीजयकृष्ण महाराज** हे आहेत. यांनी गुरुकृपेने ब्रह्मसाक्षात्कारपूर्वक वेदांतविचारांत अविश्रांत परिश्रम केलेले आहेत, आणि आपल्या सारखाच ब्रह्मसाक्षात्कार इतर मुमुक्षू जनास व्हावा या हेतूने ते कित्येक वेदांतविषयक **संस्कृत** ग्रंथांचे त्याजकडून श्रवण करवीत असतात. त्याच्याजवळ श्रवण करण्यास येणाऱ्या सज्जन मंडळातल्या कित्येक मुमूक्षूंच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली की **श्रीरामगुरूंनी** केलेल्या मूळ **पंचीकरणाच्या** प्रत्येक वाक्यांत जो अति गंभीर अर्थ भरलेला आहे व त्यांत ज्या वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत, त्याची फोड करून दाखविणारी, अगदी सुलभ, सरळ, प्रक्रियांचे काठिण्य बिलकुल न भासविणारी, म्हणजे एकंदरीत साधारण बुद्धीच्या मुमूक्षूंसही उपयोगी पडेल अशा प्रकारची टीका **गुजरातीत** झाली तर फार बरे. मूळ ग्रंथावर अशा प्रकारची टीका करण्याबद्दलची प्रार्थना या मंडळीने मशारनिल्हे **पंडितजींस** केल्यामुळे त्यांनी फार श्रम करून गुरुशिष्यांचा संवाद रुपाने गुजराती भाषेत विस्तारपूर्वक दृष्टांत, सिद्धांत, युक्तिः, अनुभव या सर्व प्रकारच्या विवेचनाने युक्त अशी टीका केली आहे. प्रक्रिया चांगल्या समजल्या जाव्या म्हणून व्यवहारातले अनेक दृष्टांत दिले आहेत ते सर्व सिद्धांत नीट ध्यानांत यावेत या हेतूने दिलेले आहेत. तेव्हा दृष्टांताप्रमाणेच सर्व सिद्धांत म्हणजे तंतोतंत जुळतील असें अर्थांत नाही. यासाठी केवळ दृष्टांतावर दृष्टि न देता, सिद्धांताचा उत्तम रीतीने विचार करून, ते समजून घेण्याचा

प्रयत्न मुमुक्षूने करावा. जो कोणी ब्रह्मनिष्ठ व वेदांतवाक्य सद् गुरूच्या मुखापासून या **पंचीकरणाचे** श्रवण करून मनन करील त्याला आत्म्याचे अपरोक्ष दृढ ज्ञान होऊन तो जन्ममरणादि क्लेशा-पासून निःसंशय मुक्त होईल. यासाठी मुमुक्षूंनी ह्या ग्रंथाचा अथ-पासून इतिपर्यंत आदरपूर्वक विचार करावा अशी विनंती आहे.

या ग्रंथात कोणकोणत्या विषयांचे विवेचन केलेले आहे ते पुढे जोडलेल्या अनुक्रमणिकेवरून ध्यानात येईल.

शा. कल्याणदास नरोत्तमदास

मराठी भाषांतराच्या वेळची वेदधर्मसभेच्या चिटणिसांची प्रस्तावना

मागील प्रस्तावनेंत विचारपूर्वक उल्लेख केलेल्या **पंचीकरण ग्रंथाचा गुजराती** भाषेत गेल्या तेहत्तीस वर्षांच्या कालांत फारच मोठा प्रसार झाल्यावरून, **अशा अनुपम** ग्रंथाचा प्रसार अन्य भाषांतूनही होईल तर फार चांगले अशी **वेदधर्मसभेस** साहजिकच उत्कट इच्छा झाली. मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या मोठी असून ते लोक धार्मिक आहेत, व त्यास वेदांतविषयीची गोडी विशेष आहे. हे ध्यानांत आणून, अगोदर **मराठीत** या ग्रंथाचे उत्तम भाषांतर करवावे असे सभेच्या मनात आल्यावरून खाली सही करणार यांनी सभेच्या तर्फेने हे काम **रा. रा. विष्णु गणेश नेने** याचेकडे सोपविले. मशारनिल्हे **रा. रा. विष्णु गणेश नेने** हे महाराष्ट्रीय लोकांमध्यें सरळ आणि मार्मिक लेखक म्हणून बरेच प्रसिद्ध आहेत. शिवाय त्यांस वेदांतविषयीचीहि बरीच अभिरुचि असल्यामुळें, त्याजकडून ह्या ग्रंथाचा **मराठी** भाषेमध्ये झालेला अवतार, त्यांनी या कामी केलेल्या विशेष परिश्रमामुळे शुद्ध, प्रौढ, सुबोध व एकंदरीत विषयकाठिण्य व इतर परिस्थिति ध्यानांत आणता शक्य तितका हृदयंगम झाला आहे. अशी सभेची खात्री आहे. ह्यापेक्षा विशेष परीक्षा करण्याचे काम विद्वान वाचकांकडे सोपवून ही प्रास्तावना पुरी करतो.

वेदधर्मसभाकार्यालय, मार्गशीर्ष
वद्य ११ शके १८२१.

{ **विश्वनाथ प्रभुराम**
प्रमुख श्रीवेदधर्मसभा

श्री

भाषांतरकर्त्याची प्रस्तावना

मुंबई प्रसिद्ध **गुजराती वेदधर्मसभेच्या** वतीने तिचे विद्वान चिटणीस **रा. रा. विश्वनाथ प्रभुराम,** बी. ए. यांनी मूळ **गुजराती पंचीकरणा**वरील गुजरातीतल्या टीकेचे मराठीत भाषांतर करण्याची मला विनंती केल्यावरून मी हे भाषांतर केले आहे. **वेदांतशास्त्रास ब्रह्मविद्या** म्हणतात अपरोक्षानुभूति करून देणारे असे एवढेच एक **शास्त्र** असल्यामुळे ते जगांतल्या सर्व शास्त्रांत अत्यंत श्रेष्ठ आहे, इतकेच नव्हे तर ते मनुष्यास अत्यत आवश्यक आहे इतकेच ते आवश्यक असूनही, ते तसे आहे असे पटून याचे परिशीलन करणाऱ्यांचे प्रमाण अगदीच थोडे असते हे सर्व मानव जातीचे फार मोठे दुर्दैव आहे असे म्हणावे लागते. या शास्त्राची गोडी मला केवळ माझ्या सुदैवाने लागल्यामुळे त्याचे होईल तितके परिशीलन करावे असे अलीकडे बहुत दिवसांपासून माझ्या मनांत घोळत होते. तितक्याच, वेदांतल्या **पंचीकरणा**सारख्या महत्त्वाच्या विषयावरील फार नावाजलेल्या अशा एका गुजराती पुस्तकाचे भाषांतर मराठीत करण्याचा सुप्रसंग अगदी योग्य वेळी आला असे पाहून, निव्वळ वेदांतासारख्या अति कठिण विषयावरील पुस्तकाचे भाषांतर करण्याची माझी वास्तविक योग्यता नसूनही व त्याप्रमाणे गुजराती भाषेचे म्हणण्यासारखे मार्मिक ज्ञान मला नसूनही, मी हे काम पत्करले ते केवळ हौशीने. तेव्हां ते धडपणे शेवटास कसे जाईल अशी अर्थातच प्रारंभापासून मला काळजी होती. असे असून माझं भाषांतर एकदांचे शेवटास जाऊन ते

छापांतून बाहेर पडून लोकांच्या हाती पडण्यापर्यंत मजल आली ही ईश्वराची मजवरील फार मोठी कृपा होय. मूळ पुस्तक व भाषांतर या संबंधाने लिहिण्यापूर्वी, अगोदर वर उल्लेख केलेल्या **गुजराती वेदधर्मसभेसंबंधाने** मराठी वाचकांच्या माहितीसाठी चार शब्द लिहिणे अप्रासंगिक होणार नाही. ही सभा बरीच जुनी असून फार महत्त्वाची आहे असे म्हणण्याचे कारण, हिने साक्षात् गुजराती भाषेवर व परंपरेने मराठी आदिकरून इतर सर्व भाषांवर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. हिने आजपर्यंत संस्कृत भाषेतल्या अनेक सामान्य अशा वैदिक, पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, नैतिक इत्यादि ग्रंथांपैकी कांहींचा प्रयासाने जीर्णोद्धार करून, व कांहींचे संशोधन करून त्यांची गुजरातींत भाषांतरे करून, गुजराती मंडळीस त्यांचा विलक्षण लाभ करून दिलो आहे. हा तिचा क्रम आजमितीपर्यंत अव्याहत चालू आहे. शिवाय हिच्याच आश्रयाने मराठींतल्या **विविधज्ञानविस्तारा-प्रमाणे**,– पण त्यांच्याइतक्या अनियमितपणाने मात्र नाही तर नियमितपणाने–**आर्यधर्मप्रकाश** या नावाचे एक मासिक पुस्तक विचारणीय लेखांनी भरलेले निघत असते, व त्यामुळे ते सर्व गुजराती विद्वानांस पसंत असल्याबद्दल त्याचा मोठा लौकिक आहे. या सर्वांचे श्रेय **वैद्यराज रा. रा. प्रभुराम जीवनराम**, यांचे बंधू **पंडित श्रीजयकृष्ण जीवनराम व. चि. रा. रा. विश्वनाथ प्रभुराम** यांसच आहे. कारण, मराठी भाषा बोलणाऱ्यापेक्षांही गुजराती भाषा बोलणाऱ्यांत विद्याभिरुचि अजून फार कमी आहे. अशा स्थितींत **वेदधर्मसभे**सारखी अत्यंत उपयोगी संस्था अव्याहत चालविणेसुद्धां कठीण आहे. परंतु वरील तीन विद्वान गृहस्थांच्या दीर्घ परिश्रमाने ती अव्याहत चालली आहे, इतकेंच नव्हे तर भरभराटीत आहे,

याचे मुख्य कारण सदरील गृहस्थ स्वतःच्या पदराला खार लावून घेवून, **व अन्य** तऱ्हेची झीज सोसून तिच्या अभिवृद्ध्यर्थ सर्वदा **झटत असतात** हेंच होय, व हे त्यांस खरोखर भूषणप्रद आहे इतके या सभेसबधी लिहिणे पुरे आहे. वर उल्लेख केलेले मूळ **गुजराती पंचीकरण** हे **दोहा चोपाई** या नांवाच्या वृत्तात दोनहि मिळून ३७ पद्यांत **श्रीराम** नांवाच्या एका महासत्पुरुषांनी केले. हे सत्पुरुष **यजुर्वेदी** महाराष्ट्रीय ब्राह्मण असून **दक्षिणहैद्राबादी** जन्मले होते. **ते** सर्वत्र, विशेषकरून **गुजरात, कठियावाड, कच्छ,** इत्यादि गुर्जरभाषीप्रांतांत, महाब्रह्मज्ञानी म्हणून प्रख्यात होते. त्यांच्या-सबधाची विशेष माहिती मूळ पुस्तकाच्या प्रस्तावनेत **वेदधर्मसभेच्या** चिटणीसांनी दिलेली मागे छापलीच आहे. म्हणून तिचा पुर्नउल्लेख **येथे** करीत नाही, त्यांनी केलेले हे **पंचीकरण** पद्यमय असून थोडयाच म्हणजे साऱ्या ३७ पद्यांत **असल्यामुळे** ते एकंदर गुजराती जनसमूहांतील मुमुक्षुवर्गास यथार्थपणे व सुलभपणे समजण्यासारखे नव्हते. परतु ते अप्रतिम असल्यामुळे त्याचा लाभ सर्व जनसमूहास करून देण्याचे हेतूने, त्यांचे सुप्रसिद्ध शिष्य व **रा. रा. विश्वनाथ-जीचे** चुलते **ब्रह्मनिष्ठ पंडित श्रीजयकृष्णमहाराज** यांनी गुजरातीत त्यावर विस्तृत टीका केली, ती टीका **वेदधर्मसभेने** छापवून काढली. प्रस्तुतचे भाषांतर हे त्याच टीकेचे भाषातर आहे **पंडित श्रीजयकृष्णमहाराजहि** आपल्या अनुभवी गुरुप्रमाणे महापंडित असून सर्वत्र विशेषकरून **मुंबईत,** वेदांतात पारगत असल्याबद्दल **त्यांचा** मोठा लौकिक आहे, अनेक सन्मान्य ग्रंथाच्या द्वारे हे आपल्या रसाळ वाणीने फार परिश्रम करून भवतापत्रस्त मुमुक्षू-जनांस नित्य नियमाने आत्मबोध करीत असतात, इतके ह दयाळू आहेत, शिवाय जुन्या पिढीतील दक्षिणी संस्कृत तज्ज्ञ पंडितांचे

आपल्या मराठीत व इतर जन्मभाषांकडे प्राय: जसे अगदी दुर्लक्ष असे तसे यांचे नाही, म्हणजे हे जुन्या पिढीतले संस्कृत भाषापंडित असूनही त्यांचे गुजराती जन्मभाषेवर संस्कृताएवढेच किंबहूना तिजहूनही अधिक प्रेम आहे हे त्यांस खरोखर भूषणावह आहे. यांस मराठी भाषाही चांगली अवगत आहे. यांची गुजराती भाषा पारशी लोकांच्या गुजरातीप्रमाणे नसून अगदी शुद्ध, प्रौढ व मधुर आहे. व तिजवर यांची नेहमी छाप असते. तेव्हां अर्थात् यांनी केलेली टीका किती उत्तम झाली असली पाहिजे याविषयी फारसे लिहिण्याचे कारण नाही ही त्यांची टीका किती उत्तम व लोकप्रिय झाली आहे त्याची एकच गोष्ट चांगली साक्ष पुरविण्यासारखी आहे म्हणून तिचा येथे उल्लेख करतो, ती गोष्ट ही की, आजपर्यंतच्या अल्प-कालांत या पुस्तकाच्या एकंदर अठरा आवृत्ती निघाल्या आहेत. या पुस्तकातली भाषासरणी जुन्या तऱ्हेची असून प्रयोगरचना मधून मधून क्वचित दूरान्वयाची, अर्थात् थोडीशी क्लिष्ट किंवा दुर्बोध झालेली आहे. पण तसे होण्याची अनेक कारणे आहेत. हे ध्यानांत ठेवले पाहिजे. एक तर गुजराती भाषेत म्हणण्यासारखे नैसर्गिक ओज व माधुर्य नसून. अजून ती पूर्णावस्थेत पोहोंचलेली नाही. या कारणामुळे तिच्या द्वारे कोणीही आपले विचार कितीही उत्तम रीतीने व्यक्त करण्याचा प्रयत्न केला तरी तिला एकदरीत यावी तितकी मनोरमता येत नाही. अशा प्रकारची मूळ भाषेची ठेवण आहे. तशांत, या पुस्तकाचे कर्ते मशारनिल्हे **पंडितजी** हे वर लिहिल्याप्रमाणे 'जुन्या पिढीतले असल्यामुळे' त्यांची भाषासरणीही अर्थात् थोडीशी जुन्या तऱ्हेची असूनही, त्यांनी आपल्या लेखांत विरामचिन्हांचा उपयोग भरपूर केलेला नाही. शिवाय विषय पडला फार गहन वेदांत. त्यामुळे कोणी कितीहि जपून लिहिण्याचा प्रयत्न

केला तरी त्यांत दूरान्वय, दुर्बोधता, इत्यादी थोडेबहुत दोष उत्पन्न व्हावयाचेच, अशा स्थितीत टीकाकार **पंडितजीच** होते म्हणून ती इतकी तरी सरस व बहुतेक निर्दोष घडली आहे. त्याच्या जागी दुसरा कोणी असता तर काय होते हे खात्रीने सांगता येत नाही असे म्हणण्यास काही हरकत दिसत नाही. हे सर्व इतक्या विस्ताराने लिहिण्याचे वास्तविक हे स्थल नसून मी लिहिले आहे त्याचे कारण इतकेच की, या मुळांतल्या गुणांच्या मानाने अगदी क्षुल्लक व तुरळक अशा दोषाचे प्रतिबिंब माझ्या भाषांतरातहि अर्थात् पडले आहे. कारण मूळ ग्रंथाची सबंध भाषा-सरणीच्या सरणीच बदलणें हे भाषांतरकाराच्या अधिकारांतले नाही असे मला वाटते, तसे शब्दास शब्द ठेवणे हैंच काय ते भाषांतराचे इतिकर्तव्य आहे असेही नाही. ह्या गोष्टी पूर्णपणे ध्यानांत धरून ठिकठिकाणी, भाषांतराचा भाषांतरपणा, कायम ठेवून, करता आले तितके फेरफार करून, व विरामचिन्हाचा जास्त उपयोग करून, मधूनमधून क्वचित् उत्पन्न झालेले दूरान्वये-दुर्बोधता इत्यादि दोष काढून टाकण्याचा प्रयत्न मी भाषांतरांत बारकाईने केला आहे, हे जे मार्मिक वाचक मुळांशी भाषांतर ताडून पाहण्याचे श्रम घेतील त्यांस सहज कळून येईल अशी आशा आहे. या क्षुल्लक व तुरळक अशा दोषांपैकी दुसरा एक दोष पण त्या सर्वांतला मुख्य दोष मुळांतल्याप्रमाणे भाषांतरातहि उतरला आहे. तो हा की, बऱ्याच ठिकाणी समजण्यास कठीण अशा संस्कृत किंवा पारिभा-षिक शब्दांचे किंवा शब्दसमूहाचे अर्थ जेथे अवश्य दिले पाहिजे होते ते दिलेले नाहीत. व याच्या उलट अगदी सोपे, निदान साधा-रण प्रतीच्या वाचकासही सहज समजले पाहिजे अशा शब्दांचे अर्थ विनाकारण दिलेले आहेत. आता भाषांतरात तर त्याखाली स्वतंत्र


टीपा देऊन अशा शब्दांचे किंवा शब्दसमूहांचे अर्थ देण्यास वास्तविक हरकत नव्हती; पण तसे मी केले असते तर ते **पंडितजीस** आवडले नसते. अशी माझी खात्री होती. म्हणून तसे करण्याच्या भरीस मीं पडलो नाही. एकंदरीत, त्यासंबंधाची जबाबदारी माझ्यावर नाही हे कोणासही कबूल करावे लागेल. वर एकाप्रसंगी लिहिल्या-प्रमाणे वेदांतविषयाचे व गुजराती भाषेचे मार्मिक ज्ञान मला नसल्या-मुळे. व इतरही कांही कारणामुळे. वर निर्दिष्ट केलेल्या दोषांखेरीज आणखी माझे स्वतःचे असेही काही दोष घडले असतील. तेव्हा लोकांपुढे नम्रतेने मांडलेली ही माझी भाषांतरकृति कितपत उतरली आहे हे सारासार विचार करून ठरविणे माझे काम नसून मर्मज्ञ वाचकांचे आहे असे समजून ते त्यांजकडेच सोपवितो शेवटी ज्या **गुजराती वेदधर्मसभेच्या** ह्या विनंतीस कारणीभूत झालेले जे तिचे विद्वान चिटणीस व माझे मित्र **रा. रा. विश्वनाथजी** त्यांचे व त्याचप्रमाणे सामान्यजनसमूहास आपल्या सुबोध पुस्तकांच्या द्वारे वेदांतविषयाची गोडी लावण्याचा अत्युत्तम प्रयत्न केल्याबद्दल व माझे भाषांतर आनंदाने गोड करून घेतल्याबद्दल ब्रह्मनिष्ठ **पंडित श्रीजयकृष्णमहाराज** यांचे. असे तिघांचेहि मनःपूर्वक आभार मानून व मराठी भाषा बोलणाऱ्या मुमुक्षूवर्गास या माझ्या अल्प भाषांतर-कृतीपासून थोडा फायदा होईल अशी उमेद बाळगून ही थोडीशी, लांबलेली प्रस्तावना पुरी करतो.

मुंबई पेंडशाची चाळ,
गिरगांव,
भाद्रपद वद्य ५ शके १८२१
ता. २३ सप्टेंबर १८९९

सर्वांचा नम्र सेवक
गणेश विष्णु नेने
भाषांतरकर्ता

विषयानुक्रमाणिका

विषय	पृष्ठ



ब्रह्मनिष्ठ श्रीरामगुरु

ॐ तत्सत् ।

श्रीपरमात्मने नमः ।

अथ सटीकपंचीकरणप्रारंभः ।

टीकाकारकृतं मंगलाचरणम्

॥ आर्यावृत्तम् ॥

वंदे श्रीमद्रामं सद्गुरुमतिशांतिसीतयाऽऽश्लिष्टम् ॥
कामादिराक्षसारिं भवजलधौतत्वबोधसेतुकरम् ॥ १ ॥

टीका ॥ परम शांती (निर्विकल्पवृत्ति) आहे स्वरूप जिचें अशा सीतेशी संयुक्त असणारा, कामक्रोधलोभमोहमदमत्सररूप राक्षसांचा शत्रु; संसाररूप समुद्रावर तत्त्वबोधरूप सेतु (पूल) बांधणारा, ब्रह्मविद्यारूप शोभेने शोभित, श्रीरामरूप अशा श्रीरामसद्गुरुला मी वंदन करतो. ज्याप्रमाणे श्रीरामचंद्र सीतेशी संयुक्त आहे, त्याचप्रमाणे श्रीराम नांवाचा सद्गुरु परम शांति (निर्विकल्प समाधि) हेंच आहे रूप जिचें अशा सीतेशी संयुक्त आहे; ज्याप्रमाणें रामचंद्र रावणादि राक्षसांचा नाश करणारा आहे; त्याचप्रमाणें रामसद्गुरु कामक्रोधादिरूप राक्षसांचा

नाश करणारा आहे; ज्याप्रमाणे श्रीरामचंद्रानें; आपल्या सेनेला समुद्रांतून पार नेण्याच्या हेतूनें समुद्रावर सेतु बांधला; त्याचप्रमाणें श्रीरामसद्‌गुरूनें मुमुक्षुजनांस संसारसमुद्राच्या पार नेण्यासाठी त्यावर तत्त्वबोधरूप सेतु बांधला आहे. श्रीराम ज्याप्रमाणें लक्ष्मीच्या योगाने शोभायमान आहे, त्याचप्रमाणे श्रीरामसद्‌गुरु ब्रह्मविद्याद्यनेक-सद्‌गुणरूप लक्ष्मीच्या योगाने शोभायमान आहे म्हणून अशा श्रीरामरूप सद्‌गुरुला मी साष्टांग नमस्कार करतो.

।। आर्यावृत्तम् ।।

पंचीकरणव्याख्यां सुखबोधार्थं करोम्यहं सरलाम्।
संस्कृतवागज्ञानां गुर्जरसद्भाषया मुमुक्षूणाम् ।।२।।

टीका ।। संस्कृतभाषा तर येत नाहीं पण संसारबंधनापासून मुक्त होण्याची तर इच्छा आहे अशा विवेकादि-साधनसंपन्न जिज्ञासू जनांना अनायासें पंचीकरणाच्या अर्थाचा बोध व्हावा या हेतूनें कठीण प्रक्रियांवांचून सुलभ रीतीनें समजली जावी अशाप्रकारची श्रीरामसद्‌गुरुकृत मूळ पंचीकरणाची टीका मी गुजराती भाषेत सोप्या शब्दांनी करतो.

---

१. गुजराती टीकाकारांच्या मंगलाचरणाचे हे मराठीत भाषांतर केले आहे सबब त्यांच्यावरील श्लोकांत लिहिल्याप्रमाणे भाषांतरातही 'गुजराती' हाच शब्द कायम ठेवला आहे.

अनुबंध चतुष्टय

१ अधिकारी, २ विषय, ३ सबंध आणि ४ प्रयोजन हे चार अनुबंध ज्या ग्रंथांत असतात त्या ग्रंथाकडे विवेकी पुरुषाची प्रवृत्ति होत असते. या पंचीकरणाचे अधिकारी आदिकरून जे अनुबंध त्यांचा यांत अभाव आहे असें समजून या ग्रंथाकडे कोणाचीही प्रवृत्ति होणार नाही, अर्थातच याचा आरंभ निष्फळ आहे अशी शंका जर कोणास उत्पन्न झाली तर तिचे समाधान करण्यासाठी यामधील दुसरी (जन्ममरण केम० पृ. २४) चौपाई (एक तऱ्हेचें हिंदी वृत्त) लिहून.

अधिकारी लक्षण I

आत्मानात्मविवेक, वैराग्य, शमदमादि षट्संपत्ति आणि मोक्षेच्छा अशा चार साधनांनी संपन्न मनुष्य या पंचीकरणाचा अधिकारी आहे असें म्हटले आहे.

आत्मानात्मविवेक लक्षण वि. चू. २

आत्मस्वरूप नित्य आहे आणि त्याच्या व्यतिरिक्त सर्व अनित्य आहे असा जो मनाचा निश्चय त्याचें नांव विवेक, व तोच त्यांतले पहिले साधन आहे.

वैराग्य लक्षण वि. चू. २१.

या लोकांतले त्याचप्रमाणें परलोकांतले भोग भोगण्यासंबंधाने इच्छारहितत्या (इच्छेचा अभाव) त्याचे नांव वैराग्य.

-पू-२२-ते-२७·

शमदमादि षट्संपत्ति

सहा संपत्ति सांगितल्या आहेत, त्या अशा :— १ शम (सर्व वासनांचा त्याग), २ दम (शब्दादि बाह्य विषयांपासून इंद्रियांचा निग्रह), ३ उपरति (सर्व प्रपंचापासून निवृत्ति), ४ तितिक्षा [शीतोष्णादि (सुखदु:खादि) जे द्वंद्वधर्म (जोडीने असणारे दोन दोन धर्म) ते सहन करण्याची योग्यता], ५ श्रद्धा (ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरुच्या त्याचप्रमाणें वेदांतशास्त्रांतल्या वाक्यांच्या ठिकाणी भक्ति) आणि ६ समाधान (सच्चित्स्वरूप जाणून घेतेवेळी केलेली चित्ताची एकाग्रता.)

वि·पू·२८·

मुमुक्षुता लक्षण

संसारबंधनापासून मुक्त होण्याची जी तीव्र इच्छा तिचें नांव मुमुक्षुता म्हणजे मोक्षेच्छा; हें साधन शेवटलें.

या चार साधनांनी युक्त जो तो याचा अधिकारी आहे. II आतां या ग्रंथाचा विषय कोणता तो सांगतो. प्रत्यगात्म्याची (जीवाची) परमात्म्याच्या (शिवाच्या) बरोबर जो एकता तीच याचा विषय आहे व तिचेच यांत ठिकठिकाणी निरूपण केलें आहे. III आतां यांत संबंध कोणता तो सांगतो. प्रतिपाद्य आणि प्रतिपादकभाव या दोघांचा जो संबंध आहे, तोच संबंध, हा ग्रंथ आणि अद्वितीय ब्रह्म या दोघांचा प्रतिपादक आहे: म्हणजे हा ग्रंथ अद्वितीय ब्रह्माचे

प्रतिपादन करणारा आहे आणि ब्रह्म प्रतिपादन (प्रतिपादन करण्याचा विषय) आहे तसाच ज्ञानाचा आणि पंचीकरणाचा जन्यजनकभावसबंध आहे, म्हणजे ज्ञान जन्य (उत्पन्न होणारें) आहे, आणि पंचीकरण विचाराच्या द्वाराने जनक (उत्पन्न करणारे) आहे. अज्ञान आणि ज्ञान यांचा निवर्त्यनिवर्तकभावसंबंध आहे, म्हणजे अज्ञान निवृत्त होतें आणि ज्ञान त्याला निवृत्ति करते. आतां या ग्रंथांत प्रयोजन कोणते ते सांगतो. परमानंदरूप परमात्म्याची प्राप्ति करून घेणें, त्याचप्रमाणे अज्ञानमूलक जन्मादि अनर्थाची निवृत्ति करणें हे यांतले प्रयोजन आहे, एवंच चारही अनुबंधांचे अस्तित्व यांत आहे असें सिद्ध झाल्यामुळे याचा प्रारंभ सफलच आहे.

॥ चौपाई ॥

॥ श्री गणेशाय नमः ।

घणा दहाडानो भ्रम थयो जीवने
एटले देह माने पोते आपने
ते सारु फरे चोराशी लक्ष योनिने,
फरि पामे जन्ममरणनें ॥ १ ॥

टीका ॥ जीव म्हटल्याने जो अविद्योपाधिक प्रत्यगात्मा त्याला पुष्कळ दिवसांचा भ्रम झाला आहे, म्हणजे अनादि-

कालापासून भूल पडलेली आहे, तिच्या योगाने त्याने (जीवात्म्याने) आपला स्वतःचा देह तोच आपण असें मानले आहे. वास्तविक तो स्वतः सच्चिदानन्दब्रह्मरुप आहे, देहरूप नाही; असे असूनही, देहच आपण, मनुष्यच आपण, ब्राह्मणच आपण, क्षत्रियच आपण इत्यादि जे तो मानतो आहे ते केवळ भ्रमामुळें मानतो आहे.

A. भ्रमाचा विपरीतबुद्धिविषयक दृष्टांत

समजा, कोणी एक ब्राह्मण एक दिवस पुष्कळ भांग प्याला आणि तिच्या कैफांत तो आपले ब्राह्मणपण विसरून "मी शूद्र आहे, मी वैश्य आहे, मी क्षत्रिय आहे" असे विपरीत बरळू लागला. तरी पण अशा त्याच्या विपरीत बोलण्याच्या वेळी बोलल्याप्रमाणे तो ब्राह्मण नाहीसा होऊन खरोखरीच शूद्रादिक झाला असे कांही झाले नाही. तर तो ब्राह्मण होता. तो जे विपरीत बोलत होता ते केवळ कैफामुळे. त्यानंतर कांही वेळाने त्याला त्याचा एक हितेच्छु भेटला; त्याने त्याचा कैफ उतरावा म्हणून त्यास तूप व दही खावयास दिले; त्याच्या योगाने त्याचा कैफ उतरला. त्यानंतर तो ब्राह्मण 'आपण ब्राह्मण आहो,' अशी आपली खरी जात ओळखून 'आपण शूद्रादिक आहो,' असे कोणी किती वेळांही सांगितले तरी मानीना. जोपर्यंत त्याला कैफाने पछाडले होते तोपर्यंतच त्याची बुद्धि विपरीत झाली होती. कारण नियम असा आहे की कैफाचा नाश झाल्यावर विपरीतबुद्धि राहूं शकत नाही.

दृष्टांताचा सिद्धान्त

वर सांगितल्याप्रमाणे प्रत्यगात्मा अज्ञानरूप कैफाच्या योगाने अविद्याकल्पित स्थूल, सूक्ष्म शरीरावर कल्पित संबंध जडवून आपले वास्तव सच्चिदानंदस्वरूप विसरून, 'आपण मनुष्य आहो, आपण ब्राह्मण आहो, आपण क्षत्रिय आहो, आपण वैश्य आहो, आपण क्षुद्र आहों, आपण गृहस्थाश्रमी आहों, आपण त्यागी (संन्यासी) आहो, आपण पुरुष आहों, आपण बायको आहो, आपण जन्मतो, आपण मरतो, असा विपरीत अध्यास (भ्रांतिमूलक समजूत) करतो. वास्तविक तो स्वतः देहादिकांचा द्रष्टा, साक्षी, ब्रह्मरूप आहे, पण ते अज्ञानाच्या योगाने जाणत नाही. जेव्हां अशा अज्ञानी जीवाला ब्रह्मनिष्ठ सद्गुरु भेटतो, आणि तो त्याला ब्रह्मविद्योपदेशरूप तूप पाजतो, तेव्हांच त्याचा अज्ञानरूप कैफ उतरतो. असे झाले म्हणजे तो पुरुष आपण देह आहों, आपण मनुष्य आहों, आपण कर्ता आहों, आपण भोक्ता आहों, असें कदापि मानणार नाही, तर उलट आपण सच्चिदानंदरूप ब्रह्म आहो असेंच मानील. पण हे सत्य जोपर्यंत तो पूर्णपणे समजत नाही, तोपर्यंत पुष्कळ दिवसांच्या चुकीच्या समजुतीने "आपण देह आहें" असे मानीत असतो.

स्वरूपविस्मरणाविषयीं सिंहाचा दृष्टांत

एक धनगर दररोज आपल्या शेळ्या व मेंढ्या चरवण्यासाठी रानांत घेऊन जात असे. तेथून जवळच असणाऱ्या एका पर्वताच्या गुहेंत नुकतीच एक सिंहीण विऊन तिला दोन पोरें झाली होतीं. त्यांपैकी एक पोर एक दिवस तो धनगर आपल्या घरीं घेऊन आला. तेथे त्यास नित्य दूध पाजून त्याने वाढविलें. तें सिंहाचे पोर दररोज मेंढ्यांच्या कळपाबरोबर रानांत फिरावयास जाई, आणि दिवसभर त्यांच्याबरोबर फिरे, धांवे बसे, पाणी पिई, आणि संध्याकाळ झाली म्हणजे त्या मेंढ्यांच्या कळपाबरोबरच घरीं परत येई. तेव्हां तो धनगरहि त्यास आपल्या इतर मेंढ्याबरोबरच कोंडवाड्यांत अडकवून ठेवि; अशारीतीने रात्रंदिवस त्या सिंहाच्या पोराला त्या मेंढ्यांची संगति असल्यामुळे ते पोर आपले सिंहस्वरूप विसरून 'आपण मेंढा आहों' असे अज्ञानाने मानूं लागलें, व तो धनगरहि त्यास प्रत्येक वेळीं मेंढा म्हणून हांक मारूं लागला. एक दिवस सुद्धां त्याने त्यास सिंह म्हणून हांक मारली नाही. या रीतीने त्या मेंढ्यांबरोबर पुष्कळ दिवस जात येत असल्यामुळे त्या पोराला त्या मेंढ्यांचें अगदी वेड लागल्यासारखें झालें, व त्यामुळे "आपण मेंढाच आहों" अशी त्याची भ्रांतिमूलक समजूत झाली. असें कांही दिवस गेल्यावर एक दिवस तो सिंह रानांत नित्याप्रमाणे मेंढ्यांच्या कळपांतच चरतो आहे इतक्यांत जवळच्या पर्वतांतून दुसरा

एक सिह बाहेर आला. त्या सिहाला मेंढ्यांच्या कळपांत पाहतांक्षणीच त्यास अतिशय आश्चर्य वाटले आणि त्याने मोठी गर्जना केली. ती ऐकून सर्व शेळ्यामेंढ्या भिऊन पळू लागल्या, त्याबरोबर त्यांची संगति करणारा तो सिहही पळूं लागला; ते पाहून तो पर्वतांतला सिह मोठ्याने आरोळी देऊन त्यास म्हणाला, 'रे माझ्या जातभाई, जरा उभा रहा. मला तुला एक गोष्ट सांगावयाची आहे." हे ऐकून तो मेंढ्यांबरोबर पळत जाणारा सिह उभा राहिला. तेव्हा तो पर्वतांतला सिह त्याच्याजवळ येऊन म्हणाला, 'अरे बाबा, तू स्वतः सिह असून मेंढ्यांच्या कळपात कसा राहतोस ?' त्यावर तो मेंढ्यांच्या कळपांतला सिह रागावून बोलला, 'मी तर बुवा काही सिह नाही. तूं सिह असशील तर असेनास बापडा. मी तर खरोखर मेंढा आहे. 'मला तूं सिह आहेस' असे सांगून खोटी गोष्ट सांगू नकोस.' अशाप्रकारचे त्यांचे विपरीत बोलणे त्याने ऐकले तेव्हा त्या पर्वतांतच्या सिहाच्या मनांत असा विचार आला की, हा बेटा ज्या दिवशी जन्माला आला त्या दिवसापासून तो मेंढ्यांच्या कळपांत वाढलेला असला पाहिजे. शिवाय, त्याला रानांत घेऊन फिरणारा धनगरही त्याला मेंढा म्हणूनच हांक मारतो त्यामुळेहि 'आपण मेंढा आहो' अशी खोटी भ्रांति याच्या मनांत दृढ झालेली आहे, अशी त्या पर्वतांतच्या सिहाच्या मनाची खात्री झाली, तर आतां ह्याची ही खोटी भ्रांति आपण

उपदेश करूनच घालविली पाहिजे. असा विचार करून तो पर्वतांतला सिंह मेंढ्यांतल्या भ्रांत सिंहाला म्हणतो, "अरे बाबा, तूं विचार करून खरे काय आहे ते पहा तर खरे ! हें मेंढे सर्व लहान आहेत पण तूं तर त्यांच्याहून मोठा आहेस ? हे जर खरे आहे तर तूं मेंढा कसा असूं शकशील ?" त्यावर तो अज्ञ सिंह म्हणाला, "मी मेंढा आहे याविषयी संशयच नाही मग कदाचित् मी मोठा मेंढा असेन." हे ऐकून तो पर्वतांतला सिंह म्हणाला, "अरे बाळा, तू पुनः विचार करून बघ आणि माझ्याकडे पहा, मी स्वतः सिंह आहे, माझी लक्षणे तुझ्या लक्षणांशी बरोबर मिळतात. परंतु या मेंढ्यांची लक्षणे तुझ्याशी मुळीच मिळत नाहीत, कशी ती पहा. मेंढ्यांच्या चारही पायांस खुर आहेत. परंतु तुझ्या व माझ्या प्रत्येक पायांस पांच पांच नखे आहेत. तेव्हा तुझ्याबरोबर मेंढ्याचे हे एक लक्षण अगोदर मिळत नाही. आणखी एक; मेंढ्यांचे शेपूट तोकडे असून हालते आहे; परंतु तुझे व माझे लांब आहे यावरून तूं मेंढा नाहीस. अशारीतीने त्या सिंहाने सिंह आणि मेंढा या दोघांतला फरक जेव्हां त्याच्या प्रत्ययास आणून दिला तेव्हा त्या अज्ञ सिंहाच्या मनांत त्या सिंहाच्या बोलण्याच्या खरेपणासंबंधाने थोडासा विश्वास उत्पन्न झाला आणि तो म्हणाला, "तूं सांगतोस ती गोष्ट खरीशी वाटते बुवा, तरी पण अजून माझ्या मनाची पक्की खात्री होत नाही त्याला काय करूं ?' तेव्हां त्या पर्वतांतल्या सिंहाने जवळच असलेल्या एका तलावाच्या कांठावर त्या अज्ञ सिंहास उभा

करून, पाण्यांत पडलेल्या आपल्या स्वतःच्या प्रतिबिंबातल्य तोंडाकडे पहावयास त्यास सांगितले आणि म्हटले "आतां बघ तुझे आणि माझे तोंड अगदी एकसारखे आहे, पण मेंढ्याचे तोंड लांब आहे. तुझ्या व माझ्या तोंडासारखे गोल नाही, तुझा गळा गुळगुळीत आहे. परंतु मेंढराच्या गळ्याला दोन स्तन आहेत त्यांस अजागलस्तन म्हणतात. तुझी कमर, तुझे केस, तुझे कान त्याचप्रमाणे तुझ्या शरीराचा वर्ण मेंढ्याच्या कमर, केस, कान व वर्ण यांशी जुळत नाहीत. आणखी दुसरे एक दाखवितो ते पहा. मेंढ्याला शिंगे आहेत, पण ती तुला नाहीत तर मग यावरून तूं असे पहा, की मेंढ्याचें एकसुद्धां लक्षण तुझ्यात नाही पण मी जो सिंह आहे त्या माझी एकूणएक लक्षणे तुझ्या लक्षणांशी मिळताहेत तर तूं सिंह नाहीस हे कसे ? आतां तूं स्वतः सिंह असून जो आपल्याला मेंढा समजत आहेस त्याचे कारण इतकेच की जन्मल्यापासून तूं मेंढरांच्या आणि धनगराच्या सहवासांत होतास यामुळे तुला आपण मेंढा आहो अशी खोटी भ्रांति झाली आहे, तर मग आतां आपण मेंढा आहो अशीं खोटी भ्रांति सोडून आपण सिंह आहो असा मनाचा पक्का निश्चय कर." हे त्याचे सर्व बोलणे ऐकून त्याचा त्या अज्ञ सिंहाने पूर्ण विचार केला, आणि आपली सर्व लक्षणे तपासून पाहिली. तेव्हा आपण सिंह आहो अशी त्याच्या मनाची खात्री झालीं, आणि त्याला पश्चाताप होऊन तो म्हणाला, अरेरे, उगीच इतके

दिवस मेंढ्यांच्या सहवासामुळे मी स्वत: मेंढाच आहे असे समजून फसलो गेलो. आतां यापुढे कधीही मी मेंढ्यांचा सहवास तर नाहीच करणार पण उलट त्यांचा नाश करीन. असा विचार करून त्या मेंढ्यांचा सहवास सोडून सिंहाच्या बरोबर तो फिरूं लागला.

उपरोक्त दृष्टांताचा सिद्धान्त

देहाचा द्रष्टा जीवात्मा खरा, पण त्याच्या ठिकाणी अनादिकालापासून स्वस्वरूपाविषयी जे अज्ञान असते त्याच्या योगाने त्याचप्रमाणे काम्यकर्मादिकांच्या संबंधाने उत्पन्न झालेल्या अविद्येने कल्पिलेले जे देहइंद्रियांचे समुदाय तेच जणुं काय मेंढ्यांचे कळप, त्यांच्याशी निकट संबंध झाल्यामुळे, ते इंद्रियांचे समुदाय तेच आपण आहो अशी मिथ्या भ्रांति जीवात्म्यास पडते, म्हणजे तिच्या योगाने आपण स्वत: मनुष्य आहो, आपण पुरुष आहो, आपण स्त्री आहो, आपण ब्राह्मणादि वर्ण आहो किंवा ब्रह्मचर्यादिसंपन्न अश्रमी आहो, इत्यादी तो मानतो आणि साक्षी, द्रष्टा आणि सच्चिदानंद असे आत्म्यानेच सिद्ध झालेले जे आपले स्वरूप ते तो विसरून गेलेला असतो. तशांत दृष्टांतांतील धनगरासारखा एकादा भेदवादी गुरु जर त्यास भेटला तर तो ' तूं संसारी आहेस, देह आहेस, कर्ता आहेस, भोक्ता आहेस, ' असा त्यास विपरीत बोध करून त्याचे अज्ञान दृढ करतो. त्याचीही त्यांत चांगलीच भर पडून तो अज्ञानी जीवात्मा आपल्या खऱ्या स्वरूपास पूर्णपणे विसरून जातो,

मोहात् विवेकेन क्रमन्ते निवृत्ति परम्॥

व 'आपण देहादिक आहो' असा आपल्या मनाचा मिथ्या ग्रह करून बसतो. पण क्वचित् जेव्हां त्या अज्ञानी जीवाच्या सुदैवाने त्याच्या गतजन्मार्जित अनंत पुण्यकर्मांचा उदय होतो आणि त्या पुण्यकर्मांचे फल देणाऱ्या जगदीश्वराचा जेव्हां त्यावर अनुग्रह होतो, त्याचवेळी एखादा वेदांत-शास्त्र अगदीं बरोबर समजलेला असून ब्रह्मनिष्ठ असा सद्गुरु त्यास भेटतो. नंतर अशाप्रकारचा सद्गुरु त्याची सर्व चांगली लक्षणे पाहून व त्याची मुमुक्षुता ध्यानांत आणून (दृष्टांतांत ज्याप्रमाणे पर्वतांतल्या सिंहाने त्या अज्ञ सिंहाला विचारले होते त्याप्रमाणे) त्यास पुढें लिहिल्याप्रमाणे प्रश्न करतो.

गुरु :— तूं कोण आहेस ? तूं ब्रह्मस्वरुप ओळखले आहेस काय ?

शिष्य :— मी मनुष्य आहे, मला ब्रह्मस्वरुप म्हणतात ते कसे ओळखतां येईल ?

गुरु :— अरे बाबा, हा तुझा देह मनुष्य आहे. देहाचा द्रष्टा तूं आत्मा देहाहून वेगळा आहेस, मनुष्य नाहींस, तू ब्रह्म आहेस. "मला ब्रह्मस्वरुप कसे ओळखतां येईल ?" असे जे तूं विचारीत आहेस ते केवळ अज्ञानानेच विचारीत आहेस.

शिष्य :— गुरुमहाराज, आपण म्हणतां की "तू ब्रह्म आहेस पण ब्रह्म म्हणून ज्यास म्हणतात ते मी कसे असूं

शकेल ? मी तर संसारी, सुखी, दुःखी, कर्ता, भोक्ता आहे अशी माझी खात्री आहे. यासाठी आपला उपदेश माझ्या अनुभवास येत नाही.

गुरु :-- हे मुमुक्षो, तू विचार करून पाहशील तर तुला असे समजून येईल की तुझ्या देहांत जो अहंकार आहे तो संसारी, सुखी दुःखी, कर्ता, भोक्ता इत्यादि असून दृश्य आहे. तूं द्रष्टा आहेस. तुझ्या देहाचे एकहि लक्षण तुझ्या आत्म्याच्या लक्षणाशी मिळत नाही. दृष्टांतांत ज्याप्रमाणे मेंढयांचे एकहि लक्षण सिंहाच्या लक्षणाबरोबर मिळाले नाही त्याप्रमाणे; परंतु ब्रह्माची सत्, चित, आनंद, इत्यादि लक्षणें तुझ्या आत्मस्वरुपाशी मिळतात (दृष्टांतांत ज्याप्रमाणे मेंढयांतल्या सिंहाची लक्षणे पर्वतातल्या सिंहाच्या लक्षणांशी जुळली त्याप्रमाणे) ज्याप्रमाणे ब्रह्म सत्य आहे, त्याप्रमाणे तूही जागृदादि तीनहि अवस्थांस जाणतोस, अर्थात् ज्ञानरूप आहेस; ब्रह्म जसे आनंदरुप आहे तसा तूंही परमप्रेमास्पद आहेस, अर्थात परमानंदरुप आहेस. तूं ब्रह्माप्रमाणे " जायते, अस्ति. " इत्यादि सहा विकाराविरहित आहेस. हा तुझा दृश्य देह असून जड, दुःखरुप आणि षड्विकार युक्त आहे. या देहाशी वास्तविक तुझा कांही संबंध नाही. केवळ आपल्या खऱ्या स्वरुपाच्या अज्ञानामुळे सुख, दुःख, कर्तुत्व, भोक्तुत्व वगैरे जे मूळचे अंतःकरणाचे

धर्म ते तूं भ्रांतीच्या योगाने आत्म्याच्या ठिकाणी कल्पिले आहेस. वास्तविक पाहतां तूं शुद्ध ब्रह्म आहेस. तुझ्यामध्ये संसार नाही याच अर्थाचे श्रीमद्भागवतांत एकादशस्कंधाच्या २८ व्या अध्यायांत श्लो० १५ श्रीभगवंताने उद्धवास सांगितलेले उपदेशपर वाक्य आहे, ते असे :--

॥ श्लोक ॥

शोकहर्षभयक्रोधलोभमोहस्पृहादयः ॥
अहंकारस्यदृश्यंते जन्ममृत्युश्च नात्मनः ॥१॥

भागवत ११।२८।१५

अर्थ ॥ शोक (दुःख), हर्ष (प्रसन्नता), भय (भीति) लोभ, मोह, स्पृहा (इच्छा), जन्म, मृत्यु, इत्यादि शब्दांनी व्यक्त होणारे कर्तुत्वभोक्तृत्वादि सगळे धर्म अहंकाराच्या ठिकाणी दृष्टीस पडतात, आत्म्याच्या ठिकाणी नाहीत, कसे ते पाहा. सुषुप्ति, समाधि इत्यादि अवस्थांत आत्मा असतोच; पण त्या अवस्थांत अहंकार लीन होत असल्यामुळे सुखदुःखादि धर्मांची प्रतीति होत नाही, परंतु जागृदवस्थेत अहंकार जागा असल्यामुळे सुखदुःखादि प्रतीतीस येतात; म्हणजे यावरून सिद्ध होते ते हे की वरील सर्व धर्म अहंकारांत असतात, व आत्मा निर्विकार आहे.

अशा रीतीने सद्‌गुरु जेव्हां बोध करतात तेव्हां शिष्य त्याचा सूक्ष्म विचार करून, देहाध्यास टाकून, "आपण स्वतः ब्रह्मस्वरुप आहो." असा निश्चय करून संसारदुःखापासून मुक्त होतो. परंतु दृष्टांतांत जसा पर्वतांतल्या सिंहाच्या उपदेशापूर्वी त्या अज्ञ सिंहाला "आपण मेंढा आहो" असा भ्रम झाला होता, त्याचप्रमाणे अज्ञानी जीवात्म्यालाही सद्‌गुरुच्या उपदेशापूर्वी, अनादिकालापासून होत आलेल्या चुकीच्या समजुतीने देहच आपण आहो असा भ्रम झालेला असतो.

या रीतीने पहिल्या चौपाईच्या पूर्वार्धांत जीवाला अनादिकालापासून चालत आलेल्या अज्ञानामुळे देहाध्यास होतो त्याचे वर्णन केले आहे; आता पुढे उत्तराधांत देहाध्यासाचे फळ जन्ममरणादिरुप संसाराचे दुःख प्राप्त होते त्याचे सद्‌गुरु वर्णन करितात.

" तें सारु फरे चोराशी लक्ष योनिने इति "

ज्या अर्थी जीव स्वतःचे खरे स्वरुप विसरून देहाच्या ठिकाणी अध्यास करतो त्या अर्थी त्यास लक्ष चौऱ्याऐंशीं योनी वारंवार फिरणे आणि पुनः पुनः जन्ममरण भोगणे कसे भाग पडते ते खाली दृष्टान्त दिला आहे त्यावरून नीट ध्यानांत येईल.

आंधळयाचा दृष्टांत

एका मोठ्या शहरांत एक आंधळा रहात असे. शहरांत होणाऱ्या अनेक प्रकारच्या त्रासामुळें शहराबाहेर जाऊन रहाण्याची त्यास एकवेळ इच्छा उत्पन्न झाली; इतक्यांत त्यास एक माणूस भेटला. त्यास त्या आंधळ्याने विचारले, 'अरे बाबा, शहराबाहेर जावयाचा रस्ता कोठें आहे?' तेव्हां त्या माणसानें उत्तर दिलें कीं, "या शहराला दरवाजा एकच आहे; म्हणून तूं शहराभोंवतीं असलेल्या कोटाच्या भिंतीला धरून धरून चालूं लाग.. असें चालतां चालतां ज्यांतून शहराबाहेर जाण्याचा रस्ता आहे असा जो दरवाजा तो तुझ्या हातास लागेल. तो हातास लागल्याबरोबर त्यांतून निघून बाहेर जा, म्हणजे तुझ्या मनांतला हेतु सिद्ध होईल." असे ऐकल्याबरोबर तो आंधळा त्यानें सांगितल्याप्रमाणें कोटाची भिंत धरून चालूं लागला. अशारीतीनें चालतां चालतां काहीं वेळानें तो दरवाजा आला, आणि त्याला त्याचा हात लागणार इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें, त्याच्या शरीरावर असलेल्या खरजोस किंवा गजकर्णास एकाएकी अतिशय खाज सुटली त्यामुळें चालतां चालतांच कोटाच्या भिंतीवरील हात काढून त्यानें तो गजकर्ण खाजवूं लागला. खाज बंद झाल्यावर पुन: तो आपला हात वर करतो तों ती कोटाची भिंत पहिल्याप्रमाणें त्याच्या हातास लागली. पण उपयोग काय? तो दरवाजा खाजवतेवेळी चुकून पुष्कळच मागे राहून गेला. अर्थातच त्या

मोठ्या शहरांत विनाकारण एकसारखे लांबच लांब फिरावे लागल्यामुळें त्यास पुन: मोठीं दु:खें सोसावीं लागलीं, तीं अशीं :--पायांत कांटे तर बोंचलेच, गांवांतल्या मलमूत्रांच्या मोऱ्यात तर कितीएक वेळां पडलाच वरून प्रखर उन्हाचा ताप तर सहन होईनासा झालाच, वाऱ्यानें धूळ उडून डोळ्यांत जाऊन खुपलीच, अशा अनेक यातना त्यास झाल्या. पुढें फिरतां फिरतां पुन: जेव्हां जेव्हां म्हणून तो त्या दरवाज्याजवळ येई, तेव्हां तेव्हां पूर्ववत् दुर्दैवानें त्याच्या खरजीस एकाएकीं खाज सुटावी, आणि ती खाजवीत खाजवीत तो चालत राहिल्यामुळें दरवाजा मागें रहावा, अशा रीतीनें पुन: पुन: फिरत राहिल्यामुळें त्यास महान यातना वारंवार भोगाव्या लागल्या

वरील दृष्टांताचा सिद्धान्त

आंधळ्याच्या ठिकाणीं अज्ञानी जीव समजावा. शहराभोवतालच्या कोटाच्या ठिकाणीं चौऱ्याऐशीं लक्ष योनी समजाव्या. दरवाजाच्या ठिकाणीं मनुष्यदेह जाणावा. खरजीच्या किंवा गजकर्णाच्या ठिकाणी विषयसुख समजावें. दृष्टांतांत सांगितल्याप्रमाणेंच अज्ञानी जीव चौऱ्यऐंशीं लक्ष योनी फिरत फिरत मनुष्य देहरूपमुक्तीच्या दरवाज्यांत आल्यावर, त्याला ब्रह्मनिष्ठ गुरूच्या उपदेशानें आपलें खरें स्वरूप जाणून घेतां येऊन, चौऱ्याऐशी लक्ष योनीच्या फेऱ्यांतून स्वत:स सोडवून, मोक्षसुखाचा लाभ करून घेतां येईल असें आहे. पण अज्ञानरूप अंधतेच्या योगानें, हा मनुष्यदेह मुक्तीचें द्वार आहे, यांत

मोक्षाचें साधन केलेंच पाहिजे, असें जीव समजत नाहीं, आणि नाना प्रकारचे विषयभोग व असदाचरणरूप ज्या खरजी किंवा जीं गजकर्णें त्यांच्या ठिकाणीं रत होऊन सर्व आयुष्य व्यर्थ घालवितो. म्हणजे खरजीस किंवा गजकर्णास कंडू सुटली असतां ती खाजवितांना जसा मनुष्याला अतिशय आनंद होतो, तद्वतच मरणकालपर्यंतही विषयांच्या भोगांत आनंद मानून, त्यावरील आपली आसक्ति तो जराही सोडीत नाहीं आणि परमेश्वरावर प्रीति करीत नाहीं. असें करतां करतां त्याच्या या कुडींतून प्राण निघून गेला म्हणजे त्याचें मनुष्यदेहरूप मोक्षद्वार हातचे गेले असे होऊन, चौऱ्याऐशीं लक्ष योनीचा कोट पुनः त्याच्या हातास लागतो. मग त्यांत बैल, घोडा, गाढव इत्यादी पशूंचीं शरीरे घेऊन त्यास महा-दुःखे भोगावीं लागतात. अशा पशूंच्या पाठीवर लोक तो वांकेपर्यंत ओझे लादून त्यास काठीने मारीत किंवा परा-ण्यांनीं टोचीत चालवितात. अशा पशूला कोणीं आठवणीने खावयाला दिले तर त्याला खावयास मिळावयाचे. एवंच त्या पशूच्या स्वाधीन असा कोणताही व्यवहार राहूं शकत नाहीं. अरेरे! काय त्या बिचाऱ्याला दुःख होत असेल ! चालतां चालतां अगदीं थकून गेला असला तरी "मी थकून गेलों आहें, मला चालवत नाहीं," असें त्या बिचाऱ्यास सांगतां येत नाहीं. त्यामुळे केवळ दुःख भोगणें हें मात्र त्याच्या कपाळीं येतें. मनुष्यदेह मिळाला असूनही त्यानें आत्मज्ञान

संपादन केले नाहीं त्याचें फल हें कीं, चौऱ्याऐंशीं लक्ष योनी त्यास फिराव्या लागत आहेत, आणि पुनः पुनः, पुनः पुनः जन्म, मरणाचें ओझें उचलावें लागत आहे. म्हणून मनुष्य-देह प्राप्त होऊनही जो जीव मोक्षाचे साधन न करतां अधर्मानें केवळ विषयोपभोगांत मग्न होऊन आपलें सर्व आयुष्य खर्च करितो, त्या जीवास मनुष्यदेह नष्ट झाल्यानंतर पश्वादिकांचे देह धारण करावे लागून विलक्षण दुःखे भोगावीं लागतात. प्रबोधसुधाकर नामक आपल्या ग्रंथांत. श्रीमच्छंकराचार्यगुरु म्हणतात :— 17 व श्लो.

॥ उपगीति–वृत्तम ॥

॥ नरदेहाऽतिक्रमणात् प्राप्तौ पश्वाऽऽदिदेहानाम् ॥
स्वतनोरप्यज्ञानं परमार्थस्यात्र का वार्ता ? ॥ १ ॥

अर्थ ॥ आत्मबोध झाल्यावांचून ज्या मनुष्याच्या आयुष्याचा क्षय होतो, त्याच्या देहाचा नाश झाल्यानंतर गतजन्मार्जित पापकर्माप्रमाणें पश्वादिदेह त्यास घ्यावे लागतात. त्या पश्वादिकांच्या योनींत पश्वादिकांस आपल्या शरीराचें सुद्धां पुरतें ज्ञान असत नाहीं, मग त्यांना अत्यंत सुखमय अशा परब्रह्माचे ज्ञान होईल ही गोष्टच कशाला बोलावयास पाहिजे ! तात्पर्य, -पशु, पक्षी वगैरेंच्या देहांत परब्रह्माचे ज्ञान उत्पन्न होऊ शकत

नाही तर मग पशु देहांत असते तरी काय ? असा प्रश्न एकाद्यास उद्भवलाच तर त्याचे उत्तर हेच की, या योनीत दुःख भोगण्याशिवाय दुसरे कांहीच नसते.

॥ आर्या–वृत्तम ॥ प्रबोधसुधाकरम्

सततं प्रबाह्यमाणैर्वृषभैरुष्ट्रैः खरैर्गजैर्महिषैः ॥
हा कष्टं क्षुत्क्षामैः श्रांतैर्नो शक्यते वक्तुम् ॥२॥

अर्थ ॥ बैल, उंट, गाढव, हत्ती, रेडा इत्यादि पशुजातीची जी शरीरे असतात त्यांच्या मानेवर अवजड बोजे ठेवून त्यांस मनुष्य चालवितात, त्यामुळे पराधीन होऊन ते पशु बोजे वहात मोठ्या कष्टानें चालतात. हर हर ! काय कष्टमय स्थिति ही ! भुकेप्रमाणे पोटभर खावयासही न मिळाल्यामुळे ते दुर्बल होऊन जातात, जड गाडे छकडे एकसारखे ओढावे लागल्यामुळे बिचारे थकून जातात, "पण आम्ही थकून गेलो आहों तरी आम्हांस सोडून द्या," असे कांही या बिचाऱ्यांस सांगता येत नाही. शिव शिव ! पशुशरीर धारण करावे लागले असतां जीवास किती दुःख होते ते प्रत्येक मनुष्यास आपल्या नजरेने प्रत्यक्ष पहावयास सांपडते. या निरूपणावरून इतके सिद्ध झाले की, आत्मज्ञानावांचून मनुष्यदेह नष्ट झाल्यानंतर चौऱ्याऐशीं लक्ष योनीत जावे लागून जीवास जन्ममरणाच्या पायी अनेक प्रकारची दुःखे आरंभापासून अखेरपर्यंत भोगावी लागतात. कशी ती पहा—–अगदी आरंभी जेव्हा जीव मातेच्या उद-

रांत गर्भवासांत असतो, तेव्हा त्यास त्या ठिकाणी मल, मूत्र, रक्त, मांस, हिरव्या पिवळ्या कफादि धातू, जंत व जठराग्नि या सर्वांच्या योगाने अनेक प्रकारची दुःखे होतात. नरकवास आणि गर्भवास यांत यत्किंचितही फरक दिसून येत नाही. इतकेच नाही, तर गर्भवास हाच सर्वांत मोठा नरक आहे असें दिसते. पुढे जन्माच्या वेळीही, म्हणजे मातेच्या उदरांतून बाहेर पडतेवेळीही, प्राण्याला व त्याच्या मातेला जे दुःख होते ते अवर्णनीय असते. त्यावेळी होणारे दुःख किती असते ते त्या प्राण्याला व त्याच्या आईलाच मात्र कळते, इतरांस कळण्यासारखे नसते. बाळपणी पराधीनतेमुळे, तरुणपणी विषयांच्या इच्छेमुळे व म्हातारपणी अशक्ततेमुळे, नाना प्रकारच्या रोगामुळे आणि स्त्रीपुत्रादिकांकडून होणाऱ्या अनादरामुळे जीवाला अत्यंत दुःख होते याचा अनुभव मनुष्यमात्रांस पूर्णपणे येतो ही गोष्ट महशूर आहे. आतां शेवटी म्हणजे मरणसमयीही जन्माप्रमाणेच, म्हणजे असंख्य विंचवांनी एकाच वेळी एकाच ठिकाणी नांग्या मारल्या तर प्राण्यास जितके दुःख होईल, तितकेच दुःख या मरणारास सर्व शरीरभर होते; किंवा जिवंत माणसाचे हात, पाय, इत्यादि अवयव करवतीने कापले असतां त्यांस जितके दुःख होईल तितकेच मृत्यूसमयी जीवास होते. अशारीतीने अज्ञानी, पराधीन, आणि पापी जीवांस आरंभापासून अखेरपर्यंत वारंवार जन्ममरणादि दुःखे भोगावी लागतात. त्याविषयी दृष्टान्त देऊन शंकरानंदमुनींनी आत्मपुराणांत सांगितले आहे की :—

॥ श्लोक ॥

जातो बालो युवा वृद्धो मृतो जातः पुनस्तथा ॥
बंभ्रमीत्येष संसारे घटीयंत्रसमोऽवशः ॥ १ ॥

अर्थ ॥ हा अज्ञानी जीव, संसारचक्रावर घटीयंत्राप्रमाणें, म्हणजे ज्याप्रमाणें विहिरीवरील रहाटगाडग्याची माळ एकसारखी खालीं जाते, वर येते, खालीं जाते, वर येते तसा, किंवा ज्याप्रमाणें कुंभाराचें चाक अथवा घाण्याचा बैल, हीं एकसारखीं फिरत असतात त्यांच्याप्रमाणें, परवश होऊन थकून जन्म घेतो, बालक होतो, तरुण होतो, वृद्ध होतो व शेवटीं मरतो. नंतर फिरून तो जन्म घेतो आणि पूर्ववत् अज्ञानानें स्वस्वरूप विसरून जाऊन, जन्ममरणरूप रहाटगाडग्याचे फेरे मारमारून महायातना भोगतो. या प्रकारानें वर्णिलेल्या चौऱ्याऐशीं लक्ष योनीतलीं दुःखे ऐकून शिष्याच्या मनांत अत्यंत भय उत्पन्न झाले, आणि ह्या आपल्या दुःखाचा कोणत्या रीतीनें परिहार होईल अशी त्यास काळजी उत्पन्न झाली. नंतर एकाएकीं स्मरण झाल्यामुळें सद्‌गुरुला शरण जाऊन जन्ममरणादि दुःखांपासून निवृत्त होण्यासंबंधाचे प्रश्न त्यानें त्यास विचारले, त्या प्रकाराचें दुसऱ्या चौपाईंत क्रमशः निरूपण केलें आहे.

॥ चौपाई ॥

जन्म मरण केम टळशे भाई,
साधुनो समागम करीए जाई ॥
जन्म मरण केम टळशे महारे,
हुं कोण छुं एवो विचार करे तबारे ॥ २ ॥

अर्थ ॥ अनेक जन्मांमध्यें निष्काम केलेल्या वैदिक शुभ कर्मांच्या समुदायांच्या फलप्राप्तीनें व प्रसन्न झालेल्या ईश्वराच्या अनुग्रहानें शांति, दांति, श्रद्धा, इत्यादि साधनांनी संपन्न झालेल्या जिज्ञासूला या आपल्या जन्ममरणांचें मोठें दुःख कसें टळेल ? म्हणजे कोणत्या उपायानें निवृत्त होईल ? अशी जर जिज्ञासा उत्पन्न झाली, तर या मुमुक्षुनें खऱ्या साधूजवळ जाऊन त्याचा समागम करावा.

शिष्य :——महाराज, साधु शब्दाचा अर्थ काय ? कौपीन (लंगोट), तुंबा इत्यादिकांचें धारण करून केवळ बाह्यवेषेंकरून लोकांस फसवून स्वतःचा निर्वाह करीत जो जगभर फिरत असतो तोच साधु, कीं साधूचीं लक्षणें यांहून कांहीं वेगळीं आहेत ? ज्या लक्षणांवरून खऱ्या साधूच्या स्वरूपाची ओळख पटल्यावर त्याचा समागम केल्यानें जन्ममरणाचे क्लेश निवृत्त होतात, तीं साधूचीं लक्षणें मला कृपा करून सांगावीं.

गुरु:-अरे बाबा, तो साधु, कीं जो स्वधर्माचा त्याग करीत नाहीं, ज्याच्या ठायीं सर्वदा समदृष्टी, वैराग्य, शांति, दांति, धैर्य, दया, अदंभ, अमान, अक्रोध, क्षमा, अद्वेष, शुचित्व, इत्यादि शुभ गुण असतात. असा साधु 'श्रोत्रिय' (वेद व वेदार्थ जाणणारा) 'ब्रह्मनिष्ठ' (ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं निष्ठा धारण करणारा) या दोन विशेषणांनीं मुख्यत्वेंकरून पूर्णपणे युक्त असला तर त्यास (साधु) सद्गुरु म्हणावें व अशा सद्गुरुचा समागम मुमुक्षूनें करावा.

शिष्य:- आपण सद्गुरुचीं (साधुचीं) श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ अशीं दोन लक्षणें विशेषेंकरून सांगितलीं, पण त्यापैकीं एकाच विशेषणानें युक्त असा सद्गुरु असला तर त्याच्यापासून कल्याणकारक बोध होऊं शकेल किंवा नाहीं ?

गुरु:- एकाच विशेषणानें युक्त अशा गुरुपासून निःसंशय बोध होऊं शकत नाहीं, यासाठीं वर सांगितलेल्या दोनही विशेषणांनी युक्त अशा सद्गुरुला शरण जावे. याविषयीं तुला एक दृष्टान्त सांगतों :—

स्वदेशीं जाणाऱ्या पुरुषाचा दृष्टांत

कोणी एक स्वदेशीं जावयास निघालेला गृहस्थ आपल्या रस्त्यानें चालला होता. त्याला वाटेंत एक नदी लागली.

तोंतून पार जाण्याच्या हेतूनें त्यानें नदीच्या कांठावर राहणाऱ्या लोकांस विचारलें कीं, "मला नदीच्या पार जातां यावें यास काय उपाय करावा?" ते ऐकून शरीरानें पुष्ट असून मजबूत व चालण्याच्या कामांत अगदीं पटाईत, पण बेटा डोळ्यांनी आंधळा, असा एक त्यांच्यापैकींच इसम पुढें येऊन त्या गृहस्थास म्हणाला कीं, "माझ्या खांद्यावर तुम्ही बसलां तर मी तुम्हांस नदीच्या पार नेईन." त्या आंधळ्याचे तें बोलणें ऐकून नदीपार जाणाऱ्या गृहस्थाच्या मनांत असा विचार उत्पन्न झाला कीं; हा बेटा आंधळा असल्यामुळें याला स्वतःला नदीचा पार तर बिलकुल दिसत नाहीं. असें आहे तर हा मला पार कसा घेऊन जाईल? केवळ याच्या विश्वासावर जाणें हें मोठें धोक्याचें आहे असें त्यास वाटून त्यानें त्या आंधळ्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. इतक्यांत डोळ्यांनीं उत्तम दिसत होतें असा एक त्याच कांठावर बसलेला पांगळा सदरील गृहस्थास म्हणाला कीं, "अहो, तुम्हांला कोणाच्याही बरोबर जाण्याची जरूर नाही. तुम्ही स्वतःच मी सांगतो तसे जा म्हणजे झालें. नदींत पाणी अगदीं थोडें आहे हें मला पक्कें ठाऊक आहे. यासाठीं मी सांगतों त्या मार्गानें जाल तर सहज पार निघून जाल." असें म्हणून तो कसें कोठून जावयाचें तें तोंडानें सांगून हातानें दाखवूं लागला. तो म्हणाला " या कांठावरून खालीं पाण्यांत उतरून सुमारें वीस कदम सरळ चालत गेल्यावर उजवीकडे जरासे वळून चालूं लागा, म्हणजे कोणत्याही अडचणीवाचून पार जाल." हें त्या पांगळ्याचें

बोलणें त्या पार जाण्याची इच्छा करणाऱ्या गृहस्थानें ऐकलें, पण त्याच्याही बोलण्यावर त्याचा विश्वास बसेना. कारण तो आपल्याशींच विचार करून म्हणाला, "या मनुष्याला स्वतःला पाय नाहींत, अर्थातच कोणत्याही दिवशीं हा स्वतः नदींतून गेलेला नाहीं, त्यामुळें नदींत पाणी थोडें आहे कीं पुष्कळ आहे तें याला ठाऊक नाहीं हें उघडच आहे. अशा स्थितींत याच्या केवळ बोलण्यावर भरंवसा धरून मी नदींत उतरून चालूं लागलों आणि कांहीं अंतरावर गेल्यावर पाणी जास्त खोल लागून माझी बुडण्याची वेळ आलीच तर मग हा पांगळा मला काय सहाय्य करणार ?" असे मनांत आणून त्यानें त्यांचेंही बोलणें कबूल केलें नाहीं. म्हणजे यापासून निष्पन्न झालें तें हें कीं, वस्तुतः तो पांगळा सांगतो आहे तें अगदीं खरें आहे. शिवाय नदींत पाणी थोडें आहे हेंही खरें आहे तरीपण तें सांगणारा स्वतः पांगळा असल्यामुळें त्याच्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसला नाहीं म्हणून तो गेलाही नाहीं. इतके होत आहे तोच त्या गृहस्थाच्या सुदैवानें नदीच्या कांठावर तिसरा एक मनुष्य त्याला भेटला. त्याला डोळ्यांनीं चांगलें दिसत होतें, पायांनीं चांगले चालतां येत होतें आणि तो नदींतून पोहून जाण्यास समर्थ होता. त्यानें त्या पार जाणाऱ्या गृहस्थास म्हटले कीं, "बाबा, मजबरोबर चल, मी तुला पार नेतों." तेव्हां त्या तिसऱ्या मनुष्याच्या बोलण्यावर त्याचा भरंवसा तेव्हांच बसला आणि त्याच्या मदतीनें तो नदी पार उतरून आपल्या गांवी गेला.

वरील दृष्टान्ताचा सिद्धान्त

ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति व्हावी अशी इच्छा करणारा मुमुक्षु त्याला दृष्टांतांतल्या स्वदेशीं जावयाची इच्छा करणाऱ्या गृहस्थाच्या ठिकाणीं समजावें; जन्ममरणरूप ज्यांत प्रवाह आहेत अशा संसाराला नदीच्या ठिकाणीं समजावें; परमात्म्याची जी प्राप्ति तिला नदीच्या पैलतीराच्या ठिकाणीं समजावें. श्रोत्रिय म्हणजे केवळ शास्त्रज्ञ जो पुरुष त्याला नदीच्या काठांवरील आंधळ्याच्या ठिकाणीं समजावें. या श्रोत्रियाला शास्त्रनिरूपण रूप पायांतला जोर आहे; पण पैलतीरावर असलेलें ब्रह्मस्वरूप यानें कधींही पाहिलेलें नाहीं, यासाठीं एकदेशी श्रोत्रिय गुरूच्या आश्रयानें स्वस्वरूपाची प्राप्ति होऊं शकत नाहीं. केवळ एकदेशी जो ब्रह्मनिष्ठ त्यांस पांगळ्याच्या ठिकाणीं समजावें. त्याला गुरुकृपेनें ब्रह्मस्वरूपाचे जें अपरोक्ष ज्ञान त्याचप्राच रूपाचे चक्षु मिळाले आहेत. तो संसारनदीचा पार जें परब्रह्म त्यास यथार्थ जाणतो हें खरें, पण त्याला वेदवाक्यांचीं प्रमाणें देऊन युक्तीनें दुसऱ्यास उपदेश करण्याचे पाय नाहींत, त्यामुळे तो दुसऱ्याला ब्रह्मप्राप्ति करून घेण्याचे उपाय दाखवून "ही संसाररूप नदी तुच्छ आहे आणि ईश्वराचा अनुग्रह झाला असतां, जसें गाईच्या खुराइतक्या पाण्यांतून तरून जाणें अगदीं सुलभ असतें तशी तरून जाण्यास सुलभ आहे, आणि परमेश्वर एक, अद्वितीय, अनंत, असंग, सक्रिय, निर्विकार, निराकार, निर्गुण, नित्य,

प्रत्यगात्मा देहत्रयाहून वेगळा, अवस्थात्रयाचा साक्षी, पंचकोशातीत, व्यापक; दृष्टा; स्वयंज्योति, सच्चिदानंदरूप असा आहे, आणि त्याचे ज्ञान झाले असता संसारनदीतून क्लेशावांचून इतकेंच नव्हें पण मोठ्या सुखानें पार जाशील," असें जें तो दुसऱ्यास बोलून दाखवितो तें सर्व जरी अक्षरशः खरें आहे, तरी त्याच्या बोलण्यावर मुमुक्षूचा विश्वास बसत नाहीं. कारण असें कीं, तो श्रुतिस्मृतींतल्या वाक्यांचीं प्रमाणें सांगत नाहीं, त्यामुळें त्याच्या स्वतःच्या वाक्यांत सुद्धां संदेह राहतो. यासाठीं दृष्टांतांत नदीपार जाणारा गृहस्थ ज्याप्रमाणें डोळस आणि पायीं चालत जाणाऱ्या मनुष्याच्या सहाय्याने नदी उतरून पार गेला त्याप्रमाणें 'श्रोत्रिय' आणि 'ब्रह्मनिष्ठ' या दोन विशेषणांनीं युक्त अशाच सद्गुरुच्या साहाय्यानें संसारनदीतून पार जातां येते, नाहीं तर नाहीं. यासाठीं अशाच सद्गुरुला शरण जावें.

गुरूला शरण जाण्याविषयीं प्रमाणें

उपनिषत 1-2-12, विवेकचूडामणि 36 ते

शिवाय अथर्ववेदाच्या 'मुण्डक' उपनिषदांत सुद्धां जिज्ञासूनें समिधादि उपहार हातांत घेऊन, विनयनत होऊन, परमतत्त्वज्ञान प्राप्त व्हावे या हेतूने, 'श्रोत्रिय' आणि 'ब्रह्मनिष्ठ' या दोन विशेषणांनीं युक्तच गुरुला शरण जावें. असें स्पष्ट निरूपण करून सांगितलें आहे. त्याचप्रमाणें भगवद्गीतेच्या चवथ्या अध्यायांत श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे कीं :—

॥ श्लोक ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥१॥

मुं. उ. 1-2-12　　　　　　　　　　　गी. अ. ४ श्लो. ३४

अर्थ ॥ सद्गुरुला साष्टांग नमस्कार करून बंध म्हणजे काय, मोक्ष म्हणजे काय, विद्या कशाला म्हणावी, अविद्या कोणाला म्हणावी, आत्मा कोण, परमात्मा कोण, व त्या दोघांची एकता कशी जाणावी, इत्यादि प्रश्न त्यास विचारून व त्याची सेवा करून त्यास प्रसन्न करून घेऊन त्याच्यापासून परमश्रेष्ठ मोक्षाचें साधन अद्वितीय, असें परमात्म्याचे ज्ञान ते बा जीवा, समजावून घे आणि तसें घेतलेंस म्हणजे ज्ञानी (श्रोत्रिय) व तत्त्वदर्शी (ब्रह्मनिष्ठ) असा जो सद्गुरु तो तुला ज्ञानाचा उपदेश करील.

त्याचप्रमाणें श्रीमद्भागवतांत एकादशस्कंधाच्या तिसऱ्या अध्यायांत प्रबुद्ध नांवाच्या योगीश्वरानें जनकराजाला सांगितलें आहे कीं :--

॥ श्लोक ॥

तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ।
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम्॥१॥

अर्थ ।। ज्या अर्थी इहलोकांतले व परलोकांतले सर्व विषय-भोग कर्मजन्य असल्यामुळें नाशवंत असून दुःख देणारे आहेत, त्या अर्थी उत्तम (नाशरहित परमसुखमय) श्रेय (मोक्ष) जाणून घेऊन, तें प्राप्तकरून घेण्याची इच्छा करणारा जो मुमुक्षु त्यानें वेदाचा खरा अर्थ जाणणारा म्हणजे श्रोत्रिय असून जो परब्रह्माचा अपरोक्ष (प्रत्यक्ष) अनुभव घेऊन त्यास ओळखणारा शांत ब्रह्मनिष्ठ सद्गुरु असेल त्यास शरण जावें.

शिष्य :––अशा सद्गुरुला शरण जाऊन काय करावें ?

गुरु :––त्याच्याजवळ जाऊन खालीं लिहिल्याप्रमाणें त्यास मुमुक्षूनें प्रश्न करावें, "जन्ममरण केंम टळसे महारे ?" हे दयाळ गुरु, या संसारात मला जन्ममरण प्राप्त होतें तें नाहींसें कसें होईल ? काय जप करून, कीं तप करून, कीं तीर्थ करून, कीं यज्ञादिक कर्म करून, कीं दुसरीं कोणतीं साधनें करून, नाहींसें होईल ? आणखी त्या वेळेला आपण कोण आहों" अशाविषयींचा आपल्याशींच होईल तितका विचार करून त्यानें "मी कोण आहे ?" असा प्रश्न सद्-गुरुला करून, "हा स्थूल देह दिसतो तो मी, कीं हीं इंद्रियें मी, कीं प्राण, मन, अहंकार म्हणतात ते मी, कीं या सर्वांचा जो समुदाय तो मी, किंवा त्या सर्वांहूनही मी कोणी निराळाच आहे, तें कृपा करून मला सांगावें" असें म्हणावें.

या प्रकारचे शिष्याचे जिज्ञासेचे प्रश्न ऐकून सद्गुरु जन्ममरण नाहींसें करण्याचा उपाय सांगतो तो असा–

॥ चौपाई ॥

सद्गुरु कहे स्वस्वरूप जाण,
एटले तारुं जन्म टलेश एप्रमाण ॥
तारा जन्ममरणनो कागळ फाटे,
सद्गुरुवचने विश्वास रोंख एमाटे ॥ ३ ॥

टीका ॥ सद्गुरु म्हणतो कीं,–हे मुमुक्षो, तूं आपल्या स्वतःच्या रुपाला जाण. म्हणजे आपण स्वतः सच्चिदानंदरुप आहों, देह, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धी, यांचा साक्षी असा प्रत्यगात्मा आहो, आणि देहेंद्रियादिकच आपण नसून देहचे वर्णाश्रमादिक धर्म व इंद्रियाचे आंध्यबधिरतादिक धर्म हे दोनहीं आपल्या स्वरुपांत नाहींत, तर आपण केवळ शुद्ध चैतन्यरुप आहों असें ज्ञान जेव्हां तुझ्याठिकाणी दृढ होईल; त्याच वेळीं तुझे जन्ममरण टळेल (निवृत्त होईल) हें अगदीं प्रमाणसिद्ध आहे. याच स्पष्टिकरण करणारीं अनेक वचनें श्रुतींतही आहेत, त्यांपैकीं कांहीं पुढील अर्थाचीं आहेत.—"ज्ञानानेंच मोक्ष होतो." "त्या आत्म्याला जाणूनच जीव मृत्यूच्या तडाख्यांतून सुटून मोक्ष पावतो." "ज्ञानावांचून दुसरा कोणताहि मार्ग मोक्ष देणार नाहीं." इत्यादि. तसेंच स्मृतींतही सांगितलें

नावांचून केवळ जपतपकर्मादिकांच्या योगानें मोक्ष मिळत नाहीं. कारण तीं कर्में अंतःकरणशुद्धीची साधनें मात्र आहेत, परंतु मोक्षाचें साधन केवळ ज्ञानच आहे," इत्यादि. ज्याप्रमाणें स्वयंपाक करावयाचा असला तर लांकडें, भांडी, धान्य इत्यादि. त्यांचीं जीं केवळ साधनें असतात तितक्यांनींच स्वयंपाक सिद्ध व्हावयाचा नाहीं तर तो सिद्ध होण्यास अग्नीचें साहाय्य पाहिजे. त्याचप्रमाणें ज्ञानावांचून मोक्ष प्राप्त होत नाहीं. त्यासाठीं तुझें स्वतःचें रूप तूं अगोदर ओळख, याप्रमाणें चौपाईच्या पूर्वार्धांत ज्ञानाच्या योगानेंच जन्ममरणादि दुःखांची निवृत्ति होते असें जें सांगितलें आहे तें श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांवरून अगदीं यथार्थ आहे असें निरूपण करून, आतां पुढें उत्तरार्धांत तें ज्ञान प्राप्त होण्यासाठी व जन्मादि दुःखांचीं कारणें जीं पापादि कर्में त्याची निवृत्ती होण्यासाठीं ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच्या सदुपदेशावर विश्वास ठेवावा अशाविषयीं निरूपण केलें आहें, तें असें :—
"तारा जन्ममरणनो कागळ फाटे" इत्यादि. म्हणजे तुला जन्ममरण देणारी जो ललाटपत्रिका, तिच्या चिंध्या चिंध्या होतील. याचा स्पष्ट अर्थ इतकाच कीं, जर तूं सद्गुरुच्या उपदेशवचनावर विश्वास ठेवशील तर तुला जन्ममरण देणारी जी तुझी ललाटपत्रिका आहे तिचे तुकडे तुकडे होऊन तुला पुनः जन्ममरणदुःख होणार नाहीं.

शिष्य :--गुरुमहाराज, आपण जन्ममरणाची ललाट-पत्रिका म्हटली, तिचा अर्थ काय बरें ?

गुरु :--सांगतो ऐक. प्रत्येक जीव पापपुण्यादि जीं जीं कर्मे करतो, त्यांचा हिशेब यमराजाचा कारभारी चित्रगुप्त म्हणून आहे तो ठेवीत असतो. आणि नंतर यमराज त्या त्या कर्माप्रमाणें त्याची ललाटपत्रिका तयार करून त्याला जन्मादिद्वारें सुखदुःखादि फल देतो. त्यामुळें लक्षचौऱ्याएंशी योनी प्रत्येक जीवाला फिराव्या लागतात असें पुराणांत सांगितलें आहे. जन्ममरण देणारी ललाटपत्रिका ती हीच. यासाठीं सद्‌गुरु जो जीवाच्या सच्चिदानंदमय अशा आत्म्याच्या संबंधानें त्यास उपदेश करतो, त्याच्या वचनावर दृढ विश्वास धरून त्याचा अनुभव जीव घेईल तरच ती ललाटपत्रिका फाटून जाईल. म्हणजे जन्ममरणाचें दुःख टळेल. हें स्थूल रीतीनें समजावें, या हेतूनें तुला एक दृष्टान्त सांगतों ऐक.

विष्णुदत्त सावकाराचा दृष्टान्त

कोणी एक सावकार होता. त्यानें मूर्खपणानें कांहीं दुर्जनांबरोबर व्यापाराचा संबध ठेवल्यामुळें त्याच्या सर्व द्रव्याचा नाश झाला, इतकेंच नाहीं, पण उलट तो कर्जबाजारी झाला. पुढें लवकरच जेव्हां त्याच्या सावकारांनीं त्यास आपल्या येण्यासंबंधानें नाना प्रकारांनीं दुःख देण्यास प्रारभ केला;

तेव्हां आपण कोणाची तरी चाकरी पत्करून काय मिळेल त्यांतून थोडेथोडें देऊन सावकाराचें कर्ज फेडावें असा त्यानें विचार केला. त्याप्रमाणें तो हलक्या पगारावर किराण्या व्यापाऱ्याची किंवा कापडवाल्याची चाकरी करूं लागला. पण त्याबद्दल जे त्यास वेतन मिळे तें सारें दोनशें रुपये वर्षास. तितक्यांत जेमतेम उदरनिर्वाह होण्याचीसुद्धां मारामार, मग त्यांतून सावकाराचें व्याज त्याला कसें द्यावयास मिळणार? असें होतां होतां सहजच देणें जसजसें दिवसेंदिवस जास्त वाढत चाललें, तसतसें त्याचे धनको अतिशय तगादा करून त्यास जास्त जास्त दुःख देऊं लागले; त्या धनकोंतच एक त्या कर्जबाजारी सावकाराचा हितेच्छु व दयाळु असा मित्र होता. तो त्यास म्हणाला, "अरे बाबा! अशा हलक्या पगाराची निर्धन पुरुषाची चाकरी करून तुझी कर्जांतून मुक्तता कधींसुद्धां व्हावयाची नाही, यासाठीं तुला एक उपाय सांगतों तो कर. या गावांत विष्णुदत्त नांवाचा एक मोठा सावकार आहे; तो अतिशय सधन आहे; व उदारही पण तसाच आहे; त्याला शरण जाऊन, पगार मागितल्याशिवाय आपलें शरीर व मन त्याच्या कामास वाहून त्याचें काम तें आपलें स्वतःचेंच काम आहे असें समजून, तो सांगेल तें काम प्रामाणिकपणानें आणि निष्कपटानें कर. त्याबद्दल तो पगार देऊं लागला तर, 'पगार आपणांस नको' असे तूं म्हण, आणखी असेंही म्हण कीं "अन्नवस्त्रावांचून मला तूर्त कशाचीही जरूर नाहीं."

असें तूं केलेंस म्हणजे तुझ्यावर त्याचा पूर्ण लोभ जडेल, आणि तसा त्याचा लोभ जडला म्हणजे तुला आपलासाच समजून तो आपण होऊन तुला तुझ्या कर्जांतून मुक्त करील." असें त्या हितचिंतकाचें भाषण ऐकून तो कर्जदार नित्य विष्णुदत्त सावकाराकडे जाऊं येऊं लागला व त्या योगानें लवकरच त्याचा स्नेह संपादून त्याची त्या हितचिंतकानें सांगितल्याप्रमाणें तो चाकरी करूं लागला. तेव्हां त्या विष्णुदत्तानें त्याचा पूर्ण प्रामाणिकपणा पाहून, व पगार घेतल्याशिवाय हा आपली चाकरी करतो आहे हें लक्षांत आणून त्याला कांहीं दिवसांनी आपल्या मुख्य मुनीमाची जागा दिली. त्या अधिकाराचें काम तो करीत असतां दोन तीन वर्षें लोटली. हा आज चांगल्या ठिकाणीं मुख्य मुनीमाच्या जागेवर असल्यामुळें आपला पैसा आज नाहीं उद्यां खचित देईल अशी आशा मनांत बाळगून, विचार करून व धीर धरून, त्याच्या जुन्या धनकोंनी तितक्या अवधींत आपल्या पैशाबद्दल त्याच्याजवळ ब्र सुद्धां काढला नाहीं. त्यानेंही देतां आलें नाहीं म्हणून मागणाऱ्या धनकोंस तितक्या मुदतींत कांहींच दिलें नाहीं. त्यामुळें त्या धनकोंपैकीं एकजण सहज अतिशय त्रासून एक दिवस तो मुनीम रस्त्यानें जात आहे असें पाहून, त्यानें— काय बोलावयाचें तें पढवून आपल्या एका मनुष्यास

त्याच्याकडे पाठविलें. तो मनुष्य मोठ्या तिरस्कारानें व त्याच्या वर्मी लागतील अशा कठोर शब्दांनीं, जें बोलूं नये ते बोलला. तें ऐकून तो कर्जबाजारी मुनीम अतिशय खिन्न झाला आणि तसाच मुकाट्यानें आपल्या यजमानाच्या घरीं गेला. त्याला उदास पाहून यजमानानें विचारलें, "मुनीमसाहेब, आज आपण असे उदास कां दिसतां ?" असें यजमानानें विचारल्याबरोबर त्याच्या डोळ्यांत खळकन् टिपें आलीं. तेव्हां पुनः यजमानानें विचारलें कीं, "मुनीमसाहेब, तुम्हांला इतकें मोठे दुःख तें कोणतें झालें आहे तें मला सांगा तर खरें ? मी तुमचें दुःख घालविण्याचा प्रयत्न करीन. माझ्यापाशीं आपलें दुःख सांगावयास अगदीं लाजूं नका किंवा भिऊंही नका." असें त्याचें आश्वासन मिळाल्याबरोबर मुनीम सांगू लागला कीं, "मी कांहीं कालापूर्वी मूर्खपणानें दुर्जनांच्याबरोबर व्यापार करीत होतो. त्यामुळें माझी सर्व संपत्ति मी घालवून बसलों. इतकेंच नाहीं, तर उलट कर्जबाजारी झालों आहे. मी आपल्याकडे चाकरीस राहिलो आहे असें पाहून चाकरीस राहिल्यापासून आजमितीपर्यंत माझ्या धनकोपैकीं कोणींही आपल्या पैशासंबंधानें मजजवळ गोष्ट काढली नाहीं; पण आजच सकाळी मी रस्त्यानें चाललों असतां त्या धनकोपैकीं एकाच्या चाकरानें मला भरबाजारांत उभा करून, ऐकूं नयेत अशा कठोर शब्दांनीं ताडन करून, माझी पुरी इज्जत घेतली,

त्यामुळे माझ्या मनाला अतिशय वाईट वाटलें. या कारणानें मी सहजच आपणांस खिन्न व उदास दिसत आहे" ते ऐकून यजमान म्हणाला, "अरे भल्या माणसा, असें होतें तर यांतलें कांहींही आजतागाईत माझ्या कानावर कसें घातलें नाहींस ? घातलें असतेंस तर तुला यापूर्वीच केव्हांच कर्जांतून मुक्त करून टाकलें असतें. असो, चिंता नाहीं, झालें तें झालें. तुझ्या धनकोंपाशीं तूं लिहून दिलेले दस्तैवज आहेत कीं नाहींत? असतील तर त्या धनकोंची नांवें मला सांग पाहूं !" हें ऐकून मुनीमानें आपल्या सर्व सावकारांची नांवें त्यांस सांगितली. त्याबरोबर सर्व धनकोंस यजमानानें बोलावून आणून त्यांस सांगितलें कीं, "यानें जें तुमचें देणें आहे, त्या सर्वांचा मी निकाल करतों तो तुम्हाला कबूल असला पाहिजे." मुनीमालाही यजमानानें विचारलें कीं, "मी ज्या रीतीनें तुमच्या देण्याचा निकाल लावीन त्यावर तुमचा विश्वास बसेल ना?" त्यावर मुनीमानें सांगितलें, आपण जें कराल तें मला कबूल आहे." त्याबरोबर यजमानानें सर्व धनकोंची बरोबर समजूत घालून कर्जाची फेड करून त्यांच्याकडून सर्व दस्तैवज फाडविले, आणि आपल्या कर्जदार मुनीमाला कर्जांतून मुक्त केलें.

वरील दृष्टांताचा सिद्धांत

मूर्ख जो जीव त्यानें कामक्रोधादि षड्रिपुरूपी दुर्जनांच्या

संगतीनें आत्मबोधरूप आपलें सर्व धन घालवून टाकलें. आपण संसारी, कर्ता, भोक्ता, इत्यादि आहों असें जे त्यानें अज्ञानानें मानिलें, त्याच्या योगानें व आपल्या पापपुण्यादि कर्माच्या संबंधानें, तो यमराजाचा कर्जदार झाला. तेव्हां त्या त्या पापपुण्यादि सर्व कर्मांचीं फळें फिरून भोगण्यासंबंधीचा स्पष्ट उल्लेख यमराजानें त्याच्या ललाटपत्रिकेंत करून दस्तऐवज करून ठेवला. त्याच्या योगानें जीवाला पुनः पुनः जन्म घेऊन मरावें लागत आहे. तेव्हां स्वकर्मांची फळें म्हणून प्राप्त झालेल्या आपल्या जन्मादि दुःखांपासून मुक्त व्हावें या हेतूनें जीव एका गुरूस शरण गेला. पण तो गुरु त्याच्या दुर्दैवानें द्वैतवादी निघाल्यामुळें त्या जीवानें त्याची किती तरी सेवा केली; तथापि जन्ममरणादि दुःखांपासून सुटका होण्याविषयींचा त्या गुरूपासून त्यास सदुपदेश न लाभल्या-मुळें त्याचें दुःख जसेंच्या तसेंच राहिलें. इतकेंच नव्हे, पण उलट संसाराच्या क्लेशांनी त्यास अधिकाधिक पीडा मात्र होऊं लागली. असा कांहीं काल गेल्यावर जीवाच्या पूर्वीच्या कांहीं पुण्याईनें सन्मार्गानें जाणारा असा एक ज्ञानसंपन्न मित्र त्यास भेटला आणि त्यास म्हणूं लागला, "अरे बाबा, असले भेदवादी गुरू धनहरण करणारे मात्र असतात. अशांची सेवा केल्यानें शोकजन्ममरणरूप दुःखाची निवृत्ति कदापि होणार नाहीं; अर्थात् परमपदाची प्राप्तीहि होणार नाहीं यासाठीं अशा गुरूचा त्याग करून एखाद्या श्रोत्रिय,

ब्रह्मनिष्ठ, वैराग्यसंपन्न आणि दयाळू अशा सद्गुरुला शरण जाऊन निष्कपटानें, निष्काम बुद्धीनें, कायेनें, वाचेनें आणि शुद्ध अंतःकरणानें त्याची सेवा कर, आणि ती केलीस म्हणजे तो तुझ्यावर प्रसन्न होऊन तुझी जन्ममरणरूप ललाट-पत्रिका जी यमराजाच्या दरबारांत लिहिली गेली आहे ती फाडून टाकण्याचा उपाय तुला सांगेल." असें त्या मित्राचें बोलणें ऐकून, एका ब्रह्मवेत्त्या सद्गुरूस शरण जाऊन त्याचें आराधन करून त्यास त्यानें प्रसन्न करून घेतलें. तेव्हां त्याच्यावर कृपा करून, 'तुझी काय इच्छा आहे?' म्हणून त्यास त्या सद्गुरूनें विचारलें व 'तुला काय दुःख आहे तें सांग म्हणजें तें घालविण्यास उपाय मी तुला सांगेन' असेहि सांगितलें. तेव्हां शिष्य म्हणाला "महाराज अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव या तापत्रयाने, मध्याह्नाच्या सूर्याच्या तापानें जसा प्राण्याला ताप होतो, तसा मला होत आहे. मीं जीं पापपुण्यादि कर्मे केली आहेत त्यांची नोंद यमराजाकडे आहे. तरी ती नोंद ज्यांत आहे ह्या कागदाच्या फाटून अगदी चिंध्या होतील असा काहींतरीं उपाय मला सांगावा, कीं जो केला असतां मी मुक्त होईन." ते ऐकून सद्गुरु म्हणाले, "सर्व पापकर्मांचा त्याग करून पुण्यकर्मांचें फल ईश्वरास अर्पण करून, शमादि साधनांनीं संपन्न होऊन, आणि दुर्जनांचा संग सोडून. तूं माझ्या उपदेशावर विश्वास ठेव." तो उपदेश हाच

कीं, "हा स्थूल देह तो तूं नव्हेस. हा स्थूल देह दृश्य आहे म्हणजे दिसतो आहे. तूं याचा द्रष्टा आहेस म्हणजे पाहणारा आत्मा आहेस. यासाठीं तूंच तो स्थूल देह नाहींस. हा तुझा देह नष्ट झाल्यावर त्यास जाळून टाकतील. म्हणजे तो कोणतेंही कर्म भोगवूं शकत नाहीं. त्याचा साक्षी जो तूं आत्मा तो तूं पूर्ण आणि व्यापक आहेस. त्याला आकाशाप्रमाणें कुठें जावयाचें नाहीं. यावयाचें नाहीं. म्हणजे सांगावयाचें इतकेंच कीं, तो आत्माही कोणत्याच कर्माचें फल भोगीत नाहीं. तर मग कर्मफल भोगवतो तरी कोण, असा प्रश्न सहजच उद्भवतो. त्याचें उत्तर हें कीं, देह आणि आत्मा सोडून बाकी राहिलेला जो चिदाभासरूप जीवसंयुक्त सूक्ष्म देह तो पापपुण्यकर्मांच्या संबंधाप्रमाणें उच्च नीच शरीरांत प्रविष्ट होऊन जन्ममरणद्वारा सुखदुःख भोगवितो. जीवाला आपल्या वास्तविक स्वरूपात असणाऱ्या सच्चिदानंद आत्म्याचें अभेद ज्ञान म्हणजे त्याच्या सूक्ष्म देहाचाही नाश होतो, व त्यांचें सर्व कर्मही ज्ञानाग्नीनें पार जळून खाक होतें. तसें झालें म्हणजे कर्मांचा कर्ता–भोक्ता कोणीच राहात नाहीं हें उघड आहे. मग यमराजाचा कारभारी तें कर्म कोणाच्या नांवावर मांडील बरे ? अर्थात कोणाच्याच नाहीं. म्हणजे यमराज त्याची कर्मफलरूप ललाटपत्रिका ताबडतोब फाडून टाकतो असें होतें. यासाठीं देह, इंद्रिय, प्राण, मन, बुद्धि, अहंकार, यांतून अहंबुद्धि टाकून व त्याचप्रमाणें त्या

देहेंद्रियांच्या संगतीत असलेली अहंबुद्धिही टाकून, त्या देहादिकांचा प्रकाश, सच्चिदानंद, नित्यमुक्त, अकर्ता, अभोक्ता असा आपण स्वतः आत्मा आहों असें जीवाचें ज्ञान संपादन करावें. म्हणजे त्यास ज्ञानानें त्यास मोक्ष प्राप्त होईल. या ज्ञानावांचून, जन्ममरण निवृत्त करावयाचे दुसरे कोणतें मुख्य साधन नाहीं."

शिष्य :—अहो महाराज, माझीं कर्मे अनंतकालाची व असंख्य आहेत, त्याचप्रमाणें अज्ञानाचें कार्य जो देहाध्यास तोही बहुत कालापासून आहे. अर्थातच त्याची निवृत्ति होण्यास फार काल पाहिजे; आणि आपण तर सांगितले कीं, सद्गुरुच्या वचनांवर भरंवसा ठेवल्यानें माझ्या जन्म-मरणाची पत्रिका तावडतोब फाटून जाईल तर मग या दोहोंची सांगड कशी घालावयाची ?

॥ चौपाई ॥

गुरु :—एमां वार नहि लागाशे जाण,
एवं वेदवचन छे, प्रमाण ॥
आ पंचीकरणना विचार जो करे,
तो हमणा मुक्ति मळमे ताहारे ॥ ४ ॥

टीका ।। हे बंधो, तुझीं कर्मे अज्ञान व देहाध्यास अनादि कालाची आहेत असे जरी आहे, तरी आत्मज्ञान झाल्यावर

त्यांस निवृत्ति होण्यास अगदीं अवकाश लागणार नाहीं, हें तुला समजावें म्हणून याच्यावर तुला एक दृष्टान्त सांगतो तो ऐक.

गुहेच्या अन्धकाराचा दृष्टान्त

पृथ्वीवर असणाऱ्या पर्वतांतील गुहांत हजारों वर्षांचा जो अंधकार असतो, तो जपतप केल्यानें अथवा काठीनें बडवून काढल्यानें नाहींसा व्हावयाचा नाहीं, तर केवळ प्रकाशानेंच नाहींसा होईल. ज्यावेळीं कोणी त्या गुहांत मशाल घेऊन जाईल, त्यावेळीं अंधकार काहीं असें नाहीं म्हणणार कीं "मी हजारों वर्षांचा आहे; सबब एकदम नाहींसा होणार नाहीं." कारण त्या अंधकाराचा विरोधी जो प्रकाश तो प्रकट झाला रे झाला कीं अंधकार नष्ट झालाच म्हणून समजावें. तो नष्ट होण्यास जसा वेळ लागत नाहीं, त्याचप्रमाणें कर्म, अज्ञान व देहाध्यास यांस निवृत्त होण्यास वेळ लागत नाहीं.

वरील दृष्टान्ताचा सिध्दान्त

अज्ञान व त्यामुळें झालेला देहाध्यास आणि कर्मे हीं दीर्घ कालाचीं आहेत खरीं, पण "अहं ब्रह्मास्मि" असा अपरोक्षज्ञान रूप प्रकाश जेव्हां उत्पन्न होतो तेव्हांच अज्ञानादिकांची निवृत्ति होते. यास वेदांतलीं वाक्ये प्रमाण आहेत. त्यांचे खालीं दिल्याप्रमाणें अर्थ आहेत.

6-13 "देवाला जाणल्यानें सर्व पाश (बंध) नष्ट होतात."

"ब्रह्म जाणणारा परमपदाला प्राप्त होतो." तै.उ. 2-1

"(जीव) त्या आत्म्याला जाणूनच मृत्युस जिंकतो."

"मोक्ष होण्यास ज्ञानावांचून दुसरा कोणताही मार्ग नाहीं." श्वे. उ. ३-४, ६-१५

त्याचप्रमाणें ज्ञानाच्या योगानें सर्व पापादि कर्मांचा नाश होतो असें श्रीभगवानांनी सुद्धा गीतेंत सांगितलें आहे.

॥ श्लोक ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाऽग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥

गीता अ. ४ श्लोक ३७

टीका ॥ बा अर्जुना, ज्याप्रमाणें ज्वालांनीं प्रज्वलित झालेला अग्नि, काष्ठें जाळून भस्ममय करून टाकतो, त्याचप्रमाणें निरंतरच्या अभ्यासानें प्रबळ झालेला जो ज्ञानाग्नि, तोही पापकर्में; पुण्यकर्में आणि त्या दोहोंनी मिश्रित अशीं सर्व कर्में भस्ममय करून टाकतो.

शिष्य :——गुरुमहाराज, आत्म्याच्या ज्ञानानेंच मोक्ष होतो असें आपण सांगितलें, तर मग ज्याच्या ज्ञानानें मी मुक्त होईन ते आत्म्याचें ज्ञान मला कसें होईल ?——असा शिष्याचा प्रश्न ऐकून चौपाईच्या उत्तरार्धानें गुरु उत्तर देतात :——

गुरु :——' आ पंचीकरण इति " या पंचीकरणाचा जर तूं विचार करशील, तर तुला आत्म्याचे ज्ञान होईल आणि त्या ज्ञानाच्या योगाने तुझा देहाध्यास निवृत्त होईल. तो निवृत्त झाला म्हणजे, तुझ्या हल्लींच्या ह्या देहांतच तुला मोक्षप्राप्ति होईल.

शिष्य :- सद्गुरुमहाराज, पंचीकरणाच्या विचारानें मला मोक्ष मिळेल असें आपण सांगितलें, तर मग पंचीकरणांत काय काय सांगितलें आहे तें कृपा करून सांगावें.

॥ चौपाई ॥

गुरुः—एमां पंचभूतनो विचारज कह्यो
जूदां जूदां तत्त्व बतायो ॥
सद्गुरुमुखे समझी लेजो
तो ब्रह्मसुख पामे आजो ॥ ५ ॥

टीका ॥ अरे बापा, या पंचीकरणांत पंचभूतांचा विचार केलेला आहे. पंचभूतें म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश. त्यांच्या तत्त्वांचे व स्थूल, सूक्ष्म आणि कारण नांवाच्या तीन शरीरांच्या तत्त्वांचे जे निरनिराळे विभाग आहेत, त्यांचें त्यांत वर्णन केलेलें आहे आणि त्या भौतिक तत्त्वांहून वेगळा, पण त्यांना जाणणारा द्रष्टा साक्षी जो आत्मा त्याचेंही तत्त्व (स्वरूप) त्यांत सांगितलेलें आहे. त्या पंचीकरणाचा अर्थ ब्रह्म सद्गुरुपासून श्रवण करून समजावून घे. तो पुरा समजला म्हणजे तुला आत्मतत्त्वाचा अनुभव येईल. असा जर योग घडून आला तर तावडतोब म्हणजे चालू असलेल्या ह्या तुझ्या जन्मांतच तुला ब्रह्मसुखाची प्राप्ति होईल.

शिष्य :--गुरुमहाराज, ब्रह्मनिष्ठ सद्गुरूजवळून पंचीकरण श्रवण करून समजून घेण्याची काय जरूर आहे? असें

विचारण्याचें कारण इतकेंच कीं, पंचीकरण म्हणतात तें तर प्राकृत भाषेंत लिहिलेलें असल्यामुळें मला स्वतः:ला वाचतां येईल व त्याचा अर्थही कळेल असें आहे. असें आहे तर तें सद्गुरुजवळून समजावून घे असें आपण सांगितलें ते कां?

गुरु :——बा शिष्या, तुला पंचीकरणांतलीं अक्षरें वाचतां येतील, त्यांचा अर्थ म्हणजे शब्दार्थही तुला समजेल पण सद्गुरुच्या उपदेशावांचून शब्दांचे जे खरें मर्म किंवा रहस्य आहे तें तुला कधींही समजणार नाहीं; अर्थात् आत्म्याविषयीं बोधही निःसंशय होणार नाहीं. यावर तुला दृष्टान्त सांगतो तो ऐक.

मंदिराच्या घुमटाचा दृष्टान्त

कोणी एक श्रीमान् गृहस्थ होता त्याच्या मनांत एक दिवस असा विचार आला कीं, आपल्याजवळ पुष्कळ द्रव्य आहे, त्यापैकीं थोडेबहुत जर आपण याचवेळी कोठल्यातरी गुप्त ठिकाणीं गुप्तपणें दडवून ठेवलें, तर कोणत्याही संकटकालीं मला उपयोग होईल. असा विचार त्याच्या मनांत आल्याबरोबर, आपल्या स्वतःसाठीं तयार केलेल्या अशा एका मोठ्या बागेंत सिद्धेश्वर नांवाचे महादेवाचें एक देऊळ त्यानें बांधविलेलें होतें, त्याच्या शिखरावरील घुमटाच्या पोकळींत कोणाच्याही दृष्टीस पडणार नाही, अशा ठिकाणी गुप्त रीतीनें एक दिवस त्यानें पुष्कळ द्रव्य नेऊन ठेवलें, व त्यासंबंधानें एका निराळ्या वहींत नोंद

करून ठेवली ती अशी :.... 'संवत १७२५ च्या वर्षी उत्तरायणांत, चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षांतल्या अष्टमी तिथीस, दिवसा दोन प्रहरीं बारा वाजतां, सिद्धेश्वराच्या देवळाच्या शिखरावरील घुमटांत पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा ठेविल्या आहेत. जेव्हां त्यांचें काम लागेल तेव्हां त्या काढाव्या.'' अशी नोंद करून ती वही त्याने मोठ्या बंदोबस्तानें गुप्त ठिकाणीं ठेवली. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी तो गृहस्थ यात्रा करावयास गेला. तेथें एकाएकीं उद्भवलेल्या व्याधीनें त्यास तोंडावाटे एक शब्दहि काढतां न येऊन ताबडतोब मरण पावला. तेव्हां त्याच्याबरोबर गेलेली त्याची बायको व लहान मुलगा ही बिचारी एकटीच घरीं परत आलीं. कालांतरानें तो मुलगा लहानाचा मोठा होऊन व्यापार करूं लागला. परंतु दुर्दैवानें त्यात वारंवार नुकसान होत गेल्यामुळें त्याचा रोख पैसा होता तो सर्व गेला इतकेंच नव्हे पण उलट तो कर्ज-बाजारी झाला. तेव्हां त्याचे धनको मागण्या करकरून त्यास दुःख देऊं लागले. त्या दुःखानें त्रस्त होऊन तो आपल्याशीं विचार करून म्हणाला की; "अरे माझा बाप पिढीजात श्रीमान् असून देण्याघेण्याचा फार मोठा व्यवहार करीत होता असे आहे, तर आपण एकदां आपल्या सर्व चोपड्या बारकाईने तपासून बघाव्या आणि जर कांहीं कोणाकडे बाकी वसूल व्हावयाची आहे असें त्यांत सांपडलें

तर आपलें बरेच काम होईल," अशी आशा मनात धरून त्यानें आपल्या वह्या तपासण्यास सुरुवात केली. त्या तपासतां तपासतां त्या चोपडीत वर लिहिलेली पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरांबद्दलची नोंद होती ती त्याच्या अवचित दृष्टीस पडली. ती नोंद वाचतांच त्याला आनंद झाला. लागलेच पाथरवट, गवंडी व मजूर यांस बोलावून आणून त्यानें त्याजकडून देवळाच्या शिखराचा घुमट खालीं उतरविला आणि त्यात सोन्याच्या मोहरांचा तपास केला. पण त्यांत कांहीही सांपडलें नाहीं. त्यामुळें खिन्न होऊन तो मनांत विचार करूं लागला की, " काय बरें ! ही रक्कम वहींत खोटी लिहिली गेली म्हणावें काय, कीं या नोंदीचा अर्थ मला बरोबर करतां आला नाहीं म्हणावें, कीं काय म्हणावें तरी काय ?" असा विचार करून ती नोंद त्याने आपल्या एका मित्राकडून वाचविली. तेव्हां त्यानेही तिचा अर्थ त्याप्रमाणें सांगितला. म्हणजे असा :—

" देवळाच्या शिखरातल्या घुमटांत धन ठेविलेलें आहे असा हिचा अर्थ होतो" तर त्याप्रमाणें तो घुमट तपासा, तेव्हां त्या मुलाने सांगितलें कीं, "आम्ही तो तपासून बघितला पण त्यांत कांहीं मिळालें नाहीं." तें ऐकून तो मित्र म्हणाला, "तर मग ही रक्कम खोटी खर्ची घातलेली असली पाहिजे." तेव्हां त्यानें पुनः तीच नोंद दुसऱ्या एका मित्राकडून वाचविली. त्यानेंही पहिल्या मित्राप्रमाणेंच सांगितलें. तितक्यांत तेथें असलेला तिसरा

एक इसम म्हणाला, "अहो, खोटी रक्कम खर्ची घालून लिहून ठेविली आहे असें तुम्हीं म्हणतां तें विचार केल्याशिवाय म्हणतां असें मला वाटतें. यामध्यें लिहिलेल्या सोन्याच्या मोहरा कोणापासून तरी विकत घेतल्या असतील आणि त्यांच्या किंमतीइतकी रक्कम कोणत्या तरी खात्यास खर्ची घातली असेल. तर तूं आपल्या चोपडयांत अशी रक्कम आहे कीं नाहीं तें नीट तपासून पहा." तेव्हा त्यानें त्या वर्षाच्या सर्व चोपडया तपासून पाहिल्या. त्यात निरनिराळया माणसांकडून त्या सोन्याच्या मोहरा घेतलेल्या होत्या व त्या सर्वांचें रुपये चुकवलेले होते, त्या सर्वांचा तपशील निघाला, आणि "पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरांची रक्कम एका निराळयाच चोपडींत देवळाच्या शिखरावरच्या घुमटाच्या खात्यास खर्ची घातलेली आहे," असें लिहिलेली सांपडलें. ते पाहून सर्वजण आश्चर्य पावून म्हणूं लागले, "आपण सर्वजण अडाणीपणाच्या समजुतीने या वहींत लिहिलेली रक्कम खोटी आहे असे म्हणत होतो. घुमटांत द्रव्य ठेवले आहे ही गोष्ट आता निर्विवाद आहे, पण ते आपल्याला सांपडत नाहीं हेच खरे. मग ते कोणीतरी चोरून नेले म्हणा, किंवा ठेवतेवेळीं कांहीं तरी गडबड झाली म्हणा, खरे काय असेल ते कोणास कसें कळणार!" एकंदरीत ते द्रव्य न मिळाल्यामुळें त्या मुलाला अतिशय वाईट वाटलें व तो त्यासंबंधानें ज्याला त्याला सचित होऊन

विचारी. पण त्यासंबंधानें कोणीच कांहीं उलगडा करूं शकेना. असे होतां होतां कांहीं दिवसांनीं त्याच्याच घराण्यांतला एक वृद्ध बुद्धीमान मनुष्य दुसरीकडे राहात होता, त्याजवळ जाऊन त्यास त्यासंबंधाची इत्थंभूत हकीकत त्यानें कळविली व म्हटले कीं, “ आजोबा, द्रव्य मिळाले नाहीं. त्याच्याविषयीं चिंता उत्पन्न झाली आहे इतकेच नाहीं, पण देवळाचा घुमट त्या द्रव्यासाठी उतरवला आहे त्यामुळें सर्व लोकांत “बापानें देऊळ बांधवले व चिरंजीव शहाणे निघाले. त्यांनीं ते पाडून टाकले असा माझ्यासंबंधानें दुर्लौकिक पसरला आहे, त्यामुळे मला अतिशय वाईट वाटत आहे. बरे द्रव्य नाहीं तर नाहीं, पण पुन: हा घुमटतरी चढवून पूर्ववत् करावा असें म्हटले, तर त्यास लागणाराहि पैसा माझ्याजवळ नाहीं. इकडे सावकार लोक आपल्या पैशासंबंधाने वारंवार तगादा करीतच आहेत. या सर्व गोष्टीमुळे माझा जीव अतिशय त्रासून गेला आहे. अशा स्थितींत आपण कृपा करून या संकटातून पार पाडण्याचा कांहीं उपाय मला सांगाल तर आपलें मजवर मोठे उपकार होतील. असे त्याचें काकुळतीचे बोलणें ऐकून त्या बुद्धिमान वृद्ध मनुष्याच्या मनांतदया उत्पन्न झाली, आणि तो म्हणाला, “ अरे बाळा, तूं कांहीं काळजी करूं नको. तुझ्या वहींत जें कांहीं लिहून ठेवलेलेआ हे, ते अगदीं खरे आहे, व त्याप्रमाणे ते द्रव्य तुला मिळेल. पण दरम्यान तूं हा घुमट अगोदर पूर्वी-

प्रमाणे बांधून तयार करावास या हेतूनें मी तुला हे दोनशें रुपये देतो ते घे पाहूं. पूर्वीच्या घुमटांत व तूं बांधशील त्यांत यत्किंचितहि फेरबदल होता कामा नये हे मात्र ध्यानांत ठेवून तसे कर. तो तयार झाल्यावर चैत्र शुद्ध अष्टमीच्या दिवशीं सकाळीं मला येऊन भेट. हा दिवस मात्र अगदीं चुकवूं नकोस." असे सांगून त्याने त्याला जाण्यास निरोप दिला. लागलीच तो मुलगा पूर्ववत् घुमट बांधण्याच्या कामास लागला व त्या वृद्ध आजोबाने सांगितल्याप्रमाणे अगदीं हुबेहूब पहिल्याप्रमाणे त्याने तो घुमट बांधवला, आणि ठरल्याप्रमाणे बरोबर चैत्र शुद्ध अष्टमीच्या दिवशीं सकाळीं आजोबाच्या घरीं जाऊन तो त्याला आपल्या घरीं घेऊन आला. तेव्हां आजोबाने सांगितल्यावरून त्याने नव्या घुमटाप्रीत्यर्थ मोठा उत्सव केला. नंतर सूर्य मध्यान्हीं येत आहे अशा सुमारास, म्हणजे बारा वाजतां, तो वृद्ध मनुष्य म्हणाला कीं, "चला, आपण बागेत जाऊन सिद्धेश्वर महादेवाचें दर्शन घेऊं." याप्रमाणे दोघांनी जाऊन महादेवाचे दर्शन घेतले, व महादेवास प्रदक्षिणा घालीत असतां त्या घुमटाची छाया जमिनीवर पडली होती ती आजोबानें मुलास दाखवून म्हटलें, "बाळा, देवळाचा घुमट याला म्हणतात बरे! तर मग ही जागा खणून पाहा म्हणजे तींत खचित तुला द्रव्य सांपडेल." लगेच त्या मुलाने ती जागा खणविली. थोडीशी जमीन खणली न खणली गेली तोंच तींत पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा त्याच्या

दृष्टीस पडल्या. मग त्या मुलाच्या आनंदास काय विचारावे ! इतके मोठे धन मिळाल्यामुळे तो पुनः श्रीमान् झाला, व त्याच्या दुःखाची निवृत्ति झाली. आतां पाहा बरे, कीं वहींत जे लिहून ठेविले होते ते बिलकूल खोटें नव्हतें. त्यांतली अक्षरें सर्वांना वाचतां येत होती; तसाच त्याचा शब्दार्थहि सर्वांस कळत होता. घुमटांतहि द्रव्य होते पण त्या वृद्धावांचून दुसऱ्या कोणत्याहि माणसाकडून ते हातीं येऊं शकलें नाहीं. कारण काय कीं, ते सर्व लोक वही वाचीत होते, पण तींत " चैत्र महिन्याच्या अष्टमीच्या दिवशीं दुसऱ्या प्रहरीं बारा वाजतां घुमटांत द्रव्य घालून ठेवलें आहे " असे लिहिण्यांत लिहिणारानें काय खुबी करून ठेविली होती ती एकाच्याहि ध्यानांत आली नाहीं. परंतु त्या वृद्ध मनुष्याने असा विचार केला कीं, पोकळ घुमटांत अगोदर धन ठेवणारा ठेवील तरी कसें ? शिवाय इतक्या लहान घुमटांत पंधरा लाख रुपयांच्या सोन्याच्या मोहरा मावूं तरी शकतील काय ? तेव्हां अर्थातच त्या घुमटाची छाया जमिनीवर ज्या ठिकाणीं पडते तेथेच ते द्रव्य पुरुन ठेवलेले असलें पाहिजे आणि ते सुद्धां वर लिहुन ठेवलेल्या दिवशींच व वर लिहून ठेवलेल्या वेळींच जेथे त्या घुमटाची छाया पडेल तेथेच खोदलें तर मिळूं शकेल. दुसऱ्या कोणत्याहि महिन्यांत व दुसऱ्या कोणत्याहि वेळीं घुमटाच्या छायेखालची जागा खणली तरी मिळूं शकणार नाहीं. तात्पर्य काय कीं ज्या वेळी त्या लिहिणाऱ्याचा अभिप्राय

बरोबर रीतीनें समजणारा बुद्धिमान् मनुष्य त्या मुलास मिळाला तेव्हांच त्याला द्रव्याची प्राप्ति झाली.

उपरोक्त कथेचा सिद्धान्त

त्याचप्रमाणें एकाद्याला संस्कृत-प्राकृतादि भाषांत लिहून ठेवलेले वेदान्तग्रंथ वाचतां येत असतील व तो त्यांतल्या नुसत्या शब्दांचें अर्थही वेळेला बरोबर समजत असेल, आणि त्यांत लिहिलेले पोपटपंचीप्रमाणे क्वचित् बोलूनही दाखवित असेल, म्हणजे "परमात्मा सर्वत्र पूर्ण आहे, देहत्रयाचा द्रष्टा आहे अवस्थात्रयाचा साक्षी आहे, पंचकोशातीत आहे, सच्चिदानंदरूप आहे." इत्यादि ठरीव बोल पोपटाप्रमाणें जेव्हां तेव्हां बोलून दाखवीत असेल, व ते त्याचे बोल वास्तविक पाहतां खरेहि आहेत. कारण देहरूप घुमटांत सच्चिदानंद आत्मस्वरूप द्रव्य आहे, व त्याची नोंद श्रुति-स्मृतिशास्त्ररूप वहींत करूनहि ठेवली आहे. असे जरी सर्व खरं आहे, तरी पण ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच्या द्वारे शास्त्राचें रहस्य समजावून घेतल्याशिवाय आत्मस्वरूप धनाची प्राप्ति कदापि होणार नाही. ब्रह्मदेवाचे पुत्र नारदमुनि ऋग्वेदादि चार वेद, पुराणें, इतिहास, इत्यादि सर्व विद्यांत पारंगत होते, तरी पण आपल्याला आत्मज्ञान झालेले नाहीं असें पाहून त्यांस फार वाईट वाटलें, त्यामुळें ते सनत्कुमार सद्-गुरुंस शरण गेले आणि त्यांच्या उपदेशानें निरतिशय, सुस्वरूप, पूर्ण अशा आत्म्याचे अपरोक्ष ज्ञान (प्रत्यक्ष) करून घेऊन विगतशोक झाले, असें छांदोग्य उपनिषदांत विस्ता-

रानें सांगितलें आहे म्हणून सद्गुरु लिहितात कीं :—

॥ दोहा ॥

"सग्दुरुमुखे समजी लजो,
तो ब्रह्मसुख पामे आजो ॥"

(पृष्ठ ४५)

ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच्या उपदेशावांचून केवळ आपल्या बुद्धीनें व विचारानें आत्म्याचा साक्षात् अपरोक्ष बोध होऊं शकत नाहीं, यासाठीं तशा सद्गुरूला शरण जाऊन त्यानें केलेला ब्रह्मज्ञानाचा उपदेश मुमुक्षूनें आपले मन निश्चल करून सदासर्वदा हृदयांत धरावा असें जें पूर्वी सांगितलें आहे, त्याचेच निरुपण पुढे केले आहे.

॥ दोहा ॥

गुरु :-मन निश्चल करि धारणा धरे,
श्रवण मनन निदिध्यासन करे ॥
तो साक्षात्कार तूं पोते भाई,
एमां संदेह रहे न कांई ॥ ६ ॥

टीका ॥ मुमुक्षू पुरुषानें सदुपदेश करील तोच आपला सद्गुरु असें समजून, त्याचा उपदेश आपलें मन निश्चल (स्थिर) करून ध्यानांत वागवावा. आतां मन स्थिर करण्यासंबंधानें तुला एक दृष्टान्त सांगतों तों ऐक.

गुरुचा उपदेश एकाग्र चित्तानें ध्यानांत धरण्यासंबंधानें चार दृष्टान्त

(१) समज, 'अ' आणि 'क' हे दोघे शेजारी गृहस्थ परस्परांचें पटत नसल्यामुळें परस्परांचा द्वेष करीत आहेत, त्यांपैकीं 'अ' एक दिवस 'ब' नांवाच्या तिसऱ्या एका मनुष्याजवळ 'क' शेजाऱ्याविरुद्ध आपल्या घरीं कांहीं बोलत बसला आहे, ते पाहून आपला शेजारी आपल्याच विरुद्ध कांहींतरी 'ब' ला सांगतो आहे असें समजून 'क' आपल्या स्वतःच्या घरांतल्या समोरासमोरील दारांत किंवा खिडकींत, 'अ' ला न समजेल किंवा न दिसेल अशा-रीतीनें अगदीं गुपचुप बसून एकाग्र चित्तानें तो काय बोलतो तें ऐकत आहे; मग ह्यावेळीं थंडी, ऊन इत्यादिकांपासून कितीहि असह्य त्रास झाला तरी तो निमूटपणें सोसतो, व त्यास तहान–भुकेचेंहि त्यांत विस्मरण होतें. अशारीतीनें सर्व गोष्टी एकाग्र मनाने ऐकून, त्यांतला शब्दन् शब्द ध्यानांत धरून प्रसंग पडेल त्या वेळीं ते शब्द तो बोलूनहि दाखवितो; म्हणजे त्याचें जसें त्या गोष्टींत मन एकाग्र होते, त्याचप्रमाणें सद्‌गुरूच्या सदुपदेशाच्या ठिकाणीं मुमुक्षूनें आपलें मन एकाग्र केलें पाहिजे, आणि शीत, उष्ण, क्षुधा, तृषा, मान, अपमान, इत्यादि सहन करून, त्या उपदेशा-पासून आपले मन कदापि ढळूं देतां कामा नये

आपणांस पुष्कळ धन मिळावें या हेतूनें नाना प्रकारच्या उलाढाली करण्यांत गुंग असलेल्या एकाद्या धनेच्छुला कोणी म्हणावे कीं, "बघ रे बुवा, तुला खात्रीनें धन मिळविण्याचा मी एक उपाय सांगतों तो सर्व एकाग्र मनाने ऐकून ध्यानांत धरून त्याप्रमाणें केलेंस तर तुला पुष्कळ धन मिळेल." ते ऐकल्याबरोबर सर्व आपल्या खटपटी बाजूला ठेवून तो धनेच्छु ते धन प्राप्त करून घेण्याची गोष्ट जशी एकाग्र मनानें ध्यानांत धरून सांगितल्याबरहुकूम करतो, किंवा आपल्यास स्वर्ग मिळावा अशी इच्छा करणारा पुरुष, स्वर्ग-प्राप्तीचा उपाय कोणी सांगितल्यास, तो जसा एकाग्र मनाने हृदयांत धरून करतो, किंवा आपला जय व्हावा असें इच्छि-णारा मनुष्य जय मिळविण्याविषयींचा उपाय कोणीं सांगि-तल्यास, तो उपाय जसा एकाग्र अंतःकरणानें ध्यानांत धरतो, त्याचप्रमाणें मुमुक्षू पुरुषानें सच्चिदानंद आत्म्याचा बोध करून घेण्यासाठीं ब्रह्मनिष्ठ सद्गुरूच्या उपदेशरूप वचनांचें धारण एकाग्र मनानें करावें, आणि त्याचें व वेदान्तशास्त्राचें त्याच्याच (सद्गुरूच्या) द्वाराने श्रवण मनन निदिध्यासन करावें. कसे म्हणून विचारशील तर सांगतों :—अरण्यांत कोणी गाणें, वाजविणे जाणणारा मनुष्य सुस्वर वाद्य वाज-वून गात असतां तेथे हरीण येऊन जसे एकाग्र चित्त करून त्याचे रागदारीचे आलाप ऐकतात, त्याचप्रमाणे आपले चित्त एकाग्र करून सद्गुरूच्या मुखापासून वेदान्तशास्त्रांतल्या

शब्दाचें तात्पर्यार्थ समजावून घेऊन त्यांचे श्रवण करावें, आणि श्रवण झाल्यानंतर त्यांचेंच युक्तीनें आणि दृष्टान्तांनीं आपले सर्व संशय दूर होतील अशारीतीनें मनन करावें. गाय जशी बाहेरून चरून आल्यानंतर आनंदानें बसून रवंथ करून तृप्ति पावते, त्याचप्रमाणें ज्या वेदान्तवाक्यांचे श्रवण केलें असेल त्यांची मनांत पुन: पुन: आठवण करून, एकांतात त्यांचे अधिकाधिक मनन केल्यानें दृढबोधरूप तृप्ति होते. आणखी पहा कीं, बदाम, पिस्ते साखर, अन्न, इत्यादि पदार्थ चांगले चावून चावून खाल्ले तरच त्याचा खरा स्वाद जिभेला येतो, व ते नीट पचतात; आणि तसे ते नीट पचले म्हणजेच शरीर पुष्ट होते, त्याचप्रमाणे वेदांताचें वारंवार मनन केल्यानें, अभेद तात्पर्याचें जे ज्ञान तद्रूप स्वाद येतो, आणि आत्मज्ञान पुष्ट (दृढ) होते. अशारीतीनें मनन केल्यानंतर, सजातीय प्रत्ययांचा प्रवाहरूप, आणि विजातीय प्रत्ययांचा तिरस्काररूप निदिध्यासा करावा. तो केल्यानें आत्म्याचा बरोबर अनुभव येऊं शकतो. सजातीय प्रत्ययांचा प्रवाह म्हणजे, आपण सत्, चित्त, आनंद, कूटस्थ, अक्रिय, अजर, अमर, पूर्ण नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त आत्मा आहों अशाप्रकारच्या ज्ञानाच्या वृत्तींचा प्रवाह होय. विजातीय प्रत्ययांचा तिरस्कार म्हणजे, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र तोंच आपण: त्याचप्रमाणे ब्रह्मचारी गृहस्थ वानप्रस्थ किंवा संन्यासी तोच आपण; त्यांचप्रमाणें पुरुष, स्त्री, बालक, तरुण, सुखी, दुखी, कर्ता आणि भोक्ता जो तोच

आपण; इत्यादि जें मानणें (त्यालाच एका शब्दाने 'देहाध्यास' म्हणतात.) त्याचा तिरस्कार करणें म्हणजे वरील प्रत्येकच आपण असे जें मानलेले असतें तें मनांतले घालवून, त्याच्याठिकाणीं वरील प्रत्येक आपण नाहीं असे जे मानणे, याचेच नांव विजातीय प्रत्ययांचा तिरस्कार करणें होय. अशारीतीनें माझ्या लाडक्या, श्रवण, मनन आणि निदिध्यास करशील तर आपण स्वत: आत्मा, निर्विकार, शुद्ध, ब्रह्मरूप आहों, असा तुला साक्षात्कार होईल, व त्यासंबंधानें तिळभरहि तुला संदेह राहणार नाहीं.

पूर्वी दुसऱ्या चौपाईत शिष्यानें जन्ममरण निवृत्त व्हावें या हेतूनें, "जन्ममरण केम टळशे महारे" असा जो प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर पूर्वी "सद्‌गुरु कहे स्वस्वरूप जाण" या चौपाईत संक्षेपानें दिलें आहे. तथापि, "अहं ममेति" या आर्ध्या श्लोकाचें व्याख्यान करून बंधनें निवृत्त करण्याचे उपाय सद्‌गुरु विस्ताराने सांगतात.

गुरु :–बा शिष्या ! "आपलें जन्ममरण कसें टळेल, म्हणजे आपले बंधन कसें नाहींसें होईल," असे तूं मला पूर्वी विचारलें होतेंस. परंतु बंधन कशाला म्हणतात व त्याचे स्वरूप कोणतें हे जर तुला अगोदर समजले असेल, तरच ते नाहींसे करण्याचा उपाय तुला करतां येईल पण मुळीं बंधन म्हणजे काय हेच जर तूं ओळखलें नसेल, म्हणजे बंधन म्हणतात तें काय आणि तें कशानें उत्पन्न

होतें, हेच जर तुला कळलेलें नाहीं, तर ते नाहींसे करण्याचा उपाय तुला कसा करतां येईल ? रोगाचे कारण व रूप हीं ओळखल्यावांचून रोगाचा नाश करण्याचें औषध करतां येणार नाहीं; तसेंच हेंहि आहे. यासाठीं अगोदर बंधनाचें रूप व कारणें ही ओळखलीं पाहिजेत. तर मग तीं तूं ओळखलीं आहेस कीं नाहीं ?

शिष्य :– बंधनासंबंधानें मला कांहींहि ठाऊक नाहीं. म्हणजे बंधन तें काय व तें कशानें होतें, आणि त्याचा नाश कसा होतो, यांतलें कांहींच मी जाणत नाहीं. यासाठीं त्यासंबंधी सर्व कांही सांगण्याची कृपा करावी.

॥ श्लोकार्ध ॥

गुरु :–अहं ममेत्ययं बंधो, नाहं ममेति मुक्तता ॥

अर्थ ॥ आपण देह आहों आणि देहादिक आपले आहेत असे जें मानणें ते बंधनाचे रूप आहे, आणि हे बंधन स्वत:च्या खऱ्या स्वरूपाच्या अज्ञानामुळें होतें म्हणून स्वरूपाचें अज्ञान हेंच बंधनाचे कारण आहे, आणि देहेंद्रियादिकच आपण नाहीं व ती आपलींहि नाहींत असे समजल्याने देहादिकांतील अहंता–ममतांची जी निवृत्ति होते तिचेंच नांव मोक्ष.

शिष्य :–– या अहंता–ममतांची कशी निवृत्ति होते ?

गुरु :–– बा शिष्या, साधनांच्या योगानें अहंता–ममता निवृत्त होतात.

शिष्य :--- तर मग मोठे आश्चर्यच आहे म्हणावयाचे. कारण मीं जीं साधनें म्हणून करतो त्या सर्वांत तर मी देह आणि माझा देह अशा प्रकारच्या अहंता-ममता असतातच असतात व कधींहि कमी होत नाहींत. कशा त्या पहा :- त्याग केला तर मी त्यागी आहे, मी त्याग केला असे म्हणतो. योग केला तर मी योगी आहे, मी योग केला असे म्हणतो. तप केलें तर मीं तपस्वी आहे. मीं तप केले असे म्हणतो. म्हणजे ज्या ज्या कामासंबंधानें माझ्यामध्ये माझ्या स्वत:विषयीं अभिमान उत्पन्न होतो. यासाठीं मी जी साधनें करीत असतों त्या त्या प्रत्येक साधनांत मी देह आणि माझा देह अशाप्रकारच्या अहंता-ममता असतातच असतात, आणि आपण तर याच्या उलट म्हणतां कीं, साधनांच्या योगाने अहंता-ममता नष्ट होतात, तर मग त्या कशा नष्ट होतात ते कृपा करून सांगावें.

गुरु :-- देहादिकांतून अहंता-ममता घालविण्यासाठीं तूं साधनें सांगतोस ती सर्व विवेक आणि विचार यावांचून निरुपयोगी आहेत. कारण असें पाहा कीं आत्मा व अनात्मा यांच्यासंबंधानें विवेक न होता तूं सांगतोस हीं साधनें जर केलीं, तर त्यांच्या योगानें अहंता-ममता कमी होत नाहींत. इतकेच नाहीं पण उलट दुप्पट वाढतात मात्र. कारण ज्या जातीचा आणि वर्णाचा जीव असेल त्या जातीचा आणि त्या वर्णाचा अभिमान अगोदर त्याच्या ठिकाणी असतोच.

आणि तशांत जर अविवेकाने एखाद्या पंथाचा वेष त्यानें धारण केला, तर त्याला त्या वेषाचा आणखी एक जास्त अभिमान उत्पन्न होतो म्हणून विवेकादि साधनांवांचून त्याग केल्यानें सुद्धां अभिमान जात तर नाहींच पण उलट वाढतो. तो जीव गृहस्थाश्रमांत असतो तेव्हां क्वचित् एखाद्या साधूची नम्रपणानें सेवा करण्याची तरी त्यास हौस असते, पण त्याग केल्यावर तर जीव गृहस्थाश्रमांत त्यागी झालों, अर्थात् सर्वजण मला एकसहा मान देतील व माझा आदर सत्कार करतील.'' असा अविवेकानें त्याच्या ठायीं अभिमान होऊन तो वाढतच जातो. अशा वेळीं त्याला कोणी सद्विद्येचा उपदेश करूं लागला तर, आपण त्यागी आहों, आपल्याला आतां याचें ऐकण्याची काय जरूर आहे असे समजून तो त्याचा उपदेश ऐकून घेत नाहीं. म्हणजे हें कसें झालें ! तर "मांजर काढून टाकले तेथें उंट येऊन पडला'' अशी जी एक गोष्ट सांगत असतात, तिच्यासारखें झालें. या दृष्टांताची पुरी गोष्ट तुला सांगतों ती ऐक.

विचारावांचून अभिमान दुप्पट वाढतो याविषयीं दृष्टान्त

एका घरांत एक म्हातारी बायको राहात असे. एक दिवस एक मांजर आपल्या अंगणांत मरून पडलेलें तिला आढळलें. तेव्हां तें मांजराचें प्रेत स्वतःच काढून टाकण्याचा विचार करून तिनें आपल्या घराची सर्व दारें बंद केलीं,

पण अंगणांच्या कवाडाचे दार तेवढें मुर्खपणाने उघडे ठेवलें. लगेच ती म्हातारी मेलेलें मांजर टोपलींत घालून गांवाबाहेर नेण्यासाठीं निघाली. मांजराचें प्रेत टाकून नदीवरून अंग धुऊन परत घरीं येऊन पाहाते, तो जेथें मांजर मेले होते तेथेंच एक आजारी उंट एकाएकीं येऊन मरून पडला आहे. तेव्हां ती म्हातारी मोठ्या चिंतेने म्हणाली, हा काय कर्माचा भोग तरी ! मांजर मेले ते टाकण्यास गेले तो तेथेंच उंट येऊन मरून पडला. तर आतां याचे हे अवाढव्य प्रेत मी एकटीं काढून टाकूं तरी कशी ? हे दुःख तिच्या मूर्खपणानें तिला झाले.

याच न्यायानें विचारविवेकावांचून देहाभिमानरूप मांजर काढून टाकण्याच्या उद्देशानें जें त्याग (संन्यास) करतात, त्यांच्या त्या त्यागाचा अभिमानरूपाचा आणखी एक उंट तेथें येऊन बसतो, मग तो काढून टाकणें फार कठीण जातें. यासाठीं जिज्ञासेवांचून, अधिकारावांचून आणि विधीवांचून, केवळ वेषधारणानें, किंवा सकाम केलेल्या जपादि इतर साधनांनीं अहंता-ममतारूप बंधनांची निवृत्ति कधीहि व्हावयाची नाहीं.

शिष्य :—तर मग कोणत्या साधनांनीं अहंता—ममतांचा नाश होतो ते कृपा करून मला सांगावें.

गुरु:—विवेकादि साधनानीं संपन्न होऊन, ब्रह्मनिष्ठ सद्गुरुस शरण जाऊन, त्याच्या उपदेशापासून झालेला जो

आत्मानात्मविचार त्याच्या योगानें झालेल्या स्वरूपाच्या ज्ञानानें, म्हणजे अज्ञानाच्या नाशाच्या द्वारानें, त्या अहंता-ममतांची निवृत्ति होते. वर विचार म्हटला तो हाच कीं, हा देह पंचमहाभूताचें कार्य आहे. त्यामुळें अनात्मा आहे व घटाप्रमाणें (मडक्याप्रमाणे किंवा भांड्याप्रमाणे) दृश्य आहे आणि ज्याप्रमाणें घटाचा द्रष्टा घटापासून वेगळा असतो, तसा देहाचा जो आपण आत्मा तो देहाहून वेगळा आहे. देह जड आहे व आपण चैतन्य आहों, देह विकारी आहे, आपण निर्विकार आहों; देह क्रियावान, संगवान मलिन आहे, आपण आत्मा अक्रिय, असंग, निर्मल आहों; अर्थात् देह आपण नव्हे, आणि जर आपण देह नव्हे, तर देहावर कल्पिलेले ब्राह्मणादि चार वर्ण किंवा ब्रह्मचर्यादि चार आश्रम किंवा बालपण, तरुणपण, वृद्धपण, स्थूलपणा, कृशता, ऱ्हस्वता, दीर्घता, श्यामता, गौरपण, इत्यादि देहाच्या ज्या अनेक जाती, धर्मकर्मे आणि स्वरूपें आहे त्यापैकी एकहि माझ्या आत्म्यांत उघडच नाहीं. अशाप्रकारच्या विचारांनीच देहांतून अहंता निवृत्त होते. देवदत्त, विष्णुदत्त, शिवदत्त, इत्यादि जी नांवें आहेत तीसुद्धां देहसंबंधीं व्यवहार सिद्ध करण्यासाठीं देहाच्या ठायींच कल्पिलेलीं आहेत. आत्म्याच्या ठायीं नाहींत. तथापि देहाहुन आत्मा वेगळा आहे असे जीव जाणत नाहींत, त्यामुळें देहास दिलेला कल्पित नांवाचा आत्म्याच्या ठिकाणीं जो त्यानें अभिमान बाळगलेला असतो, तोहि विवेकानें आणि युक्तिनें विचार

करून निवृत्त करावा. असे पाहा कीं, " तूं कोण आहेस " म्हणून तुला कोणी विचारलें' तर " मी देवदत्त नांवाचा आहे " असे त्यास तूं उत्तर देतोस. पण तूं आता विचार कर कीं देवदत्त हे जे नांव तुझ्या स्थूल देहाला प्राप्त झालें आहें, ते देह जन्मास आल्यावर दहाव्या किंवा बाराव्या दिवशीं दुसऱ्या कोणीं तरी ठेवलेले आहे. म्हणजे हा देह ज्यावेळीं जन्मला त्याच वेळीं देवदत्त जन्मला असें काहीं कोणी म्हणत नव्हतें. अथवा तुला कोणीं विचारलें तर समज कीं, " अरे बाबा, या देहांत देवदत्त म्हणतात तो कोठे आहे तो दाखव पाहूं ! " तर तुला देहाच्या अमुक एका ठिकाणीं हात ठेवून, हा तो मी देवदत्त असें कांहीं दाखवतां येणार नाही. जेथे जेथें तूं हात लावून दाखवशील तेथें तेथें डोकें, तोंड, खांदा, पोट, पाय, इत्यादिपैकी देहाचा कोणता तरी अवयव असून, तें त्या अवयवांचे नांव असेल. या विचारावरून जर देहाचे नांव देहांच्याहि ठिकाणीं खऱ्या रीतीनें सिद्ध होत नाही, तर देहाहून निराळा त्याचा द्रष्टा जो तूं आत्मा त्याचे देवदत्त हे नांव कसें सिद्ध होईल बरें ?

शिष्य :—मी आत्मा देहाहून कोणत्या रीतोने वेगळा आहे बरें ? मी देहाहून वेगळा आहे असा ज्या रीतीने मला अनुभव घेतां येईल त्या रीतीने मला समजावून सांगावें.

गुरु :—ठीक, आपण पूर्वजन्मांत केलेली कर्मे या जन्मांत भोगीत आहों आणि या चालू जन्मांत ते करीत आहों ते पुढे

येणाऱ्या जन्मांत भोगूं असे तूं म्हणतोस ना ? तर मग विचार करून पाहा कीं, हा जो स्थूल देह आतां आहे तोच पूर्वजन्मीं नसून मातेच्या उदरांतून नवीन उत्पन्न झालेला आहे. तर मग कर्म करणारा जो कोणी तूं असशील तो पूर्व-जन्मीं या देहाहून कोणी खात्रीनें वेगळा असला पाहिजेस. कारण देहाचा नाश झाल्यावर देह तर राहूं शकत नाहीं. अर्थात् तूं देहाने केलेल्या कर्मांचा भोक्ता देहाहून वेगळा आहेस असेच सिद्ध होऊन, हा स्थूल देहच आत्मा नव्हे हे जे आमचे म्हणणे ते तुला पटतें कीं नाहीं ? आणखी एका रीतीनें हेच तुला मी सिद्ध करून दाखवतों. तूं बोलतोस ते सुद्धां असे बोलतोस कीं, माझा देह आहे, माझा हात आहे, माझे डोके, पाय वगैरे माझें आहेत, पण त्याच्याबद्दल मी देह आहे, मी हात आहे, मी डोकें, मी पाय इत्यादि आहे, असे कांहीं म्हणत नाहींस. जसे माझे घर, माझी वाडी, माझी गाडी, असे आपण व्यवहारांत म्हणतो, पण केव्हांहि मी घर, मी वाडी, मी गाडी, असे कांहीं म्हणत नाहीं. त्यामुळें अमुक माझे आहे असे म्हणणारा जो कोणी तो स्वतः त्या पदार्थाहून वेगळा असलाच पाहिजे हे याहि विचारानें अगदीं सिद्ध होते. यावर तुला एक दृष्टान्त सांगतों तो ऐक.

देहापासून आत्मा भिन्न आहे याविषयीं देह व घर यांमध्यें असलेल्या सादृश्याचें वर्णन

जसे घर म्हटलें म्हणजे त्यांत तुळया, खांबले, आढें, छप-

राची दोन पाखीं असतात; तसेंच खांब, खिडक्या, दारें असतात. विटा, दगड आणि चुन्याने गिलावा केलेल्या भिंती असतात; त्यांवर पांढरा, काळा, तांबडा, इत्यादि रंग दिलेले असतात. धाब्याचे छप्पर असले तर त्यावर गवत उगवलेले असते. अशा घरांत रहाणारा मनुष्य घरच नसून घराहून वेगळा असतो आणि तो स्वतः 'मी घरच आहे' असे कधींहि म्हणत नाहीं त्याचप्रमाणे हा देहहि एक घर आहे. पाठीचा कणा हे त्याचे वांशांचें आढे आहे; बरगडचा त्याच्या छपराचीं पांखीं आहेत, हात पाय, इत्यादि त्याचे खांब आहेत; हाडे मांस इत्यादि त्यांतल्या विटा, दगड, गिलावा इत्यादि आहेत. जसे घराला पांढरा, काळा, तांबडा, इत्यादि रंग असतात तसे या देहाच्याहि चामडी-वर निरनिराळे रंग असतात; डोळा, कान, नाक, तोंड इत्यादि इंद्रियें त्यांतल्या खिडक्या आहेत. इकडे घरावर गवत उगवते, तर तिकडे देहावर केंस असतात तर अशा देहरूप घराचा द्रष्टा जो तूं आत्मा तो तूं देहच नाहीस; तर देहापासून वेगळा आहेस. यासाठीं वरील विचारसरणी ध्यानांत धरून ठेवली असतां, आपण देहच आहो अशा-प्रकारचा अभिमान नष्ट होतो. यावांचून अन्य कोणत्याहि उपायाने तो नष्ट होईल असे नाहीं.

शिष्य :—गुरुमहाराज, आपण सांगितलेल्या रीतीने विचार केला असतां हा देहच मी नाहीं असे सिद्ध होते व

ते जाणले असतां देहांतील अहंता नष्ट होते; तरी पण देह माझा आहे असे समजणे ही जी ममता ती रहातेच; व हे या आपल्या वरील दृष्टांतावरूनहि खरे ठरूं पाहातेंच, कसे ते सांगतो. घटास पहाणारा जो मी तो घटच नव्हें हे खरे. तरी पण घट माझा आहे असे म्हणतोंच. आपण घेतलेल्या घराच्या दृष्टांतावरूनच विचार करूं या. घरांत राहाणारा मी घर नाहीं हे खरे, पण घर माझे आहे असे तर मी अवश्य म्हणतोच; त्याच न्यायाने देहाचा द्रष्टा जो मीं तो देहच नव्हें, पण देह माझां आहे असे मी हटकून म्हणत असतों, आणि तें तसें म्हटले म्हणजे त्यांत ममत्व तर स्पष्ट व्यक्त होतें. तें ममत्व ज्या विचाराने निवृत्त होईल तो कृपा करून सांगावा.

गुरु:--बा शिष्या, तूं देह नव्हेस हे जितकें खरें आहे तितकेंच देह तुझा नव्हे हेंहि खरे आहे; कारण, देह आहे पंचमहाभूतांचा असे असूनहि तो आपलाच आहे असे जें तूं म्हणतोस, ते केवळ अज्ञानानें. जरी घट पृथ्वीचा आहे, तरी तो आपलाच आहे असे म्हणतोस, किंवा घर हे दगड, लांकूड, चुना इत्यादिकांचें असून तूं भ्रमानें तें आपलेंच आहे असे जसें म्हणतोस तद्वतच हाडें, मांस, त्वचा, शिरा, नाडी, रक्त, इत्यादिकांनीं बनलेला देह पंचमहाभूतांचा असून तूं आपलाच म्हणतोस ही तुझी निव्वळ चूक आहे. हाडें, चामडी इत्यादि अपवित्र पदार्थ माझे आहेत असें

उत्तम जातींतला मनुष्य तर कधींहि म्हणणार नाहीं, असें असून तूं अशा हाडांचामडद्यांच्या देहाला भ्रमाने आपला आपला असे म्हणतोस, आणि देहच आपण असेंहि मानतोस, हेच तुझ्या बंधनांचे कारण आहे. अरे, उघड उघड परक्याचा म्हणजे पंचमहाभूतांचा जो देह, त्याला तूं आपला समजतोस, तर निःसंशय तीं पंचमहाभूते तुला दुःख देतील. या लोकांत यःकश्चित् खोटचा कल्पित भूतांच्याहि भयानें जर मनुष्यास दुःखें भोगावीं लागतात; तर मग हीं तर पंचमहाभूतें, आणि त्यांचा म्हणून सर्वत्र गाजलेला जो देह त्यावर तूं जर ममता केलीस तर तीं भूतें तुला मोकळा कसा सोडून देतील ? कारण व्यंवहारांत सुद्धां न्याय असा आहे कीं, दुसऱ्याच्या वस्तुवर ममत्व केल्यानें कोणीहि सुखी तर होऊं शकत नाहीं, पण उलट दुःखी मात्र होतो. यावर तुला एक दृष्टान्त सांगतों तो ऐक.

परक्या वस्तूवर ममत्व केल्यानें बंधन उत्पन्न होते याविषयीं दृष्टान्त

कोणी एक मातबर गृहस्थ होता. त्याला आपण भागवत सप्ताह, हरिकीर्तन, वेदपारायण, यज्ञ, ब्राह्मणभोजन किंवा स्वज्ञातिभोजन, यापैकीं कोणते तरी एकादें जमेल तें धर्मकृत्यं करावें अशी इच्छा उत्पन्न झाली. पण त्याची स्वतःची

रहाण्याची जागा होती फार संकुचित. त्यामुळे असें एकादें मोठें नैमित्तिक कृत्य तेथें होण्यासारखें नव्हतें; म्हणून त्यानें पंचांच्या ताब्यांत असलेल्या अशा एका प्रशस्त महाजनवाडींत तें करण्याचें मनांत आणून, पंचांपासून ती वाडी गरजेपुरती थोडया दिवसांच्या बोलीनें मागून, तींत तो सहकुटुंब जाऊन राहिला. कांही दिवस गेल्यानंतर जे धर्मकृत्य म्हणून करण्याच्या उद्देशानें तो तेथें गेला होता ते लोभादि दुर्गुणांनीं त्याच्या मनावर पगडा बसवून विघ्न केल्यामुळे, जागच्या जागींच राहून गेले. वाडी पडली चांगली ऐसपैस, तेव्हां तेंथे राहिल्याने अर्थातच त्यास घरापेक्षां जास्त सुख होऊं लागलें. म्हणून तो तेथेंच बरेच दिवस राहिला. असें कांहीं दिवस गेल्यानंतर वाडीच्या मुख्य पंचानें आपली वाडी आतां लवकरच खालीं करून द्यावी असा आपल्या मनुष्याबरोबर त्या गृहस्थाला निरोप पाठविला. असें असूनहि त्या गृहस्थानें तिकडे बिलकूल लक्ष दिले नाहीं. तेव्हां सर्व पंचांनीं मिळून त्याला बोलावूं पाठविलें. त्यावेळीं नानाप्रकारचे बहाणे सांगून तो गृहस्थ त्यांस भेटण्यास गेला नाहीं इतकेंच नव्हे, पण उलट त्यानें त्यांस असा निरोप पाठविला कीं, "तुम्ही वाडीसंबंधानें मला काय म्हणून निरोप पाठवित अहा? हो वाडी माझी आहे, तेव्हां तुमचा माझा संबंध काय ?" तें ऐकून पंचांनीं विचार केला कीं जाऊं दे, आपणच होऊन निकरावर येऊं नये: कांहीं दिवसांनीं त्याचें त्यालाच वाईट वाटून तो वाडी आपल्या

स्वाधीन करील. असें झाल्याला बरेच दिवस होऊन गेले तथापि वाडीची काहीं गोष्ट तो गृहस्थ बोलत नाहीं असें पाहून, सर्व पंचांनीं मिळून सरकारांत त्यावर फिर्याद गुदरली, आणि त्यास निरुपायामुळें न्यायाधीशाजवळ खेचीत नेलें. तेव्हां न्यायाधीशानें विचारलें, " अहो गृहस्थ, तुम्ही पंचांपासून वाडी घेतली ती त्यांस परत कां देत नाहीं ? " तेव्हां त्या गृहस्थानें जबाब दिला, " अहो वाडी कुणाची ? वाडी तर माझी आहे, त्यासंबंधाने पंचांचा माझा अर्था-अर्थी कांहीं संबंध नाहीं. " तेव्हां न्यायाधीशानें साक्षी व खतपत्रांचा पुरावा आणून आपलें म्हणणें शाबीत करण्यास त्या गृहस्थास सांगितलें. पण तो पुरावा कोठला आण-णार ? तेव्हां कांहीं तरी इकडलें तिकडलें ठोकून लबा-डीचें बोलणे बोलूं लागला त्यास कैद करून सरकारने सांगितले कीं " जोपर्यंत तूं यांची वाडी यास परत देणार नाहींस तोपर्यंत तूं कैदेंतून सुटणार नाहींस. "

वरील दृष्टांतावर सिद्धान्त.

जीवरूप मातबर मनुष्याला मोक्ष संपादन करण्याचें सत्कृत्य करण्याची इच्छा झाली. परंतु देव–गंधर्वादिकांच्या शरीरांत भोगांची आसक्ति विशेष असल्यामुळें त्यांची शरीरें धारण करून आत्मज्ञान होत नाहीं; त्याचप्रमाणें पशुपक्ष्यां-दिकांच्या देहांत अत्यंत अज्ञान असल्यामुळें त्यांचीं शरीरें धारण करून तर आत्मज्ञान संपादन करण्याची गोष्टच बोलावयास नको. आत्मज्ञान फक्त मोक्षद्वार जो मनुष्यदेह

तोच धारण करून होते, असें लक्षांत घेऊन, जीवाने पंचमहाभूतांपासून मनुष्यदेह मागून घेऊन त्यांत आपले बिऱ्हाड केले. तरीसुद्धां मनुष्यदेहांतल्या विषयासक्तिरूप विघ्नांच्या योगाने आत्मज्ञानद्वारा मोक्ष मिळविण्याचा जो मूळचा हेतु तो जीव विसरून गेला, इतकेंच नव्हे तर उलट तो पंचमहाभूतांनीं दिलेला देह, तो आपलाच देह असें म्हणूं लागला. तेव्हां पंचमहाभूतांनीं शास्त्राद्वारा जीवास अनेक निरोप पाठविले कीं, 'तूं' धारण केलेला देह आमचा आहे. यासाठीं तूं उगीच अभिमान धरून यावर ममत्व करूं नको. तरीसुद्धां त्या निरोपांची म्हणजे शास्त्रांच्या वचनांची त्यानें मुळींच पर्वा केली नाहीं. उलट क्वचित् त्याचा एकादा स्नेही किंवा कोणी सत्पुरुष वेदांतश्रवण करण्याबद्दल त्यास उपदेश करूं लागला तर त्यास काय इकडच्या तिकडच्या खोटयानाटया गोष्टी सांगून, व काय करावें, आपल्यास वेळ मिळत नाहीं; अशाप्रकारचे बहाणे करून, तो त्याच्या उपदेशाचा अनादर करी. अशारीतीनें आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं कांहीं कालाने तरी आत्मविचार करून जीव आमचा देह आम्हांला परत करील अशी आशा बाळगून पंचमहाभूतांनीं बहुत वर्षें वाट पाहिलीं, तरी जीव कशाला त्यासंबंधाने विचार करून गोष्ट काढतो आहे ? शेवटीं पाहून पाहून निरुपाय झाला तेव्हां पंचमहाभूतांनीं यमराजापाशीं फिर्याद गुदरली व ती गुदरतेवेळीं पुढें लिहिल्याप्रमाणें तक्रार केली– 'या

अज्ञानीं जीवाने आत्मज्ञानसंपादनाच्या कार्याचा बहाणा करून, आमच्यापासून मोक्षाचे साधन जो मनुष्यदेह तो घेतला आहे; पण बोलल्याप्रमाणें यानें मोक्षसाधन तर कांहीं केले नाहीं तें नाहींच; आणि उलट या आमच्या देहाचा आपण मालक होऊन बसला आहे. तर आमचा देह आम्हांला याजकडून परत देववावा.' ही वादीची तक्रार ऐकून यमराजानें आपला स्वतःचा एक दूत प्रतिवादी अज्ञानी जीवाकडे पाठवून त्याला आपणांस समक्ष येऊन भेटण्यास सांगितलें. यमराजाचा निरोप ऐकल्याबरोबर भयानें गडबडून जाऊन त्याने त्याजकडे जाण्याची तयारी केली. मग त्या वेळीं 'मला या वेळीं येण्यास फुरसत नाहीं; माझे निकडीचे काम आहे. आत्तांच मला येववत नाहीं.' असे बहाणे करून, मी येत नाहीं, असे सांगण्याची काहीं त्याची छाती झाली नाहीं. आपण जाणार असें ऐकून आपले स्त्रीपुत्रादिक संबंधी धायधाय रडताहेत असें पाहूनहि त्यांस एकदम सोडून देऊन, स्वतः यमराजाच्या दूतांबरोबर त्यास यमलोकास जावें लागले, तेव्हां यमराजानें त्यास विचारले, 'हा पंचभूतांचा देह तूं पंचभूतांस परत कां नाहीं देत.' तेव्हां अज्ञानी जीव म्हणू लागला, 'हा देह तर माझा आहे. याविषयीं पंचभूतांशीं माझा संबंध काय ?' तेव्हां पंचभूतांनीं हा स्थूल देह व सूक्ष्म देह आपला आहे असे शाबीत केले; त्यास चार वेद, अठरा पुराणे, वगैरे सर्व शास्त्रांनीं प्रमाणरूप

साक्षी दिल्या. अर्थातच अज्ञानी जीवाला हा देह आपला आहे असें सिद्ध करतां आलें नाहीं, तेव्हां यमराजाने दुसऱ्याचा देह आपला आहे असें मानल्याबद्दल त्या अज्ञानी जीवाला चौऱ्याऐंशी लक्ष योनीच्या कैदेंत टाकलें, त्यावेळीं ठराव केला तो असा :–

" त्यानें पंचभूतांचा देह त्यांस परत दिल्यावांचून त्याला या कैदेंतून बाहेर पडतां यावयाचेंच नाहीं."

यास्तव बा शिष्या, देह हा पंचभूतांचा आहे. सबब तो तूं आपला आहे असें समजूं नको आणि त्यांचा त्यास परत कर म्हणजे देह दृश्य आहे त्यामुळें तो आपण नाहीं, आणि तो पंचभूतांचा असल्यामुळें आपलाहि नाहीं, असा मनांत विवेक करून देहावरील अहंता व ममता टाकून दे.

शिष्य :–"ह्या देहाचा तूं द्रष्टा आहेस म्हणून देहच तूं नव्हेस, आणि देह पंचभूतांचा असल्यामुळें तुझाहि नाहीं," असें गुरुमहाराज आपण मला सांगितलें. पण पंचमहाभूतें म्हणतात तीं कोणतीं तें मला ठाऊक नाहीं. तर त्यांचीं नांवें मला सांगावीं.

गुरु :––आकाश, वायु, तेज, आप आणि पृथ्वी हीं पंचमहाभूतें आहेत.

शिष्य :––आपण सांगितलेल्या पंचभूतांचें भाग माझ्या शरीरांत तर मला स्पष्टपणें दिसत नाहींत, असें असून या देहास पंचमहाभूतांचा देह काय म्हणून म्हणावयाचें बरें ?

गुरु :---अरे बाबा, विचार करून शोधून पाहाशील तर ते तुला समजेल. तुझ्या शरीरांत जितका कठीण भाग आहे तितका पृथ्वीचा आहे; द्रवीभूत (रसरूप) जितका भाग आहे तितका आपाचा (पाण्याचा) आहे; उष्ण भाग तितका सर्व तेजाचा आहे, चलनवलनादिक वायूच्या योगानें होतें. म्हणून तशा सर्व क्रिया वायूच्या आहेत, आणि पोकळी म्हणून जेवढी आहे तेवढा सर्व भाग आकाशाचा आहे.

शिष्य :---हा देह पंचभूतांचा आहे असें आपण संक्षेपानें सांगितलें, पण तें विस्तारपूर्वक कळण्यासाठीं स्थूल देहांत पंचभूतांचीं वेगवेगळीं तत्त्वें कोणतीं आहेत तें कृपा करून सांगावें.

गुरु :---स्थूल देहाच्या तत्त्वांचें कोष्टक पुढें दिल्या-प्रमाणें आहे.

स्थूल देहाच्या कोष्टकावरील टीकाहि पुढें दिली आहे.

आकाशाची---पांच तत्त्वें आहेत. त्यांचीं नांवें काम, क्रोध, शोक, मोह आणि भय अशीं आहेत. हीं सर्व हृदयाकाशांत उत्पन्न होतात म्हणून आकाशाची आहेत, हें जाणतोस. अर्थात् ही तत्त्वेंच तूं नाहींस. हीं तत्त्वें आकाशाचीं आहेत म्हणजे तुझीं नाहींत; तूं यांचा द्रष्टा आहेस; आणि हीं पांच तत्त्वें बंधनद्वारा अत्यंत दुःख देणारीं आहेत. हे सुप्रसिद्धच आहे.

स्थूल देहाच्या तत्त्वांचे कोष्टक नं. १

आकाशाची	वायूची	तेजाची	आपाची	पृथ्वीची
काम	चलन	क्षुधा	शुक्र	अस्थि
क्रोध	वलन	तृषा	शोणित	मांस
शोक	धावन	आलस्य	लाला	त्वचा
मोह	प्रसारण	निद्रा	मूत्र	नाडी
भय	आकुंचन	कांति	स्वेद	रोम

हे ध्यानांत धरून कामादिकांचा त्याग करावा असे माझे तुला सांगणें आहे. कामाच्या ठिकाणीं आसक्त झाल्यामुळे रावणास अत्यंत दुःख झालें आणि त्याचें राज्य गेले. यासाठी कामाचा त्याग करावा.

क्रोध हा राक्षसापेक्षांहि जास्त घातुक आहे. कारण राक्षस दुसऱ्याचे रक्त पिऊन रहातो. पण क्रोधी मनुष्य स्वतःचे व दुसऱ्याचें असे दोघांचेहि रक्त पितो. (जाळून टाकतो)

राक्षसाचा अनुभव रात्र झाली म्हणजेच येतो, पण क्रोध तर रात्री आणि दिवसांस, बघावा तेव्हां थयथयाट घालींत असतो, राक्षस दुसऱ्यास भीति दाखवतो. आपण स्वतः कधी भीत नाही पण क्रोधी स्वतःहि भिऊन दुसऱ्यास भीति दाखवितो ; म्हणून क्रोधी मनुष्यला

राक्षसापेक्षांहि नीच समजून त्यागावा. त्याचप्रणाणे शोक मोह आणि भय यांपासूनहि दुःख होतें, हें प्रत्येक प्राण्यास येणाऱ्या अनुभवाने सिद्ध आहे. म्हणून त्याचाहि त्याग करावा. निदान त्यांच्या ठिकाणी अहंता किंवा ममता तरी ठेवू नये. वस्तुतः ही कामादिक पांच तत्त्वें, सूक्ष्म देहाचें धर्म आहेत. स्थूल देहाचे नाहीत. तरी पण यांच्या तडाक्याचा अंमल स्थूल देहाच्या ठिकाणीं स्पष्टपणे नजरेस येतो. म्हणून ही स्थूल देहाची तत्त्वें आहेत असें समजून, यांचे स्थूल देहाच्या तत्त्वांबरोंबर वर्णन केलें आहे.

वायूचीं——पांच तत्त्वें आहेत. त्यांची नांवे चलन (चालणें), वलन (वळणे), धावन (धावणें), प्रसारण (पसरणें किंवा लांब करणे) आणि आकुंचन (आंखडणें) कांहीं ठिकाणीं वलनाच्याबद्दल उत्क्रमण (उभे राहणें) सांगितले आहें. या पांचहि तत्त्वांस तूं ओळखतोस म्हणून हीं तत्त्वेंच तूं नाहींस व हीं वायूची आहेत म्हणून तुझीहि नाहींत. वायूवांचून चलनादि क्रिया घडूं शकत नाहींत म्हणून ही तत्त्वे वायूची आहेत असे म्हटले. तू यांचा साक्षी आहेस.

तेजाची——पांच तत्त्वे आहेत ती अशी :—क्षुधा (भूक लागणे), तृषा (तहान लागणे), आलस्य (आळस), निद्रा (निजणे), आणि कांति (तेज) ही पांचहि तेजाचे भाग आहेत असे स्पष्टपणे अनुभवास येते. कारण पोटांत अग्नि प्रबळ झाल्यावांचून भूक लागत नाही, उष्ण काली अग्नि-

रूप उष्णतेच्या जोरावर तहान जास्त लागते, व त्या उष्ण कालाच्याच दिवसांत आळस आणि झोंप इतर दिवसांपेक्षां जास्त येतात, शिवाय झोंप घेतल्यानें अन्नाचें पचनहि चांगलें होतें, म्हणून झोंप आणि आळस दोन्हीं अग्नीचे भाग आहेत. कांति हा तेजाचा भाग आहे हें तर स्पष्टच दिसून येतें.

आपाचीं--पांच तत्त्वें आहेत, तीं अशीं :--शुक्र (वीर्य), शोणित (रक्त), लाला (लाळ) मूत्र (मूत), आणि स्वेद (घाम), हीं पांचहि जलरूप आहेत, असें स्पष्ट दिसून येतें म्हणून जलाचीं आहेत. असें म्हटलें.

पृथ्वीचीं--पांच तत्त्वें आहेत. त्यांचीं नावें अस्थि (हाड), मांस (मांस), त्वचा (चामडी,) नाडी (शिरा) आणि रोम (केस); हीं पांच तत्त्वें पृथ्वीचीं आहेत असें म्हणण्यांतला हेतु हाच आहे कीं, ज्यावेळीं स्थूल शरीरांतून प्राण निघून जातो त्यावेळीं आकाश, वायु, तेज आणि जल या चारहि भूतांचे कामक्रोधादि विभाग आकाशादि भूतांत मिसळून जातात हें पाहण्यांत येतें. कसें तें पाहा :--प्रेतामध्यें काम, क्रोध, वगैरे आकाशाचीं तत्त्वें नसतात, चलनवलनादि वायूची तत्त्वें नसतात, क्षुधा, तृषा, इत्यादि तेजाची तत्त्वें नसतात, शुक्रशोणितादि जलाचीं तत्त्वें नसतात, परंतु एकटचा पृथ्वीचीं पांचहि तत्त्वें म्हणजे अस्थि, मांस, त्वचा, नाडी आणि रोम हीं मात्र दृष्टीस पडतात. हीं तत्त्वें, प्रेत जाळलें तर भस्मरूप होऊन, पुरलें तर

मातींत माती मिळून, जनावरांकडून खावविलें तर विष्ठारूप होऊन, पृथ्वीला मिळून जातात. म्हणून तीं पृथ्वीचीं आहेत. त्यांस तूं ओळखलेंस म्हणून तीं तूं नाहींस. तीं पृथ्वीचीं आहेत त्यासाठीं तुझीहि नाहींत. तूं द्रष्टा साक्षी आहेस. वर सांगितलेल्या पंचवीस तत्त्वांचा हा स्थूल देह झालेला आहे आणि तो पंचीकृत पंचमहाभूतांचें कार्य आहे.

शिष्य :---सद्‌गुरो, आपण पंचीकृत पंचमहाभूतें म्हटलीं तीं कशी असतात तें सांगावे.

गुरु :---ईश्वराच्या इच्छेनें, प्रत्येक भूताचे प्रथम बरोबर दोन दोन भाग होतात. त्या दोन दोन भागांपैकीं एक एक भाग निराळा राहून, बाकी राहिलेल्या प्रत्येक अर्ध्या भागाचे पुन: चार सम भाग होतात, म्हणजे अर्थातच हा एक भाग सर्व भूतांचा एक अष्टमांश झाला. नंतर वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक भूताच्या निराळ्या राहिलेल्या सबंध अर्ध्या भागांत दुसऱ्या भूतांचा प्रत्येक अर्ध्या भागाचा (अर्धक) चौथा भाग, म्हणजे पूर्वोक्त एक अष्टमांश मिसळून पांचापांचाचें असें प्रत्येक भूत तयार होतें. यालाच पंचीकरण म्हणतात. अशारीतीनें ज्यांचे पंचीकरण झालेंले असतें त्यांस पंचीकृत पंचमहाभूतें म्हणतात. अशा पंचीकृत पंचमहाभूतांपासून हीं वर सांगितलेलीं पंचवीस तत्त्वें स्पष्ट दृष्टीस पडतील, अशा प्रकारानें हा स्थूल देह उत्पन्न झाला आहे. आतां या स्थूलदेहाचीं पंचवीस तत्त्वेंहि पंचीकरणाच्या रीतीनें समजलीं जावींत या उद्देशानें पुढील कोष्टक दिलें आहे.

स्थूल देहाचीं पंचीकृत पंचवीस तत्त्वें समजून घेण्याचें

कोष्टक नं. २

पंचभूतें	पृथ्वीची	जलाची	तेजाची	वायूचीं	आकाशाची
पृथ्वीचीं	अस्थि	शोणीत	आलस्य	संकोचन	कटचाकाश
जलाचीं	मांस	शुक्र	कांति	चलन	उदराकाश
तेजाचीं	नाडी	मूत्र	क्षुधा	उत्क्रमण	हृदयाकाश
वायूचीं	त्वचा	स्वेद	तृषा	धावन	कंठाकाश
आकाशाचीं	रोम	लाला	निद्रा	प्रसरण	शिरआकाश

कोष्टकाचा अर्थ

पृथ्वीचा--अस्थि (हाड) मुख्य भाग आहे. तें पृथ्वीप्रमाणें कठीण असतें म्हणून त्याला पृथ्वीचा अर्धा भाग समजावे. बाकी राहिलेल्या अर्ध्या भागाचे चार भाग झाले ते असे:-१ शोणित. २ आलस्य. ३ संकोचन आणि ४ काटचाकाश: हे जलादि बाकीच्या भुतांत मिसळले. ते कसे ते सांगतो.

१ शोणित--(रक्त) याचा रंग तांबडा असतो म्हणून हें

पृथ्वीचा भाग आहे. हे जलांत मिसळले यासाठी जलाच्या तत्त्वाबरोबर याचा उल्लेख करतात.

२ आलस्य--पृथ्वीप्रमाणें आळसांत जडता असते, म्हणून हें पृथ्वीचा भाग आहे. पण हें तेजाशी मिळाले त्यामुळें याचा तेजाच्या तत्त्वांबरोबर उल्लेख करतात.

३ संकोचन--हेंहि पृथ्वीप्रमाणेंच जडतेचा हेतु आहे. सबब पृथ्वीचा भाग आहे. पण हें वायूशीं मिसळल्यामुळे याची गणना वायूच्या तत्त्वांबरोबर होतें.

कटचाकाश--हें पृथ्वीचा भाग जो मळ त्यास सांठविते, म्हणून पृथ्वीचा भाग आहे. पण हें आकाशास मिळाले असल्यामुळें याला आकाशाचें तत्त्व म्हणतात.

जलाचा--मुख्य अर्धा भाग वीर्यं आहे. याचें कारण जल जसें पांढरें असून वृक्षादिकांस उत्पन्न करते, तसेंच वीर्यहि पांढरें असून गर्भ उत्पन्न करतें. म्हणून हें जलाचा भाग आहे असें समजावे. आतां बाकी राहिलेल्या अर्ध्या भागाचे चार भाग झाले ते असे:--१ मांस, २ कांति, ३ चलन आणि ४ उदराकाश, हे पृथ्वी आदिकरून बाकीच्या चार भूतांत कसे मिळाले तें सांगतों.

१ मांस--द्रवीभूत आहे म्हणून पाण्याचा भाग आहे पण पृथ्वीच्या तत्त्वांबरोबर मिसळल्यामुळें त्याला पृथ्वीचें तत्त्व समजतात.

२ कांति--जलाचा भाग आहे. कारण जलाच्या संबंधाने कांतींत फेरफार होतात, पण ही कांति तेजाबरोबर मिसळल्यामुळे तेजाचें तत्त्व म्हणतात.

३ चलन--पाण्याप्रमाणें वाहतें किंवा पसरत असते त्यामुळें जलाचा भाग आहे, पण हें वायूच्या तत्त्वाबरोबर मिसळल्यामुळें याला वायूचे तत्त्व म्हणतात.

४ उदाराकाश--जलाची राहण्याची जागा आहे म्हणून जलाचा भाग आहे, पण हें आकाशाच्या तत्त्वाबरोबर मिसळल्यामुळें याला आकाशाचें तत्त्व म्हणतात,

तेजाचा--मुख्य अर्धा भाग क्षुधा आहे. कारण उदरांत अग्नि प्रबळ झाल्याने क्षुधा लागते. बाकीच्या अर्ध्या भागाचे चार भाग झाले; त्यांची नांवें-१ नाडी, २ मूत्र, ३ उत्क्रमण, आणि ४ हृदयाकाश हे पृथ्वी आदिकरून बाकीच्या चार भूतांत कसें मिळालें ते सांगतों,

१ नाडी--हिच्या योगानें ज्वरपरीक्षा होते, यासाठीं ही तेजाचा भाग आहे, पण ही पृथ्वीच्या तत्त्वांशी मिसळून गेल्यामुळें हिला पृथ्वीचें तत्त्व म्हणतात.

२ मूत्र--उष्ण असते म्हणून तेजाचा भाग आहे, पण जलाच्या तत्त्वांशीं हें मिसळल्यामुळें याला जलाचे तत्त्व म्हणतात.

३ उत्क्रमण--यांत अग्नीच्या गतीप्रमाणें ऊर्ध्वगति असते

म्हणून उत्क्रमण हें तेजाचा भाग आहे, पण हें वायूच्या तत्त्वांशीं मिसळलें म्हणून याला वायूचें तत्त्व म्हणतात.

४ हृदयाकाश--सदासर्वदा हृदयांत उष्णता असते यावरून तेंजाचा भाग आहे, पण हें आकाशाच्या तत्त्वांशीं मिसळल्यामुळें याला आकाशाचें तत्त्व म्हणतात.

वायूचा--स्वतःचा अर्धा भाग (धावणें) आहे, कारण वायूप्रमाणें वेगाने धावणें होते. बाकी राहिल्या वायूच्या अर्ध्या भागाचे ४ भाग झाले ते असे:-- १ त्वचा, २ स्वेद, ३ तृषा, ४ कंठाकाश. हे पृथ्वी आदिकरून बाकीच्या चार भूतांशीं कसे मिळाले तें सांगतो.

१ त्वचा--हिच्या योगाने स्पर्श होतो म्हणून त्वचा वायूचा भाग आहे, पण ही पृथ्वीच्या तत्त्वांशीं मिसळल्यामुळे हिला पृथ्वीचे तत्त्व म्हणतात.

२ स्वेद--(घाम) एकसारखा चालत असलेल्या श्वासोच्छ्वासरूप वायूनेच उत्पन्न होतो, आणि वायूनेच सुकतो, म्हणून वायूचा भाग आहे, पण हा जलाच्या तत्त्वांशीं मिसळल्यामुळे याला जलाचें तत्त्व म्हणतात.

३ तृषा--वायूच्या योगाने शोषण होऊन, किंवा कोरडा पडून उत्पन्न होते. यासाठीं वायूचा भाग आहे, पण ही तेजाच्या तत्त्वाबरोबर मिसळल्यामुळे हिला तेजाचे तत्त्व म्हणतात.

कंठाकाश--वायूचे जाण्यायेण्याचे ठिकाण आहे म्हणून वायूचा भाग आहे; हे आकाशाच्या तत्त्वांबरोबर मिसळल्यामुळे याला आकाशाचें तत्त्व म्हणतात.

आकाशाचा-- स्वतःचा मुख्य अर्धा भाग चिरआकाश आहे, कारण डोक्यांत जी पोकळी आहे ती आकाशरूप आहे. ह्याच्या बाकी राहिलेल्या अर्ध्या भागाचें चार भाग झाले ते असे:--१ रोम, २ लाला, ३ निद्रा, आणि ४ प्रसरण, हे पृथ्वी आदिकरून भूतांशी कसे मिसळले ते सांगतो.

१ रोम--कापल्याने दुःख होत नाहीं म्हणून आकाशाचा भाग आहे, पण हा पृथ्वीच्या तत्त्वांबरोबर मिळाल्यामुळें याला पृथ्वीचे तत्त्व म्हणतात.

२ लाला--शिर आकाशांतून खाली येते म्हणून आकाशाचा भाग आहे. पण ही जलाच्या तत्त्वांबरोबर मिळाल्यामुळे हिला जलाचें तत्त्व म्हणतात.

३ निद्रा--शून्यस्वभाव असल्यामुळे आकाशाचा भाग आहे, पण ही तेजाच्या तत्त्वांबरोबर मिळाली म्हणून हिला तेजाचें तत्त्व म्हणतात.

४ प्रसरण--यांत व्यापकता असते, म्हणुन प्रसरण आकाशाचा भाग आहे, पण वायूच्या तत्त्वांबरोबर हे मिळाल्यामुळें व वायुमुळेच शरीर लठ्ठ होत असल्यामुळे याला वायूचे तत्त्व म्हणतात.

या रीतीनें स्थूल देहाच्या पंचवीस तत्त्वांनीं पंचीकरणाचें निरूपण केलें आहे ते गौण पक्षाने समजण्यासाठीं केलें आहे. परंतु खरें पाहिलें तर पंचीकृत पंचमहाभूतांच्या पंचवीस तत्त्वांचा स्थूल देह झाला आहे म्हणून जें सांगितलें तोच मुख्य पक्ष आहे. तो तत्त्वें पहिल्या कोष्टकांत निरूपण केल्याप्रमाणे समजावो. पण आकाशाच्या तत्त्वासंबंधानें मात्र दोन पक्ष आहेत त्यापैकीं पहिल्यांत कामक्रोध आदि पांच तत्त्वें सांगितली आहेत. आणि दुसऱ्या पक्षांत शिर-आकाश, कंठाकाश, हृदयाकाश, उदराकाश, आणि कटयाकाश हे पांच आकाशाचे भाग सांगितले आहेत. पण ह्या सर्वांचे निरूपण करण्यांत मुख्य अभिप्राय म्हणून तुला सांगावयाचा तो इतकाच कीं; हीं सर्व तत्त्वें भौतिक (पंचभूतांचें) कार्य असल्यामुळें जड असून परिणामी, विकारी आणि असत्य आहेत. आणि आपण स्वतः त्यांना जाणणारा, द्रष्टा, निर्विकार, असंग असाआत्मा असून त्या तत्त्वाच्या समुदायाच्या रूपानें असणारा स्थूल देहच आपण नाहीं, व तीं तत्त्वें पंचभूतांची आहेत त्यामुळें आपलीहि नाहींत असें जाणुन, त्यांच्यांतला अहंताममतारूप अध्यास टाकून द्यावा. त्या तत्त्वापैकीं कोणतेही एकादे तूं स्वतः आहेस कीं काय त्याचा विचार करून, त्याचप्रमाणें त्यापैकी एखादे तत्त्व आपलें आहे असें मानण्याचें भाग पडण्याइतका तुझा त्यांचा कांहीं संबंध आहे कीं काय याचा खरा विचार करून

पाहाशील तर त्यांतकीं कोणतेंही एकादें तत्व किंवा तशा अनेक तत्वांनीं झालेला देहच तूं स्वत: नाहींस व देह पंचभूतांचा असल्यामुळें तुझाहि नाहीं. असें तुला खचित समजून येईल. यासाठीं अशा विचारांनींच देहावरील अहंता-ममता नष्ट होतात. देह हें एक नांव खरें, पण तें वरील पंचवीस तत्वें एकत्र मिळाल्यानें प्राप्त झालेलें आहे. देहाचें पृथक्करण करून निघालेली सर्व तत्वे निरनिराळीं करून; एकाजवळ एक अशी जर मांडून ठेवली तर देह म्हणतात तो कांहीं सिद्ध व्हावयाचा नाहीं. दगड, वीट, लांकूड, चुना, इत्यादि सर्व पदार्थ ठिकाणच्या ठिकाणीं जोडल्यानें घर असें नांव सिद्ध होते. हें अगदीं खरें आहे, पण त्याच्याबद्दल प्रत्येक वस्तू वेगवेगळीं करून ठेवली तर घर म्हणतात ते कांहीं दिसणार नाहीं. देहाचीहि गोष्ट तशीच आहे. यासाठीं खऱ्या रीतीनें विचार करून पाहिला असतां, देह सत्य आहे असें मुळींच सिद्ध होत नाहीं; ती कल्पना मात्रच आहे, याच्यासंबंधानें तुला एक दृष्टांत सांगतो त्यावरून ह्या गोष्टीचा अधिक चांगल्यारीतीनें विचार कर.

पंचमहाभूतांची तत्वें वेगळीं वेगळीं समजल्यानें देह सिद्ध होत नाहीं त्याला गाडीचा दृष्टांत

'विवेकी' आणि 'अविवेकी' या नांवाचे दोन गृहस्थ एकदां रस्त्यावरून सहज बोलत चालले होते; तेव्हां अविवे-

क्यानें विवेक्याला म्हटलें, "अहो विवेक बुवा, तुम्ही बराच वेळ चालून चालून थकला असाल, यासाठीं ती तिकडून गाडी येते आहे तींत आपण बसून जाऊं चला." विवेकी म्हणाला "गाडी येते आहे म्हणतोस ती कोठे आहे ती मला नाहीं बुवा दिसत." त्यावर अविवेकी म्हणाला, "अहो गाडी येत आहे ती अगदीं स्वच्छ दिसते आहे. असें असून तुम्ही तर म्हणता कीं ती दिसत नाहीं म्हणून; याचा अर्थ काय बरें ?" विवेकी उत्तर देतो, "जर ती गाडी नाहीं असें सिद्ध झालें तर तुला कोणती शिक्षा करावी तें अगोदर सांग पाहूं ?" अविवेक्याने उत्तर दिलें, "तुम्ही म्हणतां तसे जर सिद्ध झालें तर तुम्ही आमच्या थोबाडीत मारावी." असा त्यांचा वाद चालला आहे. इतक्यांत गाडी जवळ येऊन ठेपली. तेव्हां अविवेकी म्हणाला, "हं, ही गाडी आली. तुमची मर्जी असल्यास हिचें भाडें नक्की ठरवून आपण हिच्यांत बसूं या." त्यावर विवेकी म्हणाला, "गाडी, गाडी असें तोंडानेच काय म्हणतो आहेस, गाडी कोणती ती मला आपला हात ठेवून तर दाखीव." अविवेक्यानें गाडीच्या एका भागावर हात ठेवून म्हटलें कीं, "ही पहा गाडी." तेव्हां विवेकी म्हणाला, तूं ज्यावर आपला हात धरला आहेस तो गाडीचा आंस आहे." तेव्हां अविवेक्यानें गाडी-वर दुसरीकडे आपले बोट ठेवलें. तेव्हां विवेकी म्हणाला, ही कांही गाडी नव्हे, हे तर चाक आहे." तेव्हां अविवे-

क्याने आपले बोट गाडीवर तिसऱ्या एका ठिकाणी ठेवले, तेव्हां विवेकी म्हणाला, अरे ही तर कमान आहे, गाडी नव्हें." अशारीतीने अविवेक्याने जेथे जेथें म्हणून हात ठेवावा, तेथल्या तेथल्या भागाचें तेवढें नांव विवेक्याने घेऊन ही गाडी नव्हे म्हणून सांगावे. एवंच, गाडी म्हणून कांहीं सिद्ध झाली नाहीं, तेव्हां अविवेक्याचा निरुपाय होऊन तो म्हणाला, "ठीक आहे, तर मग ठरल्याप्रमाणें आतां तुम्ही माझ्या एक थोबाडीत लगवा. तेव्हां विवेकी म्हणाला, 'तुझे थोबाड कोठले तेवढे बोट ठेवून मला दाखव पाहूं ? म्हणजे मग मारीन." तेव्हां अविवेक्याने गालावर हात ठेवला. तें पाहून विवेकी म्हणाला, "हा तर गाल आहे." फिरून फिरून अविवेक्यानें इतर पुष्कळ ठिकाणीं हात ठेवून दाखविला त्यावेळीं विवेक्यानें, "हे तर कपाळ आहे. ही तर दाढी आहे. हा तर ओठ आहे. हें तर नाक आहे, हा तर डोळा आहे." इत्यादि प्रकारची त्यास उत्तरें देऊन त्याचें म्हणणे खोडून काढले. तात्पर्य काय, कीं जशी गाडी म्हणून कोणती ती सिद्ध झाली नाहीं, तसेच थोबाड म्हणून कोणते तेंहि सिद्ध झाले नाहीं.

याप्रमाणेंच इतर कोणत्याही पदार्थांच्या केवळ खऱ्या स्वरुपावरून पाहिलें तर त्याच्या नांवाची सिद्धता होऊं शकतच नाहीं केवळ व्यवहार सिद्ध करण्यासाठीं नांवाची

कल्पना मात्र केलेली असते. त्याच न्यायानें हा देहसुद्धां कल्पनासिद्धच आहे. त्यामुळें त्याच्यांत अहंता ममता राहूं शकतील असें बिलकुल संभवत नाहीं. यास्तव देहावर अहंता ममता करूं नये, व तशा त्या केल्या नाहीं तरच मोक्ष होईल, शिवाय, या स्थूल देहाला अन्नमय कोश असें नांव देऊन त्याचे वर्णन केलेले आहे. त्या अन्नमय कोशाहूनही आत्मा वेगळा आहें असें जाणावें.

शिष्य :-- स्थूल देहाला अन्नमय कोश कां म्हणतात तें कृपा करून सांगावें.

गुरु :-- जिवाच्या आईबापांनीं खाल्लेल्या अन्नाचा परिणाम म्हणुन त्यांच्या शरीरांत रक्त आणि वीर्य उत्पन्न होतात. त्या रक्तवीर्यांच्या संयोगानें जीवाचा हा स्थूल देह उत्पन्न होतो. जीव जन्मल्यानंतर सुद्धां त्याच्या आईने खाल्लेल्या अन्नाचाच परिणाम म्हणून तिच्या स्तनांत दुध उत्पन्न होते. तें दुध पिऊनच जीवाचा स्थूल देह वाढतो, व दांत आल्यानंतरही अन्न खाऊनच जीवाचा देह जगतो. शिवाय, हा प्रत्यक्ष स्थूल देहही इतर जीवांचें अन्नरूप भक्ष्य आहे, तो स्वत: अन्न खाल्यावांचून जगूंच शकत नाहीं; व गळून पडतो तेव्हां अन्नरूपच पृथ्वीमध्यें लय पावतो. या इतक्या कारणांसाठीं स्थूल देहाला अन्नमय म्हटलें आहे. आतां कोश म्हटलें याचें कारण असें

कीं, तरवार झांकून ठेवण्याचें जें म्यान असतें त्याचें जसें कोश हें एक नांव आहे व द्रव्य झांकून ठेवणाऱ्या भांडारालाही जशी कोश ही संज्ञा आहे, त्याच न्यायानें अन्नमय शरीराच्या योगानें आत्मा झांकला जातो म्हणून शरीरालाही अन्नमय कोश म्हणतात. तो अन्नमय कोश दृश्य आहे परंतु आपण आत्मा अन्नमय कोशाहून निराळा असून, त्या कोशाचा द्रष्टा आहें. त्यामुळें आपण अन्नमय कोशातीत आहों, असे मुमुक्षूनें सद्गुरुजवळून समजावून घेऊन त्याचा आपल्या मनांत पक्का निश्चय करावा.

अशारीतीनें स्थूल देहाचें वर्णन केल्यानंतर आतां पुढें मी त्याच्या अवस्थादिकांचें वर्णन करतों.

॥ चौपाई ॥

गुरु—जाग्रत अवस्था नेत्र स्थान,
वैखरी वाचा स्थूल भोग जान ॥
क्रिया शक्ति रजोगुण मान,
अकार मात्रा विश्व अभिमान ॥ ७ ॥

स्थूल देहाचीं जागृदवस्थादि जीं आणखी आठ तत्वें आहेत त्यांतील प्रत्येकाचे नांव व वर्णन पुढें दिल्याप्रमाणें आहे :—

जागृदवस्थेंतील आठ तत्त्वांचे कोष्टक नं. ३

पांच ज्ञानेंद्रियांचीं नांवें	त्यांच्या विषयांची नांवें	त्यांच्या देवतांची नांवें
श्रोत्र	शब्द	दिशा
त्वचा	स्पर्श	वायु
चक्षु	रूप	सूर्य
जिव्हां	रस	वरुण
घ्राण	गंध	अश्विनीकुमार
पांच कर्मेंद्रियांचीं नांवें	**त्यांच्या विषयांची नांवें**	**त्यांच्या देवतांची नांवें**
वाक्	वचन	अग्नि
पाणि	आदान	इंद्र
पाद	गमन	उपेंद्र
शिश्न	आनंद	प्रजापति
गुद	विसर्ग	मृत्यु
चार अंतःकरणांचीं नांवें	**त्यांच्या विषयांची नांवे**	**त्यांच्या देवतांची नांवें**
मन	संकल्प	चंद्रमा
बुद्धि	निश्चय	ब्रह्मा
चित्त	चिंतन	नारायण
अहंकार	अभिमान	रुद्र

कोष्टकाचा अर्थ

१ जागृदवस्था--जीव जागा असून त्यास इंद्रियांपासून म्हणजे पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें आणि चार अंत:करणे यांपासून झालेल्या त्यांच्या शब्दस्पर्शरूपरसगंधादि विषयाचे ज्ञान ज्या अवस्थेंत स्पष्टपणें होते, त्या अवस्थेला जागृदवस्था म्हणतात, असे शास्त्रांत स्पष्टपणें सांगितलेलें आहे. जीवाच्या या जागृदवस्थेचा व्यवहार एकंदर मिळून बेचाळीस तत्त्वांपासून होतो. त्या बेचाळीस तत्त्वांची नांवे वर दिलेल्या कोष्टकावरून समजावीं.

वर सांगितलेल्या बेचाळीस तत्त्वांपैकीं प्रसंगोपात्त एकादें तत्त्व जरी कमी असले तरी तितका व्यवहार जागृदवस्थेंत कमी होईल. जागृदवस्थेंत जागे झाल्यापासून निजेपर्यंत जे कांहीं आपले व्यवहार होतात त्या सर्वांना जाणणारे आपण साक्षी आहो असें जाणावें.

२ नेत्रस्थान--जागृदवस्थेचे आहे. कारण विशेषेंकरून नेत्राच्या योगानें जागृदवस्थेंतले व्यवहार घडतात.

३ वैखरी (वाचा)--जागृदवस्थेंत असते. १ कंठ, २ तालु, ३ जिव्हामूल. ४ दांत, ५ ओष्ठ (ओठ), ६ नासिका (नाक), ७ ऊर (छाती), ८ शिर (डोकें) या आठ स्थानांच्या योगानें स्पष्टपणें मनुष्य जे बोलतो त्याचें नांव वैखरी वाचा.

४ स्थूलभोग-म्हणजे सुखदु:खादि जे भोग स्पष्टपणे जागृदवस्थेत होतात ते.

५ क्रियाशक्ति--म्हणजे जागृदवस्थेंत शरीराकडून क्रियारूप व्यवहार ज्या शक्तीनें होतात ती.

६ रजोगुण–म्हणजे अभिमानाच्या योगानें रागद्वेषादि राजसी या ज्या गुणाच्या योगानें जागृदवस्थेंत घडतात तो

७ अकारमात्रा–अक्षरालाच मात्रा म्हणतात, ही या अवस्थेंत असते.

८ विश्वाभिमान--म्हणजे जागृदवस्थेत बुद्धीच्या ठिकाणीं आत्म्याचा जो आभास (आपण कर्ता, आपण भोक्ता इत्यादि प्रकारचा जीवानें केलेला अभिमान) तो.

या सर्व तत्वांस तूं जाणतोस: यासाठीं तूं तीं तत्वेंच नाहींस. ती सर्व जागृदवस्थेचीं संबंधी आहेत. अर्थात् तुझीहि नाहींत. तूं त्यांचा द्रष्टा व साक्षी आहेस.

॥ चौपाई ॥

गुरु :–उमलां पच्चीस ने आ अष्ट,
एवा तत्व तेत्रीश स्पष्ट ॥
ए दृश्य तुं द्रष्टा जाण,
ए तुं केम थाईश वेदप्रमाण ॥८॥

टीका ॥ स्थूल देहाची वर सांगितलेलीं कामक्रोधादि पंचवीस तत्वें, आणि जागृदवस्थादि हीं आतां सांगितलेलीं

आठ तत्त्वें, मिळून एकंदर तेहतीस तत्त्वें स्पष्टपणें समजून येणारी आहेत. या सर्व तत्त्वांस तूं जाणतोस म्हणजे हीं तुला दृश्य आहेत व तूं यांना जाणणारा द्रष्टा आहेस. हीं तत्त्वेंच तूं नव्हेस. अशाविषयीं वेदांत प्रमाणें आहेत. श्री शंकराचार्यंही वाक्यवृत्ति नांवाच्या आपल्या ग्रंथांत हेंच, म्हणजे, " देहाहून आत्मा भिन्न आहे " असे सांगतात:--

॥ श्लोक ॥

घटद्रष्टा घटाद्भिन्नः सर्वथा न घटो यथा
देहद्रष्टा तथा देहो नाहमित्यवधारयेत् ॥

अर्थ ॥ जसा घटाचा [मडक्याचा किंवा भांड्याचा] द्रष्टा [पाहणारा] घटाहून भिन्न असतो, व कोणत्याही प्रकारें घटच होऊं शकत नाहीं, तसाच देहाचा द्रष्टा जो आपण स्वत: आत्मा तो आपण कदापि देहरूप असूं शकणार नाहीं, असा मनुष्यानें निश्चय करावा.

घट पंचभूतांपासून उत्पन्न झालेला असल्यामुळे जड आणि दृश्य आहे, हा तुझा देहहि पंचभूतांपासून झालेला असल्यामुळें जड आणि दृष्य आहे, म्हणून घटासारखा आहे. त्याचा द्रष्टा तूं चैतन्य आहेस.

शिष्य:--गुरुमहाराज, घट जसा उत्पन्न होतो तसाच राहतो, म्हणजे वाढत नाहीं, त्यामुळें जड आहे हें ठीक

आहे, पण देह तर प्रतिदिनीं वाढत असतो त्यामुळें चैतन्य असला पाहिजे. तर मग देह घटाप्रमाणें आहे असे आपण सागितलें तें कसें बरें ?

गुरु:—देह वाढत असतों इतक्यावरून तो चैतन्य आहें असे म्हणता येणार नाहीं, रोजच्या रोज विटावर विटा चढवून भित वाढविली असतां वाढते, किंवा उकिरड्यावर रोजच्या रोज कचरा टाकीत राहिले तर तो सुद्धां वाढत जाऊन मोठा होतो, म्हणून भितीस आणि उकिरड्यास जसें चैतन्य म्हणतां यावयाचें नाहीं; त्याचप्रमाणे, देहांतही दररोज अन्न-पाणी, भाजी, मिठाई इत्यादि कचरा पडत असल्यामुळे तो वाढत असतो, असा तो वाढत असतो इतक्यावरूनच त्यास चेतन्य म्हणतां येणार नाहीं. लोखंडांत अग्नीच्या संबंधाने जशी दाहकता दिसून येते तसेच चेतन्यरूप आत्म्याच्या संबंधाने देहाच्या ठिकाणीं चैतन्य प्रतीत होते, म्हणजे अनुभवास येते. देह स्वतः सिद्ध चैतन्य नाहीं. या रीतीने देह जड आहे, तूं त्याचा द्रष्टा अर्थात् त्याहून वेगळी चित्स्वरूप अजर अमर, असा आत्मा आहेस.

शिष्य—महाराज, मी तर जन्मलो आहे, आणि मरणार हेंही खचित आहे, असे असून आपण मला अजर, अमर, म्हणता, तसा मी कसा असूं शकेन? ते सांगण्याची कृपा करावी.

गुरु:—यास्क नांवाच्या आचार्यांनीं, देहाला जन्मादि सहा विकार होतात, पण ते आत्म्याला होत नाहींत असे सांगतले आहे; ते सहा विकार तुला सांगतो; एक :—

षड्‌विकार

॥ दुहो ॥

जायते अस्ति वर्धते,
विपरिणमते जोय ।
अपक्षियते विनश्यति,
षड्‌विकार कहि सोय ॥

टीका ॥ (देह) जायते (जन्मतो), अस्ति (जन्मल्यानंतर असतो), वर्धते (जन्मल्यानंतर वाढतो), विपरिणमते (तरुण होतो), अपक्षीयते [वृद्ध होतो], आणि विनश्यति [मरतो], हे देहाचे सहा विकार जाणावे.

॥ दुहो ॥

ए षड्‌विकार देहने कह्या
तूं पोते निर्विकार ।
गुरुवाक्ये विश्वास करि,
अनुभव मनमां धार ॥

टीका ॥ हे वर सांगितलेले जन्मादि सहा विकार स्थूलदेहास होतात, पण तूं स्थूलदेह नाहींस; तूं तर स्वतः निर्विकार आत्मा आहेस. देह विकारी आहे. म्हणून आत्मा विकारी होऊं शकत नाहीं. जसें मातीपासून घट झाला

म्हणून त्या घटांत जें आकाश (पोकळी) असतें तेंहि नवें झालें असें कांहीं म्हणतां यावयाचे नाहीं. रांध्यांत तयार झाल्यावर घट झाला असे म्हणतात; नीट ठोकून लांबरुंद झाला म्हणजे तो वाढला असें म्हणतात, भाजून पक्व झाला म्हणजे तो परिणतावस्थेला आला असें म्हणतात त्यानंतर त्यास भोंक अथवा चीर पडली म्हणजे तो वृद्ध झाला असें म्हणतात, आणि फुटला म्हणजे तोच नाश पावला असे म्हणतात, पण घटांत जे आकाश असते त्याला केव्हांही यांपैकीं एकही विकार होत नाहीं. कारण काय कीं, आकाश निरवयव, असंग आणि निर्लेप आहे, घटाप्रमाणेंच देह जन्मतो, जन्मल्यानंतर असतो, नंतर वाढतो, नंतर तरुण होतो, नंतर वृद्ध होतो, शेवटीं मरतो. पण तूं आत्मा या सहाहि विकारांवांचून म्हणजे निर्विकार, निरवयव आणि असंग आहेस. याच प्रकारचें, म्हणजे आत्मा जन्मादिषड्वि-काररहित आहे असें निरूपण भगवद्गीतेंतही दुसऱ्या अध्या-यांत केलेले आहे--

॥ श्लोक ॥

न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायंभूत्वा भविता वा न भूयः ॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो,
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ १ ॥

गी. अ. २ श्लोक २०

अर्थ ।। हा अपरोक्षरूप आत्मा कधीं जन्मतहि नाहीं, कधीं मरणहि पावत नाहीं, व जन्मून पुनः अस्तित्वरूपानें असणाऱ्या दुसऱ्याहि विकारास प्राप्त होत नाहीं, तो अज [अजन्मा] आहे, तो नित्य [विपरिणामरूप चवथ्या विकारावाचून, म्हणजे एकरूप] आहे; शाश्वत (अपक्षयरूप पांचव्या विकारावांचून, म्हणजे सर्वदा किंवा अव्यय) आहे, तो पुराण (वृद्धिलक्षणरूप तिसऱ्या विकारावांचून, म्हणजे अनादिसिद्ध) आहे, आणि शस्त्रादिकांनी शरीराचा नाश होऊं शकतो, पण या आत्म्याचा होऊं शकत नाहीं, तर बा शिष्या ! सद्‌गुरुच्या वचनावर विश्वास ठेवून, आपण स्वतः निर्विकार शुद्ध आत्मा आहों असा अनुभव घेऊन, तो आपल्या मनांत दृढ करून ठेव.

सूक्ष्मदेहाचें वर्णन

अशारीतीनें सद्‌गुरुंनीं स्थूलदेहाहून भिन्न असलेल्या आत्म्याचा शिष्यास बोध करून, त्याजकडून देहावरील अहंता ममतारूप अध्यास तर सोडवून टाकलाच. तरी पण स्थूल देहाहून भिन्न असणारा सूक्ष्मदेहच आपल्या आत्म्याचें रुप असेल अशी भ्रांति मनांत धरून शिष्य विचारतो:--

।। दुहो ।।

शिष्य :— स्थूल देह तो हुं नहीं,
सूक्ष्म देह हुं जाण ॥

सद्गुरू कहे ते तूं नहीं,
लिंग दृश्य वखाण ॥ ११ ॥

टीका ॥ गुरुवर्य, आपल्या उपदेशाने स्थूलदेहच मी नाहीं अशी माझी खात्री झाली, तरी पण सूक्ष्मदेह म्हणतात तो मी असेन असें मला वाटतें.

गुरु :—अरे बाबा सूक्ष्मदेहही तूं नाहींस. लिंगदेह म्हणजे सूक्ष्मदेह तोहि तुला दृश्य आहे, व तूं त्याचा द्रष्टा आहेस, अर्थात् तो तूं नाहींस.

सद्गुरुनी लिंगदेह दृश्य आहे इतकेंच सांगून, लिंगदेहावरील अध्यास टाकून देण्यांविषयीं शिष्याला उपदेश केला. पण लिंगदेहांतील विशेष तत्वाचें वर्णन करून लिंगदेहाहून भिन्न असणाऱ्या आत्म्याचा स्पष्ट रीतीनें अनुभव येईल अशा रीतीनें, म्हणजे विस्तारपूर्वक कांहीं सांगितले नाहीं, त्यामुळे शिष्य पुनः लिंगदेहालाच आत्मा मानून प्रश्न करतो :—

॥ चोपाई ॥

शिष्य :—— स्वामी स्थूल देह ते हुं नहीं,
पण सूक्ष्म देह ते हुं सही ॥
गरु कहे ते तुं केम थाईश भाई,
प्रथमनी पेठे विचारो जाई ॥ २२ ॥

टीका ॥ गुरुमहाराज, हा स्थूल देह तर मी नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. कारण तो भौतिक म्हणजे पंचभूतांच्या पंचवीस तत्त्वांच्या संघाताच्या रूपाचा आहे; अतिशय घाणेरड्या अशा वीर्य रक्तांपासून उत्पन्न झालेला आहे; हाडे, मांस; रक्त, मल, मूत्र, कफ इत्यादि अत्यंत अपवित्र पदार्थांनी भरलेला आहे, आणि त्याच्या नऊहि द्वारांतून अतिशय दुर्गंधीचे मल, मूत्र, कफ इत्यादि पदार्थ नित्य निघत असतात. शिवाय मेवामिठाई, अन्न, वगैरे अति उत्तम खावयाचे पदार्थ खरे, पण ते या स्थूल देहांत जाऊन पोहोंचले रे पोहोंचले कीं ताबडतोब बिघडून मलरूप होतात. त्याचप्रमाणें मोठ्या मोलाचें व स्वच्छ वस्त्रहि देहाच्या संगानें बिघडून मळकट व दुर्गंधी होतें. तर प्रत्येकाच्या पाहाण्यांत येणारा असा अशुचिमय स्थूलदेह तोच मी असें कसें होईल? शिवाय, स्थूलदेह दृश्य आहे, व मी त्याचा द्रष्टा आहे, म्हणूनहि तोच मी नाहीं, आणि ज्या अर्थी स्थूलदेह दृश्य असून तो देहच मी नव्हें, त्या अर्थी त्या देहाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण, व ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम, असे दोनहि अर्थात् माझ्यामध्यें नाहींत, त्याचप्रमाणें स्थूलता कृशता, श्यामता, गौरता, बाल्य, तारुण्य, वार्धक्य. इत्यादि स्थूलदेहाचे धर्महि माझ्यामध्यें नाहींत, असे अनुभव घेऊन मला जाणतां येतें. पण स्थूलदेहाच्या आंत जो सूक्ष्मदेह आहे, तो तरी 'हूं सही'

म्हणजे मी आहेंच असें मला वाटतें. कारण स्थूलदेहाकडून जाणें, येणें, संभाळणें, वगैरे जे व्यवहार होतात ते सूक्ष्म देहाच्या आधारानेंच होतात. कसे ते पहा--चक्षुरिंद्रियानें जीव पाहातो; कर्णेंद्रियाने ऐकतो, वागिंद्रियानें बोलतों; एवंच, सूक्ष्म देहाच्या इंद्रियांकडून स्थूलदेहाचे सर्व व्यवहार चालले आहेत. ज्यांत प्राण आहेत अशा सूक्ष्मदेहाच्या योगानेंच स्थूलदेह जगूं शकतो. प्राण निघून गेल्यावर स्थूलदेहाला जगतां यावयाचेंच नाहीं. यासाठीं स्थूलदेहांत सूक्ष्मदेहाचे प्राधान्य (मुख्यपणे) आहे. शिवाय, स्थूलदेहांत सूक्ष्मदेह जोंपर्यंत आहे तोंपर्यंतच हा माझा बाप, हा पुत्र, हा भाऊ, हें कुटुंब, इत्यादि जीवास ज्या संबंधामुळें म्हणता येतें तो संबंध राहूं शकतो. तो सूक्ष्मदेह एकदांचा निघून गेला कीं हा बाप, हा भाऊ, इत्यादि म्हणविणारा स्थूलदेहावरील संबंध नाहींसा झालाच. म्हणजे तो ताबडतोब खाक झाला. या अनेक कारणांमुळें सूक्ष्मदेहच मी आहें असें मला वाटतें. शिवाय, मी बोलतों, पाहतों, ऐकतों, चालतों, त्याचप्रमाणें मी भुकेलों आहे, मी सुखी आहे, मी दुःखी आहें इत्यादि अहंप्रत्ययहि सूक्ष्मदेहाच्या ठिकाणीं दिसून येतात; यामुळेंहि मी सूक्ष्मदेहच आहे असे मला वाटतें.

गुरु:--अरे बाबा, सूक्ष्मदेह तरी तूं कसा असू शकशील? कारण तो सुद्धां भौतिक, जड आणि दृश्य आहे व त्याचा तूं

द्रष्टा आहेस म्हणून तूं तोहि नाहींस, आणि तो सूक्ष्मदेह पंचमहाभूतांचा आहे म्हणून तुझाहि होऊं शकत नाही. तूं त्याचा साक्षी आहेस, याचा अनुभव करून घेण्यासाठीं तूं पहिल्याने ज्याप्रमाणे स्थूल देहाचा विचार करून स्थूल देह आत्म्याहून भिन्न आहे असे जाणलेस, त्याचप्रमाणें सूक्ष्म देहाचाहि विचार करून सूक्ष्म देहापासून निराळा असणारा जो त्याचा द्रष्टा आत्मा त्याला तूं ओळख, व सूक्ष्म देह तोच आपण नव्हे असे जाण.

शिष्य :-- गुरुमहाराज, सूक्ष्मदेहाची तत्त्वे किती आहेत, कोणकोणत्या भूतांपासून कोणकोणती तत्त्वे उत्पन्न झालीं आहेत त्या सर्वांचे निरुपण करून मला सांगावे.

गुरु :– सूक्ष्म देहाची अंतःकरणपंचक, प्राणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक व विषयपंचक अशी पांच पंचकें आहेत. प्रत्येक पंचकांत पांच पांच तत्त्वे असतात, म्हणजे पांच पंचकांची मिळून पंचवीस तत्त्वें आहेत. ती तत्त्वे आकाश, वायु, तेज, आप आणि पृथ्वी या पंचमहाभूतांपासून क्रमाने झाली आहेत. त्यांच्या विभागाच्या वेगवेगळ्या प्रक्रिया करून त्यांचे निरुपण विस्ताराने करण्याच्या हेतूने हे पुढील कोष्टक दिले आहे :--

सूक्ष्मदेहाच्या विचाराचें कोष्टक नं. ५.

पूर्व

उत्तर

पंच महाभूत.	आकाशाचें अंतःकरणपंचक कर्तें बोलतें	वायूचें प्राणपंचक वाहन.	तेजाचें ज्ञानेंद्रियपंचक द्वार.	आपाचें कर्मेंद्रियपंचक सेवक	पृथ्वीचें विषयपंचक भोग
आकाश.	अंतःकरण प्रथम स्फुरण देवता विष्णु.	व्यान सर्वांगस्थानांत रहातो त्याचें कर्म सर्व देहाच्या साध्यास धामें पुरें करणें.	श्रोत्र देवता दिशा त्याच्या योगानें शब्दाचें श्रवण होतें. त्याच्यावांचून जीव बहिरा	वाचा देवता अग्नि, तिच्या योगानें जीव शब्द बोलतो. तीवांचून मुका.	शब्द
वायु.	मन संकल्पविकल्पात्मक. देवता चंद्रमा त्याच्या योगानें जीव संकल्प करतो.	समान नाभिस्थानांत रहातो कर्म अन्नरस नाड्यांच्या द्वारें रोमरोमांस पोहोंचविणें.	त्वचा देवता वायु तिच्या योगानें शीत, उष्ण, मृदु, कठीण इत्यादि स्पर्श समजतात.	पाणि देवता इंद्र त्यानें जीव पदार्थ देतो घेतो. त्यावांचून हें काम होणें नाहीं.	स्पर्श
तेज.	बुद्धि निश्चयात्मक देवता ब्रह्मा. तिच्या योगानें जीवाचा निश्चय होतो	उदान कंठस्थानांत रहातो. अन्नरसाचे विभाग करणें हिता नाडींतून उचकी उत्पन्न करणें स्वप्न पाहणें	चक्षु, देवता सूर्य. त्याच्या योगानें जीव रूप पाहातो. त्यावांचून तो आंधळा.	पाद, देवता उपेन्द्र त्याच्या योगानें जीव जातो येतो. त्यावांचून तो पांगळा.	रूप.
आप.	चित्त चिंतात्मक देवता नारायण त्याच्या योगानें जीव स्मरण करतो.	प्राण जीवाच्या हृदयस्थानांत रहातो. कर्म एकवीस हजार सहाशें श्वासोच्छ्वास करणें.	जिव्हा, देवता वरुण तिनें जीवास रसस्वाद समजतो. तिच्यावांचून समजत नाहीं.	शिश्न, देवता प्रजापति त्यानें पुरुषास सुख रतिभोग होतात. त्यावांचून तो नपुंसक	रस.
पृथ्वी.	अहंकार अहंपणा, देवता रुद्र. त्याच्या योगानें जीवास अहंकार होतो.	अपान गुदस्थानांत रहातो. कर्म मलाचा उत्सर्ग करणें.	घ्राण देवता अश्विनीकुमार त्यानें जीवास सुगंध दुर्गंध समजतात. त्यावांचून समजावयाचे नाहीत.	गुद, देवता मृत्यु (यम) त्याच्या योगानें जीवाच्या मलाचा उत्सर्ग होतो.	गंध.

दक्षिण

सूक्ष्मदेहाच्या कोष्टकावरील टीका

या कोष्टकांत पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या प्रक्रियांत पूर्वेपासून पश्चिमेकडे क्रमाने वाचून तत्त्वांचा विचार ध्यानांत आणावा, व चवथ्या, पांचव्या, सहाव्या, व सातव्या प्रक्रियांत उत्तरेकडून दक्षिणेकडे क्रमाने वाचीत जाऊन तत्त्वांचा विचार ध्यानांत आणावा.

प्रक्रिया पहिली

आकाशाचे -- अंतःकरणपंचक आहे. त्यांत पांच तत्त्वें आहेंत. अंत.करण, मन, बुद्धि, चित्त, आणि अहंकार अशीं त्यांचीं नांवे आहेत.

वायूचें--प्राणपंचक आहे. त्यांत व्यान, समान, उदान, प्राण आणि अपान, या नांवाचीं पांच तत्त्वें आहेत.

तेजाचें -- ज्ञानेंद्रियपंचक आहे. त्यांत श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा आणि घ्राण या नांवाचीं पांच तत्त्वे आहेत.

आपाचें -- कर्मेंद्रियपंचक आहे. त्यांत वाचा, पाणि, पाद, शिश्न आणि गुद या नांवाचीं पांच तत्त्वें आहेत.

पृथ्वीचें -- विषयपंचक आहे. त्यांत शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या नांवाची पांच तत्त्वें आहेत.

या सर्व तत्वांस तूं जाणतोस, म्हणून तींत तूं नाहींस. तीं पंचभूतांचीं आहेत, म्हणून तुझींहि नाहींत. तूं या तत्वांचा द्रष्टा आहेस.

प्रक्रिया दुसरी

शिष्य :-- गुरुवर्य, ह्या पंचवीस तत्वांचीं नांवें आपण मला सांगितलीं तीं समजलीं: पण त्यांची स्वरूपें स्पष्ट ओळखण्यासाठीं त्या तत्वापासून जें ज्ञान होतें व ज्या क्रिया होतात, तीं मला सांगावीं.

अंतःकरणपंचकाचें व्याख्यान

गुरु :- अंतःकरण-म्हणजे देहाच्या आंत उत्पन्न होणाऱ्या ज्ञानसुखादींचे साधनरूप करण (इंद्रिय) त्याचे स्वरूप म्हटले म्हणजे कोणतेंही काम करण्याविषयीं प्रथम जें स्फुरण होतें तें. अंतःकरणाची देवता विष्णु आहे. त्यापासून हें स्फुरण होतें.

मन--म्हणजे जें काम करण्याचें स्फुरण झाले तें काम निश्चयानें करावे, किंवा करूं नये, अशाप्रकारचा संकल्प किंवा विकल्प ज्याच्यापासून उत्पन्न होतो तें ठिकाण. मनाचो देवता चंद्रमा आहे. त्याच्या योगानें संकल्प विकल्प होतात.

बुद्धि--म्हणजे मनांत आलेलें काम करण्याचा निश्चय ज्या शक्तीच्या योगानें होतो ती शक्ती. बुद्धीची देवता ब्रह्मा आहे. त्याच्या योगाने निश्चय होतो.

चित्त -- म्हणजे अमुक एक काम करावयाचें आहे ते कसे करावे अशाविषयीं जें चिंतन ते. चित्ताची देवता नारायण आहे. त्याच्या योगानें स्मरण होतें.

अहंकार--म्हणजे अमुक एक काम आपणच करूं असा जो अभिमान तो. त्याची देवता रुद्र आहे. त्याच्या योगाने अहंकार (अभिमान) उत्पन्न होतो. अंतःकरणाचे स्वरूप खरे म्हटले म्हणजे एकच आहे, पण त्यांत संकल्प, विकल्प, निश्चय इत्यादि वेगवेगळ्या वृत्ति असतात म्हणून त्यास मन, बुद्धि, इत्यादि नांवेंहि वेगवेगळी पडलीं आहेत. जसें, एक ब्राह्मण आहे. तो स्वयंपाक करीत असेल तर त्यास स्वयंपाकी म्हणतात; कोणासहि शिकवीत असेल तर त्यास शिक्षक म्हणतात; ज्योतिष जाणणारा असेल तर ज्योतिषी म्हणतात; आणि रोग्यांच्या नाड्या पाहात असेल तर वैद्य म्हणतात. त्याचप्रमाणे, एकाच अंतःकरणास वृत्तिभेदाने मन, बुद्धि, इत्यादि वेगवेगळीं नांवे दिलेलीं आहेत. या सर्व अंतःकरण, मन, इत्यादिकांचा तूं साक्षी आहेस. तींच तूं नाहींस हे विचार करून पाहा.

प्राणपंचकाचे व्याख्यान

व्यान -- या नांवाचा वायु शरीराच्या सर्व स्थानांत राहून, देहाचे सर्व सांधे मागेपुढें हालविण्याचें कर्म करतो.

समान--या नांवाचा वायु नाभिस्थानांत रहातो. मनुष्य

जें अन्न खातो व पाणी पितो, त्यांचे जठराग्नीत पचन झाल्यानंतर त्यांचे स्थूल, सूक्ष्म आणि मध्यम असे तीन भाग होतात. त्यांतल्या अन्नाचा जो अति सूक्ष्म भाग होतो तो शरीरांतल्या हृदयांत येऊन मन व बुद्धीस पुष्ट करतो; जलाचा जो सूक्ष्म भाग होता तो प्राण पुष्ट करतो आणि अन्न व जल यांचा दुसरा जो स्थूल भाग मल व मूत्र या रूपानें घाणेरडा होतो, तो अनुक्रमें गुद आणि शिश्न या द्वारांनीं शरीराच्या बाहेर निघून जातो. बाकी राहिलेला अन्नजलांचा मध्यम रसरूप भाग, समानवायु नाड्यांच्या द्वारांनी सर्व शरीरांत रोमरोमांच्या ठिकाणी पोहोंचवितो. त्या मध्यम रसाचा परिणाम रक्त, मांस इत्यादि होऊन त्यायोगें शरीर पुष्ट होतें. सर्व बाजूंनीं जर अन्न जलांच्या रसांचे भाग शरीरांत बरोबर पोहोंचत नसतील तर सर्व अवयव पुष्ट होणार नाहींत. ज्याप्रमाणें बागेंतला माळी विहिरींतलें पाणी काढून तें पाटाच्या द्वारें ठिकठिकाणी सर्व वृक्षांस सारखें पोहोंचवितो व त्याच्या योगानें सर्व वृक्ष प्रफुल्लित होतात, त्याचप्रमाणें समानवायुरूप माळी देहरूप बगीच्यांत सर्व अवयवरूप व रोमरूप वृक्षांस अन्नजलांचे रसरूप पाणी सर्व शरीरशिरांच्या पाटानें पोहोंचवून सर्व शरीर पुष्ट करतो.

उदान —– या नांवाचा वायु कंठस्थानात रहातो आणि मनुष्य जे अन्न खात असतो व जल पीत असतो, त्यांचे वेग-

वेगळे विभाग करून 'हिता' या नांवाची कंठांत जी एक अति सूक्ष्म नाडी आहे तिच्या द्वारें स्वप्न व उचकी उत्पन्न करतो.

प्राण -- या नांवाचा वायु हृदयस्थानांत रहातो, तो दिवस आणि रात्र मिळून एकंदर २१६०० श्वासोच्छ्‌वासरूप काम करतो.

अपान -- या नांवाचा वायु गुदस्थानांत राहून मलविसर्जन करतो.

वर सांगितल्याप्रमाणें वेगळच्या वेगळच्या क्रिया पांच वायूंच्या आहेत. आत्म्याच्या नाहींत. तूं त्या सर्वांचा साक्षी आहेस.

ज्ञानेंद्रियपंचकाचें व्याख्यान

श्रोत्रेंद्रिय -- (कान) याची देवता दिशा आहे. याच्या योगानें शब्द ऐकूं येतो. यावांचून मनुष्य बहिरा असतो; म्हणजे त्यास ऐकू येत नाहीं.

त्वगिंद्रिय -- याची देवता वायु आहे. या इंद्रियाच्या योगाने मनुष्यास शीत, उष्ण, कोमल किंवा कठीण, असे स्पर्श समजतात.

चक्षुरिंद्रिय -- याचीं देवता सूर्य आहे. याच्या योगानें नाना प्रकारचीं रूपें मनुष्य पहातो. याच्यावांचून मनुष्य आंधळा असतो.

जिव्हेंद्रिय -- याची देवता वरुण आहे. या इंद्रियांच्या योगानें खारट, आंबट, गोड इत्यादि षड्‌रस मनुष्यास जाणतां येतात. यावांचून ते जाणतां येणार नाहींत.

घ्राणेंद्रिय --याची देवता अश्विनीकुमार आहे. याच्या योगाने जीवास सुगंध व दुर्गंध समजतात. यावांचून ते समजावयाचे नाहींत

या पांचही ज्ञानेंद्रियांना तूं ओळखतोस, त्यामुळें हींच तूं नाहींस. तूं या सर्वांचा साक्षी आहेस.

कर्मेंद्रियपंचकाचे व्याख्यान

वागिंद्रिय --याची देवता अग्नि आहे. यामुळें जीवास शब्द बोलतां येतो. यावांचून तो मुका असतो.

पाणिंद्रिय – (हात) याची देवता इंद्र आहे. याच्या योगानें मनुष्य पदार्थ घेतो देतो. यावांचून त्या क्रिया होणार नाहींत.

पादेंद्रिय--याची देवता उपेंद्र (विष्णु) आहे. याच्या योगने जाण्यायेण्याची क्रिया घडते. यावांचून मनुष्य पांगळा असतो.

शिश्नेंद्रिय – याची देवता प्रजापति आहे. याच्या योगाने मूत्र आणि रतिभोग होतात. यावांचून पुरुष नपुंसक असतो.

गुदेंद्रिय – याची देवता मृत्यु (यम) आहे. याच्या योगानें जीवाच्या मलाचा त्याग होतो.

या पंचकर्मेंद्रियांस तूं जाणतोस, त्यामुळे हींच तूं नाहींस. तूं याचा साक्षी आहेस.

विषयपंचकाचें व्याख्यान

शब्द, स्पर्श, रूप, रस, आणि गंध–हे पांच विषय आहेत. याहूनही आत्मा भिन्न आहे. आत्मा विषयरूप

नाहीं असें जाणावें, आणि या पांच विषयांत जो मनुष्य आसक्त होतो त्याला बंधन प्राप्त होते, यासाठीं त्यांचा त्याग करावा. कारण यांपैकीं एकेक विषयांतच एकेक विवक्षित जीव आसक्त राहून नाश पावतो; मग या सर्वांतहि एकच जीव आसक्त होऊन राहिला तर त्याचा नाश होईलच होईल हें निराळें कशाला सांगावयास पाहिजे ?

शिष्य : — कोणता विवक्षित जीव कोठल्या विषयांत आसक्त राहून नाश पावतो ते कृपा करून सांगावें.

गुरु: — शब्दविषयांत आसक्त होऊन हरिण मरण पावतो, तो असा—एकदा लबाड सुस्वर कंठाचा पारधी रानांत मुद्दाम सुस्वर गाऊं लागतो. त्याच्या गाण्याने नादावून, गाणें स्पष्ट ऐकूं यावें म्हणून, एकादा हरिण त्या पारध्याच्या अगदीं जवळ येऊन बसतो. इतक्यांत पारधी ताबडतोब येऊन दग्याने त्यास पकडून ठार मारतो. अशा रीतीने शब्दविषयांत आसक्ति ठेवल्याने हरिण नाश पावतो.

स्पर्शविषयांत आसक्त होऊन हत्ती नाश पावतो. ज्या देशांत हत्ती पुष्कळ असतात त्या देशांत हत्तीचे मौल्यवान दांत मिळविण्यासाठीं, जंगली लोक जंगलांत मोठा खड्डा करून ठेवतात आणि तो खड्डा दिसूं नये म्हणून त्यावर लांब लांब वांसे टाकतात व त्यांवर जमिनीबरोबर दाट गवत पसरून ठेवतात. नंतर खड्ड्याच्या ज्या बाजूकडून हत्तींची

टोळी येत असेल तिच्या समोरच्या बाजून लांकडाची एक हत्तीण रंग देऊन हुबेहूब तयार करून ठेवतात. त्या लांबून येणाऱ्या हत्तीपैकी एकादा हत्ती, ती लांकडी हत्तीण पाहिल्याबरोबर ती खरी आहे असे समजून तिला स्पर्श करण्यासाठी वेगाने धांवत येतो तोंच त्या खड्ड्यात पडून मरण पावतो.

रूपविषयाच्या सेवनानें पतंगाचा नाश होतो हे सर्वांच्या पाहण्यात नेहमी येतेच. हे पतंग दिव्याचा प्रकाश पाहून त्यावर झडप घालतात आणि मरतात.

रसविषयानें माशांचा नाश होतो, तो असा—मासे मारणारे कोळी, मासे मारण्याच्या आपल्या लोखंडी गळांचे आंकडे एकत्र जमवून त्यांवर आमिष म्हणून कांहींतरी खाण्याचा पदार्थ बांधून तो गळ पाण्यांत सोडतात. लगेच पाण्यांतले मासे त्या पदार्थाच्या अभिलाषेनें त्या पदार्थांतच, म्हणजे वस्तुतः त्या लोखंडी गळासच, आपलीं तोंडे खुपसून मरण पावतात. यासाठीं हा रसविषयहि दुःखाचें कारण आहे.

गंधविषयानें भ्रमर मरण पावतो तो असा——एकाद्या सूर्यविकासी प्रफुल्लित कमळावर, एकादा भ्रमर सुगंधाच्या अभिलाषेनें बसून रहातो. सूर्यास्ताबरोबर तें कमळ मिटतें. तथापि तो सुवासाच्या लोभानें त्यांतून बाहेर पडत नाहीं. कांहीं वेळानें तेथें एकादा हत्ती येऊन तें कमळ उपटून खाऊन टाकतो तेव्हां तो भ्रमर अर्थात् त्या कमलाबरोबरच मरण पावतो, म्हणून गंधविषयही दुःखाचा हेतु

आहे. यासाठीं या पांचही विषयांच्या ठिकाणीं दोषदृष्टी ठेवून त्यांचा त्याग करावा.

प्रक्रिया तिसरी

अंतःकरणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक आणि कर्मेंद्रियपंचक यांतील प्रत्येकांत अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव अशी त्रिपूटी असते; तिच्या योगानें क्रिया घडते. ही त्रिपूटी तूं जाणतोस. म्हणून हीच तूं नव्हेस. तूं हिचा साक्षी आहेस.

शिष्य :— महाराज, अंतःकरणादि पंचकांतील प्रत्येकांत अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव या त्रिपुटीनें क्रिया घडते असें आपण सांगितलें; पण अध्यात्म, अधिभूत आणि अधिदैव म्हणजे काय तें मला सांगावें

गुरु :— पांच अंतःकरणांच्या त्रिपुटचा खालील कोष्टकांत दाखवल्या आहेत. त्याप्रमाणें समजाव्या.

अंतःकरणत्रिपुटीचें कोष्टक

अध्यात्म	अधिभूत	अधिदैव
अंतःकरण	स्फुरण	विष्णु
मन	संकल्प विकल्प	चंद्रमा
बुद्धि	निश्चय	ब्रह्मा
चित्त	चिंतन	नारायण
अहंकार	अभिमान	रुद्र

अंतःकरण अध्यात्म, स्फुरण अधिभूत, आणि विष्णु अधिदेव या तिघांकडून क्रिया होते. या तिघांपैकीं एकहि कमी असेल तरी क्रिया होणारच नाहीं. त्याचप्रमाणें मन अध्यात्म संकल्प–विकल्प अधिभूत, आणि चंद्रमा अधिदेव, या तिघांकडून संकल्परूप क्रिया होते.

अशाच प्रकारची बुद्धि चित्त आणि अहंकार यांतील प्रत्येकाची त्रिपुटी जाणावी. या त्रिपुटया तूं जाणतोस; म्हणून याच तूं नाहींस, तूं यांचा साक्षी आहेस.

पांच ज्ञानेंद्रियाच्या त्रिपुटया खालील कोष्टकांत दिल्या-प्रमाणें समजाव्या–

ज्ञानेंद्रिय त्रिपुटी कोष्टक नं. ४

अध्यात्म	अधिभूत	अधिदैव
श्रोत्र	शब्द	दिशा
त्वचा	स्पर्श	वायु
चक्षु	रूप	सूर्य
जिव्हा	रस	वरुण
घ्राण	गंध	अश्विनीकुमार

श्रोत अध्यात्म, शब्द अधिभूत, आणि दिशा अधिदेव; या त्रिपुटीच्या योगाने (हीं तीन मिळून) ऐकणें हीं क्रिया घडते. यांपैकीं एकहि जरीं कमी असेल तरी क्रिया घडणार नाहीं.

उदाहरणार्थ :-- चक्षु अध्यात्म आहे, रूप अधिभूत आहे, परंतु अधिदेव सूर्य जर नसेल, तर जीवास दिसणार नाहीं. सूर्य व रूप आहेत, पण चक्षु नाहीं, तरीसुद्धां त्यास दिसावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें सूर्य आणि चक्षु आहेत, पण रूप नाहीं, तरीसुद्धां त्यास दिसावयाचें नाहीं. अशाच बाकी राहिलेल्या ज्ञानेंद्रियांच्या त्रिपुटचा समजाव्या. त्या त्या त्रिपुटचा तूं जाणतोस म्हणून त्या तूं नव्हेस. क्रिया त्रिपुटयांच्या आहेत, अर्थात् तुझ्या नाहींत. तूं त्यांचा साक्षी आहेस.

पांच कर्मेंद्रियांच्या त्रिपुटचा खालील कोष्टकांत दिल्याप्रमाणें समजाव्या--

कर्मेंद्रिय त्रिपुटीकोष्टक नं. ५

अध्यात्म	अधिभूत	अधिदेव
वाचा	वचन (बोलणें)	अग्नि
पाणि	आदान (देणें घेणें)	इंद्र
पाद	गमन (जाणें येणें)	उपेंद्र
शिश्न	आनंद (रति भोग)	प्रजापति
गुद	विसर्ग (मलत्याग)	यम

वागिंद्रिय अध्यात्म, वचन अधिभूत, आणि अग्नि अधिदेव या त्रिपुटीच्या योगानेच शब्द बोलण्याची क्रिया घडते. या तिहीं पैकीं कोणते एकहि जरी कमी असेल तरीसुद्धां

क्रिया घडणार नाहीं. याचप्रमाणें बाकीच्या सर्व कर्मेंद्रियांच्या त्रिपुटचा जाणाव्या. या त्रिपुटचांस तूं ओळखतोस, अर्थात् याच तूं नाहींस. क्रिया त्रिपुटचांपासून घडतात, म्हणून तुझ्याहि नाहींत. तूं त्यांचा साक्षी आहेस.

प्रक्रिया चवथी

प्रारंभीं अंतःकरणादि जीं पंचवीस तत्त्वें सांगितलीं, तीं सर्व पंचमहाभूतांच्या सात्विक, राजस आणि तामस भागांपासून उत्पन्न होतात, म्हणून तीं सर्व तत्त्वें पंचमहाभूतांचें कार्य आहेत असें जाणावें. तूं त्यांचा द्रष्टा साक्षी आहेस.

शिष्य :-- गुरुमहाराज, या पंचवीस तत्त्वांपैकी कोणकोणती तत्त्वें कोणकोणत्या भूतांच्या सात्विक, राजस व तामस भागांपासून झालेली आहेत तें सांगावें.

गुरु :-- पंचभूतांच्या सात्विक भागांपासून पांच अंतःकरणें व पांच ज्ञानेंद्रियें झालीं आहेत. त्यांच्या राजस भागांपासून पांच प्राण व पांच कर्मेंद्रियें झालीं आहेत, व त्यांच्या तामस भागांपासून पांच विषय झालें आहेत.

शिष्य :-- आपण आकाशादि पंचभूतांच्या सात्विकादि भागांपासून एकंदर मिळून पंचवीस तत्त्वांची उत्पत्ति सांगितली, तरी पण प्रत्येक भूताच्या सात्त्विक भागापासून,

राजस भागापासून व तामस भागापासून उत्पन्न झालेली निरनिराळी तत्वें स्पष्टपणे ध्यानांत येतील अशारीतीने सांगावीं.

गुरु :-- पंचभूतांच्या सात्विक, राजस व तामस भागांपासून उत्पन्न झालेली निरनिराळीं तत्वें समजण्यासाठीं हे पुढील कोष्टक दिले आहे.

सात्विकादि भगांच्या तत्वांचें कोष्टक नं. ६

पंचभूतें	सात्विक भागापासून		राजस भागापासून		तामस भागापासून
	पांच अंत:करणें	पांच ज्ञानेंद्रियें	पांच वायु	पांच कर्मेंद्रिय	पांच विषय
आकाशाच्या	अंत:करण	श्रोत्र	व्यान	वाचा	शब्द
वायूच्या	मन	त्वचा	समान	पाणि	स्पर्श
तेजाच्या	बुद्धि	चक्षु	उदान	पाद	रूप
आपाच्या	चित्त	जिव्हा	प्राण	शिश्न	रस
पृथ्वीच्या	अहंकार	घ्राण	अपान	गुद	गंध

कोष्टकाचा अर्थ

आकाशाच्या सात्विक भागापासून अंत:करण व श्रोत्रेंद्रिय हीं झालीं आहेत, त्याच्या राजस भागापासून व्यानवायु व वागिंद्रिय हीं झालीं आहेत. आणि त्याच्या तामस भागा-

पासून शब्दविषय झाला आहे. याप्रमाणें वायु आदिकरून बाकीच्या चार भूतांच्या सात्त्विकादि भागांपासून मन, त्वचा, आदिकरून तत्वें उत्पन्न झालीं आहेत असे समजावे.

शिष्य :– पांच अंतःकरणे व पांच ज्ञानेंद्रियें पंचभूतांच्या सात्विक भागांपासून झाली आहेत असे आपण सांगितले. त्याला प्रमाण काय बरें ?

14-17

गुरु :– गीतेंत सत्वात्संजायते ज्ञान' असे सांगिलले आहे. म्हणजे, 'सत्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते' असे सांगितले आहे. हे कसे ते पाहा–अंतःकरण, मन, बुद्धि इत्यादिकांपासून सुखदुःखांचे ज्ञान होते, आणि श्रोत, त्वचा, चक्षु वगैरे पांच ज्ञानेंद्रियांपासून शब्दस्पर्शरूपादि विषयांचे ज्ञान होते, म्हणून या गीतेच्या प्रमाणावरून, अर्थात् अनुभवाच्या प्रमाणावरून ती सात्त्विक भागांपासून झाली आहेत असे समजावे.

शिष्य :– पंचप्राण व पांच कर्मेंद्रिये पंचभूतांच्या राजस भागांपासून झालीं आहेत हे कसे खरे ठरते ते सांगावे.

गुरु :– रजोगुणापासून ज्या प्रकारची क्रिया घडते, त्याच प्रकारची क्रिया पांच प्राण आणि पांच कर्मेंद्रिये यांच्यापासूनहि स्पष्टपणें घडते, म्हणून प्राण आणि कर्मेंद्रिये ही पंचमहाभूतांच्या राजस भागांपासुन झालीं आहेत असे समजावे.

शिष्य :– पांच विषय तामस भागांपासुन झाले आहेत हे खरें कशावरून ?

गुरु :– पांचहि विषयांत ज्ञान नाहीं, ते केवळ जडरूप आहेत,

त्यामुळे ते तामस भागापासुन झाले आहेत असें सांगितलें. या सर्व तत्त्वांस तूं जाणतोस, म्हणून हींच तूं नाहींस. हीं सर्व पंचभूतांची आहेत. अर्थातच तुझी हीं नाहीत. तूं अकर्ता, अभोक्ता असा त्यांचा साक्षी आत्मा आहेस.

प्रक्रिया पांचवी

शिष्य :– महाराज, आपण माझा आत्मा अकर्ता, अभोक्ता व साक्षी आहे असें म्हटले तर मग ह्या देहांत कर्ता तरी कोण आहे ? व सुखदु:खांचा भोक्ता तरी कोण आहे ? आणि तीं सुखदु:खें कोणकोणत्या साधनांनीं तो भोक्ता भोगतो ? तें सर्व स्पष्ट समजेल अशा रीतीनें कृपा करून सांगावें.

गुरु :– या देहांत पांच अंत:करणें कर्ती व भोक्ती आहेत; पांच प्राण या कर्त्याभोक्त्यांचीं वाहनें आहेत; पांच ज्ञानेंद्रियें त्यांचीं द्वारें आहेत; पांच विषय त्यांचें भोग आहेत आणि पांच कर्मेंद्रियें त्यांचे सेवक आहेत. तूं या सर्वांस जाणणारा अकर्ता, अभोक्ता, असंग, आत्मा आहेस.

शिष्य :– महाराज, अंत:करणपंचक हें कर्ते भोक्ते आहे, प्राणपंचक त्याचें वाहन आहे; ज्ञानेंद्रियपंचक त्याचे द्वार आहे, विषयपंचक त्याचा भोग आहे; आणि कर्मेंद्रियपंचक त्याचा सेवक आहे; असे आपण सर्वसाधारण रीतीनें, म्हणजे समुच्चयें करून सांगितलें; पण त्या अंत:करणपंचकांतील कोणकोणतें कर्ते, भोक्तें कोणकोणत्या वाहनावर बसून, कोणकोणत्या द्वारांत येऊन, काय काय भोगते आणि त्याची

कोणकोणता सेवक सेवा करतो ? तें सर्व खुलासेवार मला समजेल अशारीतीनें विचारपूर्वक सांगावें.

गुरु :– आकाशाचें ' अंत:करण ' हें तत्त्व कर्तें व भोक्ते 'व्यान' वाहनावर बसून श्रोतद्वारांत येतें आणि शब्दविषय-रूप भोग भोगतें, म्हणजे कानांच्या योगानें अनुकूल अथवा प्रतिकूल शब्द ऐकल्यानें अंत:करणांत सुखदु:खरूप भोग होतो. ' वाचा ' सेवक अंत:करणाची सेवा करते. म्हणून अंत:करण कर्तें भोक्तें असून तूं आत्मा त्यास जाणणारा आहेस.

वायूचें ' मन ' हें कर्तें व भोक्तें ' समान ' या वाहनावर बसून त्वचाद्वारांत येऊन स्पर्शविषयास भोगतें. मनाची सेवा हात करतो, म्हणजे त्वचेला थंडी लागली तर तिच्या-वर वस्त्र नीट पसरणें, तिजवर उष्णतेमुळें घाम आला तर तिला पंख्यानें वारा घालणें इत्यादि प्रकारची सेवा हात करतो. त्वचेवर चंदनादिकांच्या मृदु व अनुकूल स्पर्शानें सुख, व कठिण किंवा उष्ण वगैरे प्रतिकूल स्पर्शानें दु:ख मनास होतें, म्हणून सुखदु:खांचें भोक्तें मन आहे, पण त्यास तूं जाणणारा आत्मा सुखी किंवा दु:खी यांतील एकही नाहींस.

तेजाची –' बुद्धि ' ही कर्ती व 'भोक्ती ' उदान' वाहनावर बसून चक्षुद्वारांत येऊन रूपविषयाचें ग्रहण करते तिचा सेवक पाय आहे. तो तिला रूप पाहावयास नेतो, म्हणजे

डोळ्यानें प्रिय पदार्थ पाहिल्यानें बुद्धि सुखदुःखांची भोक्ती होतें; पण तूं तिचा द्रष्टा अभोक्ता आहेस.

आपाचें:--'चित्त' हें कर्तें व भोक्तें 'प्राण' वाहनावर बसून जिव्हाद्वारांत येऊन रसविषय भोगतें, आणि त्याचा सेवक शिश्न रसाचा त्याग करतें; म्हणजे जिव्हेनें मधुरादिकरून अनुकूल (प्रिय) रस व कडू इत्यादि प्रतिकूल (अप्रिय) रस चाखल्यानें, चित्त सुखदुःखांचें भोक्तें होतें. तथापि तूं त्याचा द्रष्टा अभोक्ता आहेस.

पृथ्वीचा :-- 'अहंकार' हा कर्ता व भोक्ता 'अपान' वाहनावर बसून घ्राणद्वारांत येऊन गंधविषय भोगतो, आणि त्याचा सेवक गुद मलाचा त्याग करतें; म्हणजे नाकानें फूल, अत्तर, इत्यादि अनुकूल सुगंध आणि प्रतिकूल दुर्गंध. यांचें ग्रहण केल्यानें अहंकार सुखदुःखांचा भोक्ता होतो. तूं त्यास जाणणारा अभोक्ता आहेस. तुझ्या आत्म्याच्या ठिकाणीं सुखदुःखें नाहींत.

अशारीतीनें कर्त्याभोक्त्यांच्या प्रक्रियेचें निरूपण केल्यानंतर पुढें दुसऱ्या प्रकारानें आकाशादि पंचमहाभूतांपैकीं प्रत्येकाचीं पांच पांच तत्त्वें गुरु सांगतात.

प्रक्रिया सहावी

गुरुः--आकाशाचीं-अंतःकरण, व्यान, श्रोत, वाचा आणि शब्द अशीं पांच तत्त्वें आहेत.

शिष्य :– अंतःकरणादि तत्त्वें आकाशाचीं आहेत असें आपण म्हटलें, तीं आकाशाचीं असण्याचें कारण काय ?

गुरु :– स्फुरणरूप अंतःकरण आकाशापासून उत्पन्न होतें. आणि त्याच्यांतच लय पावतें, म्हणून तें आकाशाचें आहे. व्यान सर्व अंगांत आकाशाप्रमाणें सर्वव्यापी असतो. म्हणून आकाशाचा आहे. श्रोत्रेंद्रिय आकाशाचा गुण जो शब्द तो ऐकते म्हणून आकाशाचें आहे. वागिंद्रिय आकाशाचा गुण जो शब्द त्याचा उच्चार करतें म्हणून आकाशाचें आहे. शब्द आकाशाचा गुण आहे हें तर प्रसिद्धच आहे.

वायूचीं :– मन, समान, त्वचा, पाणि आणि स्पर्श हीं पांच तत्त्वें आहेत.

शिष्य :– हीं पांच तत्त्वें वायूचींच असण्याचें कारण काय बरें असावें ?

गुरु :– मन वायूप्रमाणें चंचल आहे, म्हणून वायूचें समजावें. समान स्वतः वायूरूप आहे. त्वगिंद्रिय वायूचा गुण जो स्पर्श त्यास जाणतें, म्हणून तें वायूचें आहे. हस्तेंद्रियापासून वायूचा गुण जो स्पर्श तो होतो म्हणून तें वायूचें आहे. स्पर्श तर वायूचा गुण आहेच आहे. तूं या सर्वांचा साक्षी आहेस.

तेजाचीं :– बुद्धि, उदान, चक्षु, पाद आणि रूप ही पांच तत्त्वें आहेत.

शिष्य :– हीं पांच तत्त्वें तेंजाचीं असण्याचें कारण काय तें कृपा करून सांगावें.

गुरु :– बुद्धि स्वप्रकाश तेजोमय आहे, म्हणून तेजाची आहे. उदानवायु कंठांत अन्नजलांचें विभाग करून त्यांस जठराग्नीकडे पोहोंचवितो, म्हणून तेजाचा आहे. चक्षुरिंद्रिय तेजाचा गुण जें रूप त्यास पाहतें यासाठीं तेजाचें आहे. पादेंद्रियांत विशेष उष्णता असते व तेजाचें गुण जें रूप त्यास बघण्यासाठीं तें बुद्धीस किंवा चक्षूस घेऊन जातें, म्हणून तें तेजाचें आहें. रुप तर तेजाचा गुण आहेच आहे. या रीतीनें हीं पांच तत्त्वें तेजाचीं आहेत. तूं ह्या सर्वांचा साक्षी आहेस.

आपाचीं –– चित्त, प्राण, जिव्हा, शिश्न आणि रस हीं पांच तत्त्वें आहेत.

शिष्य :– हीं पांच तत्त्वें जलाचीं आहेत हें कशावरून समजावयाचें ?

गुरु :– चित्त जलाप्रमाणें द्रवीभूत होते म्हणून जलाचें आहे. प्राणवायु जलाशिवाय राहूं शकत नाहीं म्हणून जलाचा आहे, तसेच ‘ जलमय प्राण आहे ’ असे श्रुतींतही सांगितले आहे. जिव्हेंद्रिय जलाचा गुण जो रस त्याचे ग्रहण करते व सर्व काल ओले असते म्हणून ते जलाचे आहे. शिश्नेंद्रिय मूत्ररूप जलाचा त्याग करते म्हणून जलाचे आहे. रस हा जलाचा गुण आहे हे तर प्रसिद्धच आहे. तूं या सर्वांस जाणणारा साक्षी आहेस.

पृथ्वीची :— अहंकार, अपान, घ्राण, गुद आणि गंध हीं पांच तत्त्वें आहेत.

शिष्य :—हीं पांच तत्त्वें पृथ्वीचींच आहेत हें निश्चयानें कसें समजावें ? तें सांगण्याची कृपा करावी.

गुरु :— अहंकार पृथ्वीप्रमाणें फार मोठा आणि जड आहे, म्हणून पृथ्वीचा आहे. अपानवायु पृथ्वीचा भाग जो मळ त्यास गुदद्वारांतून बाहेर काढतो म्हणून पृथ्वीचा आहे. घ्राणेंद्रिय पृथ्वीचा गुण जो गंध त्यास जाणतें म्हणून पृथ्वीचें आहे. गुदेंद्रिय पृथ्वीचा भाग जो मळ त्याचा त्याग करतें म्हणून पृथ्वीचें आहे. गंध हा पृथ्वीचा गुण आहे हें प्रसिद्धच आहे.

या रीतीनें, पांच भूतांच्या पंचवीस तत्वांचा साक्षी (जाणणारा) तूं आत्मा आहेस; यासाठी तीं तत्त्वेंच तू नाहीं; व तीं तुझींहि नाहींत. तू त्याहून वेगळा आहेस.

प्रक्रिया सातवी

शिष्य :— गुरुमहाराज, पहिल्या प्रक्रियांत आकाशाचीं तत्त्वें पांच अंतःकरणें आहेत. वायूची तत्त्वें पांच प्राण आहेत, तेजाची पांच ज्ञानेंद्रियें आहेत. आपाचीं पांच कर्मेंद्रियें आहेत, आणि पृथ्वीचीं तत्त्वें पांच विषय आहेत असें आपण निरूपण करून सांगितलें, परंतु आतां सांगितलेल्या सहाव्या प्रक्रियेंत पहिल्या प्रक्रियेहून कांहीं वेगळ्याच तऱ्हेचें निरूपण केलें; म्हणजे असें :—

आकाशाची – अंत:करण, व्यान, श्रोत्र, वाचा आणि शब्द हीं तत्त्वें आहेत.

वायूची – मन, समान, त्वचा, पाणी आणि स्पर्श, हीं तत्त्वें आहेत.

तेजाचीं – बुद्धि, उदान, चक्षु, पाद आणि रूप हीं तत्त्वे आहेत.

आपाचीं – चित्त, प्राण, जिव्हा, शिश्न आणि रस हीं तत्त्वें आहेत.

पृथ्वीचीं – अहंकार, अपान, घ्राण, गुद आणि गंध हीं तत्त्वें आहेत.

तर दोन प्रक्रियांच्या निरूपणांत असा फरक पडण्याचे कारण काय बरें ?

गुरु :– मुख्यत्वेकरून अपंचीकृत पंचभूतांच्या सतरा तत्त्वांपासून सूक्ष्मदेह उत्पन्न झाला आहे असें वेदांताच्या प्रकरणग्रंथांत यद्यपि सांगितलें आहे, तथापि स्थूलरीतीनें भिन्न भिन्न प्रक्रियांच्या योगानें सर्व तत्त्वांची विस्तारानें फोड होऊन मुमुक्षूची समजूत पडावी या हेतूनें, या पंचीकरणाच्या सूक्ष्म देहाच्या कोष्टकांत सूक्ष्म देहाच्या पंचवीस तत्त्वांचे जें निरूपण केलें आहे त्यांत प्रत्येक भूताचीं मूळचीं शुद्ध तत्त्वें व त्यांतच दुसऱ्या भूतांची तत्त्वें

मिसळल्यामुळें मिश्रीत झालेलीं तत्त्वें म्हणजे उदाहरणार्थ, आकाशाचीं तत्त्वें वायु इत्यादि बाकीच्या भूतांशीं मिसळलेलीं, वायूचीं तत्त्वें आकाशादि बाकीच्या भूतांशीं मिसळलेलीं, व त्याचप्रमाणें तेज, आप, आणि पृथ्वी यांतील प्रत्येकाचीं तत्त्वें बाकीच्या भूतांशी मिसळलेलीं अशा दोन प्रकारच्या तत्वांचें निरूपण केल्यामुळें, पहिल्या आणि सहाव्या प्रक्रियांत असा फरक पडला आहे. वेगवेगळ्या प्रकारांनीं निरूपित केलेल्या तत्वांत कितीही फरक पडला तरी समजावयाचें आहे तें एवढेंच कीं, तीं सर्व तत्वें भौतिक असल्यामुळें अनात्मरूप, दृश्य आहेत व आत्मा त्या सर्वांहून वेगळा आहे.

प्रक्रिया आठवी

शिष्य :— सूक्ष्म देहाची हीं जीं पंचवीस तत्वें आपण सांगितलीं तीं पंचवीसच आहेत, कीं त्याहून जास्त आहेत किंवा कमी आहेत, तें सांगावें.

गुरु :— वेदशास्त्रांत पुष्कळ ठिकाणीं पाच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच प्राण, मन आणि बुद्धी, मिळून सतरा तत्वांचा सूक्ष्म देह आहे, असें सांगितलेलें आहे. कांहीं ठिकाणीं मन आणि बुद्धि हीं दोन एकच धरली गेल्यामुळें सोळा तत्वें सांगितलेलीं आहेत. कांहीं ठिकाणीं यावरील सतरा तत्वांत चित्त व अहंकार हीं आणखी दोन तत्वें

मिळाल्यामुळे एकंदर एकोणीस तत्वें सांगितलेली आहेत. आणि कांहीं ठिकाणीं अष्टपुरींतल्या सत्तावीस तत्वांचा सूक्ष्मदेह होतो असे वर्णिलेले आहे.

शिष्य :– अष्टपुरींतील सत्तावीस तत्वांनीं झालेल्या सूक्ष्म देहाविषयीं आतां आपण सांगितलेलें, पण अष्टपुरी म्हणजे काय ते अगोदर सांगावे.

गुरु :– पांच ज्ञानेंद्रियांचे पुर पहिले आहे, पांच कर्मेंद्रियांचे दुसरे पुर, चार अंत:करणांचें तिसरे पुर, पांच प्राणांचे चवथे पुर. पंचमहाभूतांचें पांचवे पुर, अविद्या सहावें पुर, काम सातवें पुर, आणि कर्म हें आठवें पुर आहे, हीं आठ पुरें मिळून सत्ताविस तत्वे होतात. या सर्व तत्वांचा तूं द्रष्टा आहेस, व हीं तत्वें दृश्य, जड, विकारी, अनात्मरूप आहेत.

शिष्य :–– गुरुमहाराज, अशारीतीनें तत्वांची निरूपणें, वेगवेगळीं केलीं आहेत, तर त्यांपैकीं मी किती मानूं ? देह पाहिला तर एकच आहे, पण त्याचीं तत्वें गणण्याच्या रीति मात्र वेगवेगळ्या सांगितल्या आहेत, त्याचें कारण काय बरें?

गुरु :– अरे बाबा, तुला मुद्याची अशी एक गोष्ट सांगतो जेवढ्या प्रक्रियांच्या योगानें आत्मा असंग, अजर अमर अक्रिय, सच्चिदानंदस्वरूप आहे असें समजून येईल तेवढ्या

ॐ

श्लो॰ कर्मेन्द्रियाणि खलु पञ्च तथापराणि,
बुद्धीन्द्रियाणि मन आदि चतुष्टयं च।
प्राणादि पञ्चकमथो वियदादिकञ्च,
कामश्च कर्म च तमः पुनरष्टमी पूः॥
("संक्षेपशारीरके" अन्तिम पृष्ठे - योगीन्द्रानन्द)

श्लो॰ ज्ञानेन्द्रियाणि पञ्चैव पञ्च कर्मेन्द्रियाणि च।
मनो बुद्धिरहङ्कारश्चित्तं चेति चतुष्टयम्॥
श्लो॰ प्राणोऽपानस्तथा व्यान उदानाख्यस्तथैव च।
समानश्चेति पञ्चैताः कीर्तिताः प्राणवृत्तयः॥
श्लो॰ खं वाय्वग्न्यब्धरित्र्यश्च भूतसूक्ष्माणि पञ्च च।
अविद्या कामकर्माणि लिङ्गं पुर्यष्टकं विदुः॥
(पञ्चीकरण वार्तिके) (वेदान्तसारः- बदरीनाथ शुक्ला - पृष्ठः 136.) संदर्भः- पञ्चीकरण-मराठी. पृष्ठः 126.

सर्व प्रक्रिया मानाव्या. कांहीं ठिकाणीं कार्यकारणांची एकता कल्पिल्यामुळे थोडीं तत्त्वे सांगितलेलीं आहेत, आणि कांहीं ठिकाणीं कार्य आणि कारण यांतील प्रत्येकास वेगवेगळे कल्पून त्यांचे निरूपण केलेले आहे, म्हणून जास्त तत्त्वे सांगितलेलीं आहेत. पण कितीही तत्त्वे धरली तरी तीं सर्व दृश्ये, अनात्मरूप, परिणामी आणि जड आहेत, सबब त्यांचा त्याग करावा, व त्यांच्याहून वेगळा त्यांचा द्रष्टा परिणामरहित चैतन्यरूप असा जो आत्मा त्याचा अपरोक्ष रीतीने दृढ निश्चय करावा.

प्रक्रिया नववी

गुरु :— बा शिष्या, ज्याप्रमाणें स्थूलदेह अन्नमयकोशरूप आहे, आणि त्याहून तूं आत्मा भिन्न आहेस, त्याचप्रमाणें या सूक्ष्मदेहांतहि प्राणमय, मनोमय आणि विज्ञानमय असे तीन कोश आहेत. या तीनहि कोशांहून तूं वेगळा आहेस, अर्थात् कोशातीत आहेस.

शिष्य :— गुरुवर्य, या तीनही कोशांचीं रुपे भिन्न भिन्न करून सांगावीं.

गुरु :— पांच प्राण व पांच कर्मेंद्रिये अशी दहा तत्त्वे मिळून प्राणमयकोश झाला आहे असें समजावे, अथवा पांच प्राण आणि पांच उपप्राण मिळूनहि प्राणमयकोश होतो असे समजावे.

शिष्य :—पांच प्राण म्हणतात ते जाणतो, पण पांच

उपप्राण आपण सांगितले ते मी जाणत नाहीं. यासाठीं त्यांची नांवें सांगावीं, आणि त्या प्रत्येकापासून कोणकोणती क्रिया घडते तीहि सांगावी.

गुरु :—— नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि यांतील धनंजय अशीं पांच उपप्राणांची नांवें आहेत, आणि यांतील प्रत्येकापासून वेगवेगळी क्रिया घडतें, ती अशी :——

नागापासून :—— उद्गार (ढेकर) येतो.

कूर्मापासून :—— डोळे मिटतां व उघडतां येतात.

कृकलापासून :—— शिंक येते.

देवदत्तापासून :—— जांभई येते.

धनंजयवायु :—— सर्व शरीरांत राहून शरीर पुष्ट करतो आणि शवांत (प्रेतांत) राहून त्यास फुगवतो.

हे दहा वायू प्राणरूप आहेत, म्हणून त्यांस प्राणमय असें नांव दिलें आहे; शिवाय, हे प्राणमय वायू आत्मा झांकून टाकतात. म्हणून त्यांस कोश अशी संज्ञा दिली आहे. म्यान तरवारीस झांकते म्हणून त्याला जसे कोश म्हणतात, तसेच यांनाहि कोश म्हणतात. वर सांगितलेल्या प्राणमय कोशाचा तूं द्रष्टा त्या कोशाहून वेगळा आहेस. त्या प्राणमय कोशाच्या आंत मनोमय कोश आहे. पांच ज्ञानेंद्रियें आणि एक मन या सहांस मिळून मनोमयकोश म्हणतात. त्याहूनहि तूं साक्षी आत्मा वेगळा आहेस, यासाठीं दृश्यरूप असा तो

मनोमय कोशच तूं नाहींस, तूं त्याचा द्रष्टा आहेस. या मनोमय कोशाच्या आंत विज्ञानमय कोश आहे. तो पांच ज्ञानेंद्रियें आणि एक बुद्धि अशीं सहा मिळून झालेला आहे असें सांगितलेलें आहे. त्यासहि जाणणारा तूं आत्मा आहेस. अशारीतीने, सूक्ष्म देहांत असणारे तीनहि कोश तूं नाहींस. त्या कोशत्रयाहून भिन्न आहेस. अशारीतीने म्हणून कोशत्रयरूप सुक्ष्मदेह जर तूं नाहींस, तर मग तूं कर्ता-भोक्ताहि नाहींस, व सुख:दुखेहि तुझ्यांत नाहींत, तर तीं अंत:करणांत आहेत. ऐकणे, पाहणे इत्यादि पंचज्ञानेंद्रियांचें धर्म आहेत; बोलणे, घेणें, देणें इत्यादि कर्मेंद्रियांचे धर्म आहेत; आणि क्षुधा, तृषा इत्यादि प्राणांचे धर्म आहेत. यापैकीं एकहि तुझ्यांत नाहीं, तर तूं या तीनहि कोशांहून निराळा, असंग, साक्षी आत्मा आहेस.

या रीतीने सूक्ष्म देहाच्या कोष्टकांत ज्या नऊ प्रक्रियांचे निरूपण केले आहे, त्या प्रक्रियांचे विवेचन ब्रह्मनिष्ठ सद्‍गुरूच्या उपदेशाने समजावून घेऊन, आपण स्वत: त्या सूक्ष्म देहाहून विलक्षण, सद्रूप, चिद्रूप, आनंदरूप, अकर्ता, अभोक्ता असंग असा आत्माच आहों असा निश्चय करून, भौतिक आणि अनात्मरूप जो सूक्ष्मदेह त्यावरील अहंता—

या रीतीने सूक्ष्मदेहाच्या कोष्टकांचे निरूपण संपले. आतां पुढें तेराव्या चौपाईत सूक्ष्म देहाच्या स्वप्नावस्थादि दुसऱ्या आठ तत्त्वांचें निरूपण सद्गुरु करतात :—

॥ चौपाई ॥

स्वप्न अवस्था कंठस्थान
मध्यमा वाचा प्रविविक्त भोग जाण ॥
ज्ञानशक्ति सत्वगुण मान—
उकार मात्रा तैजस अभिमान ॥ १३ ॥

अर्थ ॥ वर सांगितलेला जो सूक्ष्मदेह त्याची स्वप्नावस्था आहे.

शिष्य :— महाराज, स्वप्नावस्था म्हणजे काय ?

गुरु :— जागृतावस्थेंत जे विषय पाहिलेलें किंवा ऐकलेले असतील त्यांच्या अंत:करणास चिकटून राहिलेल्या अशा कांहीं संस्काराच्या योगाने, झोंपेच्या वेळीं, गाडी, घोडा, रस्ता, नदी, पर्वत, समुद्र, किंवा स्त्रीपुत्रादि कुटुंब, व्यवहार, हानि, लाभ, सुख, दु:ख, वगैरे जो प्रपंच दिसतो, त्यांतलें कांहींच खरें नसते, असें असूनहि, तो सर्व प्रपंच अगदीं खरोखरचा आहे असे वाटते. त्यासच स्वप्नावस्था म्हणतात, तीस तूं जाणतोस म्हणून स्वप्नावस्थाच तूं नव्हेस. ती

सूक्ष्मदेहाची आहे म्हणून तुझीहि नाहीं. तूं तिचा साक्षी आहेस. या स्वप्नावस्थेचे स्थान कंठ आहे म्हणजे कंठांत " हिता " या नांवाची नाडी आहे, तिच्यांत स्वप्नावस्था होते. या अवस्थेत " मध्यमा " नांवाची वाणी असते, आणि " प्रविविक्त " नांवाचा भोग असतो म्हणजे सूक्ष्मवासनामय भोग असतो. ज्याप्रमाणें कापूर, केशर इत्यादि सुगंधी वस्तू ठेवलेल्या डब्यांतून त्या वस्तू काढून घेतल्यानंतर त्या डब्यास झालेल्या सुगंधाचे संस्कार सूक्ष्मरीतींनें कळून येतात, त्याचप्रमाणें स्वप्नावस्थेंत जागृतींतलें सर्व स्थूल भोग निवृत्त झाले असले तरी, त्या जागृतींतल्या स्थूल भोगांचे संस्काररूप सूक्ष्म भोग स्वप्नांत अनुभवानें समजून येतात. जागृतावस्थेंत अन्नभक्षणानें सुख होऊन जसे शरीर पुष्ट होतें, किंवा हत्यार अंगाला लागले तर त्यापासून जसें रक्त येतें, त्याप्रमाणें स्वप्नावस्थेतल्या अन्नभक्षणानें शरीर पुष्टहि होत नाहीं व हत्यार लागल्यानें अंगांतून रक्तहि येत नाहीं, पण केवळ सुखदुःखांचा भोग मात्र होतो; म्हणून त्या भोगास सूक्ष्म भोग असें म्हटलें आहे, स्वप्नांत " ज्ञानशक्ति " म्हणजे स्वप्नपदार्थांस जाणण्याची जी शक्ति, ती असते, स्वप्नावस्थेंत ' सत्वगुण ' असतो.

शिष्य – शास्त्रांत तर पुष्कळ ठिकाणीं जागृतींत सत्वगुण, आणि स्वप्नांत रजोगुण असतो असें सांगितलेले आहे,

आणि आपण तर स्वप्नांत सत्त्वगुण आणि जागृतींत रजोगुण असतो असें उलट सांगितलें, त्याचें कारण काय बरें ?

गुरु – कांहीं ठिकाणीं जागृतींत सत्त्वगुण सांगितलेला आहे त्याचें कारण इतकेंच कीं, जागृतावस्थेत विषयांचे ज्ञान होते, व शांति, दांति, इत्यादि शुभ साधनांची उत्पत्ति होते, व मोक्ष व्हावा अशा अंतःकरणांतल्या इच्छेने ब्रह्मनिष्ठ गुरुला शरण जाऊन श्रवणमननादि केली तर आत्म्याचेही ज्ञान होते, हे ध्यानांत आणून तींत सत्त्वगुण असतो असे सांगितले आहे, परंतु आम्हीं तिच्यांत रजोगुण असतो असें सांगितलें, त्याचें कारण इतकेंच कीं; जागृतींत ज्या क्रिया घडतात त्या विशेषकरून रजोगुणाची कार्यें असतात, व स्वप्नांत सत्त्वगुण असतो असें जें आम्हीं सांगितलें, त्याचें कारण इतकेंच कीं, स्वप्नांत केवळ विषयांचे ज्ञान मात्र होतें, परंतु प्रत्यक्ष क्रिया घडत नाहीं. शिवाय सत्त्वगुणानें ज्ञान होतें असे गीतेंतहि सांगितलेलें आहे.

स्वप्नांत प्रणवाची (ओंकाराची) दुसरी 'उकार' नांवाची मात्रा असते, आणि स्वप्नावस्थेंत सुखदुःखें भोगणारा 'तैजस' नांवाचा अभिमान असतो. वर सांगितलेल्या स्वप्नादि आठ तत्त्वांचा तूं द्रष्टा आहेस, यासाठीं तीं तत्त्वेंच तूं नाहींस आणि स्वप्नावस्थादिक तत्त्वें तुझीहि नाहींत. तूं त्यांचा साक्षी (जाणणारा) आत्मा आहेस.

॥ चौपाई ॥

ए मळीने तेत्रीश तत्त्व जाण,
तुं एनो द्रष्टा छो सुजाण
तुं ए दृश्य तत्त्व नही होई,
भिन्न भिन्न विचारी जोई ॥ १४ ॥

टीका ॥ पूर्वी सांगितलेलीं अंत:करणादि पंचवीस तत्त्वें, व आतां सांगितलेलीं स्वप्नावस्थादि आठ तत्त्वें, अशी सर्व मिळून सूक्ष्मदेहाची तेहतीस तत्त्वें आहेत असें समज. आणि हे सुजाण म्हणजे सुबुद्धिमान पुरुषा ! या तेहतीस तत्त्वांचा द्रष्टा तूं आत्मा आहेस. हीं दृश्य तत्त्वेंच तूं नाहींस. या सर्वांस वेगळें वेगळें करून त्यांतील प्रत्येकाचा विचार करून पाहशील तर आपण या सर्व तत्वांहून निराळे, ज्ञानरूप आहों व हीं तत्त्वें जडरुप दृश्य आहेत म्हणून हींच आपण नाहीं. असा तुला स्पष्ट अनुभव येईल.

पुढें पंधराव्या दोह्यांत दृष्टांत देऊन सूक्ष्मदेहापासून आत्मा वेगळा आहे असें गुरु सांगतात :—

॥ दुहो ॥

घटद्रष्टा ज्यों घट नहीं, Page. 93.
प्रगटही न्यारो देख ॥

त्यों देहद्रष्टा तुं आत्मा,
न्यारो भिन्न भिन्न विशेष ॥ १५ ॥

अर्थ ॥ घट पाहाणारा पुरुष घटरूप किंवा घटच नाहीं, तर घटापासून वेगळा आहे असे प्रत्यक्ष दिसते, त्याचप्रमाणे तूंहि दृश्य, जड व भौतिक सूक्ष्मदेह त्यास जाणणारा आत्मा, त्या सूक्ष्मदेहाहून निःसंशय विशेषेंकरून निराळा आहेस.

या रीतीने स्थूल व सूक्ष्म या दोनहि देहांहून आत्मा भिन्न आहे याचा शिष्यास स्पष्टपणे अनुभव करवून, तिसरा जो कारणदेह त्याहूनहि आत्मा वेगळा आहे, असा अनुभव शिष्यास घेतां येईल, अशा प्रकाराने आतां पुढें कारणदेहाचे निरुपण सद्‌गुरु करतात :—

॥ चौपाई ॥

त्रीजो कारणदेह अज्ञान,
तेनो तुं द्रष्टा पोते स्वरुप ज्ञान ॥
तेथी विलक्षण तुं आत्मा जाण,
ते तु नहि अनुभव प्रमाण ॥ १६ ॥

टीका ॥ पहिला स्थूल आणि दुसरा सूक्ष्म या दोनहि देहांच्या अपेक्षेने असणारा कारणदेह तिसरा असें म्हणतात. अज्ञानाचे नांव कारणदेह आहे.

शिष्य :— अज्ञानाचें नांव कारणदेह कां पडलें असावें?

गुरु :— A अज्ञानापासून स्थूल आणि सूक्ष्म हे जे दोन देह तत्स्वरूप कार्य झालें आहे, त्यामुळे अज्ञानाला कारण-देह असे नांव पडलें आहे, आणि ज्याप्रमाणें स्थूल आणि सूक्ष्म या दोनहि देहांचा तूं द्रष्टा आहेस, त्याचप्रमाणे कारणदेहाचाहि तूं द्रष्टा आहेस, तूं स्वतः ज्ञानरूप आहेस, म्हणून तो अज्ञानरूप तिसरा कारणदेह तूं नाहींस.

शिष्य :— महाराज, स्थूलदेहाचीं सर्व तत्त्वें स्पष्टपणें पाहण्यांत येतात, त्याचप्रमाणे सूक्ष्मदेहाचीं तत्त्वेंहि अनु-मानाने कां होईना, पण स्पष्टपणे समजावून घेतां येतात, व तीं सर्व दृश्य असून मी त्या स्थूल व सूक्ष्म देहांचा द्रष्टा आहे असा अनुभव स्पष्टपणे घेतां येतो, पण आपण तिसरा अज्ञानरूप कारणदेह जो सांगितला तो प्रत्यक्ष पाहण्यांत येत नाहीं, व अनुमानानेहि ध्यानांत येण्यासारखा नाहीं असें वाटते, तर मग तें कारणदेहात्मक अज्ञान दृश्य आहे, आणि मी त्याचा द्रष्टा आहे, असा अनुभव मला कसा होईल तें कृपा करून सांगावें.

गुरु :— अरे बाबा, तिसरा कारणदेहरूप अज्ञानाचा तीन प्रकारांनीं तूं द्रष्टा आहेस.

शिष्य :— कोणत्या तीन प्रकारांनीं मी हें अज्ञान जाणूं शकेन तें मला सांगावें.

गुरु :— "स्थूल व सूक्ष्म देह मी जाणतो, पण मी स्वतःलाच ओळखत नाहीं, म्हणजे मी स्वतः कोण आहे हें माझे मलाच कळत नाहीं," असे प्रथम तूं जें म्हणतोस याचेच नांव अज्ञान. या अज्ञानाचा तूं द्रष्टा आहेस, कारण "मी स्वतःला ओळखत नाहीं" असें जें तुझे म्हणणे ते ज्ञानावांचून संभवणारच नाहीं, आणि "मीं स्वतःच जाणत नाहीं" असे ज्याने जाणलें तोच तूं ज्ञानरूप आहेस. ज्ञानावाचून असे जाणणे किंवा बोलणे संभवतच नाहीं, आणि जर तूं ज्ञानरूप नसून, अज्ञानी जडरुप असशील तर, "मी स्वतःस ओळखत नाहीं" असें तूं स्वतःच कसे म्हणूं शकशील ? मातीचा घट जड व ज्ञानहीन असतो, अर्थातच तो "मी स्वतःस जाणत नाहीं." असें कोणत्याहि वेळीं बोलून दाखवूं शकत नाहीं. पण तूं तर तसें बोलून दाखवीत आहेस म्हणून "मी स्वतःस ओळखत नाहीं." असें जे तूं म्हणतोस तेच अज्ञान आहे आणि हें तुझे अज्ञान दृश्य असून तूं त्याचा द्रष्टा आहेस. हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार असा आहे :—

"मी अज्ञानी आहे" असे जे तूं म्हणतोस त्या म्हणण्यानें असे सिद्ध होतें कीं, जे दृश्यरुप अज्ञान आहे ते अगोदर तूं स्वतः जाणतोस. आणि तदनंतर त्याचाच आपल्या ठिकाणीं अध्यारोप करून "मी अज्ञानी आहे" असें तूं म्हणतोस; यावरूनहि अज्ञानास जाणणारा ज्ञानरूप तूं आत्मा अज्ञानाहून वेगळा आहेस. असा जर तूं अज्ञानाहून वेगळा नसशील

तर, " मी अज्ञानी आहे. " असे तुझे म्हणणे संभवणारच नाहीं. स्थूल देहाचे जाडा, पातळ, काळा, गोरा, इत्यादि धर्म तूं जाणतोस म्हणजे हा माझा देह जाडा किंवा पातळ, काळा किंवा गोरा आहे असे तूं जाणतोस, तर मग तो स्थूल देह तसेच त्याचे धर्म यांना जाणणारा तूं स्वतः आत्मा त्या दोघांपासून भिन्न आहेस हें उघडच सिद्ध होते. तरीपण चुकीनेच आपण स्वतः जाडे, पातळ, काळे गोरे, इत्यादि आहों असे मानतोस, त्याचप्रमाणे अज्ञानाचे दृष्य रूप समजूनहि भ्रमाने " मी स्वतः अज्ञानी आहे " असा आपल्या ठिकाणीं अध्यारोप करतोस. म्हणून विचार करून अनुभव घेऊन पाहाशील तर अज्ञानास जाणणारा तूं त्या अज्ञानाहून वेंगळा आहेस, असे तुला खचित समजून येईल. अज्ञानास जाणणारा तूं ज्ञानरूप आत्मा अज्ञानापासून जर निराळा नसशील तर " मी अज्ञानी आहे " असे तुझे म्हणणे किंवा मानणे केव्हांहि सिद्ध होणार नाहीं. तिसरा प्रकार असा – अज्ञानाचे दोन प्रकारचे कार्य, असद्रूप आणि अभानरूप नांवाचीं दोनहि आवरणे तूं जाणतोस. वे. पञ्चदशी

शिष्य :– असदावरण व अभानावरण म्हणजे काय तें कृपा करून सांगावे.

गुरु :– बा शिष्या, " तूं आत्म्याला जाणतोस " असे तुला कोणी विचारले असतां, " आत्मा म्हणतात तो कोठे

आहे कीं ज्यास मी जाणूं शकेन," असें तूं उत्तर देतोस. म्हणजे, आत्मा नाहींच. व पाहण्यांतहि येत नाहीं, असें तुझ्या उत्तरापासून निघतें. त्यांपैकीं "आत्मा नाहींच" अशा अर्थाचे जें म्हणणें त्याचें नांव 'असदावरण' आणि "आत्मा पाहण्यांतच येत नाहीं" अशा अर्थाचे जें म्हणणें त्याचें नांव 'अभानावरण' असें समजावें. आतां आत्मा नाहीं व भासतहि नाहीं, असें ज्यानें जाणलें तोच तूं आत्मा आहेस, तरी पण 'मी आत्मा नाहीं, तर मी मनुष्य, कर्ता-भोक्ता आहे, पण हें मला प्रश्नोत्तरांनीं सिद्ध मात्र करतां येत नाहीं," इत्यादि जें तूं म्हणत आहेस, ते सर्व अज्ञानाचें कार्य असून त्यास तूं जाणणारा आहे, यासाठीं तिसरा कारणदेह जें अज्ञान त्याहून विलक्षण व निराळा असा तूं आत्मा ज्ञानरूप आहेस, म्हणून तो अज्ञानरुप कारणदेहच तूं नाहींस असें समज.

शिष्य :– अज्ञानरूप कारणदेह मी नाही यास प्रमाण काय तें सांगावें

गुरु – तीन प्रकारांनी कारणदेहाहून आत्मा वेगळा आहे, असा विद्वानांचा अनुभव जो मीं तुला सांगितला, तो अनुभव त्यास प्रमाण आहे. आत्मा सूर्यासारखा स्वयंप्रकाश असून अज्ञानाहून भिन्न आहे असें श्रुतींतहि निरुपण केलेले आहे, यासाठीं विचार करून आपण तिसऱ्या कारणदेहाहूनहि निराळे आहों असा निश्चय करावा.

अशारीतीनें कारणदेहाचें निरूपण करून त्या कारणदेहाची आठ तत्त्वें सतराव्या चौपाईत सद्गुरु सांगतात :--

॥ चौपाई ॥

सुषुप्ति अवस्था हृदयस्थान वेदान्तपंचदशी 11-31 11-32
पश्यंती वाचा आनंदभोग जाण
द्रव्यशक्ति तमोगुण मान
मकारमात्रा प्राज्ञ अभिमान ॥ १७ ॥

टीका ॥ कारणदेहाची 'सुषुप्तावस्था' आहे.

शिष्य :-- महाराज, 'सुषुप्तावस्था' म्हणजे काय ?

गुरु :-- ज्या गाढ निद्रेंत इंद्रियांचे व्यापार व सर्ववृत्ति संयुक्त बुद्धि लयाच्या वेळेप्रमाणें कारणज्ञानांत अगदीं बुडून राहिलेली असतात, म्हणजे जागृतींतले व स्वप्नांतले भिन्न भिन्न व्यवहार ज्या गाढ निद्रेच्या अवस्थेंत लवमात्रहि अनुभवास येत नाहींत, त्या गाढ निद्रेला 'सुषुप्तावस्था' म्हणतात. श्रुतींतहि सुषुप्तावस्थेचें स्वरूप असेंच सांगितलेलें आहे. म्हणजे ज्या गाढ निद्रेच्या अवस्थेंत जीव असूनहि, शब्दादिक विषयांची कोणत्याच प्रकारची कामना करीत नाहीं. आणि कोणत्याच प्रकारचें स्वप्नही पाहात नाहीं, त्या अवस्थेंचें नांव 'सुषुप्तावस्था' असे सांगितलेले आहे. त्या सुषुप्तीचा तूं द्रष्टा आहेस. कारण, सुषुप्तींतून जागा झाल्यानंतर "सुखमहमस्वाप्सं न किंचिदवेदिषं" म्हणजे,

"मी सुखानें निजलों होतो व त्यावेळीं मला सुखाशिवाय इतर कांहींहि ठाऊक नव्हतें," असें तुला स्मरणपूर्वक सांगतां येतें. यावरून असें दिसतें कीं, सुषुप्तावस्थेंत सुखच असते, सुखावांचून दुसरें कांहींही नसतें. त्या सुषुप्तीच्या वेळच्या सुखाचा अनुभव घेणारा तूं आत्मा आहेस, म्हणूनच जागा झाल्यानंतर तूं वर सांगितल्याप्रमाणे बोलतोस. पण सुषुप्तीच्या वेळीं सुखाचा अनुभव, म्हणजे दुःखमय प्रपंचाच्या अभावाचा अनुभव, जर तुला आला नसता तर जागा झाल्यावर, "मी आज मोठ्या सुखानें निजलों होतो, त्यावेळीं सुखाशिवाय दुसरें कांहींही मला माहीत नव्हते," असें तूं म्हणतोस ना? शास्त्रांतहि असाच नियम सांगून ठेवला आहे कीं, जीवाला ज्या गोष्टीचा अनुभव आला असेल त्याचीच त्यास कालांतरानें स्मृति होते. उदाहरणार्थ, कोणी एखादा मनुष्य काशीस जाऊन तेथल्या काशीविश्वेराचे मंदिर व मणिकर्णिकेचा गंगेचा घाट प्रत्यक्ष पाहून आला असेल तरच त्या मनुष्यास स्वदेशीं परत आल्यानंतर कालांतराने काशीविश्वेश्वराच्या मंदिराचे आणि मणिकर्णिकेच्या घाटाचे स्मरण होऊं शकेल. त्याचप्रमाणें सुषुप्तीत सुखच आहे, दुसरें कांहींहि नाहीं, असा जर जिवाने अनुभव घेतला असेल तरच तो जागा झाल्यावर "मी मोठ्या सुखाने निजलों होतो" असें म्हणूं शकेल, एरव्हीं असें कसें म्हणेल?

दृष्टान्त दुसरा :— कल्पना कर, रात्रभर गस्त घालीत

पहारा करणारा कोणी एक शिपाई रस्त्यावर उभा असतांना त्यास दुसऱ्या एका माणसाने विचारलें कीं, 'अहो शिपाई-दादा, गेल्या रात्रीं बारावर दोन वाजण्याच्या सुमारास रस्त्यावरून कोण गेले बरें ?' तेव्हां तो शिपाई त्यास उत्तर देतो, 'नाहीं बुवा, त्यावेळीं कोणीहि रस्त्यावरून गेलें नाहीं.' म्हणजे या त्याच्या उत्तरावरून समजून येतें तें हें कीं, रस्त्यावरून कोणीहि गेलें नाहीं हें जाणणारा शिपाई तेथें त्यावेळीं होता म्हणूनच 'कोणी गेलें नाहीं' असें त्यास सांगतां आले. म्हणजे फिरून स्वतः तो शिपाई त्या वेळीं तेथें नसता तर 'कोणीहि गेलें नाहीं' असे सांगता आले नसते. हीच गोष्ट निद्रेला लागू आहे. म्हणजे 'झोपेच्या वेळीं मला कांहींही ठाऊक नव्हते.' असें जागा झाल्यावर जीव जर सांगत आहे, तर त्यावरून झोपेच्या वेळीं कोणताच दुःखमय द्वैतप्रपंच नसतो, पण त्या प्रपंचाच्या अभावास जाणणारा स्वतः आत्मा मात्र असतो, असें सिद्ध होतें.

शिष्य :— गुरुमहाराज, सुषुप्तावस्थेला जाणणारा आत्मा आहे असें जर आपण म्हणतां, तर "मी सुषुप्तावस्थेला जाणत आहे" असें निद्रेतच तो आत्मा कां म्हणत नाहीं ? आणि जागा झाल्यावरच तसें कां बोलतो ?

गुरु :— ज्यावेळीं सुषुप्तावस्था असते त्यावेळीं सर्व इंद्रियें मन, बुद्धि इत्यादि अंतःकरणें अज्ञानांत लय पावलेली

असतात, त्यामुळें त्यावेळीं होणारा अनुभव सांगावयाला वाणी इत्यादि करणें (साधनें) समर्थ असत नाहींत, म्हणून निद्रेच्या वेळीं तो अनुभव त्यास बोलून दाखवितां येत नाहीं. जागा झाल्यानंतरच बोलून दाखवितां येतो.

दृष्टांत-कल्पना कर, कीं कोणी एक स्त्री विहिरीवर पाणी आणण्यासाठीं गेली व विहिरींतून पोहोऱ्यानें पाणी काढून भरूं लागली. ते पाणी भरतेवेळीं अवचित तिच्या नाकांतल्या नथीला पोहोऱ्याचे दोरीचा धक्का लागल्यामुळे ती नथ विहिरींत पडली. तेव्हां अर्थातच आपली नथ विहिरींतून निघेल कशी, या फिकिरींत ती बाई पडली. इतक्यांत तिच्या सुदैवानें, तिच्या घरीं नित्य जाणारा-येणारा एक ओळखीचा मनुष्य सहजगत्या तेथेंच आला, तेव्हां ती बाई म्हणाली, 'अरे दादा, माझी नथ मी पाणी भरीत असतां एकाएकी विहिरींत पडली आहे. जर तूं ती काढून मला देशील तर तुझ्या मेहनतीबद्दल योग्य बक्षिस तुला घरी गेल्यावर देववीन.' हे ऐकून तो मनुष्य विहिरींत उतरला आणि पाण्यांत बुडी मारून अगदीं खोल पाण्यांत तळाशी जाऊन हातानें चांचपूं लागत आहे तोंच ती नथ त्याच्या हाताला लागली. त्यावेळीं नथ आपल्या हातास लागली आहे असें त्यास पक्कें ज्ञान होऊन अतिशय आनंद झाला खरा; तथापि, 'आपल्याला नथ मिळाली' असें पाण्यांतूनच सांगावयास त्याच्या वाणीच्या साधनाला

सामर्थ्य नव्हतें. कारण असें कीं, पाण्यांत एका वागिंद्रिया-खेरीज इतर सर्व इंद्रियांचे व्यवहार होऊं शकतात. वागिं-द्रियाचा व्यवहार होऊं शकत नाहीं. याचें कारण वागिंद्रि-याची देवता आहे अग्नि. आणि अग्नीचें आणि पाण्याचें अगदीं वांकडें आहे ही गोष्ट लहानापासून थोरापर्यंत सर्वांस ठाऊकच आहे. इंद्रियाच्या देवतेशिवाय इंद्रिय बोलूं शकत नाहीं; म्हणूनच नथ मिळाल्याबद्दलच्या आनंदाचा अनुभव तो पाण्यामध्यें आपल्याशीच घेत होता; विहिरीं-तून बाहेर आल्यावर मग " मला नथ मिळाली " असें तो वाणीच्या साधनानें सांगूं लागला.

सिद्धांत — वर सांगितल्याप्रमाणेंच सुषुप्तीच्या वेळच्या सुखाचा अनुभव बोलून दाखविणे तें मन आणि वाणी यांचीं साधनें नसल्यामुळें शक्य नाहीं. तरी पण सुषुप्ती-तल्या प्रपंचाच्या अभावाचा अनुभव घेणारा स्वप्रकाश ज्ञानानंदरूप आत्मा असतो तोच, जीव जागा झाल्यावर मन; वाणी इत्यादि साधनांच्या योगानें, ' मी सुखानें निजलों होतो, त्यावेळीं सुखाशिवाय दुसरें कांहींहि ओळ-खत नव्हतो ' असें सांगतो. यासाठीं, बा शिष्या, सुषुप्ता-वस्थेचा द्रष्टा तूं आत्मा त्या अवस्थेहून निराळा आहेस असें सिद्ध झालें. या पूर्वनिरूपित सुषुप्तावस्थेचें हृदयस्थान × आहे. पश्यंती[1] वाचा आहे. आनंदभोग[2]

---

१ सूक्ष्म विचाराची संस्काररूप वाचा. २ निर्विषय सुखाचे भोग.

आहे. द्रव्यशक्ति आहे. तमोगुण आहे; प्रणवाची तिसरी मकार[२] मात्रा आहे आणि प्राज्ञाभिमानी आहे, ही सुषुप्त्यादि आठ तत्वें तूं जाणतोस, म्हणून ती तत्वे तूं नाहीस, ती कारणदेहाचीं असल्यामुळें तुझींहि नाहींत, तूं त्यांचा साक्षी आहेस.

॥ चौपाई ॥

ए कारणदेहनां, आठ तत्त्व कहीं;
बीजां तत्त्व एमां नहीं ॥
तूं एनो साक्षी सच्चिदानंद,
नित्य निरंतर परमानंद ॥ १८ ॥

अर्थ ॥ वर सांगितलेल्या कारणदेहांत आठच तत्वें आहेत, ती कोणती तीं आतां सांगितलींच आहेत, तरी पुनः तीं एकत्र सांगतों :– १ सुषुप्तावस्था, २ हृदयस्थान, ३ पश्यंतीवाचा, ४ आनंदभोग, ५ द्रव्यशक्ति, ६ तमोगुण, ७ मकार-मात्रा आणि ८ प्राज्ञाभिमानी. याशिवाय आणखी तत्वें यांत (कारणदेहांत) नाहींत. या तिसऱ्या कारणदेहांत,

---

१ जाग्रदादी व्यवहाराला अनुकूल पदार्थ उत्पन्न होण्याची कारणरूप शक्ति. २ "मकार" अक्षर हीच मात्रा. ३ सुषुप्तावस्थेचा अभिमान करणारे चैतन्य.

" आनंदमय " या नांवाचा पांचवा कोश आहे.

शिष्य :— " आनंदमयकोश " म्हणजे काय तें सांगण्याची कृपा करावी.

गुरु :— कारण शरीररूप अविद्येंत जें मलिन सत्व असते, त्यांच्यातल्या प्रिय, मोद आणि प्रमोद या तीन प्रकारच्या वृत्तींनीं आनंद होतो म्हणून त्या सत्वांचें नांव आनंदमयकोश ' आहे असें सांगितलें आहे.

शिष्य :— गुरुमहाराज, प्रिय, मोद आणि प्रमोद या तीन पदांचे अर्थ काय बरें ?

गुरु :— आपल्या इष्ट (आवडत्या) पदार्थाला पाहिल्याने जो आनंद होतो त्याला 'प्रिय' असे म्हणतात, त्या आपल्या आवडत्या पदार्थाचा लाभ झाल्याने जो आनंद होतो त्याला 'मोद' असें म्हणतात आणि आपला आवडता पदार्थ भोगल्यानें जो आनंद होतो त्यास 'प्रमोद' म्हणतात. या रीतीनें विषयाच्या संबंधापासून प्रिय-मोद-प्रमोदरुप तीन प्रकारची जी वृत्ति होते तिला 'आनंदमय' म्हणतात. परंतु त्या विषयजन्य आनंदाच्या योगानें शुद्ध निर्विकार आत्मा जाणला जात नाहीं आणि तो कोशांत झांकलेला असल्यामुळें, त्या प्रियादि तीन प्रकारच्या वृत्तींपासून झालेल्या आनंदानें संयुक्त असें जें अविद्येंतलें मलिन

सत्व असतें त्याला 'आनंदमयकोश' अशी संज्ञा आहे. त्या आनंदमयकोशाचा प्रकाशक, सर्व आनंदाचा जो मूलभूत आनंद तत्स्वरूप जो तूं आत्मा आहेस तो तूं कोशरूप नाहीस, तर असा तूं आत्मा कारणदेहाचा, कारणदेहांतल्या तत्वांचा व आनंदमय कोशाचा साक्षी आहेस. आणि तूं सच्चिदानंद असून नित्य निरंतर (भेदरहित), निरतिशय (ज्याहून कोणीहि अधिक नाहीं) असा परमानंदरूप आहेस.

शिष्य :— गुरुमहाराज, मी सच्चिदानंद आहे याचा मला स्पष्ट बोध होईल अशारीतीनें सत्, चित् आणि आनंद या तीनहि पदांचे अर्थ सांगावे.

गुरु :— जागृत स्वप्न आणि सुषुप्ति या तीनहि अवस्थांत, तसाच भूत, भविष्य आणि वर्तमान या तीनहि कालांत तूं आत्मा असतोस म्हणून तुला सत् म्हणतात, जागृतादि तीनहि अवस्थांत तूं आत्मा जाणतोस यासाठीं तुला चित् म्हणतात, आणि तूं आत्मा सर्वकाळ परमप्रेमास्पदरूप आहेस म्हणून त्या तुला आत्म्याला आनंद म्हणतात.

शिष्य :— तीनहि अवस्थांत मी सच्चिदानंदरूप आहे याचा बोध मला स्पष्टपणें होईल अशारीतीनें निरूपण करून सांगावें. ✓

गुरु :— जागृतावस्थेंत, म्हणजे तूं जागा झाल्यापासून निद्रेपर्यंत जो कांहीं व्यवहार घडतो त्या सर्वांस तूं जाणतोस, आणि जागृतावस्थेंत शब्दस्पर्शादिकांचे जें ज्ञान होते

व गमनादिक ज्या क्रिया घडतात तो सर्व व्यवहार तुला ज्ञानपूर्वक उच्चार करून दाखवितां येतो, म्हणून जागृतावस्थेस जाणणारा तूं सद्रूप आत्मा आहेस. असा सद्रूप आत्मा जर तूं नसशील तर जागृदवस्थेला कोणताही व्यवहार तुला जाणतां येणार नाहीं, किंवा त्याचा उच्चार करून दाखवितां येणार नाहीं, एवंच तूं सद्रूप आहेस, जागृतावस्थेस तूं जाणतोस म्हणून चिद्रूप आहेस, आणि जागृतावस्थेंत स्त्री, पुत्र, देह, इंद्रिये यांपेक्षां इतकेच नव्हे, तर प्राणाहिपेक्षां आत्मा अधिक प्रिय असतो. या कारणामुळे तूं आत्मा आनंदरूप आहेस. पंचदशीतहि सांगितलेले आहे कीं— बृहदारण्यकभाष्यवार्तिकम् -1-4-1031.

1-8
पं.द. 12-30
12-31

॥ श्लोक ॥ वे.पं.दे. 12-60

वित्तात्पुत्रः प्रियः पुत्रात्पिंडः पिंडात्तथेंद्रियम् ॥
इंद्रियाच्च प्रियः प्राणः प्राणादात्मा परः प्रियः ॥१॥

अर्थ॥ वित्त म्हणजे धन, त्याहून पुत्र प्रिय असतो. पुत्र होण्यासाठी व पुत्र झाल्यावर त्याच्या रक्षणासाठीं त्याचप्रमाणें, चोरीं, जुगार, इत्यादि अपराध पुत्राच्या हातून झाले असतां त्यातून त्यास बचावण्यासाठीं बाप लागेल तितके धन खर्च करतो. या गोष्टीनें धनापेक्षां पुत्र प्रिय आहे हें सिद्ध होते. पुत्रापेक्षांहि आपला स्वतःचा देह अधिक प्रिय आहे दुष्काळांत कित्येक वेळां स्वतःचे मुलगे विकून मिळालेल्या द्रव्याने मनुष्य आपल्या देहाचे रक्षण करतो.

यावरून पुत्रापेक्षांहि आपला स्वतःचा देह अधिक प्रिय आहे. आपल्या स्वतःच्या देहापेक्षांहि आपलीं इंद्रियें अधिक प्रिय असतात. जर कोणी आपल्याला मारावयास आला तर आपल्या इंद्रियांचें संरक्षण करण्यासाठीं आपण आपल्या देहाची पाठ, डोकें, इत्यादि अवयव पुढें करून त्यांवर मार घेतों. या गोष्टीवरून देहापेक्षांहि इंद्रियें प्रिय आहेत असा अनुभव येतो. इंद्रियांपेक्षांही स्वतःचा प्राण अधिक प्रिय आहे. एकाद्यास जर प्राणान्त शिक्षा झाली तर तो "हात, पाय इत्यादिपैकीं एकादें माझें इंद्रिय हवे तर तोडा, पण माझा प्राण वांचवा" असें म्हणतो, यावरून इंद्रियापेक्षांहि प्राण अधिक प्रिय आहे असें कळून येतें. प्राणाहूनहि परम श्रेष्ठ असा आपला स्वतःचा आत्मा अत्यंत प्रिय आहे. कसा तो पहा—कोणत्या तरी एकाद्या विलक्षण दुःखानें किंवा वेदनेनें गांजलेला मनुष्य " माझा या वेळीं प्राण जाईल तर मी फार सुखी होईन" असें म्हणतांना बहुत वेळा आढळतो. यावरून समजून येतें तें हें कीं, देह, इंद्रियें आणि प्राण, या सर्वांहून निराळा सुखरूप आत्मा आहे.

याज्ञवल्क्य मुनींनीं आपली बायको जी मैत्रेयी तिला बृहदारण्यकउपनिषदाच्या मैत्रेयीब्राह्मणांत याचप्रमाणें उपदेश केला आहे. त्यांत त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, स्त्री, पति, पुत्र, धन, पशु, देवता, लोक इत्यादि जो मनुष्याला

प्रिय असतात तीं सर्व त्याच्या आत्म्याच्या सुखाचीं साधनें आहेत, म्हणून प्रिय असतात. तीं स्त्री–पुत्रादिक जर त्याला स्वतःलाच प्रतिकूल असतील तर त्यास प्रिय वाटत नाहींत. यावरून आपला स्वतःचा आत्माच सर्वांपेक्षां अधिक प्रिय आहे. स्त्रीपुत्रादिक प्रिय असतात हें खरें, पण तीं आत्म्याहून कमी प्रिय असतात. या कारणामुळें आत्मा आनंदरूप आहे असें स्पष्टपणें अनुभवास येतें. त्याचप्रमाणें, स्वप्नावस्थेंतहि आत्मा असतो म्हणून तो सत्य आहे. तो स्वप्नास जाणतो, आणि जागा झाल्यावर स्वप्नांत जे काहीं पाहिलें असेल तें सर्व बोलून दाखवतो. त्यामुळें तो चैतन्यरूप आहे. स्वप्नांतहि आपला आत्मा सर्वांत अधिक प्रिय असतो म्हणून स्वप्नावस्थेंतहि तूं आत्मा सच्चिदानंदरूपच असतोस, त्याचप्रमाणें सुषुप्तावस्थेंतहि कोणताच प्रपंच नसतो हेंहि जाणणारा तूं आत्मा सुखरुप सच्चिदानंद आहेस असें सिद्ध होतें, अशारीतीनें विचार केला असतां स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीनहि देहांचा तूं द्रष्टा आहेस, जागृत, स्वप्न आणि सुषुप्ती, या तीनहि अवस्थांचा तूं साक्षी आहेस, व अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पांचहि कोशाहून निराळा तूं आत्मा सच्चिदानंदरुप आहेस असें ठरतें. यासाठीं बा शिष्या ! अशा ज्ञानानेंच तुला मोक्ष मिळेल, यांत संशय नाहीं.

आत्म्याच्या अपरोक्षज्ञानानेंच मोक्ष प्राप्त होतो यास ब्रह्मनामावलीचें प्रमाण सांगतों :—

॥ श्लोक ॥

अहं साक्षीति यो विद्याद्विविच्यैवं पुनः पुनः ॥
स एव मुक्तः सो विद्वानिति वेदांतडिंडिमः ॥ १ ॥

अर्थ ॥ वर सांगितलेल्या रीतीने तीन देह, तीन अवस्था, पंचकोश, भोक्ता आणि भोग्य इत्यादि सर्वांचे वारंवार विवेचन करुन, तीं देहादिक सर्व दृश्य आहेत आणि आपण त्या सर्वांचा द्रष्टा, साक्षी आत्मा आहे असें जो पुरुष निश्चयानें जाणतो तो मुक्त आहे आणि तोच विद्वान आहे; असा वेदांतशास्त्राचा नगारा बोलतो. म्हणजे, असें वेदांत-शास्त्र सर्वांस अगदीं उघड करून मोठ्याने सांगतें.

पूर्वी देहत्रय, अवस्थात्रय, कोशपंचक इत्यादिकांचें वर्णन केलें आणि त्या देहादिकांचा आपण द्रष्टा आहों असे जें समजणें तें विशेष ज्ञान आहे असें सांगितलें, पण तें विशेष ज्ञान वृत्तिजन्य असल्यामुळें, म्हणजे मनाच्या वृत्तींत उत्पन्न होत असल्यामुळें परिच्छिन्न व विस्मृत होण्यासारखें आहे. यासाठीं त्या विशेष ज्ञानाच्या साधनाचा उपयोग फक्त अज्ञान निवृत्त करण्याकडे त्याचप्रमाणे, अज्ञानाचें कार्य जो

देहाध्यास तोहि निवृत्त करण्याकडे करावा. त्यानंतर तें विशेषज्ञानसुद्धां कल्पित आहे असें समजून वास्तविक, परिपूर्ण सामान्यज्ञानरूप ब्रह्मस्वरूपांत त्याचा एकजीव करून टाकणें हेंच मोक्षाचें साधन आहे. यासाठीं विशेषज्ञानरूपच चवथा महाकारणदेह आहे अशी कल्पना करून त्याचें गुरु निरूपण करतात :--

॥ चौपाई ॥

चोथो महाकारण देह ज्ञानस्वरूप,
तेनो तुं प्रकाशक शुद्ध स्वरूप ॥
देहानां तत्त्व कहुं सुजाण,
ते तुं श्रवण कर विनकान ॥ १९ ॥

अर्थ ॥ तीन देहांच्या अपेक्षेनें हा चवथा आहे असें म्हणतात. अज्ञान व तत्कार्यरूप जो देहादिक प्रपंच त्याच्या पूर्ण निवृत्तीचें हा देह मोठें कारण आहे, म्हणून त्यास महाकारण देह म्हणतात. या महाकारणदेहाचे रुप ज्ञान आहे, म्हणजे ब्रह्मनिष्ठ गुरुच्या द्वारानें वेदान्तशास्त्राचे श्रवण केल्यानें, आपण स्वतः द्रष्टा, साक्षी आहों असें जें विशेषज्ञान मनाच्या वृत्तींत उत्पन्न होते त्यालाच चवथा महाकारणदेह म्हणतात, त्या महाकारणदेहाचाहि प्रकाशक तूं आत्मा शुद्धस्वरूप आहेस. म्हणजे निर्मल, सामान्य, नित्य ज्ञानरूप आहेस. तें विशेषज्ञान जागृतावस्थेंतच

असते, सुषुप्तींत असत नाहीं, यामुळें अनित्य आणि परिच्छिन्न आहे. तूं त्या विशेषज्ञानाचा प्रकाशक सामान्यरूप आत्मा, अस्ति, भाति आणि प्रिय, या तीन रूपांनी आकाशाप्रमाणें सर्व विश्व जेथें आहे तेथें व्यापून राहिला आहेस. म्हणून या सामान्य पूर्णस्वरूपाचा अनुभव घ्यावा आणि त्या पूर्व ज्ञानाचा अनुभव घेतल्यावर, वृत्तिजन्य जें विशेषज्ञान आहे तेच अज्ञानाच्या निवृत्तीचे साधन आहे असें समजावें.

शिष्य :– गुरुमहाराज, अस्ति–भाति–प्रियरूप तूं सामान्यज्ञानरुप आत्मा सर्व जगांत व्यापक आहेस असे आपण सांगितलें; पण अस्ति, भाति आणि प्रिय म्हणजे काय तेंच अगोदर ठाऊक नाहीं, तर कृपा करून त्याचें निरूपण करावें व जगत् म्हणजे काय तेंहि सांगावे.

गुरु :– भूतभौतिक म्हणजे भूतांपासून झालेले जेवढे पदार्थ आहेत त्या सर्वांत १ अस्ति, २ भाति, ३ प्रिय, ४ नाम, आणि ५ रूप या नांवाचे पांच अंश प्रतीत होतात यांचा तुला स्पष्टरीतीनें बोध व्हावा या हेतूनें घटांत या पांचहि अंशाचा अनुभव कसा येतो तें सांगतों, तर आपलें चित्त स्थिर करून हा भाग ध्यानांत आण. 'घटोऽस्ति' (घट आहे) असें म्हटल्यानें घटांत अस्तित्वाचा (सत्तेचा) बोध होतो. " अयं घटो भाती " (हा घट भासतो) असें

म्हटल्यानें हा घट आहे असे खास जाणले जाते. 'घटः-प्रियोऽस्ति' (घट प्रिय आहे) असे म्हटल्याने घटाच्या ठिकाणीं आपली प्रियता किंवा प्रीती आहे असे समजते. 'घट' हे नांव तर आहेच. तोंड लहान व पोट मोठें असे म्हणणे हे घटाचें रूप आहे, याचप्रमाणे पटांत व पृथ्वी, जल, तेज इत्यादि भूतभौतिक सर्व जगांत अस्ति, भाति, इत्यादि पांच अंश आहेत असे समजून येते. त्यांपैकीं पहिले तीन अंश जे अस्ति, भाति आणि प्रिय ते ब्रह्मरूप आहेत, व बाकी राहिलेले नाम आणि रुप हे दोन अंश कल्पित जगताची स्वरूपे आहेत, म्हणजे मिथ्यारूप आहेत, असे समजावे. अस्ति, भाति आणि प्रिय हे पहिले तीन अंश घट-पटादि सर्व पदार्थांत एकाच रुपाने असतात, व नाम आणि रुप हे दोन अंश घटपटादि सर्व पदार्थांत निरनिराळे म्हणजे निरनिराळ्या रुपांनीं असतात. एका पदार्थांची नामरुपे दुसऱ्या पदार्थांत असत नाहींत; जसे घटादींची नामे आणि रुपे पटादि पदार्थांत नाहींत, व पटादि पदार्थांचीं नामें आणि रूपें घटादि पदार्थांतहि नाहींत; त्यामुळे नाम आणि रुप हीं कल्पित आहेत, पण अस्ति, भाति आणि प्रिय हे तीनहि अंश सर्व पदार्थांत एकाच रीतीनें राहतात. असा ब्रह्मांडांत एकहि पदार्थ नाहीं कीं ज्यांत हे तीन अंश नाहींत. या कारणामुळे अस्ति, भाति आणि प्रिय या रुपांनीं ब्रह्माच्या सर्वात्मपणाविषयीं निश्चय अथवा खात्री होते, ज्याप्रमाणें देहाच्या आंत आत्म्याचा अनुभव सत्, चित्

आणि आनंद या तीन रुपांनी होतो, त्याप्रमाणें सर्व ब्रह्मांडांत ब्रह्माचा अनुभव अस्ति, भाति आणि प्रिय या तीन रुपांनीं सिद्ध होतो. अस्ति म्हटल्यानें सत्, भाति म्हटल्यानें चित् आणि प्रिय म्हटल्याने आनंद, या दृष्टीने पाहिले असतां, ब्रह्म आणि आत्मा यांच्यातला अभेदहि अनुभवानें समजून येतो. यासाठीं सामान्यज्ञानरूप तूं आत्मा ब्रह्मस्वरूप आहेस, आणि त्या ब्रह्मस्वरुप तुझ्या आत्म्याविषयाचे जे अज्ञान त्याच्या योगाने नाम आणि रूप या दोन अशांनीं भरलेले हे जग आहे असें भासते, म्हणूनच तें कल्पित आहे असें जाणावें.

शिष्य :-- गुरुमहाराज, सूर्य जसा अंधकाराचा विरोधी आहे, तसें ज्ञान अज्ञानाचे विरोधी आहे. या न्यायानें जर माझें स्वरुप ज्ञानरुप आहे तर त्या माझ्या ज्ञानरुपाविषयीं माझ्या ठिकाणीं अज्ञान आहे हे म्हणणें संभवत नाहीं. आपण तर सांगतां कीं आत्म्याविषयींच्या अज्ञानानेंच नाम आणि रुप कल्पित भासतात, तर मग ह्या परस्परविरूद्ध गोष्टी कशा संभवतात ?

गुरु :-- बा शिष्या, ज्ञान दोन प्रकारचे आहे; एक सामान्यज्ञान आणि दुसरें विशेषज्ञान. यापैकीं सामान्यज्ञान अज्ञानाचें विरोधी नसतें इतकेंच नाहीं, तर उलट अज्ञानाला प्रकाशांत आणतें; म्हणजे अज्ञान कोठे आहे ते दाखवितें, उदाहरणार्थ सूर्याचा प्रकाश [ऊन] लांकूड, गवत, कापूस,

इत्यादि सर्व पदार्थावर पडतो. सूर्याच्या उन्हांत सामान्य रुपाचा अग्नि असतो तरीपण तो लांकूड, गवत इत्यादि सर्व पदार्थ जाळीत नाहीं तर उलट, लांकूड, गवत इत्यादिकांस स्पष्टपणें दाखवून देतो. पण जेव्हां त्याच उन्हाच्या आणि लांकूड, गवत इत्यादिकांच्यामध्ये सूर्यकांत मणि धरल्याने त्या पदार्थांत विशेष अग्नि उत्पन्न होतो, तेव्हां तो अग्नि लांकूड, गवत इत्यादि सर्व पदार्थ जाळून टाकतो. याच न्यायाने, सामान्यज्ञान प्रत्येक मनुष्यामध्ये असते, पण "मी अज्ञानी आहे. मी मला स्वतःलाच जाणत नाहीं. मी मनुष्य, कर्ता, भोक्ता, सुखी, दुःखी आहे," असे म्हटल्याने जे अज्ञान व्यक्त होते. त्याचे व त्या अज्ञानाचे कार्य जो देहाध्यास त्याचे, ते सामान्यज्ञान विरोधी नसते. म्हणजे ते सामान्यज्ञान, अज्ञान व त्याचे कार्य यांस नष्ट करीत नाहीं; पण उलट, ते सामान्यज्ञान अज्ञान व त्याचे जे कार्य त्यांस स्पष्टपणें दाखवून देते. जर ते सामान्यज्ञान अज्ञानाचे विरोधी असते तर अज्ञान व त्याचे कार्य त्यांची प्रतीती (अनुभव) कदापि आली नसती; पण तशी प्रतीति येते ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. यावरून सामान्यज्ञान अज्ञानाचे विरोधी नाहीं असें सिद्ध झाले; आणि तूं आत्माहि सामान्यज्ञानरूप आहेस, पण अज्ञानाच्या योगानें तुझ्या ठायीं कल्पित नामरूपे भासतात असे म्हणणे संभवते. जेव्हां ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरूच्या द्वाराने झालेल्या वेदांतशास्त्राच्या

उपदेशानें आपण स्वत: सच्चिदानंदरूप आत्मा ब्रह्म आहों असें विशेषज्ञान बुद्धीच्या आंत उत्पन्न होतें, त्याच वेळीं "मी स्वत: अज्ञानी आहे" असें म्हणणें हें जें अज्ञान, व "कर्ता, भोक्ता, मनुष्य वर्णाश्रमी, सुखी दु:खी" असें मानून विपरीत अध्यास करणें हें जें त्याचें कार्य या दोघांची निवृत्ति होते. दुसरा दृष्टांत :— लांकडांत सामान्यरुपानें अग्नि असतो, तरी पण तो कोणाला दिसत नाहीं व लांकडांचा विरोधीहि नाहीं, म्हणजे तो लाकूड जाळीत नाहीं पण दुसरे लांकूड घेऊन त्या लांकडावर घांसलें तर घांसल्याबरोबर त्या पहिल्या लांकडांत विशेष अग्नि उत्पन्न होऊन तो तें लांकूड जाळून टाकतो. त्याच न्यायानें सामान्यज्ञान प्राणिमात्रांत असतेंच, तथापि ते ज्ञान कोणाच्याही अज्ञानाची निवृत्ति करीत नाही. पण जेव्हां गुरुच्या आणि शास्त्राच्या उपदेशानें झालेल्या विचाराच्या मंथनानें (घुसळण्यानें किंवा घांसण्यानें) आपण स्वत: सच्चिदानंद ब्रह्मरुप आहो असें विशेषज्ञान उत्पन्न होतें, तेव्हां अज्ञान व त्याचें कार्य जो देहध्यास या दोघांचीहि निवृत्ति होते.

शिष्य :— सामान्यज्ञान आणि विशेषज्ञान अशी दोन ज्ञानें सांगितल्यानें द्वैत उत्पन्न होते, आणि सिद्धांतांत तर अद्वितीयज्ञानरूप एकच आत्मा आहे असे सांगितलेलें आहे.

तर या दोन परस्परविरोधी गोष्टींची एकवाक्यता होईल अशारीतीनें माझें समाधान करावें.

गुरु :— अद्वितीय सामान्यरूप आत्मा एकच आहे हें सत्य आहे. हें जें विशेषज्ञान गुरुशास्त्रांच्या उपदेशानें वृत्तिद्वारा होतें आणि अज्ञान आणि त्याचें कार्य देहादिकांवरील अध्यास, या दोघांस नष्ट करतें, तें तसें केल्यानंतर स्वत: आपणच निवृत्त होतें. म्हणजे तें विशेष ज्ञान सामान्य-ज्ञानापासून वेगळे रहात नाहीं, यामुळें तेथें द्वैत उत्पन्न झालें असें म्हणतां येत नाहीं, तर केवळ एकच सामान्य-ज्ञानरुप पूर्ण आत्मा असतो असें सिद्ध होतें. यावर तुला एक दृष्टांत सांगतों तो ऐक.

नदीचें पाणी पावसाळ्यांत मातीनें व चिखलानें अगदीं गढूळ होऊन जातें. त्यांतलें जितकें पाणी स्वच्छ करावयाचें असेल तितके एका भांड्यांत घालून त्यांत 'कतक' नांवाचे जें पाणी स्वच्छ करणारे फळ असतें त्याची पूड करून घालतात. ते कतकफलाचे रेणू पाण्यांतील मळास बुडाशीं बसवतात, व आपणहि त्यांच्याच बरोबर बुडाशीं जाऊन बसतात. अशारीतीनें, ते त्या भांड्यांतले पाणी स्वच्छ करतात. याच न्यायानें गुरुशास्त्राच्या उपदेशानें उत्पन्न झालेले विशेषज्ञान अज्ञानाचा नाश करून, स्वत: आपण निवृत्त होतें. म्हणजे त्यावेळीं एक सामान्यज्ञानरुप आत्माच काय तो अविशिष्ट रहातो. लांकडांतल्या अग्नीची

गोष्ट तशीच आहे. म्हणजे, अशीं दोन लांकडें एकमेकांवर घांसल्यानें त्या लांकडांत विशेष अग्नि उत्पन्न होतो. तो अग्नि स्वयंपाक आदिकरून कार्य सिद्ध केल्यानंतर, त्याच लांकडांचें जाळून भस्म करून टाकल्यानंतर, आपण स्वतः सामान्य अग्नींत लय पावतो. त्याचप्रमाणें, विशेषज्ञान अज्ञानाची निवृत्ति करण्याचे कार्य करून सामान्यज्ञानांत लय पावते. या विवेचनावरून ज्ञानांत द्वैत उत्पन्न होत नाहीं, असे सिद्ध होतें. एवंच, विशेषज्ञानरूप जो चवथा महाकारणदेह त्याचा प्रकाशक तूं आत्मा शुद्धस्वरूप आहेस असें सिद्ध झालें. आतां त्या महाकारणदेहाची तत्त्वें कोणतीं आहेत तें सांगतो. हे प्रकरण तूं बिनकानानीं (कानांवाचून) श्रवण कर.

शिष्य :— कानांवांचून कसें श्रवण करतां येईल ?

गुरु :— एखादी गोष्ट चांगली समजली नाहीं, मग ती कानांनीं ऐकली काय आणि न ऐकली काय, सारखीच. महाकारणदेहाची तुरीयावस्था आदिकरून आठ तत्त्वें सांगितलीं आहेत त्यांची नांवें मात्र कानांनीं ऐकण्यासारखीं आहेत, पण त्या तुरीया इत्यादि नांवाचे अर्थ अनुभवपूर्वक एकाग्र चित्तानें ध्यानांत धरल्याशिवाय समजण्यासारखे नाहींत, म्हणून अनुभवासहित विचारपूर्वक एकाग्र चित्ताने जे ऐकणें त्याचेंच नांव कानांवांचून एकणें असे समज.

कोनावाचून ऐकून असें सांगण्यांत कान दुसरीकडे ठेवून ये आणि ऐक असें सांगण्याचा हेतु नाही. विसाव्या चौपाईंत महाकारणदेहाच्या आठ तत्त्वांचें वर्णन सद्गुरु करतात :--

॥ चौपाई ॥

तुर्या अवस्था मूर्द्धमिस्थान,
परा वाचा आनंदावभास भोग ॥
जाण इच्छा शक्ति शुद्ध सत्त्वगुण मान,
अर्द्धमात्रा प्रत्यगात्मा अभिमान ॥ २०॥

अर्थ ॥ तुर्या अवस्था म्हणजे चवथी अवस्था असें म्हणतात. तूं तिचा प्रकाशक तुर्यातीत आहेस.

शिष्य :-- तुरीया असें शुद्ध आत्म्याचें नांव आहें, आणि आपण तर मला तुर्यातीत म्हणतां, तर मग शुद्ध आत्म्याहून निराळा असा मी कोण आहे बरें ?

गुरु :-- तुरीया जो शुद्ध आत्मा आहे त्यालाच मी तुर्यातीत म्हटलें आहे. कारण असें कीं, जागृत, स्वप्न व सुषुप्ति या तीनहि अवस्थांस जाणणारा एक आत्मा या तीनहि अवस्थाहून वेगळा आहे व या तीन अवस्थांच्या अपेक्षेने तो तुरीया म्हणजे चवथा आहे असें सांगण्यांत येतें, म्हणजे या तीन अवस्थांचा नाश झाला तर त्याला तुरीय (चवथा) असें म्हणतां येणार नाहीं. यासाठीं तो

तुर्यातीत आहे, म्हणजे तुरीया या नांवाविरहित आहे असें म्हटले. त्यामुळे तुरीयरूप जो आत्मा तो तुर्यातीत आहे आणि तीन अवस्थांच्या अपेक्षेनें आत्म्याला तुरीय हें नांव दिलेलें आहे. त्रोटकवृत्तांत वेदांताचा एक ग्रंथ आहे, त्यांतही असेंच सांगितलेलें आहे :---

॥ श्लोक ॥

यदि जागरितप्रभृति त्रितयं,
परिकल्पितमात्मनि मूढधिया ॥
अभिधानमिदं तदपेक्ष्य भवेत्,
परमात्मपदस्य तुरीयमिति ॥ २ ॥

अर्थ ॥ जागृत, स्वप्न, सुषुप्ति ह्या ज्या तीन अवस्था, त्या मूढबुद्धि मनुष्याने आत्म्याच्या ठिकाणीं कल्पिलल्या आहेत, म्हणजे ह्या तीन अवस्था आत्म्याच्या आहेत असें मानले आहे. या तीन अवस्थांच्या अपेक्षेनें परमात्मपदाला तुरीया (चवथा) असें नांव पडलेलें आहे.

यासाठीं तीन अवस्थांवाचून आत्म्याला तुरीय असें नांव देतां येत नाहीं, यामुळे तुरीयालाच तुर्यातीत म्हटलें, म्हणजे

तुरियनामरहित म्हटलें. पण तुर्यातीत म्हटल्यानें तुरीयाहून वेगळा पांचवा आत्मा आहे असें सांगण्याचा हेतु नाहीं. असे पहा कीं, एकाद्या पुरुषाला पुत्राच्या अपेक्षेनें पिता असे नांव पडलें, पण पुत्राच्या अभावीं, म्हणजे पुत्र मेल्यानंतर, त्याला पिता हें नांव जरी देतां येणार नाहीं तरी पुरुष म्हणून तो आहेच. त्याच न्यायानें आत्मा तुर्यातीत आहे. या तुर्यावस्थेचें मूर्धनिस्थान आहे. तुरीय आत्मा नखशिखान्त, म्हणजे सर्व शरीरांत व्याप्ति करून राहिलेला असल्यामुळें तो एका मूर्धनिस्थानांतच आहे असें म्हणतां येत नाहीं. असे असूनहि "तुर्यावस्था मूर्धनिस्थान" असें जें म्हटले आहे त्याचें कारण इतकेंच कीं, मूर्धनिस्थान सर्व स्थानांत श्रेष्ठ आहे व सर्वोत्तम अशा तुरीय आत्म्यालाही स्थान उत्तमच दिलें पाहिजे, हेंच केवळ ध्यानांत आणून त्या अवस्थेचें मूर्धनिस्थान आहे असे सांगितलें. त्या महाकारणदेहाची परा (शब्दोच्चाराची पहिली अवस्था) या नांवाची वाचा आहे. गुरु व शास्त्रांच्या योगानें आत्म्याचें यथार्थज्ञान झाल्यानें "आपण कृतार्थ आहो, आपण धन्य आहों, आपली जन्ममरणादि दुःखें निवृत्त झालीं" असे बोलून दाखवितां येण्याजोगा विशेष आनंदाचा अनुभव, ज्यास आनंदावभासभोग म्हणतात तो, या महाकारणदेहाचा आहे, महाकारणदेहाची इच्छाशक्ति आहे. ज्ञान झाल्यानंतर निर्विकल्प सुखाचा अनुभव घेण्याची जी इच्छा होते तिचें नांव इच्छाशक्ति. या देहाचा सत्त्वगुण आहे.

रजोगुण आणि तमोगुण यांचा संबंध ज्यांत बिलकूल नाहीं असा जो सत्त्वगुण त्याला शुद्धसत्त्वगुण म्हणतात. असें जाणावे. या अवस्थेंत प्रणवाची अर्धी मात्रा असते. आपण द्रष्टा आहों असा जो अभिमान, त्याला प्रत्यगात्माभिमान म्हणतात. हा प्रत्यगात्माभिमान या देहांत असतो. याप्रमाणें तुरीयावस्थादि जीं महाकारणदेहाचीं आठ तत्त्वें सांगितलीं त्या विशेषज्ञानस्वरूप सर्व तत्त्वांचा प्रकाशक तूं सामान्य, पूर्ण ज्ञानस्वरूप आत्मा आहेस.

॥ चौपाई ॥

एवां सर्व मळीनें ब्याशी तत्त्व कही,
तुं एनो जाणनार स्वप्रकाश सही ॥
अहं ब्रह्मास्मि यह दृढ होई,
एज साक्षात्कार कहीए सोई ॥ २१ ॥

टीका। स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चार देहांचीं वर सांगितलेलीं सर्व तत्त्वें मिळून एकंदर ब्याऐशीं तत्त्वें झालीं, तीं अशीं :– स्थूलदेहाचीं तेहतीस, सूक्ष्मदेहाचीं तेहतीस, कारणदेहाचीं आठ, महाकारणदेहाचीं आठ या सर्व तत्त्वांस जाणणारा तूं प्रत्यगात्मा स्वयंप्रकाश आहेस यांत बिलकूल संशय नाहीं. यासाठीं बा शिष्या ! असा विचार करून आपण उपाधिरहित शुद्धब्रह्म आहों असा जेव्हां दृढ

निश्चय होतो तेव्हां त्यालाच साक्षात्कार म्हणजे अपरोक्षज्ञान म्हणतात.

ज्ञान दोन प्रकारचे आहे. एक परोक्षज्ञान व दुसरे अपरोक्षज्ञान. त्यापैकीं अपरोक्षज्ञानाला साक्षात्कार म्हणतात. यास पंचदशीचें प्रमाण सांगतो :—

॥ श्लोक ॥

अस्ति ब्रह्मेति चेद्वेद परोक्षज्ञानमेवतत् ॥ पै.पं 6
अहंब्रह्मेति चेद्वेद साक्षात्कारः स उच्यते ॥१॥

अर्थ ॥ ज्ञान दोन प्रकारचे आहे. एक परोक्षज्ञान आणि दुसरें अपरोक्षज्ञान. परब्रह्म सत्यरूप आहे असे मानून ब्रह्माचें रूप आत्म्याच्या रूपाहून भिन्न आहे असे ज्या ज्ञानानें जाणले जाते ते यांपैकी परोक्षज्ञान असे समजावे, आणि ते निर्विकल्पब्रह्म आपणच आहों अशाप्रकारचा अनुभव होऊन, ब्रह्म आणि आत्मा यांच्यांत बिलकुल भेद नसून तीं दोनहि एकच आहेत असे ज्या ज्ञानाने जाणले जाते ते यांपैकीं अपरोक्षज्ञान आहे व त्यालाच साक्षात्कार म्हणतात.

साखर गोड आहे असे एकाने दुसऱ्यास केवळ सांगितल्यावरून तो दुसरा मनुष्य साखर गोड आहे असे जाणतो, हे ज्या ज्ञानाने तो जाणतो त्याला साखरेचे परोक्षज्ञान असे म्हणावें. नंतर तोच मनुष्य साखर प्रत्यक्ष खाऊन तिचा स्वाद घेतो म्हणजे साखरेच्या गोडीचा

स्वानुभव घेतो तेव्हां ती साखरेची गोडी तो ज्या अनुभविक ज्ञानानें जाणतो त्या ज्ञानास साखरेचें अपरोक्षज्ञान असें म्हणावें. याच न्यायानें शास्त्राच्या फक्त उपदेशानें परमात्मा सच्चिदानंद आहे असें जे जाणणें त्याचे नांव परोक्षज्ञान, आणि गुरुशास्त्रांच्या अनुग्रहानें विचार करून, सच्चिदानंदरूप ब्रह्म आपणच आहों असें जें प्रत्यक्ष अनुभव घेऊन जाणणें त्याला अपरोक्षज्ञान म्हणतात.

आतां पुढल्या बाविसाव्या चौपाईत चार देहांहून भिन्न असणाऱ्या आत्म्याच्या अपरोक्षज्ञानाचें फल गुरु सांगतात:—

॥ चौपाई ॥

एवा चार देहती न्यारो होय,
तो हमणा मुक्तिसुख पामे सोय ॥
सर्वव्यापक सहुती न्यारो,
विवेकदृष्टि करी विचारो ॥ २२ ॥

टीका ॥ पूर्वी निरूपण केलेले जे स्थूल सूक्ष्म; कारण आणि महाकारण असे चार देह त्यांच्याहून वेगळा असून त्यांचा प्रकाशक शुद्ध, सामान्य, चैतन्य असा आत्माच आपले स्वरूप आहे अशा दृढ बोधाने देहाध्यासाचा जर कोणी त्याग केला तर तो या देहातच विलंब न लावता मोक्षसुख प्राप्त करून घेईल. गीता ५-३९

बृह. 1-4-2

शिष्य :- गुरुमहाराज, भेददृष्टी निव्वळ दुःखाचे कारण आहे, आणि त्या दुःखाची निवृत्ति वेदशास्त्रांत प्रतिपादित
-8-7 बृह. 1-4-10 छां. 7-1-3 निरालंब उप. 31.
जें अभेदरूप आत्मज्ञान त्याच्या योगानें होते, आणि मोक्षहि त्यानेच होतो, असे मी शास्त्रांतून सांगितलेलें ऐकलें आहे आणि आपण तर आत्मा चार देहांतून भिन्न आहे असें निरूपण करून सांगतां, तर मग आत्म्याहून देह वेगळा आणि देहाहून आत्मा वेगळा, त्याचप्रमाणें आत्म्याहून भूत-भौतिक प्रपंच निराळा आणि त्या प्रपंचाहून आत्मा निराळा, अशाप्रकारच्या परस्परभेदात्मक प्रतिपादनानें द्वैत सिद्ध होत असल्यामुळें, अद्वैतसिद्धांतांत विरोध उत्पन्न होतो. यासाठीं त्यांची एकवाक्यता संक्षिप्त निरूपणानें,पण माझें समाधान होईल अशारीतीनें करण्याची कृपा करावी.

गुरु :- माझ्या लाडक्या, जसें ब्रह्मस्वरूप सत्य आहे त्याचप्रमाणें ब्रह्माहून निराळे चार देह व भूतभौतिक प्रपंच हेहि जर सत्य असेल, तरच द्वैत उत्पन्न होईल. पण ते देहा-दिक सर्व प्रपंच खरे नसून ब्रह्माच्या ठिकाणीं कल्पित आहेत. ज्याप्रमाणें रज्जूच्या (दोरीच्या) ठिकाणीं सर्प, भूछिद्र (जमिनीवरील भेग). सूत्रधारा इत्यादि कल्पित असतात पण त्या कल्पित सर्पादिकांची सत्ता (अस्तित्व) दोरीहून भिन्न नाहीं, किंवा शुक्तीच्या (शिंपल्याच्या) ठिकाणीं कल्पिलेल्या रजत (रूपे) इत्यादिकांची सत्ता शुक्तीहून भिन्न नाहीं, किंवा पटाची (वस्त्राची) सत्ता तंतूहून भिन्न नाहीं; किंवा सुवर्णालंकाराची सत्ता सुवर्णाहून

भिन्न नाहीं; किंवा मृत्तिकेच्या घटादिकांची सत्ता मृत्तिकेहून भिन्न नाहीं; किंवा आकाशाच्या ठिकाणीं कल्पिलेल्या श्यामतेची (निळचा रंगाची) सत्ता आकाशाहून भिन्न नाहीं; किंवा आणखी, मरुभूमीच्या ठिकाणीं कल्पिलेल्या मृगजलाची सत्ता मरुभूमिहून भिन्न नाहीं, त्याचप्रमाणें देहादिक सर्व प्रपंचाची सत्ता आत्म्याच्या सत्तेहून भिन्न नाहीं. आत्म्याच्या ठिकाणीं जें कल्पित असद्रूप भासतें त्या असद्रूपाने भरलेल्या देहादिक प्रपंचानें द्वैत होत नाहीं. एक अद्वितीय, आत्मा सत्य आहे, त्यामुळें अद्वैतसिद्धांताशीं कोणत्याहि प्रकारचा विरोध येंत नाहीं. देहादि जगत् सर्व असत्य आहे, आणि आत्माच काय तो एक सत्य आहे असे श्रीकृष्णभगवंतांने अर्जुनाला भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे :--

॥ श्लोक ॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥
उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १ ॥

गी. अ. २ श्लो. १६.

अर्थ :– असद्रूप असें जें हें भूत–भौतिक नामरूपात्मक देहादि सर्व जग, त्याचा कोणत्याहि काली सद्भाव (खरें अस्तित्व) नाहीं तर तें सर्वदा असद्रूपच [खोटें किंवा कल्पित] आहे. एक अद्वितीय, अज, अजर, अमर, सद्घन, चिद्घन,

आनंदघन, परिपूर्ण, निरवयव आणि निष्क्रिय असा जो सद्रूप आत्मा त्याचा कोणत्याहि कालीं अभाव नाहीं. तर सदासर्वदा तो सद्रूपच आहे. असत्य असें हें जग, आणि सत्स्वरूप असा हा आत्मा, या दोघांचा, परमात्मतत्वास सत्य समजणाऱ्या ज्ञानी पुरुषांनीं अंत लावला आहे (निर्णय केला आहे.) म्हणजे सर्व जग खोटें आहे आणि आत्माच काय तो एकटा खरा आहे, असा निश्चय करून ठेवला आहे

शिष्यः— महाराज, जर हें जग असत्य आहे. तर तें दिसता कामा नये आणि तें असत्य असल्यामुळें सुखदुःखेंहि होतां कामा नये, पण वस्तुस्थिती तशी नाहीं; म्हणजे हें जग दिसतें, व त्यामुळें सुखदुःखेंहि होतात; तर मग त्याला असत्य कसें म्हणता येईल तें सांगावें.

गुरुः— खरें असतें तेवढेंच दिसतें, आणि खऱ्यापासूनच तेवढीं सुखदुःखें होतात असा कांहीं ठरलेला नियम नाहीं. असत्यहि दिसतें व असत्यानें सुखदुःखेंहि होतात. उदाहरणार्थ, स्वप्न असत्य असूनही दिसतें, त्याचप्रमाणें त्याच्यापासून सुखदुःखेंही होतात. शिंपल्यांत कल्पित रुपें आणि दोरींत कल्पित सर्प असतात. तरीपण तीं दिसतात. आणि त्यांच्या योगानें सुखदुःखेंहि होतात. मृगजल व आकाशाचा निळेपणा हीं असत्य आहेत. तरी-

पण तीं दिसतात. त्याचप्रमाणें जग असत्य असूनहि दिसतें. यावरून सर्व खरें असतें तेवढेंच दिसते, किंवा याच्या उलट, दिसते तितके सर्वच खरें असते असे कांहीं सिद्ध होत नाहीं.

शिवाय ईश्वरानें मायेच्या योगाने रचलेले कल्पितरूप म्हणजे असद्रूप असें हे भूतभौतिक जग विचारें दिसलें तर दिसेना. त्यास निवृत्त करण्याचे आपणास कांहींच प्रयोजन नाहीं. कारण असे कीं, ईश्वरानें रचलेले हे जग कोणालाहि बंधन करीत नाहीं; पण ईश्वरानें निर्मिलेल्या या जगांत जीवाने आपल्याच मनाने सत्यबुद्धीने निर्माण केलेले जे द्वैत आहे ते मात्र त्याला बंधन करते, यासाठीं त्याची मात्र निवृत्ति अवश्य केलीच पाहिजे.

शिष्य :— ईश्वराने निर्मिलेले जग या देहादिरूपांनीं स्पष्टपणे दिसून येतें, पण त्यांत जीवाने रचलेले द्वैत, ज्यामुळे बंधन होते असे आपण सांगितलें, तें कोठले बरे ?

गुरु :— ईश्वराने निर्मिलेल्या देह-स्त्री-पुत्र धनादिकांच्या ठिकाणीं जो अहंताममतारूप दृढ अध्यास पहाण्यांत येतो तो जीवानें निर्मिलेला आहे. तो बऱ्याच बंधनाचे व दुःखाचे कारण आहे. हा देह स्वतः होऊन कोणासहि बंधन करीत नाहीं, पण त्याच्यात अहंताममतारूप जी जीवसृष्टी आहे. ती बंधनाचे कारण आहे.

ईश्वराने उत्पन्न केलेल्या एखाद्यामांसमयी स्त्रीच्या ठिकाणीं कोणाचेहि ममत्व जर नसेल तर ती मेली असतां कोणालाही दुःख होणार नाहीं; पण अमुक एक स्त्री ही माझी आई आहे, ही माझी मुलगी आहे, ही माझी बायको आहे, ही माझी बहीण आहे, इत्यादि भिन्न भिन्न प्रकारचें ममत्व भिन्न भिन्न जीवांनी आपण होऊन जिच्या ठायीं भरपूर केलेले असतें, अशी ती मनोमयी नष्ट झाल्याने त्या सर्व भिन्न भिन्न जीवांस दुःख होते. समज कीं, कोण्या एका गृहस्थाचा मुलगा कांहीं कारणाने फार दूर देशांतरी गेलेला असून तो तेथें जिवंत असतांहि " अहो, देशांतरी गेलेला तुमचा मुलगा मरण पावला." असं कोणी लबाड मनुष्याने त्या गृहस्थाकडे एकाएकीं येऊन त्यास सांगितलें. ते ऐकतांच आपला मुलगा मेला असे मानून तो बाप असह्य दुःखाने रडूं लागला. बरें आता त्याच्या उलट कल्पना कर कीं, " तो मुलगा देशांतरी खरोखरच मरण पावला." असे असूनहि कोणीहि त्यास सांगितले नाहीं तोपर्यंत त्या गृहस्थास यत्किंचितहि दुःख झाले नाहीं. उलट, तो नेहमींप्रमाणे आनंदांत आहे असे दिसून येत होते. आतां पहा कीं, ईश्वराने उत्पन्न केलेला मुलगा देशांतरी जिवंत आहे, परंतु तो मेला असे त्याने केवळ मनाने मानल्याच्या योगाने त्यास किती विलक्षण दुःख झाले. याच्याउलट, ईश्वराने उत्पन्न केलेला मुलगा देशांतरी सुखानें रहातो

आहे, असे त्या बापाने केवळ मनानें मानल्यामुळें त्यास लवभरहि दुःख झालें नाहीं. एवंच. द्वैत म्हणून जितके आहे तितकें सर्व मनानें रचलेलें असल्यामुळें बंधनास कारण होते यासाठीं आत्मज्ञानाच्या योगाने त्याची निवृत्ति करावी.

शिष्य :— जर मनानें उत्पन्न केलेले द्वैत बंधन करणारे आहे. तर त्या मानसद्वैताची निवृत्ति मनोविरोधरूप योग केला असतां होण्यासारखी आहे. म्हणजे जिच्यासाठी योगाभ्यास करावा; आत्मज्ञानाचे काय कारण आहे तें सांगावें.

गुरु :— ज्ञानावांचून योगाभ्यास करून द्वैताची निवृत्ति होते खरी, पण ती फक्त तितक्यापुरतीच होते. म्हणजे योगाभ्यासाने जितका वेळ मन एकत्र रहाते तितकाच वेळ मात्र द्वैताची प्रतीति होत नाही, म्हणजे पुनर्जन्म टाळील अशा प्रकारची द्वैताची पूर्ण निवृत्ति आत्मज्ञानावांचून केलेल्या केवळ योगाभ्यासानें होऊं शकणारच नाहीं. ज्ञान झाल्याशिवाय जन्ममरणादि दुःखांची निवृत्ति होतच नाहीं. असा श्रुतींतहि नियम सांगून ठेवलेला आहे. तीं श्रुतिवचनें पुढील अर्थाचीं आहेत— “ ज्ञानानेंच कैवल्य (मोक्ष) मिळते. ” “ ज्ञानावांचून मुक्ति मिळूं शकत नाहीं. ” शिवाय श्वेताश्वेततर उपनिषदांत तर असें सांगितलेले आहे कीं, “ ज्या वेळीं मनुष्य सबंध आकाशाला चामड्याप्रमाणें गुंडाळतील, म्हणजे हरिणाचे कातडें लांब असलें तर ते जसें हातांनीं गुंडाळून ठेवतात, त्याचप्रमाणें आकाशाच्या सर्व पोकळीचो

मनुष्य जेव्हां गुंडाळून घडी करील तेव्हांच देवाला (स्वयं-प्रकाश आत्म्याला) जाणल्यावांचून त्याच्या दुःखांचा नाश होईल. असें लिहिण्यांतला अभिप्राय असा आहे कीं, आकाशाची गुंडाळी जशी केव्हांहि होऊं शकावयाची नाहीं, त्याचप्रमाणे आत्मज्ञान झाल्यावांचून केवळ योगाभ्यासानें जन्मादि दुःखांचें कारण जें मनोमय द्वैत, त्याची पूर्ण निवृत्ति केव्हांहि होऊं शकावयाचीं नाहीं.

शिष्य :– हें बाहेर दिसूं शकतें असें जें द्वैत, ईश्वरानें करून ठेविलें आहे, त्याचें निवारण केल्याशिवाय अद्वैत आत्म्याचें जर ज्ञानच उत्पन्न होऊं शकत नाहीं, तर तें ज्ञान मानस द्वैतास कसें निवृत्त करूं शकेल ते सांगावे.

गुरु :– असद्रूप बाहेरल्या द्वैताचें निवारण केल्यावांचून गुरुशास्त्राच्या उपदेशाने तें द्वैत मिथ्यारूप आहे असें केवळ जाणल्यानेंच अद्वैतरूप आत्म्याचें ज्ञान होतें. वै. पं. 4-40

शिष्य :– बाह्य द्वैत मिथ्यारूप आहे असें जाणल्यानेंच अद्वैतज्ञान होत नाहीं, तर द्वैताच्या निवारणानेंच, म्हणजे बाहेरलें द्वैत(जग) मुळीं पहाण्यांतच येणार नाहीं असें केल्यानेंच अद्वैतज्ञान होतें, त्यावांचून होत नाहीं, यासाठीं बाह्य द्वैवतांचें निवारण केले पाहिजे ना ?

41 गुरु :– बाह्य द्वैताच्या निवारणेंकरूनच जर अद्वैतज्ञान होत असेल, तर सुषुप्तावस्थेंत व प्रलयकालीं प्राण्यांनीं

यत्किंचितहि प्रयत्न केल्यावांचून त्यांच्या समग्र बाह्य द्वैतांची निवृत्ति आपोआप होते, यासाठीं त्यास त्यावेळी अद्वैत आत्म्याचें ज्ञान झाले पाहिजे. परंतु त्यावेळीं, ज्ञान होण्याची साधनें जीं गुरु आणि शास्त्र यांच्या अभावामुळें, त्यास अद्वैतज्ञान होऊं शकत नाहीं, आणि ज्ञानावांचून आत्यंतिक दु:खाची निवृत्ति होत नसल्यामुळें मोक्षहि होऊं शकत नाहीं, यासाठीं द्वैत जर न दिसेल तरच अद्वैतज्ञान होईल असे म्हणणे व्यर्थ आहे. शिवाय ईश्वराने उत्पन्न केलेले जे बाह्य द्वैत दृष्टीस पडते तें म्हणजे अद्वैतज्ञानाला कोणत्याहि रीतीनें अडथळा करते असेंहि नाहीं; इतकेंच नाहीं तर उलट शास्त्रादींच्या द्वारानों अद्वैतज्ञान होण्याच्या कामीं मोठें सहाय्यच करतें. शिवाय तें खोटें आहे असें जाणण्याच्याच एका उपायावांचून दुसऱ्या कोणत्याहि उपायानें ते नष्ट होण्यासारखें नाहीं, यासाठीं ईश्वरकृत द्वैत असेना बापडे, आपण त्याचा कशासाठीं द्वेष करावा ? जीवाने केलेले द्वैत बंधन करते म्हणून त्यास मात्र निवृत्त करण्याचा प्रयत्न करावा. ✓ वै.पं.द. ५-४२.

शिष्य :— जीवकृत द्वैत पूर्वी आपण संक्षेपाने सांगितलेंच आहे, कीं त्याशिवाय आणखी कोणतें आहे ? आणखी असल्यास तें किती प्रकारचें आहे तें कृपा करून सांगावें.

द. गुरु: — विद्यारण्यमुनींनी जीवकृत द्वैत दोन प्रकारचें

आहे म्हणून सांगितलें आहे. एक शास्त्रीय द्वैत व दुसरें अशास्त्रीय द्वैत ; प्रत्यग्ब्रह्माच्या एकत्वाचा जो विचार, तन्मय जें वेदांतशास्त्राचें श्रवणमनन करणें त्याला शास्त्रीय मनोमय द्वैत म्हणतात. A सच्चिदानंद ब्रह्मरूप प्रत्यगात्म्याचा अपरोक्ष बोध जोपर्यंत दृढ झाला नाहीं तोपर्यंत शास्त्रीय द्वैताचा त्याग मनुष्यानें करूं नये. कामादिकांची पूर्ण निवृत्ति होऊन अद्वैततत्त्वाचा दृढ बोध झाल्यानंतरच त्याचा त्याग करावा. सदसद्विचारांत कुशल असा बुद्धिमान पुरुष असतो. तो वेदांतशास्त्राचा अभ्यास करून त्याच्याद्वारें परोक्ष व अपरोक्ष ज्ञानांत निष्णात झाल्यावर मग, भातगोटच्यांतून तांदळाचा दाणा काढून घेऊन तूस टाकून द्यावें या न्यायानें समग्र शास्त्राचा त्याग करतो. अशारीतीनें दृढ बोध सिद्ध झाल्यानंतरच शास्त्रीय द्वैताचा त्याग करावा असें B श्रुतींत सांगितलेलें आहे. म्हणजे श्रुतींत शास्त्रविचाराची अवधि किती ती सांगितलेली आहे. तरी पण बोध झाल्यानंतर सच्छास्त्रविचार करूंच नये असा निषेध केलेला नाहीं. यामुळें दृढ बोध झाल्यानंतरहि पूर्व प्रवाहाच्या ओघानें प्राप्त झालेलें शास्त्रविचारादिक शास्त्रीय द्वैत कल्पित आहे असे जाणून त्याच्या पारानें सद्विचारांत कालक्षेप करण्यास कोणत्याहि प्राकरचा प्रत्यवाय किंवा हरकत नाहीं. ✓

शिष्य :– गुरुमहाराज, शास्त्रविचारादिकासहि जर आपण कल्पित म्हणतां, तर त्याच्याकडून सांसारिक बंधनाची निवृत्ति कशी होईल ते सांगावें.

गुरु :– ज्याची निवृत्ति करायची आहे असा तो संसार कोठे खरा आहे ? " जसा यक्ष तसें बलिदान " अशी जो म्हण आहे, त्या न्यायाने स्वप्नकल्पित सिंहाच्या दर्शनाने कल्पित स्वप्नाची जशी निवृत्त होते, त्याचप्रमाणें कल्ति शास्त्रादिकानें कल्पित संसाराची निवृत्ति होऊं शकते. आतां अशास्त्रीय द्वैत म्हणतात ते दोन प्रकारचें आहे, एक तीव्र व दुसरे मंद. त्या दोहोंपैकी कामक्रोधादिकांना तीव्रद्वैत म्हटलेलें आहे. आणि मनोराज्याला मंदद्वैत म्हटलेलें आहें. या दोहोंचाहि त्याग अद्वैततत्त्वबोध होण्याच्या अगोदरच करावा. कारण कीं तत्त्वबोध करून घेण्याची जीं चार साधने सांगितलेलीं आहेत, त्यांतील कांहीं साधने साध्य करीत असतां असतांच ह्या गोष्टी, म्हणजे कामक्रोधादिकांचा त्याग आणि मनोराज्याचा हे दोनहि त्याग आपोआप घडून येतात. हीं चार साधने कोणतीं तीं याच पुस्तकाच्या आरंभीं एका प्रसंगीं सांगितलेलीं आहेत, तरी पण पुन: एक वेळ सांगतो, त्यांतलें पहिलें साधन विवेक (आत्मा सत्य

साधन वैराग्य (इहलोक व परलोक यांच्यातले भोग भोगण्यासंबंधाने अनिच्छा किंवा अप्रीति). १ शम. (वासनांचा त्याग), २ दम (बाह्येंद्रियांचा निग्रह), ३ उपरति (प्रपंचापासूननिवृत्ति), ४ तितिक्षा (शीतोष्णादि द्वंद्वधर्म सहन करण्याची योग्यता), ५ श्रद्धा (ब्रह्मनिष्ठ गुरूच्या व वेदांतशास्त्रांतल्या वाक्यांच्या ठिकाणीं भक्ति) व ६ समाधान (चित्ताची एकाग्रता) ह्या सहा संपत्ति मिळून झालेले तिसरें साधन. चवथें साधन मोक्षेच्छा (मी जीवाने संसाराच्या बंधनापासून मुक्त व्हावें अशी इच्छा) या आत्मज्ञानाच्या चार साधनांपैकीं तिसरे साधन जी षट्संपत्ति तिच्यातली शम म्हणून जी वर पहिली संपत्ति सांगितली तिच्या योगानें कामक्रोधादिकांचा त्याग करावा. तसा केला म्हणजे वासनांचा त्याग होतो असे सांगितलेलें आहे; समाधान म्हणून जी सहावी संपत्ति सांगितली तिच्या योगानें मनोराज्याचा त्याग केला असतां चित्ताची एकाग्रता होते असें सांगितलें आहे. यासाठीं पहिल्या साधनावस्थेंत कामक्रोधादिकांचा त्याग करून जीवाने बोध संपादन करावा.

शिष्य :— बोध सिद्ध व्हावा म्हणून, बोध होण्याच्या अगोदर कामादि अशास्त्रीय द्वैताचा त्याग करावा असें आपण सांगितलें ते ठीक आहे, पण तत्वबोध झाल्यानतर त्याचें

ग्रहण केलें तर त्यांत काय हरकत आहे अशी शंका जर उत्पन्न झालीच, तर तिचें समाधान आहे काय ? असेल तर सांगावें.

गुरु :— बोध झाल्यावरहि जीवन्मुक्तता सिद्ध करण्यासाठीं कामक्रोधादिकांचा त्याग केंलाच पाहिजे. कारण असें कीं, कामक्रोधादिरूप क्लेशांच्या योगाने जो बद्ध झालेला असेल त्याची जीवन्मुक्ति सिद्ध होत नाहीं हीच काय ती त्यास हरकत आहे.

शिष्य :— गुरुमहाराज, जन्ममरणादि दुःखे ज्या संसारांत आहेत, त्या संसाराने मी अतिशय गांजलेला आहे. यासाठीं जन्मादि दुःखें जीथं नाहींत अशाप्रकारची अत्यंत मोक्षसुखरुप विदेहमुक्तिच जर मला प्राप्त झाली तर तिच्या योगाने मात्र मी कृतार्थ होईन असे आहे. तर या लोकीं मी जिवंत आहे तोपर्यंतच काय ती टिकणारी जीवन्मुक्ति तिची मला अर्थातच जरुरी नाहीं.

गुरु :— कामक्रोधादिकांच्या त्यागानें जर जीवन्मुक्तीचें संपादन केलें, तर आपण इहलोकाच्या भोगांस अंतरुं अशी तुला भीति पडून तीमुळें जर तूं जीवन्मुक्ति टाकून देशील, तर अंतरुं विदेहमुक्त झालों तर आपण स्वर्गभोगांस

अंतरुं या भीतीने तूं विदेहमुक्तीही टाकून देशील. तसें झालें असतां तुला स्वर्ग मात्र प्राप्त होईल. पण जन्मादि दुःखरहित जी विदेहमुक्ति ती तुला कधीहि प्राप्त होणार नाहीं.

शिष्य :– स्वर्गातले सर्व भोग नाशवंत आहेत व सातिशय आहेत, त्याचप्रमाणें तेथील भोगांच्या अंती जीवाचा स्वर्गापासून अधःपात होतो, इत्यादि अनेक दोष स्वर्गांत असल्यामुळें मी स्वर्गाचा निःसंशय त्याग करीन. स्वर्गाची मला जरूरी नाहीं.

गुरु :– जर स्वर्गांत क्षय आणि सातिशयादि दोष आहेत आणि त्यामुळें तूं स्वर्गाचा त्याग करण्यास तयार आहेस. तर स्वभावतः अनेक दोषांनीं परिपूर्ण, धर्मादि सर्व पुरुषार्थांचा नाश करणारे, आणि अत्यंत दुःख देणारे जे कामक्रोधादिक त्यांचा त्याग करण्यास तूं कां तयार नाहींस ?

शिष्य :— वैराग्यादि साधनांच्या योगानें, विलक्षण अनर्थास कारणभूत जे कामादिक त्यांची मला बाधा होणार नाहीं अशारीतीनें जर मी त्यांस जिंकून ठेवलें आहे, तर मग या लोकांत भोगमात्रास उपयोगी जे कामादिक त्यांचें गरजेपुरतें ग्रहण केल्यानें कोणता दोष उत्पन्न होतो तें सांगावें.

गुरु :— बा शिष्या, आत्मतत्त्व जाणल्यानंतरहि जर विशेष (समग्र) कामक्रोधांचा त्याग न करशील, व कामादिकांस वश होऊन, "मी तत्त्ववेत्ता आहे, सबब विधिनिषेधशास्त्रांचा उपदेश मला लागूं नाहीं" असें अभिमानाने

बोलून, धर्मशास्त्राला व त्यांत करावयास सांगितलेल्या पुण्यकर्मालाहि जर तूं झुगारून देशील, तर यथेष्टाचरणाकडे (शास्त्राने सांगितलेली वर्णाश्रमाची मर्यादा सोडून स्वेच्छा वर्तन करण्याकडे) तुझी प्रवृत्ति होईल. कदाचित् तूं म्हणशील कीं यथेष्टाचरणाकडे प्रवृत्ति झाली तर होईना बापडी, पण अशी प्रवृत्ति होणें बिलकूल योग्य नाही. नैष्कर्म्यसिद्धि नांवाच्या ग्रंथांत श्रीसुरेश्वराचार्यांनी याचेच विस्तारपूर्वक निरूपण केलें आहे. त्यांतला सारांश असा आहे कीं एकदा पुरुष अद्वैतपरमात्मतत्त्व जाणूनहि यथेष्टाचरणास प्रवृत्त झाला तर त्याच्या योगाने अभक्ष्याचे भक्षण करणे, इत्यादि अनर्थाकडे त्याची प्रवृत्ती झाल्यामुळें, कुत्र्याचा आणि तत्वज्ञानाचा असे दोघांचेही व्यवहार एकसारखेच होतील पण अगोदर, ज्याला तत्त्वज्ञान झालें आहे त्याची यथेष्टाचरणाकडे प्रवृत्तिच संभवत नाही. कारण असें कीं, पूर्वजन्मांत अधर्माचरण ज्यानें केलें असेल त्याचीच विद्यमान जन्मांतहि अधर्माच्या ठिकाणीं प्रीति जडून यथेष्टाचरण करण्याकडे प्रवृति होते. शिवाय एखाद्याला तत्त्वज्ञान जें होते ते केवळ त्याच्या पुण्यकर्मामुळेच होते. अनेक जन्मांत केलेल्या अनेक यज्ञदानादिक पुण्यकर्मांच्या योगानें सर्व पापाची निवृत्ति होऊन ज्याचें अंत:करण शुद्ध झालेले असते, त्यालाच तत्वज्ञान होऊन मोक्षाची प्राप्ति होते असे भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं सांगितले आहे. तसेच यज्ञ

केल्याने, अन्नदान व धनदान केल्याने, मन व इंद्रिय यांचा निग्रह करणारे तप केल्याने, किंवा कृच्छचांद्रायणादिरूप तप केल्याने ब्राह्मणांस आत्मतत्व जाणण्याची इच्छा उत्पन्न होते असे श्रुतींतहि सांगितलेलें आहे. तेव्हां अनेक पुण्य-कर्मांचेच फल जे तत्वज्ञान ते प्राप्त झाल्यावर, अनेक पाप-कर्मांचेच फल जें यथेष्टाचरण त्याजकडे जीवाची प्रवृत्ति व्हावयाचीच नाहीं. एकदा मनुष्य भुकेने पराकाष्ठेचा व्याकुळ होऊन जेवावयास बसणार इतक्यांत 'अहो, तुमच्या पुढील ताटांत जे अन्न आहे त्यांत विष कालवलेलें आहे." असे त्यास कोणी सांगितलें तर तो क्षुधित असूनहि तें अन्न तसेच टाकून चालता होईल. हे जर खरे आहे तर, तो चांगले मिष्टान्न खाऊन तृप्त झालेला मनुष्य सविष अन्न खावयास कसा बरें प्रवृत्त होईल? अर्थातच होणार नाहीं हें निःसंशय आहे. याच न्यायाने मुमुक्षु अवस्थेतसुद्धां शास्त्रांनीं सांगितल्याप्रमाणे वर्णाश्रमधर्म पाळून त्याप्रमाणे वर्तन करण्याची एकाद्यास इच्छा असून यथेष्टाचरणाकडे जर त्याची प्रवृत्ति होत नसेल, तर मग त्याच्या पुण्य-कर्मांच्या अनुष्ठानामुळें त्यावर ईश्वराचा अनुग्रह होऊन सर्व लोकांतील भोगासंबंधानें त्याच्याठिकाणीं उत्पन्न झालेल्या वैराग्याच्या योगानें त्यास आत्मज्ञान होऊन त्या ज्ञानानें तो तृप्त झाल्यावर, त्याची प्रवृत्ति यथेष्टाचरणा-कडे कशी होईल? अर्थात कधींहि व्हावयाची नाहीं हें सांगावयासच नको, हे मुमुक्षो, तूं जर आतां तत्वज्ञान

झाला आहेस, म्हणजे जें ज्ञान प्राप्त झाल्यामुळें सनकादिक व शुकादिक महात्मे उत्तम पदवीला प्राप्त झाले तेच ज्ञान जर तुलाहि प्राप्त आहे तर सूकरांसारखे जे पशूत अधम पशू त्यांच्याप्रमाणें अधम होण्याची इच्छा करूं नको व बंधन देणाऱ्या तीव्र (जोरदार) मनोमय द्वैताने भरलेले काम, क्रोध, मोह, इत्यादि जे दोष त्या सर्वांच्या ठिकाणीं दोषदृष्टि करून त्यांचा त्याग कर. त्याचप्रमाणें सर्व अनर्थांचे मूळ जे मनोमय द्वैत, त्याच्याच रूपानें असणाऱ्या मनोराज्याचाहि (मनानें उत्पन्न केलेल्या अनेक प्रकारच्या विषयांच्या संकल्पांचाहि) त्याग कर, आणि सच्चिदानंद, परिपूर्ण परमात्म्याच्या ठिकाणीं अभेदस्थितिची जी जीवन्मुक्ति तिच्या सुखाचें संपादन कर. मनोमय द्वैतरूप कामक्रोधादिक आसुरी संपत्ति बंधन करणारीं आहे, यासाठीं तिचा त्याग कर असें भगवद्गीतेंत श्रीभगवंतांनींहीं अर्जुनास सांगितलें आहे :—

नरकाचीं तीन द्वारें

॥ श्लोक ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्मादेतत् त्रयं त्यजेत् ॥

भ. गी. अ. १६ श्लो. १२.

श्वानसूकरादि (कुत्रे, डुक्कर इत्यादि) ज्या नीच योनी, तोच नरक आहे. त्याचीं काम, क्रोध आणि लोभ हीं तीन

द्वारें आहेत. ते कामक्रोधादिक मोक्षमार्गाकडे वळलेल्या मुमुक्षु पुरुषाच्या मोक्षरूप पुरुषार्थाचा नाश करतात, यासाठी विवेकाने केलेल्या आत्मविचाराच्या शास्त्रानें त्या तिघांचाहि नाश करावा, म्हणजे ते तीनहि टाकून द्यावे.

कामक्रोधादिकांची निवृत्ति झाल्यावांचून जीवन्मुक्तीचें सुख सिद्ध होत नाहीं, म्हणून त्यांची निवृत्ति करून कल्पित देहादिक प्रपंचापासून भिन्न असणाऱ्या आत्म्याचा गुरुशास्त्रांच्या उपदेशाने जर अनुभव घेशील तर विस्मरणाने सांपडत नाहींसा झालेला गळ्यांतील रत्नांचा हार जसा एकदम सांपडावा त्याप्रमाणें, 'हमणा' म्हणजे देहांतच, आणि पुन्हां विलंब न लागतां, तें मोक्षसुख तुझ्या हातास लागेल.

याप्रमाणे, चौपाईच्या पूर्वार्धात कल्पित सर्व देहादिक प्रपंचाहून भिन्न असणारें जें अद्वितीय आत्म्याविषयींचे ज्ञान त्याच्या योगाने मोक्षरूप आत्मसुखाची प्राप्ति या सांप्रतच्या देहांतच होतें असे निरूपण करून सांगितलें. आतां पुढें चौपाईच्या उत्तरार्धांत सर्व जगभर अधिष्ठानरूपाने आत्मा व्यापक असून तो कल्पित जगाहून वेगळा आहे असे गुरु निरूपण करून सांगतात. "सर्वव्यापक सहुथी न्यारो" इति. तो आत्मा सर्वव्यापक आहे असे म्हटल्यानें अस्ति, भाति आणि प्रिय या तीन रूपांनीं तो नामरूपात्मक सर्व

ब्रह्मांड जिकडे तिकडे व्यापून राहिलेला आहे असें समजावें. तो व्यापक कसा आहे ? तर दागिन्यांत सुवर्ण जसें व्यापक असतें तसा आहे; आणि 'सहुथी न्यारो' म्हटल्यानें, कल्पित जे सर्व ब्रह्मांड त्याहून तो निराळा आहे असें जाणावें. तो निराळा कसा आहे ? तर कल्पित सर्पाहून दोरी जशी निराळी असते तसा तो आहे. स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीन देहांत द्रष्टा रूपानें जागृत, स्वप्न, आणि सुषुप्ति या तीन अवस्थांत साक्षिरूपानें; आणि अन्नमयादि पंचकोशांमध्यें प्रकाशरूपानें; तो सच्चिदानंदरूप आत्मा व्यापक आहे आणि तोच आत्मा असद्रूप जे देहादि, तीन अवस्था, आणि पांच कोश, या सर्वांहूनहि निराळा आहे असे "विवेकदृष्टि करी विचारो" म्हणजे विवेकदृष्टीनें अनुभव घेऊन पहा, म्हणजे पुन: एक, अद्वितीय, सजातीय, विजातीय व स्वगत या भेदाविरहित असा आत्मा आहे असें अनुभव घेऊन पहा.

याप्रमाणें गुरुजीनीं जेव्हां विचार करून अनुभव घेण्यास सांगितलें तेव्हां, जें जें कांहीं एवढा वेळ ऐकलें होतें त्या त्या सर्वांचे मनन करून निदिध्यासपूर्वक आपल्या स्वरूपाचा साक्षात्काररूप अनुभव शिष्याने घेतला. तो आपला अनुभव शिष्य तीन दोह्यांनीं सांगून उघड करून दाखवतो. त्यांतल्या सुद्धां पहिल्या दोह्यांत चार देह व तीन अवस्था यांहून आत्म्याचें रूप निराळें आहे असें शिष्य सांगतो. :—

शिष्य अनुभव वर्णन.

॥ दुहो ॥

शिष्य :

हूं स्थूल सूक्ष्म कारण नहीं,
नहीं महाकारण रूप ।
नहीं जागृत स्वप्न सुषुप्ति,
हुं पोते शुद्ध स्वरूप ॥ २६ ॥

टीका ॥ स्थूल, सूक्ष्म आणि कारण हें जें देहत्रय, तें मी नव्हे. त्याचप्रमाणें विशेषज्ञानस्वरुप जो महाकारणदेह, तोहि मी नव्हे, जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थाहि माझ्या आत्म्याच्या नाहींत, तर त्या बुद्धीच्या आहेत.

भागवतातहि सप्तम स्कंधाच्या सातव्या अध्यायांत प्रल्हादांनीं असेंच सांगितलें आहे :—

॥ श्लोक ॥

बुद्धिजागरणं स्वप्नः सुषुप्तिरिति वृत्तयः
ता येन वाऽनुभूयंने सोऽध्यक्षः पुरुषः परः ॥ १ ॥

अर्थ ॥ जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्था बुद्धीच्या आहेत, या तीन अवस्था ज्याच्या योगाने जाणल्या जातात, तो या तीन अवस्थांचा साक्षी या अवस्थांहून निराळा सच्चिदानंदरूप उत्तम पुरुष आहे.

यासाठीं तीन अवस्थांचा प्रकाशक मी स्वतः केवळ शुद्ध, निर्मळ, स्वयंप्रकाश सामान्यरुप आहे.

तुर्या साक्षी तो कोय कहे,
जो साक्ष्यपदारथ होय ॥
उपाधिरहित स्वरुप हुं
नहीं साक्ष्य साक्षी दोय ॥ २४ ॥

टीका ॥ जर साक्ष्य (साक्षीने जाणल्या जाणाऱ्या) अशा जागृदादि वृत्ति व स्थूलसूक्ष्मदेहादि पदार्थ आत्म्याहून भिन्न आहेत हें सत्य असेल, तरच तुरीय आणि साक्षी अशी दोन विशेषणें आत्म्यास कोणीहि लावूं शकेल. पण जर जागृदादि अवस्था व स्थूल पदार्थ पारमार्थिकदृष्टच्या खरी नाहींत, तर आत्म्यास तुरीय व साक्षी अशी विशेषणें कशी कोणास लावतां येतील ? एकाद्या मनुष्यास निरनिराळ्या आप्तांच्या संबंधानें निरनिराळी नावें प्राप्त होतात. म्हणजे त्यास भाचा असला तर मामा, पुतण्या असला तर काका, जांवई असला तर सासरा व पुत्र असला तर पिता अशीं निरनिराळीं नावें प्राप्त होतात, परंतु वर सांगितलेले त्याचे संबंधी नसले, किंवा मेले तर त्याला मामा, काका, इत्यादि नांवें देतां येत नाहींत. म्हणजे यावरून असें झालें कीं, सर्व नांवें कल्पित आहेत, पण मूळचा पुरुष तेवढा खरा आहे. याच न्यायानें तुरीय, साक्षी, इत्यादि विशेषणेंहि माझ्या स्वरूपांत उपाधींच्या अपेक्षेनें प्राप्त झालेलीं आहेत, वास्त-

विक म्हणजे खरी नाहींत. आणि मी त्या जागृदादि उपाधिविरहित म्हणजे निरुपाधिस्वरूप आहे. त्यामुळें माझ्या शुद्ध स्वरुपांत साक्ष्य आणि साक्षी हीं दोनहि नांवें नाहींत.

॥ दुहो ॥

हुं विश्व तैजस प्राज्ञ नहि,
नहि तुर्या मुजमांय ॥
नहि द्रष्टा साक्ष नहि
केवळ शुद्ध हुं भाय ॥ २५ ॥

टीका ॥ जागृतीचा अभिमानी विश्व, स्वप्नाचा अभिमानी तैजस, आणि सुषुप्तीचा अभिमानी प्राज्ञः हीं तीनहि मी नाहीं व तुर्यावस्था हें नांव, तशींच द्रष्टा, साक्षी हींहि नांवें माझ्यामध्यें वास्तविक नाहींत. कारण, दृश्य व साक्ष्य यांच्या अपेक्षेनें द्रष्टा आणि साक्षी अशीं नांवें देतां येतात. पण दृश्य व साक्ष्य पदार्थ नसेलच तर कोणाला द्रष्टा आणि कोणाला साक्षी म्हणावयाचें ? म्हणून दृश्य व साक्ष्य जे पदार्थ आहेत ते पारमार्थिकदृष्टचा सत्य नव्हेत. यामुळें त्यांस नांवें देतां येण्यासारखी नाहींत. तथापि जेथें तेथें तीं दिलेली आहेत. वास्तविक विचार करून अनुभव घेतला असतां, मी केवळ निष्प्रपंच, स्वयंप्रकाश, स्वतःसिद्ध निरुपाधिक, शुद्धरूप, मन आणि वाणी यांस अगोचर असा आहे असें सिद्ध होतें.

या प्रकारचा शिष्यानें सांगितलेला अनुभव ऐकून तो

अनुभव दृढ करण्याच्या हेतूनें, मन आणि वाणी यांस अगोचर असे जे निष्प्रपंच अद्वैतब्रह्माचें स्वरूप, त्याचे निरूपण गुरुजी पुढील दोन दोह्यांनीं करतात :—

अद्वैतब्रह्माचें वर्णन

॥ दुहो ॥

ज्या नहि पिंड ब्रह्मांड नहि,
नहि एक त्यां नहि,
प्रकृति पुरुष ज्यां नहि,
स्वयंप्रकाश सत सोय ॥ २६ ॥

"ज्यां नहि पिंड" म्हणजे ज्यांत (ज्या अद्वैतस्वरूपांत) शरीराचा संबंध नाहीं, त्याचप्रमाणे ब्रह्मांडाचाहि संबंध नाहीं, 'त्यां' म्हणजे त्या अद्वैत स्वरूपांत एक दोन अशी गणनाहि नाहीं, आणि त्यांत प्रकृति म्हणजे माया, आणि पुरुष म्हणजे अविद्योपाधीने युक्त जीव हीं दोनहि नाहींत. अशा प्रकारचें स्वयंप्रकाश, सत्य अद्वितीय आत्म्याचे स्वरूप आहे असे जाणावें.

॥ दुहो ॥

वृत्तिव्याप्ति फलव्याप्ति विना,
जेमनुं तेम स्वरुप ॥
सदा उदित स्वप्रकाश छे,
मन वाणी विन रूप ॥ २७ ॥

टीका ।। आणखी ते आत्मस्वरूप वृत्तिव्याप्ति व फलव्याप्ति या दोहोंच्याहि संबंधाविरहित 'जेमनुं तेम' म्हणजे जसे आहे तसेंच स्वाभाविक स्वरूप आहे.

शिष्य :– वृत्तिव्याप्ति आणि फलव्याप्ति म्हणजे काय तें सांगावे.

गुरु :– अंतःकरणाच्या वृत्तीनीं घटादि पदार्थ व्याप्त झाल्यावर तो पदार्थ आकारानें स्फुरण पावतो, या स्फुरण पावण्याला वृत्तिव्याप्ति म्हणतात. आणि पदार्थात चित्ताभासाची जी व्याप्ति म्हणजे हा घट आहे असे जें ज्ञान होतें त्याला फलव्याप्ति म्हणतात. अज्ञानाची निवृत्ति होऊन झालेले जे आत्म्याचे विशेष ज्ञान त्याचीं उत्पत्ति होण्यासाठीं केवळ वृत्तिव्याप्तीचीच अपेक्षा असते. फलव्याप्तीची नसते. जसें प्रकाशस्वरूप अशा सूर्याला पाहण्यासाठीं केवळ निरोगी नेत्राची अपेक्षा असते, पण इतर दीपादिकांची अपेक्षा नसते, तसेंच स्वयंप्रकाश आत्म्याला जाणण्यासाठीं वृत्ति व्याप्तीचीच अपेक्षा आहे, फलव्याप्तीची नाहीं. परंतु बाह्य जे घटपटादि पदार्थ आहेत ते पाहण्यासाठीं वृत्तिव्याप्ति व फलव्याप्ति या दोहोंचीही अपेक्षा असते, जसे अंधारात असलेला घट पाहण्यासाठीं नेत्र आणि दिवा या दोघांचीही अपेक्षा असते, कारण एका नेत्रानेंच घट पहातां येणार नाहीं, तसेंच चिदाभासावांचून केवळ जड ज्या अंतःकरणाच्या वृत्ति त्यांच्या योगानें जड पदार्थ पहातां येणें शक्य नाहीं. कारण, एकतर वृत्ति जड आहे, व जे

पदार्थ पहावयाचे आहेत, तेहि जड आहेत, अर्थात जडास जड भासणार नाहीं. यासाठीं त्या जड पदार्थास जाणण्यासाठीं फलव्याप्तीची अपेक्षा आहे. पण अज्ञानाची निवृत्ति करून जो आत्मज्ञानाचा अनुभव घेतो त्यास तिची अपेक्षा नाहीं, तर केवळ वृत्तिव्याप्तिचीच अपेक्षा आहे.

शिष्य :— गुरुमहाराज ! जर वृत्तीच्या योगानें आत्मा जाणला जातो. तर वृत्ति द्रष्टी झाली व आत्मा वृत्तीचा दृश्य झाला, आणि तसें झालें असतां आत्मा मनाला आणि वाणीला अगोचर आहे असें जें श्रुतीचें म्हणणें ते अप्रमाण ठरतें, तर त्यांची समाधानपूर्वक एकवाक्यता कशी करावी ?

गुरु :— अरे बाबा, मन आत्म्याला दृश्य पदार्थाप्रमाणें आपल्या पाहण्याचा विचार करून कांहीं पहात नाहीं, तर मनाच्या द्वारानें विचार करून व अविद्या आणि देहाध्यास यांस निवृत्त करून स्वतः आत्मा आपल्याच स्वरुपानें प्रकाशतो. आरशाच्या साधनाने मनुष्य आपलेंच तोंड आपण पहातो, आरसा कांहीं तोंड पहात नाहीं. म्हणजे आरसा हें तोंड पहाण्याचें केवळ साधन आहे. तोंड पाहिल्यावर मनुष्य आरसाहि टाकून देतो. त्याचप्रमाणें मुमुक्षु पुरुष मनाच्या वृत्तीनें विचाराच्या द्वारें अज्ञानाची निवृत्ति करून स्वयंप्रकाश आत्म्याचा अनुभव घेतल्यावर मग त्या वृत्तीचाहि त्याग करतो. या कारणासाठीं वृत्तिव्याप्ति व फलव्याप्ति यांविरहित आत्म्याचें स्वाभाविक जसे स्वरूप आहे तसेंच

सांगितले. शिवाय तें आत्मस्वरुप सदा उदय पावलेले व स्वयंप्रकाश आहे. वे. पं. 7-95

स्वयंप्रकाश

शिष्य :– हे कृपानिधे, स्वयंप्रकाश म्हणजे काय तें स्पष्टपणे माझ्या ध्यानांत उतरेल अशारीतीने सांगावें.

गुरु :– घटपटादि पदार्थ जे जगांत दिसतात ते सूर्य, दीप इत्यादिकांच्या प्रकाशाने दिसतात, म्हणजे ते पदार्थ परप्रकाश आहेत असें समजावें आणि जी वस्तू स्वतः प्रकाशरूप असून दुसऱ्या वस्तूंस प्रकाश करते, व जिला प्रकाश करणारी दुसरी कोणतीहि वस्तु नाहीं, अशी वस्तु स्वयंप्रकाश म्हणावी. असा स्वयंप्रकाश एक आत्माच आहे, त्यांवाचून जो कांहीं नामरूपात्मक भूतभौतिक प्रपंच आहे तो सर्व परप्रकाश आहे. यद्यपि सूर्य, चंद्र, तारा, वीज, अग्नि, इत्यादि पदार्थ स्वतः प्रकाशमय असून दुसऱ्या पदार्थांसहि प्रकाश देणारे आहेत, तरी उलट आत्म्याला प्रकाश करावयास समर्थ नाहींत. इतकेच नाहीं, तर उलट आत्म्याच्या प्रकाशानेच ते सूर्य, चंद्र, तारा इत्यादि प्रकाशमय दिसतात, म्हणून ते सर्व जड व परप्रकाश आहेत व आत्मा स्वयंप्रकाश आहे, असें जाणावे. स्वप्नावस्थेंतहि त्या सूर्यचंद्रादिकांपैकीं कोणीहि प्रकाशरुप नाहीं, परंतु आत्मा स्वतः स्वयंप्रकाश आहे. त्यामुळेच अंतःकरणाचा परिणाम जो स्वप्नप्रपंच तो सर्व पहाण्यांत येतो याचा अनुभव

बृ.उ. 4-3-9
4-3-14

मनुष्यमात्राला आहे. बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य-मुनींनीं सूर्य, चंद्र, अग्नि, इत्यादिकांचें निराकरण करून याचप्रमाणें म्हणजे आत्मा स्वयंजोति स्वयंप्रकाश आहे असा उपदेश जनकराजाला केला आहे. भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायांत श्रीकृष्णांनींहि तसेंच सांगितलें आहे :—

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम् ॥ १ ॥

गीता 15-12

गी. अ. १३ श्लो. १७

जाणावयास योग्य असें त्या परमात्म्याचें स्वरूप सूर्य-चंद्रादि ज्योतींसह प्रकाश करणारें स्वयंज्योतिरूप आणि स्वयंप्रकाश आहे. तें स्वरूप अमानित्वादि साधनांच्या योगानें झालेल्या आत्मज्ञानानें जाणलें जातें, आणि तें स्वरूप प्राणिमात्राच्या हृदयात बुद्धीस, बुद्धीच्या धर्मास व अवस्थांस प्रकाश करणाऱ्या रूपाने राहिलेलें असते.

5. 4 याप्रमाणें आत्मा स्वयंप्रकाश आहे असा निश्चय अनुभवानें व श्रुतिस्मृतींच्याहि प्रमाणांनीं होतो. "मन वाणी बिन रूप" म्हणजे, मन आदिकरून चार अंतःकरणें, आणि वाणि आदिकरून दहा इंद्रियें यांविरहित आत्म्याचें स्वरूप आहे, म्हणजे मन व इंद्रियें हींच आत्मा नव्हेंत. मन आणि वाणी यांना अगोचर असें आत्म्याचें स्वरूप आहे, किंवा

आत्म्याच्या ठिकाणीं मन आणि वाणी यांची प्रवृत्ति होत नाहीं, असाहि ' ' मन वाणी बिन रुप " याचा अर्थ होतो.

शिष्य :— महाराज, आत्म्याच्या ठिकाणीं मन आणि वाणी यांची प्रवृत्ति होत नाहीं याचें कारण काय बरें ?

गुरु :— अरे बाळा ! जाति, क्रिया, गुण, नाम, रुप इत्यादि शब्दप्रवृत्तीच्या कारणांचा ज्या वस्तूंशी संबंध होतो त्या वस्तूंतच वाणी प्रवृत्त होते. आत्मा असंग, अगुण, अक्रिय आहे म्हणून जाति, गुण, क्रिया, इत्यादिकांचा संबंध त्याच्याशीं होत नाहीं. यासाठीं त्याच्यांत वाणी, मन, इत्यादि प्रवृत्त होऊं शकत नाहींत. या कारणासाठीं "मन वाणी बिन रुप" असें आत्म्यासंबंधानें म्हटलें.

अद्वैत स्वरुपांत तद्रूपता

याप्रमाणें गुरुंनीं आत्म्याच्या निष्प्रपंच स्वरुपाचें वर्णन दोन दोह्यांनीं केलें. आतां पुढें महावाक्याच्या अर्थाचें निरुपण करण्याच्या हेतूनें एका दोह्यानें लक्ष्य स्वरुपाच्या ठिकाणीं तद्रूपतेची स्थिती करण्याविषयींचा प्रकार गुरु सांगतात :—

एम अभेद लक्ष्य जाणी करी,
रहिये सुख स्वरुप ॥
निरंतर महदाकाशवत,
पोते स्वयं स्वरुप ॥ 28 ॥

टीका ।। 'एम' म्हणजे पूर्वी सांगितल्याप्रमाणे मनास आणि वाणीस अगोचर, अभेद असा जो लक्ष्य (जीव आणि ईश्वर या भेदावांचून असणारा लक्ष्यार्थरुप असा आत्मा) त्यास अनुभवानें जाणून, 'रहिये सुखस्वरुप' म्हणजे, अद्वैत सुखस्वरुपांत तद्रूपतेची स्थिति करून असावें असें होतें. महदाकाश जसें निरंतर भेदरहित, असंग, सर्वत्र व्यापक आहे, तसेंच आत्मा स्वरुप जीवेश्वरादि भेदरहित, व्यापक असून, स्वयंप्रकाश, असंग आहें. म्हणून बाळा ! आपण निर्विकल्प, असंग, सुखरुपब्रह्म आहो असा आपल्या मनांत दृढ निश्चय करून ठेवावा.

तत्त्वमसि

शिष्य :– गुरुमहाराज, आपण जीव आणि ईश्वर हे दोघे एकच असें सांगितलें, पण त्याच्यांत विरोध तर स्पष्टपणें दिसतो. कारण जीव सुखी, दुःखी, कर्ता, भोक्ता, जन्ममरणानें बद्ध, असमर्थ, पराधीन, अभिमानी व अल्पज्ञ आहे आणि ईश्वर तर याच्या उलट म्हणजे अहंकाररहित, सुखदुःखरहित, समर्थ स्वतंत्र, जगाच्या उत्पत्तीचा, स्थितीचा आणि लयाचा कर्ता, व सर्वज्ञ असा आहे. तर मग या दोघांचें ऐक्य कसें होऊ शकतें तें सांगावें व त्यांच्या ऐक्याविषयींची प्रमाणेंहि सांगावी.

गुरु :– अरे, तत्पद ईश्वर व त्वंपद जीव या दोन पदांचें जे वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ आहेत ते न समजल्याच्या योगानें ही तुझी शंका उत्पन्न झाली आहे. कशी ती पहा–जीवाच्या ठिकाणीं कर्तुत्व, भोक्तृत्व, सुख, दुःख इत्यादि संसाराची

जी प्रतीति होते, ती केवळ अविद्याकल्पित अंतःकरणादि उपाधीच्या अध्यासानेंच होते. जीवाचे वास्तविक स्वरुप शुद्ध, सच्चिदानंद आहे. कर्तृत्व, भोक्तृत्व, इत्यादि धर्म अंतःकरणाचे आहेत; जन्ममरण देहालाच आहे. लक्ष्यरुप आत्म्याच्या ठिकाणीं यांतले कांहींएक नाहीं. त्याचप्रमाणें ईश्वराच्या ठिकाणीं जगाची उत्पत्ति, स्थिती आणि लय यांचे कर्तृत्व केवळ मायोपाधींच्या योगानेंच आलें आहे. ईश्वराचें वास्तविक स्वरुप शुद्ध, अद्वितीय, पूर्ण सच्चिदानंदरुप, लक्ष्य आहे. म्हणून उपाधींतल्या भेदामुळें या विचार न केल्यामुळें जीवेश्वरांच्या वाच्यार्थापासून भेद प्रतीत होतो, पण दोघांचाहि लक्ष्यार्थ मनांत आणला असतां अनुभवानें अभेदच सिद्ध होतो. सामवेदाच्या छांदोग्य उपनिषदाच्या महावाक्यांतहि असेंच अभेदनिरुपण केले आहे. तें महावाक्यच या अभेदाविषयीं प्रमाण आहे असें जाणावें. त्या महावाक्यांत 'तत्' 'त्वं' आणि 'असि' हीं तीन पदे आहेत, त्यांतील अभेदाचा अर्थ दृष्टांत देऊन एकुणतिसाव्या दोह्यांत सांगतों तो श्रवण करुन त्याचा दृढ निश्चय आपल्या मनांत कर.

॥ दुहो ॥

तत्त्वं मठ घटाकाशवतत्
असि पद महदाकाश ॥
बे उपाधिभाग त्याग करी,
पोते स्वयंप्रकाश ॥ २९ ॥

टीका ।। बा शिष्या, जसें एकाच आकाशाला मठाच्या उपाधीनें मठाकाश म्हणतात; आणि घटाच्या उपाधीनें घटाकाश आहे त्याला महदाकाश म्हणतात, त्याच न्यायानें एक म्हणजे अद्वितीय अशा तत्त्वांत मायेच्या उपाधीने 'तत्' पदाचा अर्थ 'ईश्वर' असे पंडित सांगतात, आणि अविद्येच्या उपाधीनें 'त्वं' पदाचा अर्थ जीव असें सांगतात, तथापि ह्या दोनहि उपाधी सोडून लक्ष्यांत 'तें तूं आहेस' याप्रमाणें 'असि' पदानें दोघांचे ऐक्य जाणल्याने, एक अद्वितीय स्वरुप सिद्ध होते. ईश्वराच्या ठिकाणीं समर्थपण व जीवाच्या ठिकाणीं असमर्थपण, हीं अनुक्रमे मोठ्या आणि लहान अशा उपाधींच्या योगानें मात्र उत्पन्न झाली आहेत, पण हीं मूळस्वरुपाच्या ठिकाणीं नाहींत. मठांत पुष्कळ माणसें बसूं शकतात व हजारों मण धान्यहि भरुन ठेवतां येतें व घटांत तर एकहि माणूस बसूं शकत नाहीं व एक मण धान्य भरतां येत नाहीं. यावरुन काय झालें कीं, मठ आणि घट यांच्यात अनुक्रमें जी मोठी उपाधि आणि धाकटी उपाधि, यांच्यांतल्या भेदामुळे पुष्कळ आणि थोडे सामर्थ्य भासते. पण त्यांच्यामधल्या आकाशांत मोठेपण आणि लहानपण किंवा सामर्थ्य आणि असामर्थ्य अशा प्रकारचे भेद नाहींत, घटांत व मठांत दोहोंतहि महदाकाश जें आहे, ते भेदरहित एकच आहे, वेगवेगळे नाहीं. त्याचप्रमाणे तत्पद व त्वंपद यांच्या लक्ष्यार्थरुपाचें शुद्ध, सच्चिदानंद ब्रह्म एकच आहे, त्यांत भेद नाहीं. म्हणून जीव आणि

ईश्वर यांच्या वाच्यार्थरूपानें असलेल्या कल्पित ज्या दोन उपाधि (अविद्या आणि माया) त्यांचा भागत्यागलक्षणेने त्याग करून, अरे मुमुक्षु पुरुषा ! तूं स्वतः (प्रत्यगात्मा) जीव ईश्वराचा शुद्ध लक्ष्य स्वयंप्रकाशरूप आहेस अशी आपल्या मनांत अगदीं गांठ मारून ठेव.

तीन प्रकारची लक्षणा

शिष्य :– गुरुमहाराज, भागत्यागलक्षणा कशाला म्हणतात, व लक्षणा म्हणतात ती किती प्रकारची आहे ?

गुरु :– १ जहती, २ अजहती, ३ जहदजहती, असे तीन प्रकार लक्षणेचे आहेत. जिच्या समग्र अर्थाचा त्याग होतो तिला जहती लक्षणा असें म्हणतात. उदाहरणार्थ– " गंगायां घोषः प्रतिवसति " हें वाक्य घ्या. या वाक्याचा शब्दार्थ असा आहे कीं गंगेत घोष (गाईचा गोठा) आहे. आतां या अर्थावरून पाहिलें असतां; गंगेंत म्हणजे गंगानदीच्या प्रवाहांत गाईचा गोठा असणें संभवत नाहीं म्हणून गंगापदाचा अर्थ टाकून गंगा नदीच्या कांठावर गाईचा गोठा आहे अशीं लक्षणा करावी लागते. ही लक्षणा महावाक्यसंबंधानें करणें संभवत नाहीं; कारण ही जहतीलक्षणा केली असतां महावाक्याच्या पदाच्या समग्र वाच्य अर्थाचा त्याग होईल म्हणजे महावाक्यानें जाणण्यास योग्य असें जें शुद्ध चैतन्य त्याचाही त्याग होईल, हा महान अनर्थ होईल आणि सिद्धांतांत तर पदाच्या वाच्यार्थरूप एका

अंशाला टाकून लक्ष्यार्थरूप एका अंशाचें ग्रहण करावयाचें आहे. तें जहती लक्षणेने अर्थातच जुळत नाहीं, यासाठीं येथें जहतीलक्षणें ग्रहण करू नये. तिच्याच उलट दुसरी अजहती म्हणून लक्षणा आहे तिच्यांत सर्वच अर्थाचे ग्रहण होतें. कशाचाहि त्याग होत नाहीं. उदाहरण -- "शोणो धावति" म्हणजे तांबडा धावतो पण यांत ज्याअर्थी तांबडा म्हणजे तांबडा असा जो रंग त्याचें धांवणे संभवत नाहीं, त्याअर्थी तांबडा रंग ज्याचा आहे असा एकादा घोड्या-सारखा प्राणी धांवतो आहे असें होतें, म्हणजे तांबडा रंग व तांबडा रंग ज्याचा आहे असा घोडा इत्यादि सर्वांचें ग्रहण होते. ही दृष्टांतानें निरूपित अजहतीलक्षणाहि महा-वाक्याच्या ठिकाणीं संभवत नाहीं, कारण तिच्या योगाने वाच्यार्थ व दुसरा कांहीं अधिक अर्थ या दोहोंचेंहि ग्रहण होते, परंतु महावाक्यांत तर "तत् त्वं" पदांच्या वाच्या-र्थांचा त्याग करून केवळ लक्ष्यार्थाचेंच ग्रहण करावयाचें आहे, म्हणून महावाक्यांत जहतीलक्षणेचेंच म्हणजे भाग-त्यागलक्षणेचें ग्रहण केलें पाहिजे.

भागत्यागलक्षणेचे स्पष्टीकरण

भागत्यागलक्षणेच्या स्पष्टीकरणार्थ पुढील उदाहरण देतों :--

"सोऽयं देवदत्तः" म्हणजे तो हा देवदत्त आहे. आतां या उदाहरणाचा अर्थ स्पष्ट समजावा म्हणून इतिहासाच्या रीतीनें त्याची फोड करून सांगतों ती ऐकून ध्यानांत ठेव.

तत्त्वमसि वाक्याचा स्पष्टार्थ

कोणी शिवदत्त म्हणून एका खेडेगांवचा रहाणारा मनुष्य काशीस यात्रेसाठीं गेला; तेथें दैववशात् कांहीं प्रसंगाने त्याची काशीच्या राजाबरोबर मैत्री जुळल्यामुळें तो तेथें बरेंच दिवस राहून परत आपल्या गांवीं आला. या गोष्टीस बरींच वर्षें झाल्यानंतर तोच काशीचा राजा पूर्वसंस्काराच्या जोरानें कडकडीत वैराग्यानें संपन्न होऊन सर्व राज्य सोडून वैराग्याचा वेष धारण करून तीर्थाटन करीत वाटेत पूर्वी काशीस जाऊन आलेल्या शिवदत्ताच्या रहावयाच्याच गांवीं कर्मधर्मसंयोगाने येऊन एका देवळांत उतरला. त्याच वेळीं शिवदत्तहि नित्यनियमाप्रमाणे त्याच देवळांत दर्शनासाठी म्हणून गेला तो सहजगत्या त्याची नजर त्या काशीहून आलेल्या विरक्त राजाकडे गेली. तेव्हां त्यांनें आपल्यापाशींच विचार केला कीं, कित्येक वर्षांपूर्वीं काशीत जो मी राजा पाहिला तो हा असावा असें वाटतें. परंतु पुनः त्याच्या मनांत संशय आला कीं, हा तो काशीचा राजा कसा असूं शकेल ! कारण तो तर महासमर्थ हुकुम बजावणारा, सत्ताधीश, अपराध्यास शिक्षा करण्यास व योग्य माणसांस जहागीर, धान्य, इत्यादि देण्यास स्वतंत्र. शिवाय काशीसारख्या पवित्र देशांत रहाणारा, इतकें असून त्यास मी जेव्हां पाहिले होते तेव्हांच्या त्याच्या लक्षणापैकीं एकसुद्धां याच्यांत दिसत नाही. उलट हा तर बाह्यरूपावरून एखादा असमर्थ, पराधीन भिक्षुक असावा. व म्हणू-

नच ह्या वेळीं ह्या देशांत आलेला दिसतो आहे, तर मग हा मनुष्य तो काशीचा राजाच असें कसें म्हणतां येईल ? अशी त्याला एकदां भ्रांति उत्पन्न व्हावी, तरी पण तोच हा राजा असें त्यास फिरून एकदां वाटावे. अशा रीतीनें तो अगदीं गोंधळून गेला. तेव्हां पुन्हां एकदां विचार करून त्याच्या शरीराची चिन्हें तो तपासू लागला.; ती तपासतां तपासतां तोच राजा हा अशी पुनः एक वेळ बहुतेक त्याच्या मनाची खात्री झाली, म्हणून तो त्या विरक्त मनुष्याबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी सांगू लागला. त्या वेळच्या त्याच्या भाषणांत निघालेल्या मुद्यांच्या खुणांवरून व राजा काशी पाहून आलेल्या गांवांतल्या इतर माणसांशींहि बोलतां बोलतां त्याच्या तोंडून ज्या कांहीं खुणेच्या गोष्टी निघाल्या त्यांवरूनहि, ज्या काशीच्या राजास आपण पूर्वी काशींत पाहिलें होतें तोच हा अशी त्याने आपल्या मनाची अगदीं पक्की खात्री करून घेतली. आतां या गोष्टीचें तात्पर्य असें आहे——तो काशी प्रदेश, ती राज्याची समृद्धि, तें सामर्थ्य; तो काल, इत्यादि उपाधींनीं संयुक्त राजाचें व हा देश, ही असमृद्धि, ही असमर्थता, हा काल, इत्यादि उपाधींनीं संयुक्त भिक्षुकाचे "तो राजा हा आहे" असें म्हणण्यानेंच ऐक्य करण्याचा प्रयत्न सिद्ध होणें शक्य नाहीं; यासाठीं तो काशीप्रदेश व राज्य समृद्ध्यादि सर्व गोष्टी टाकून, त्याप्रमाणें हा देश, काल, ही असमर्थता, इत्यादि सर्व गोष्टीही टाकून, "तो काशीत पाहिलेला राजाच हा मनुष्य आहे." अशी केवळ

त्याच्या एकट्या पिंडावरूनच (शरीरावरूनच) एकता केली तर तींत कोणत्याहि रीतींचा विरोध होऊं शकत नाहीं. याच न्यायानें महावाक्यांत 'तत् त्वं असि' (तें तूं आहेस) यापैकी तत्पदवाच्या जो ईश्वर त्याच्या सामर्थ्य, सर्वज्ञता, परोक्षपण, जगत्कर्तृत्व इत्यादि वाच्यार्थरूप उपाधींचा त्याग करून, त्याचप्रमाणें त्वंपदवाच्य जो जीव त्याचा असमर्थपणा, अल्पज्ञता परिछिन्नता, इत्यादि वाच्यार्थरूप उपाधींचाहि त्याग करून, तत्पदाचा लक्ष्य अद्वितीय पूर्णानंद, सर्वात्मा, आणि त्वंपदाचा लक्ष्य कूटस्थ, साक्षी, असंग सच्चिदानंद, या दोघांची एकता 'असि' पदानें केलीं तर कोणत्याहि प्रकारचा बाध येत नाहीं; परंतु वाच्यार्थोपाधि घेऊन एकता करण्याचा प्रयत्न केला तर मात्र बाध येतो. यासाठीं त्या वाच्यार्थास टाकून देऊन, लक्ष्यार्थात ब्रह्म आणि आत्मा यांचा अभेद समजावा, व महावाक्यहि त्या लक्ष्यार्थांतल्या एकतेचेंच निरूपण करून सांगतों.

दृष्टांत दुसरा :—भातगोटे उखळीत घालून कांडून त्यांतील तूस निराळे करून ते टाकून आंतले तांदूळ तेवढे घेतले तर त्यांच्यापासून भुकेची शांति करतां येते; पण तांदूळ तुसापासून वेगळे न करतां भातगोटेच्या भातगोटेच टाकून दिले तर त्यांबरोबर तांदूळहि गेल्यानें क्षुधेची शांति व्हायची नाहीं. बरें, तुसापासून तांदूळ निराळे न काढतां सगळे भातगोटेच्या भातगोटे जर

खावयाचे मनांत आणले तर ते घशाखालींच उतरावयांचे नाहींत. एवंच, या दोहोंपैकीं एकानेंहि भुकेची शांति होणें शक्य नाहीं. म्हणून तांदूळ आणि तूस यांस निराळें करून तूस टाकून देऊन तांदूळ तेवढेच जर घेतले तर भूक शांत करण्याचे कार्य होईल. याचप्रमाणे जीव आणि ईश्वर यांच्यातून भागत्यागलक्षणेने उपाधिरूप वाच्यार्थाचा त्याग करून, एक लक्ष्यार्थ तेवढाच घ्यावा म्हणजे त्या योगानेंच मोक्ष सुखाची प्राप्ति होईल.

शिष्य :– महाराज, तत्पद ईश्वरांत आणि त्वंपद जीवांत वाच्यरूप उपाधि कोणत्या आहेत व लक्ष्यरूप म्हणतात तें कसे असतें तें किंचित् विस्तारानें सांगावें,

गुरु :–

॥ दुहो ॥

तत्पद उपाधि माया कहि,
त्वंपद अविद्या जान ॥
बे उपाधिदृश्य त्याग करि,
पोते शुद्ध भगवान् ॥ ३० ॥

टीका ॥ तत्पद ईश्वराची वाच्य उपाधि माया आहे असे म्हणतात, म्हणजे विराट, हिरण्यगर्भ, आणि अव्याकृत हे ईश्वराचे तीन देह मायारूप आहेत. वैश्वानर, सूत्रात्मा आणि ईश्वराचे देह, हे तिघे तत्पद वाच्यार्थांतले अभिमानी

आहेत व उत्पत्ति, स्थिती आणि प्रलय ह्या तीन त्यांतल्या अवस्था आहेत. हे सर्व मायोपाधी तत्पदाचे वाच्यार्थ आहेत असें म्हणतात. त्वंपद जीवाची अविद्या उपाधि आहे असें जाणावें. ही अविद्या स्थूल, सूक्ष्म, आणि कारण या तीन देहांच्या रूपानें परिणामाप्रत पावलेली आहे. या तीन देहांचे विश्व, तैजस आणि प्राज्ञ, हे अनुक्रमें अभिमानी आहेत. जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति ह्या त्वंपदवाच्य जीवाच्या तीन अवस्था आहेत. हीं सर्व मिळून अविद्या-कल्पित त्वंपदजीवाचा वाच्यार्थ झाला आहे असें समजावें या रीतीनें माया व अविद्या या वाच्यार्थरूप असणाऱ्या उपाधि दृश्य आहेत, त्यांचा त्याग करून तूं स्वतः आत्मा, तत्पद आणि त्वंपद या दोन्हि पदांतला जो लक्ष्यार्थ त्याच्या रुपानें असणारा, जो शुद्ध भगवान् तो तूं आहेस. म्हणजे उपाधिरहित सच्चिदानंद, ब्रह्मरुप तूं आहेस. भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायांत "क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि" गीता अ० १३ श्लो० २ श्लोकांत भगवंतांनी अर्जुनास पुढें लिहिल्याप्रमाणें सांगितलें आहे. त्यांत आपल्या स्वतःशीं क्षेत्रज्ञाचें ऐक्य होतें त्याचें निरुपण केलें आहे. भगवान् म्हणतात, "हे अर्जुना ! सर्व क्षेत्राच्या (शरीराच्या) आंत असणाऱ्या देह, प्राण, इंद्रियें मन, बुद्धि, इत्यादिकांस जाणणारा जो क्षेत्रज्ञ (शुद्ध जीव) तोच आपलें स्वतःचें रुप आहे असें जाण." श्रीमद्भागवताच्या चवथ्या स्कंधांतील २८ व्या अध्यायांतल्या पुरंजनोपाख्यानांत जीवात्म्याच्या

ईश्वराबरोबरच्या ऐक्यासंबंधाचें ज्ञान जीवास दृढ करून देण्यासाठीं ईश्वरानें जीवात्म्याचें व आपलें ऐक्य आहे याबद्दलचा उपदेश याचप्रमाणें केला आहे :—

॥ श्लोक ॥

अहं भवान्न चान्यस्त्वं त्वमेवाहं विचक्ष्व भो ॥
न नौ पश्यंति कवयश्छिद्रं जातु मनागपि ॥१॥

भागवत, स्कंध ४ अ. २८ श्लोक. ६२

अर्थ ॥ हे जीवा, जो मी तोच तूं आहेस. माझ्याहून निराळा नाहींस. अथवा तूं तोच मी आहे, याचप्रमाणें माझे व तुझे ऐक्य आहे असे विचार करून पहा. जे ज्ञानसंपन्न पुरुष असतात ते आपल्या दोघांत केव्हांहि लवभरसुद्धां भेद पहात नाहींत, म्हणजे जीव आणि ईश्वर या दोघांचेहि रूप एकच आहे असें समजतात.

अशा रीतीनें श्रुति, स्मृति, पुराण, इत्यादिकास प्रत्यगात्म्याच्या परमात्म्याशीं असलेल्या अभेदाचे निरूपण केलेले आहे. यासाठीं अरे माझ्या शिष्या ! तूं आपला आत्मा ब्रह्मस्वरूप आहे असें समज.

शिष्य :— गुरुमहाराज, ब्रह्म तर जन्म, मरण क्षुधा, पिपासा (तहान) शोक आणि मोह, या सहा प्रकारच्या ज्या ऊर्मी (तरंग) त्या विरहित आहे असें मी शास्त्रांतून

सांगितलेलें ऐकलें आहे, परंतु माझ्यात तर वर सांगितलेल्या सहाहि ऊर्मी दृष्टीस पडतात, तर मी ब्रह्मरूप कसा असूं शकेन तें मला कृपा करून सांगावें.

गुरु :——वर सांगितलेल्या सहा उर्मीविरहित ब्रह्म आहे असें जें तूं शास्त्रांतून ऐकलें आहेस म्हणतोस तें अगदीं बरोबर आहे. तो ब्रह्मरूप तुझा प्रत्यगात्मा आहे. त्या प्रत्यगात्म्याला देहाहून, प्राणांहून व मनाहून निराळा न जाणतां देहादिक धर्मांचा आत्म्याच्या ठिकाणीं आरोप करून, आपल्याला जन्ममरणादिक आहेत असें तूं केवळ मानलें आहेस, वास्तविक तीं तुझ्या आत्म्याच्या ठिकाणीं नाहींत याचेच तुला जास्त विवेचन करून सांगतो तें ऐक,

॥ दुहो ॥

जन्ममरण देहने कहि, क्षुधा पिपासा प्राण ॥
शोक मोह मननो धर्म, पोते ब्रह्म प्रमाण ॥३१॥

टीका ॥ अरे, जन्म आणि मरण ह्या दोन ऊर्मी स्थूल देहावर आहेत असें म्हणतात. म्हणजे स्थूल देह मरतो व जन्मास येतो. परंतु त्याचा द्रष्टा जो तूं आत्मा तो तूं जन्मत नाहींस व मरतहि नाहींस. क्षुधा आणि पिपासा म्हणजे भूक व तहान ह्या दोन उर्मी प्राण्यांच्या आहेत; कारण क्षुधेनें व तहानेंने प्राण

अतिशय व्याकुळ होतात व अन्नजलावांचून प्राण राहूंहि शकत नाहींत. प्राणांचा तूं द्रष्टा आहेस. अर्थातच त्या क्षुधा-पिपासा तुझ्यामध्यें नाहींत. शोक आणि मोह या उर्मी मनाच्या आहेत, कारण असें कीं, जागृदवस्थेंत व स्वप्नावस्थेंत मन असते म्हणून त्याच्या ठिकाणी शोक व मोह ह्या दोन ऊर्मी उत्पन्न होतात. सुषुप्त्यवस्थेंत मनाचा लय झालेला असतो म्हणून तींत शोक व मोह या दोन उर्मी दिसत नाहींत, कारण त्या मनांतच उत्पन्न होणाऱ्या असतात. मन व त्याचे धर्म जे शोक आणि मोह त्यांचा तूं द्रष्टा आहेस. यामुळे त्या ऊर्मी तुझ्या ठायीं नाहींत. तूं शोकमोहरहित आहेस. अशा रीतीनें "पोते ब्रह्म प्रमाण" म्हणजे तूं स्वतः या सहा ऊर्मीविरहित आत्मा ब्रह्मरूप आहेस असा उपदेश श्रुतिप्रमाणांनींहि सिद्ध होतो. यजुर्वेदाच्या बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य मुनींना कहोळ नांवाच्या ब्राह्मणानें प्रश्न केला आहे तो असा—"याज्ञवल्क्यमहाराज ! साक्षात् अपरोक्ष ब्रह्मस्वरूप जो सर्वांतर्यामी आत्मा आहे तो आपण मला दाखवाल काय ?" त्यावर याज्ञवल्क्यमुनींनीं उत्तर दिलें, "अपरोक्ष (अंतःकरणाच्या वृत्तींना प्रकाशक) तुझा जो आत्मा तोच सर्वांतर्यामी आहे" त्यावर फिरून कहोळाने प्रश्न केला, "महाराज ! कोठला तो सर्वांतर्यामी आत्मा ?' याज्ञवल्क्यांनीं त्याचें उत्तर दिलें, क्षुधा, तृषा, शोक, मोह, जरा आणि मृत्यू, या सहा ऊर्मीवांचून असणारा जो सर्वांतर्यामी आत्मा तो तूंच आहेस' यासाठीं बा

शिष्या ! तूं आत्मा ब्रह्मरूप आहेस, शुद्ध आहेस, व कर्माचे फल जें सुख आणि दुःख त्यांचा भोक्ता नाहींस, यामुळें तूं जीवन्मुक्त (जिवंत असून) मुक्त आहेस.

कर्माचे तीन प्रकार

शिष्य :—महाराज, कर्म किती प्रकारचे आहे ? कर्माचा भोक्ता कोण आहे ? कर्माची झाडून निवृत्ति कशी होते व जीवन्मुक्त कोणास म्हणावें ? इतक्या प्रश्नांची उत्तरे सांगावी.

गुरु :—कर्म तीन प्रकारचें आहे—१ संचित, २ क्रियमाण आणि ३ प्रारब्ध. [1] अनेक जन्मांत केलेलें जें पुण्यपापादि कर्म तें भोगलें गेल्यावांचून संस्काररुपानें अज्ञानासह सूक्ष्म शरीरांत राहिलेले असतें त्यास संचितकर्म म्हणतात. [2] या चालू असलेल्या देहाकडून जें कांहीं नित्य नैमित्तिक कर्म घडत असते त्यास क्रियमाणकर्म म्हणतात व [3] पूर्वी अनेक जन्मांत केलेल्या संचितकर्मांपैकी फल देण्यास प्रवृत्त झालेल्या अशा ज्या कर्मांच्या योगाने सुखदुःखादिकांचा भोग होतो त्या सर्वांस मिळून प्रारब्धकर्म म्हणतात. असें तीन प्रकारचें कर्म आहे. त्यापैकी संचितकर्माचा आत्म्याच्या अपरोक्षज्ञानाग्नीनें नाश होतो, आणि कमलाच्या पानास ज्याप्रमाणें जलाचा लेप होऊ शकत नाही त्याचप्रमाणें अपरोक्षज्ञानसंपन्नाला क्रियमाणकर्मांचा लेप होऊं शकत नाहीं. कारण कायिक, वाचिक आणि मानसिक, जें कर्म घडतें त्यांत

'मी कर्ता' असा अभिमान ज्ञान्याला होत नाहीं म्हणून क्रियमाण कर्माचाहि ज्ञानाग्नीच्या योगानें नाश होतो. श्रुतींतहि सांगितलेलें आहे कीं, ज्याप्रमाणें ईषिकेतला (मुंज नांवाच्या गवताच्या दांड्यात असलेला) तूल (कापूस) अग्नींत टाकला असतां एकदम जळून जातो, त्याचप्रमाणें ज्ञानसंपन्न पुरुषांची संचित आणि क्रियमाण पुण्यपापमिश्रित सर्व कर्मे जळून खाक होतात, "अशा ज्ञानी पुरुषाचीं सर्व कर्मे क्षीण होतात," इत्यादि, गीतेंतहि श्रीकृष्णपरमात्म्यानें असे सांगितलें आहे:--

॥ श्लोक ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ॥
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥१॥

गीता अ. ४ श्लोक ३७

अर्थ ॥ अर्जुना, सूक्ष्म काष्ठादिकांनीं प्रज्वलित झालेला अग्नि ज्याप्रमाणें तीं सर्व काष्ठें जाळून त्यांचे भस्म करतो, त्याचप्रमाणें श्रवणमननाच्या अभ्यासानें उत्पन्न झालेला ज्ञानाग्नि संचित व क्रियमाण पुण्यपापमिश्रित सर्व कर्मे जाळून त्याचें भस्म करतो.

या रीतीनें परमात्म्याचें ज्ञान झाल्यानें संचित व क्रियमाण अशा दोन्हि कर्मांची निवृत्ति होते. आतां बाकी राहिलेलें तिसरें जें प्रारब्धकर्म तें देहाच्या शिरावर आहे. म्हणजे प्रारब्धानें देह जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत प्रारब्धकर्माच्या फलाच्या रूपानें असणारीं जीं सुखदुःखे तीं

स्थूल देहाच्या द्वारें सूक्ष्मदेहरूप जें अंतःकरण तें भोगतें व त्या देहाचा द्रष्टा आपण अभोक्ता परब्रह्मरूप आहों असा अनुभव घेतल्यानें ज्ञानी पुरुष जीवन्मुक्त होतो, हा सर्व प्रकार या पुढल्या चौपाईनें स्पष्ट करून दाखविला आहेः—

॥ चौपाई ॥

देहने माथे प्रारब्ध कर्म,
हुं पोते अभोक्ता परब्रह्म ॥
एम जे जाणे अनुभवयुक्त
तेने कहिए जीवन्मुक्त ॥ ३२ ॥

टीका ॥ संचित, क्रियामण आणि प्रारब्ध असें तीन प्रकारचे कर्म आहे. त्यापैकीं संचित आणि क्रियामण कर्मांचा नाश ज्ञानानें होतो, बाकी राहिलेलें सुखदुःख-भोगरुप तिसरें प्रारब्धकर्म देहाच्या शिरावर आहे, म्हणजे देहानें भोगावयाचे आहे, स्थूल देह त्याचे भोगायतन आहे, इंद्रिये ते भोग भोगण्याची साधने आहेत, आणि चिदाभास-संयुक्त अंतःकरण सुखदुःखभोगरुप जे प्रारब्धकर्म त्याचें भोक्तें आहे. प्रारब्धकर्म भोगले गेल्यावाचून निवृत्त होऊ शकत नाहीं. " प्रारब्धकर्माचा भोगानेच नाश होतो. " असें शास्त्राचेंहि वचन आहे. ज्ञानीचा अथवा अज्ञानीचे हाद उत्पन्न होतो, तो भोग अवश्य देणाऱ्या प्रारब्ध-कर्माच्या योगानेंच होतो. म्हणून त्या प्रारब्धकर्माचें

फल जे भोग ते जरूर भोगल्यानेच निवृत्त होतात. यद्यपि ज्ञानी देहाची व त्याच्या भोगांची अपेक्षा करीत नाहीं, तरी जोंपर्यंत प्रारब्धाच्या भोगांचा वेग आहे तोंपर्यंत देहाच्या योगें सुख दुःखादि भोग जे अवश्य व्हावयाचे असतील ते झाल्यावांचून टळणारनाहींत. कारण त्याचे प्रारब्धकर्म त्यास फळ द्यावयास प्रवृत्त होऊन चुकलेलें असतें म्हणून फळ दिल्यावाचून ते निवृत्त म्हणून व्हावयाचेंच नाहीं.

दृष्टांत :— कोणी एका मनुष्यानें आपल्या स्वतःच्या हाताची चलाखी पाहण्याच्या हेतूनें एका वृक्षाच्या पूर्वी ठरवून ठेवलेल्या एका पानास छिद्र पाडण्यासाठीं धनुष्य खेंचून नेम धरून जोरानें एक बाण मारला, त्याबरोबर त्या ठरलेल्या पानास भोक तर पडलेंच, पण तें पडल्यावर त्याच्या मनांत अवचित असें आलें की, आता आपण सोडलेला बाण पुढें न जातां तेथल्या तेथेंच एकदम राहील तर बरें होईल; परंतु तसें झालें नाहीं. कां की, तसें होणें शक्य नव्हतें. कारण बाणाचा जितका वेग होता तितका तो अवश्य गेल्याशिवाय थांबू शकलाच नाहीं. त्याचा वेग संपल्यानंतरच तो थांबून पडला, एरवीं पडावयाचा नव्हता. यद्यपि, तीच पुरुष, आपल्या जवळच्या भात्यांत व हातांत असलेले दूसरे बाण, दुसऱ्या कोणाच्या तरी सांगण्याने वाईट आहेत असें जाणून, टाकून देण्यास किंवा विस्तवांत घालून जाळून टाकण्यास समर्थ होता तरी एकदा म्हणून

हातांतून सोडलेल्या बाणास थांबवण्यास तो समर्थ नव्हता. याच न्यायानें ज्ञानी आपल्या संचित व क्रियमाण कर्मांस ज्ञानाग्नीच्या योगानें जाळून टाकण्यास समर्थ असतो, पण भोग देण्यास प्रवृत्त झालेलें जें त्याचें प्रारब्धकर्म तें हातांतून सुटलेल्या बाणाप्रमाणें अटकावण्याला समर्थ नसतो.

शिष्य :– जर ज्ञानानें संचित व क्रियमाण पुण्यपापादिक सर्व कर्मांची निवृत्ति होते, तर त्यानेंच प्रारब्धकर्मांची निवृत्ति कां होऊं नये ? अशी शंका उत्पन्न होते, तर तिचे समाधान कृपा करून करावें.

गुरु :– ज्ञान अज्ञानाचें व संचित आणि क्रियामण कर्मांचें विरोधी आहे पण प्रारब्धकर्माचें विरोधी नाहीं, प्रारब्धकर्माचें विरोधी ज्ञान जर असेल; तर ज्ञानाचा उदय झाल्याबरोबर प्रारब्धकर्माचा नाश झालाच पाहिजे आणि तसा तो झाला असतां प्रारब्धानें राहिलेल्या ज्ञान्याच्या देहाचाहि नाश झाला पाहिजे; पण तसे कांहींच होत नाहीं. यावरून प्रारब्धकर्म ज्ञानाचे विरोधी नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. शिवाय युक्तीच्या विचारानेंहि असेंच ठरतें. तो युक्तिविचार कोणता त्याचें एकाग्रचित्तानें श्रवण व मनन करून आपला संशय निवृत्त करून घे शिष्या ! ज्ञानाचा उपदेशकर्ता गुरु स्वतः ज्ञानी असतो कीं अज्ञानी असतो ते अगोदर गृहीत धरून चाललों

तर काय निघतें तें पाहूं या. स्वतः गुरूलाच जर ज्ञान नसेल तर तो दुसऱ्या जिज्ञासूंना ज्ञानाचा उपदेश कसा करूं शकेल ? अर्थातच करूं शकणार नाहीं. आतां गुरु ज्ञानसंपन्न असतो म्हणूनच ज्ञानाचा उपदेश जिज्ञासूंस करतो, असें धरून चाललों तर काय ठरते तें बघूं. ज्ञान्याने जे ज्ञानाचा उपदेश करावयाचा तो त्यानें स्वतःच्या देहावांचून करणें संभवतच नाहीं. आणि देहाची स्थिति तर प्रारब्धकर्मावांचून संभवत नाहीं यामुळें ज्ञानी अशा गुरुचा प्रारब्धकर्मासहित जो देह राहिलेला असतो, तोच ज्ञानाचा उपदेश करतो. यावरून, ज्ञान प्रारब्धकर्माचे विरोधी नाहीं हे सिद्ध होतें. ज्ञान प्रारब्धकर्माचे विरोधी आहे असे जर म्हटलें तर ज्यावेळीं गुरुला ज्ञान झालें असेल त्याचवेळीं गुरुच्या प्रारब्धकर्माचा नाश झाल्यानें गुरुच्या देहाचाही नाश झालाच पाहिजे होता. असा जर गुरुच्या देहाचा नाश होऊं लागला तर ज्ञानाचा उपदेश करणाऱ्या गुरुच्या अभावाने ज्ञानमार्गाचा संप्रदायच उच्छिन्न होईल आणि अमुक एक उपदेशकर्ता ज्ञानी आहे असें म्हणणेच संभवणार नाहीं अशा प्रकारचा मोठा विरोध येतो; यासाठीं ज्ञान प्रारब्धकर्माचा नाश करीत नाहीं असेंच मानणें प्रशस्त आहे, आणि म्हणूनच याज्ञवल्क्य, उद्दालक, वसिष्ठ, पराशर, वीतहव्य, वेदव्यास, शुकदेव इत्यादि अद्वैतज्ञाननिष्ठ, ज्ञानी पुरुष ज्ञानाचे संप्रदाय प्रवृत्त करणारे पुष्कळ होऊन गेले ही गोष्ट श्रुति-

शास्त्रांतून सर्वांस महशूर आहे. त्याचप्रमाणें जनक, भगीरथ, शिखिध्वज, इत्यादि अतुलप्रतापी राजेसुद्धां अद्वैतज्ञाननिष्ठेच्या योगानें जीवन्मुक्त होऊन गेले, अशा गोष्टी महाभारत, श्रीमद्भगवत योगवसिष्ठ इत्यादि ग्रंथांतूनही प्रसिद्ध आहे. यावरून ज्ञानाच्या योगानें प्रारब्धकर्माचा नाश जर झाला असता तर याज्ञवल्क्यादि ऋषींसह जनकादि राजांस जीवन्मुक्त म्हणणें संभवतेना. कारण जें पुरुष प्रारब्ध-कर्माच्या योगाने जिवंत असूनहि नित्य शुद्ध बुद्ध मुक्त एक अद्वैत, अकर्ता, अभोक्ता, सच्चिदानंदरूप आहे असें जाणल्यानें मुक्त असतात, त्यांस जीवनमुक्त म्हणतात. यावरून, ज्ञान प्रारब्धकर्माला निवृत्त करीत नाहीं हे स्पष्ट समजून येतें. श्रीरामचंद्र युधिष्ठिरादिक समर्थांसही ज्ञान होऊनसुद्धा, प्रारब्धकर्माचें फल अवश्य भोगावे लागलें हे वाल्मिकीय रामायण व्यासकृत महाभारत इत्यादि इतिहासावरून प्रसिद्ध आहे.

॥ श्लोक ॥

अवश्यंभावि भावानां प्रतीकारो भवेद्यदि ॥
तदा दुःखैर्न लिप्येरन् नलरामयुधिष्ठिराः ॥ १ ॥

अवश्य व्हावयाचेच असे जें प्रारब्धकर्माचे फलभोग, त्यांस निवारण्याचा जर कांहीं उपाय असता तर नलराजा, धर्मराजा, व श्रीरामचंद्रप्रभु हे तिघेहि राजे राज्यहित होऊन वनवासादि दुःखें भोगतेना.

यासाठीं ज्ञानी किंवा अज्ञानी, पाहिजे तो असला तरी त्याच्या देहाचे प्रारब्धकर्म भोगले गेल्यावांचून निवृत्त होऊं शकावयाचेंच नाहीं. ज्ञान्याचीं संचितादि बाकीचीं कर्में मात्र ज्ञान झाल्याबरोबर निवृत्त होऊं शकतात.

यावर श्रुतीच्या अर्थास धरून असलेलें असें एका प्रामाणिक पुरुषाचे वचन तुला सांगतों :—

॥ श्लोक ॥

प्रारब्धं भोगतो नश्येत् शेषं ज्ञानेन दह्यते ॥
शरीरं त्वितरत् कर्म तद्द्वेषिप्रियवादिनौ ॥ १ ॥

अर्थ ॥ ज्ञान्याचे प्रारब्धकर्म भोगले गेल्यानेच निवृत्त होतें, संचितकर्म असते तें ज्ञानाने नाश पावते, व तिसरे जें शरीरसंबंधीं शुभाशुभ क्रियामाणकर्म होत असतें ते त्याच्याशी (ज्ञान्याशीं) अनुक्रमें प्रेम आणि द्वेष करणाऱ्याकडे जाते. ज्ञानी व ब्रह्मनिष्ठ अशा पुरुषाची जो भक्तीने स्तुति व पूजन करतो तो त्या ज्ञानाच्या पुण्यकर्माचें ग्रहण करतो, व जो त्याची निंदा व द्वेष करतो तो त्याच्या अशुभकर्मांचे ग्रहण करतो असे श्रुतीमध्येंही सांगितलेलें आहे.

म्हणून प्रारब्धकर्माचें फल म्हणून प्राप्त झालेलें जें सुखदुःखादि भोग तें देह भोगतो त्या देहाचा प्रकाशक आपण अभोक्ता परब्रह्म आहो असें जों मनुष्य अनुभव

घेऊन निश्चितपणे समजतो त्याला जीवनमुक्त म्हणावे; म्हणजे तो देही असूनहि मुक्त आहे. म्हणून 'आपण देह आहों' अशी बुद्धि सोडून आपण 'आत्मा ब्रह्मरूप आहों' असा निश्चय करावा.

देहाभिमान पापरूप आहे व आत्मज्ञान पुण्यरूप आहे.

'आपण देहच आहो' असें मानणें दोषास्पद आहे आणि आत्म्याचा बोध महापुण्यप्रद आहे, या प्रकारचें वर्णन गुरु आतां करतात :--

॥ चौपाई ॥

देहने हुं माने जे कोई,
महादोषी कहिए सोई ॥
आत्मबुद्धि जेने मांई
महापुण्य जाणीए ताई ॥ २२ ॥

टीका ॥ जो मनुष्य आपला देहच आपण आहों असें मानतो, त्याला महादोषी किंवा महापापी म्हणावे. स्मृतींतहि सांगितलेलें आहे कीं, "नानृतात्पातकं परम्" असत्य भाषणापेक्षां अधिक मोठे असे दुसरे कोणतेंहि पाप नाहीं, म्हणजे असत्य बोलणें हे सर्वांत मोठे पाप आहे या नियमाप्रमाणें देहच आत्मा आहे असे जो म्हणतो तो असत्य बोलतो, कारण देह आहे पंचभूतांचे कार्य

वर्तु आत्मा आहे. पंचभूतांचें कारण| त्याचप्रमाणें देह विकारी, दृश्य, अनित्य, जड, परिच्छिन्न, सावयव आहे. व आत्मा अविकारी, द्रष्टा, नित्य, ज्ञानस्वरुप, परिपूर्ण, निरवयव आहे. देह अपवित्र, दुर्गंध मलमांस—मूत्ररूधिरादिकांनीं भरलेला आहे, व आत्मा सदा शुद्ध, निर्मल व आनंदघन आहे. या रीतीनें देह व आत्मा यांचीं लक्षणे परस्परांपासून भिन्न असल्यामुळे, आत्मा देहाहून निराळा आहे असें अनुभवाने समजण्यासारखें आहे. तथापि देहाहून आत्मा वेगळा आहे असें न समजतां, देहच आपण आहों असें जर कोणी म्हणेल तर त्याला महादोषी म्हटलें पाहिजे, किंवा ज्याप्रमाणें वात, पित्त आणि कफ हीं तिघेहीं एकत्र झालीं म्हणजे त्यास महादोष (त्रिदोष) अथवा सन्निपात म्हणतात, व हा सन्निपात ज्यास झाला असेल तो मनुष्य मृत्यूच्या वश होतो. त्याचप्रमाणे देहाचा अभिमान बाळगणाऱ्यासहि महादोषी म्हणावे, म्हणजे त्याला सन्निपात झाला आहे समजावें. भागवतांतहि श्रीकृष्णभगवंतांनीं उद्धवास सांगितलें आहे कीं, “उद्धवा ! अहंताममतारूप बुद्धि केवळ सन्निपातच आहे. असें समजावें,” म्हणजे सत्वगुण, रजोगुण आणि तमोगुण या तीन गुणांच्या ठिकाणीं व त्यांच्या कार्यांच्या ठिकाणीं ज्या अहंता, ममता असतात त्यांस सन्निपात समजावें, असा सन्निपात ज्यास झाला असेल तोही मरणाच्या स्वाधीन होतो, आणि त्याचें जन्ममृत्युरुप दुःख निवृत्त होत नाहीं असें समजावें. याच्या उलट ज्या मनुष्याला ब्रह्मनिष्ठ

सद्गुरुच्या अनुग्रहाने आपण सच्चिदानंद आत्मा आहों अशीं बुद्धि झाली असेल, त्याचें पुण्य जबरदस्त आहे असे समजावे. ब्रह्मविचार विलक्षण पुण्याचा हेतु आहे असें सिद्धान्मुक्तावलींत आप्तपुरुषाचे वाक्य आहे :—

क्षणमात्र ब्रह्मविचाराचे फल

॥ श्लोक ॥

स्नातं तेन समस्ततीर्थसलिले दत्ताऽपि सर्वावनि-
र्यज्ञानांच कृतं सहस्रमखिला देवाश्च संपूजिताः॥
संसाराच्च समुद्धृताः स्वपितरस्त्रैलोक्यपूज्योऽप्यसौ।
यस्य ब्रह्मविचारणे क्षणमपि स्थैर्यं मनः प्राप्नुयात्॥१।

अर्थ ॥ ब्रह्मविचाराच्या ठिकाणीं ज्या पुरुषाचे मन क्षणमात्र कां होईना, पण स्थिरतेला पावले, तो पुरुष गंगादि सर्व तीर्थाच्या जलांत स्नान केलेला असें समजावे, इतकेच नव्हे, तर त्याने सर्व पृथ्वीचे दान केले, हजारों यज्ञ केले. जितक्या म्हणून देवता आहेत तितक्या सर्वांची पूजा केली. आपल्या सर्व पितरांचा संसारापासून उद्धार केला, म्हणजे त्यांस उत्तम गति प्राप्त करून दिली, व आपल्याला स्वतःलाहि त्रैलोक्यांत पूज्य करून ठेवलें असें समजावें.

क्षणमात्र केलेल्या ब्रह्मविचारानें जर एवढे पुण्य लागते, तर देहाध्यास टाकून, "सदा आपण ब्रह्मरूप आत्मा आहो" अशी ज्याची बुद्धि ब्रह्माकार झाली असेल त्याच्या पुण्यास जोडच नाहीं असे समजले तर त्यांत आश्चर्य तें कोणते ?

वर सांगितलेल्या सिद्धांतास पुराणाचे प्रमाण सांगतो :—

॥ श्लोक ॥

देहात्मबुद्धिजं पापं न तग्दोवधकोटिभिः ॥
आत्माऽहं बुद्धिजं पुण्यं न भूतोन भविष्यति ॥१॥

अर्थ ॥ "देहात्मबुद्धिजं पापं" म्हणजे आपण देह आहो असे मानल्याने झालेले पाप क्रोडो गाई मारून झालेल्या पापापेक्षां अधिक आहे, (श्रुतीतहि असेंच सांगितलेले आहे, म्हणजे देहाभिमानाच्या ठायीं सर्व दोष उत्पन्न होतात, तो पापी होतो व आत्महत्या करणारा होतो असे सांगितले आहे,) व आपण सच्चिदानंद आत्माच आहो अशा बुद्धिने झालेले पुण्य यापूर्वी कधीहि झालें नाहीं, व पुढे कधीं होणारहि नाहीं, अशा श्रेष्ठ प्रकारचे असतें.

अशी आत्मबुद्धि महापुण्यरूप आहे असें सांगून पुढे शुद्ध ज्ञानरूप, एक देव सर्व मनुष्यांच्या मनांत साक्षीरूपाने राहिलेला आहे म्हणून, बंधनाचे कारण जी भेदबुद्धि तिचा त्याग शिष्यानें करावा या हेतुने भेदबुद्धिच बंधनाचे कारण आहे असें गुरु निरुपण करून सांगतात—

॥ चौपाई ॥

जेने तुं कहेले देव,
ते चैतन्य स्वयमेव ॥
बीजो देव माने जे कोई,
एज बंधन तेने होई ॥ ३४ ॥

टीका ॥ बा शिष्या, ज्याला तूं देव, चैतन्य स्वयंप्रकाश म्हणतोस, तो चैतन्यरुप देव तूं स्वयमेव (आपणच) आहेस आणि तो चैतन्यरुप, स्वयंप्रकाश देव प्राणिमात्राच्या ठिकाणी एकच आत्मारूपाने आहे, यासाठी चैतन्यरूप देव आत्मा स्वत: आपण आहों असें जाणावें. चैतन्यरूप आत्मदेवास अज्ञानानें विसरून, आपण देहच आहो असें मानून, चैतन्यरूप देंव तो आपल्याहून कोणी तरी निराळाच आहे असें जो कोणी मानतो त्या भेद मानणाऱ्या अज्ञानाच्या बंधनाला हे त्याचें भेद मानणेंच कारण होते. श्रुतींतहि सांगितलेले आहे कीं, "जो कोणी, आपण स्वत: वेगळे आहो व देवता आपल्याहून भिन्न आहेत, असें मानून अन्य देवतांची उपासना करतो, तो अद्वितीय ब्रह्मतत्व जाणूं शकत नाहीं म्हणून, तो देवांस पशुतुल्य आहे." पशु ज्याप्रमाणे गाडीस जोडणे, शेत नांगरावयाच्या जोताला लावणे, बोजा उचलणें इत्यादि कामास उपयोगी पडतो त्याप्रमाणें मनुष्यरूप पशु यज्ञादिकाच्या योगानें

देवतांस भोग देतो व त्या योगानें तो देवांच्या कामास उपयोगी पडतो, म्हणून त्यास देवांचा पशु म्हटलेलें आहे. दुसऱ्या एका श्रुतीत सांगितलेलें आहे कीं "जो पुरुष अद्वैत ब्रह्माच्या ठिकाणीं भेदबुद्धि करतो तो पुरुष वारंवार मृत्यूच्या जबडयांत पडतो." यासाठीं भेदबुद्धि टाकून देव एकच असून सर्वांच्या मनाचा साक्षी आहे, असें गुरु-शास्त्राच्या उपदेशानें जाणून अभेदबुद्धि ठेवावी.

मनास जाणणारा तूं आहेस

स्मृतींतहि गुरुशिष्यांच्या संवादरूपानें सर्वांच्या मनाचा साक्षी देव एकच आहे असें सांगितलेले आहे --

॥ श्लोक ॥

को देवो यो मनःसाक्षी मनो मे दृश्यते मया।
तर्हि देवस्त्वमेवासि एको देव इति श्रुतेः ॥१॥

अर्थ ॥ कोणी एका उत्तम अधिकारी मुमुक्षु पुरुषानें वेद-वाक्यावरून श्रवण केलें कीं, "देवाला जाणलें असतां सर्व पापांची निवृत्ति होते." ऐकून, "अशा देवाला मी कसा जाणूं, मला त्या देवाचा कोण अनुभव करवील," असा त्याच्या मनांत विचार आल्यामुळे एका ब्रह्मनिष्ठ गुरूस शरण जाऊन त्यानें त्यास प्रश्न केला कीं, "को देवः? म्हणजे कोण देव आहे? त्यावर गुरूने उत्तर दिलें, "यो मनःसाक्षी" म्हणजे जो मनाचा साक्षी (मनास जाणणारा)

तोच देव आहे. असें त्या गुरूने सांगितल्यावरून " माझ्या मनाला कोण बरें जाणणारा असेल ? काय इंद्रादि देवता जाणत असतील, कीं दुसरा कोणी जाणणारा असेल, " असा विचार तो पुन:पुन: करीत असूनहि त्याच्या मनाचा निश्चय असा कांहीच होईना; म्हणून दुसऱ्या एका बुद्धिमान मनुष्याकडे जाऊन त्यानें त्यास विचारलें कीं, " हे दयासागरा सत्पुरुषा ! माझ्या मनास कोण बरें जाणत असेल ? त्यावर त्या सत्पुरुषानें उत्तर दिले कीं, " तुझ्या मनाला तूंच जाणतोस, दुसरा कोण जाणील ?" हे त्याचें उत्तर ऐकून त्या विचारणाऱ्याला वाटलें कीं, हा कांहीं आपल्याला खरें उत्तर देत नाहीं. यासाठीं आपला प्रश्न आणखीं तिसऱ्या कोणास तरी विचारावा या विचारानें तिसऱ्या एका सत्पुरुषाकडे जाऊन त्यानें त्यास विचारलें कीं, ' दयाळू सत्पुरुषा ! माझ्या मनाचा साक्षी कोण बरें असेल ?" तेव्हां त्याहि सत्पुरुषानें पूर्वीच्या सत्पुरुषाप्रमाणेंच जबाब दिला, या रीतीनें आणखी दोनचार सत्पुरुष विचारून पाहता त्या सर्वांकडून त्यास पूर्वीप्रमाणें एकच उत्तर मिळाल्यामुळे त्या सर्वांच्या वचनावर विश्वास ठेवून, एकांतांत बसून 'आपणच आपल्या मनाचा साक्षी आहों किंवा नाहीं ' याविषयीं तो आपल्या मनांत विचार करूं लागला. असा विचार करतां करतां त्यास समजून आलें कीं, संकल्पविकल्प

करणे व सुखदु:खे भोगणें हे धर्म मनाचे आहेत, त्याचप्रमाणें बाहेरल्या पदार्थांच्या ठिकाणीं गमनागमन (जाणें येणें) हाही धर्म मनाचाच आहे, व अशा मनाच्या धर्मास जाणणारे आपण त्या मनाचे साक्षी आहों. कारण त्याच्या ध्यानांत असें आलें कीं, एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास कांहीं सांगत असतां ते ऐकणाऱ्याचें मन जर दूसऱ्याच कोणत्यातरी ठिकाणीं लागलेलें असेल तर तो सांगणारा काय सांगत असतों तें तो ऐकणारा ऐकूं शकत नाहीं, ऐकणाराचे मन स्थिर नाहीं असें सांगणाराच्या लक्षांत आल्याबरोबर तो सांगणारा म्हणतो, अरे बाबा! मीं तुला इतका वेळ सांगितलें तें तूं ऐकलेंस कां ?" तेव्हां तो ऐकणारा उत्तर देतो, "नाहीं बुवा, तूं एवढा वेळ काय सांगितलंस त्यांतलें कांहींच मीं ऐकलें नाहीं. कारण आतांपर्यंत माझें मन अन्य ठिकाणीं असल्यामुळें मला तूं सांगितलेंस ते ऐकूंच आलें नाहीं, आतां माझें मन ठिकाणीं आहे तर फिरून मला तेंच सांग म्हणजे मी ऐकेन." या गोष्टीवरून त्यास उघड दिसून आलें कीं, मन पहिल्यानें बाहेर गेलें होतें व मागून तें स्थिर झालें असें ज्यानें जाणलें तोच मनाचा साक्षी आहे, म्हणून मनाची चंचलता व स्थिरता, त्याचप्रमाणें जागृति व स्वप्नांत संकल्पविकल्पपूर्वक जे विषय मनांत स्फुरण पावतात ते अभाव, त्याचप्रमाणें सुषुप्त्यवस्थेंत मनाच्या सर्व वृत्तीचे होणारे अभाव या सर्वांस जाणणारे (प्रकाशक) आपण आहों, अर्थात् मनाचे

साक्षी आपणच आहों असें अनुभव घेऊन जाणतां येतें, असें त्याने आपल्याशींच विचार करून जाणलें, व अर्थात् तोच निश्चय करून तो मुमुक्ष गुरुजवळ जाऊन त्यांस म्हणाला, " मनो मे दृश्यते मया " म्हणजे " माझें मन मलाच दिसते, " म्हणजे पुनः माझ्या मनाचा साक्षी मीच आहे " अशी आतां माझी खात्री झाली आहे. असें शिष्याचें वचन ऐकून गुरु म्हणतात, ' तर्हि देवस्त्व-मेवासि " म्हणजे " असे असेल तर मग देव तूंच आहेस, " म्हणजे पुनः प्रत्यक् चैतन्य, स्वयंप्रकाश, देवरुप, साक्षी आत्मा तूंच आहेस.

याप्रमाणे " को देवो यो मनः साक्षी " या स्मृतीच्या तीन चरणांनीं सर्व प्राण्यांच्या मनांचा साक्षी जो आत्मा देवरुप आहे असे सांगितलें. आतां पुढें त्याच स्मृतीचा चवथा चरण देव एकच असून प्राणिमात्रांच्या हृदयांत आहे असें, श्वेताश्वेतर उपनिषदांतलें श्रुतीचें प्रमाण देऊन सांगतो; तो चरण असा - " एको देव इति श्रुतेः " यांतील प्रमाणभूत श्रुतीचा इत्यर्थ असा आहे कीं ब्रह्मदेवापासून पिपीलिकपर्यंत (मुंगीपर्यंत) सर्व भूताच्या ठिकाणीं देव (स्वयंप्रकाश, चैतन्यरुप) एक (अद्वितीय) आहे. तथापि सदसद्विचारशून्य अज्ञानी लोकांना अज्ञानजन्य आवरण व देहाभिमान यांच्या योगानें असा तो देव अपरोक्षरुप आहे असें जाणतांच येत नाहीं. म्हणून त्या गूढ गुप्त म्हटलें

5. 6-11.

आहे. तो देव सर्व व्यापक, सर्व भूतांचा अंतरात्मा, पुण्यापुण्यकर्माची फळे देणारा आणि पृथिव्यादि सर्व भूतांचे अधिष्ठान असून, सर्व भूतांचा साक्षी, द्रष्टा, चैतन्यरूप, वस्तुतः केवळ निष्प्रपंच, निर्विकल्प व निर्गुण (तत्त्वादिकरून व ज्ञानादिकरून गुणांवांचून, सत्यरूप, ज्ञानरुप, व आनंदरुप) आहे. यासाठीं बा शिष्या ! मनाचा आणि बुद्धिचा साक्षी जो आत्मा तोच देव आहे असा निश्चय करुन देव आपल्याहून भिन्न आहे असा भेदबुद्धि टाकून द्यावी, कारण द्वैत मानल्यानें भय उत्पन्न होते असें श्रुतींत सांगितलेले आहे, भागवंतातहि सांगितलेले आहे कीं, "भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात्" म्हणजे द्वैताच्या ठिकाणीं आग्रह धरल्यानें जन्ममरणादि दुःखे प्राप्त होतात, यासाठीं भेदबुद्धि करूं नये.

स्वयंप्रकाशरुप चैतन्यदेवाच्या सर्वात्मपणाचें अशा रीतीनें निरुपण केलें. आतां अमानित्वादि श्रेयकर साधने संपादून व पूर्वी २९ (193 Page) व्या दोह्यांत निरुपण करुन सांगितलेलें जें सामवेदातलें महावाक्य त्याचा अखंडार्थ अभेदार्थ (ब्रह्मनिष्ठ) सद्‌गुरुच्या उपदेशानें हृदयांत धरुन त्याच्या मनननिदिध्यासांच्यायोगाने आपण नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त, प्रत्यक्, एकरस, सच्चिदानंद, ब्रह्मरुप आहों असा, निर्विकल्पनिष्क्रिय अशा आत्म्याचा दृढ साक्षात्कार ज्यानें स्वतःच्या अनुभवानें करुन घेतला असेल तो पुरुष ज्ञानामृतानें जीवन्मुक्त होऊन त्यास कृतकृत्यतारुप तृप्ति झाली आहे असें

होते. जशा पुरुषाला पुढें कर्तव्य म्हणून कांहीं नसते. परंतु मोक्षाच्या इच्छेनें जे श्रवणादिकास तर प्रवृत्त झाले आहेत, पण ज्यांच्या मनाची वृत्ति बाह्य विषयांच्या संकल्पामुळें चंचल असल्याकारणाने अपरोक्ष, अद्वितीय अशा आत्म्याच्या अनुसंधानांत दृढ व निष्ठावंत तर होऊं शकत नाहीं, अशा मुमुक्षूंनीं आपल्या मनाच्या वृत्ति बाह्य विषयांच्या संकल्पापासून निवृत करून त्यांच्यामध्ये स्थिरता उत्पन्न करण्यासाठीं व अद्वितीय आत्म्याचा अपरोक्ष दृढ बोध करून घेतल्याने जीवनमुक्त झाल्यानंतर स्वत:स विदेहमुक्ति प्राप्त करून घेण्यासाठीं, पुढें समाधीचा अभ्यास अवश्यमेव करावा अगदीं योग्य आहे. यासाठीं त्या समाधीच्या अभ्यासाचे निरूपण श्रीगुरु ३५ व्या दोह्याने करतात——

ध्यानाच्या अभ्यासाचा प्रकार

॥ दुहो ॥

प्रथम वृत्ति त्याग करी,
बीजी उठावा न दइए ॥
वचमां निर्विकल्प दशानो,
अभ्यास करता रहिए ॥ ३५ ॥

टीका ॥ 'प्रथम वृत्ति' म्हणजे आपण देह आहों, व कर्ता, भोक्ता, सुखी, दु:खी आहों असें मानण्याची जो वृत्ति तिचा, किंवा शब्दस्पर्शरूपरसादि विषयांचें स्मरण कर-

णारी जी वृत्ति तिचा, ‘ त्याग करी ’ म्हणजे त्याग करून, देहादिकांच्या ठिकाणीं अहंताममतारुप, अथवा शब्दादी विषयांचें स्मरण करणारी, जी दुसरी वृत्ति तिला, उठवा न दइए ’ म्हणजे उत्पन्न होऊं देऊं नये, आणि “ बचमां ” म्हणजे मधल्या अवकाशांत (एका वृत्तीचे निवृत्त होणे व दुसरीचे उदयास येगें या दोहोमधल्या अवकाशांत) जें निर्विकल्प (कल्पनारहित) असे आपले स्वरुप स्वप्रकाश असते त्याच्यात, स्थितिरुप दशेचा (अवस्थेचा) “ अभ्यास करता रहिए, ” म्हणजे प्रथम सविकल्प समाधीचा अभ्यास करुन नंतर निर्विकल्प समाधीचा अभ्यास निरंतर करीत रहावे.

सविकल्पसमाधीचा प्रकार

शिष्य :—गुरुमहाराज, सविकल्प समाधींत व निर्विकल्प समाधींत काय फरक आहे तें कृपा करून सांगावें.

गुरु :—समाधीचे दोन प्रकार आहेत, एक सविकल्प व दुसरा निर्विकल्प, सविकल्प समाधीचे पुन्हां दोन प्रकार आहेत. एक दृश्यानुविद्ध व दुसरा शब्दनुविद्ध.

शिष्य :—दृश्यानुविद्ध समाधि म्हणजे काय ?

गुरु :—काम, संकल्प, चिकित्सा, अश्रद्धा, धैर्य, अधैर्य, लज्जा, भय, व दुसऱ्या ज्या कितीएक सात्त्विकादि वृत्ति अंतःकरणांत उत्पन्न होतात त्या सर्व दृश्य आहेत व त्या सर्व वृत्तींचा द्रष्टा आपण साक्षी चैतन्यरुप आहों, अशा अनुसंधा-

नाने जो सदा आत्म्याचा अनुभव घेणें त्यास दृश्यानुविद्ध सविकल्प समाधि म्हणतात.

शिष्य :— शब्दानुविद्ध सविकल्प समाधि म्हणजे काय तें कृपा करून सांगावे. ~~दृग्दृश्यविवेक: श्लो २५.~~

A गुरु :— ज्याप्रमाणे तूप, तेल, चंदनाचे गंध, चिखल, इत्यादिकांत आकाश भरलेलें असते पण तें त्याच्याशीं लेपायमान होत नाहीं म्हणजे त्यास चिकटून रहात नाहीं, त्याचप्रमाणेच आपण असंग आहों, म्हणजे देह, इंद्रियें, अंत:करणे, इत्यादिकांत आपण आहों, तथापि त्यांचा संग आपल्याला होत नाहीं, तसेच आपण सच्चिदानंदरूप आहों, म्हणजे, जाग्र-स्वप्नसुषुप्तींत आहों म्हणून सत् आहों, जागृदादि तीन अवस्थांस आपण जाणतो म्हणून चित् आहों, आणि आपण परमप्रेमाचे आस्पद म्हणजे स्थान आहों म्हणून आनंद आहों. आपण स्वत: स्वभावत: प्रकाशरूप आहों. आपण दुसऱ्यांस प्रकाशित करतो, व आपणांस कोणी प्रकाशित करीत नाहीं, म्हणून आपण स्वप्रकाश आहों. आपण द्वैतरहित आहो, म्हणजे आपल्या स्वरुपांत द्वैतप्रपंचाचा कांहीं संबंध नाहीं. कारण तो समग्र द्वैतप्रपंच कल्पित आहे. या रीतीने आपण असंग सत्, चैतन्य, आनंद आणि स्वयंप्रकाश आहों असा प्रत्यक्ष शब्दांनीं उच्चार करून, आत्म्याच्या ठिकाणीं वर लिहिल्याप्रमाणे असंगादि विशेषणांच्या अर्थाचा जो अनुभव घेणे त्याला शब्दानुविद्ध सविकल्प समाधि म्हणतात.

या प्रकारच्या दृश्यानुविद्ध व शब्दानुविद्ध अशा दोन समाधींचा प्रथम अभ्यास करावा व तो दृढ झाला म्हणजे मग निर्विकल्प समाधींचा अभ्यास करावा.

निर्विकल्प समाधी वर्णन

शिष्य :— गुरुमहाराज, आतां निर्विकल्प समाधि म्हणजे काय सांगावें. दृग्दृश्यविवेक: श्लो २६.

गुरु :— दृश्यानुविद्ध व शब्दानुविद्ध या दोन समाधींचा उत्तम रीतीनें अभ्यास केल्यामुळें, अंतःकरणाच्या आंत आनंदरूप आत्म्याच्या ज्ञानानंदाच्या अनुभवाच्या आवेशानें कामसंकल्पादि दृश्य वृत्तीचें अनुसंधान सुटून, त्याचप्रमाणें आपण असंग आहों इत्यादि शब्दहि नष्ट होऊन, संकल्परहित, तूष्णीभूत अशी जी जीवाची स्थिति होते तिला निर्विकल्प समाधि म्हणतात. वायु नसलेल्या जागेत दिवा जसा निश्चल रहातो, तसें निर्विकल्प अभ्यास करणाऱ्या पुरुषाचें चित्त निश्चल रहाते म्हणजे निर्विकल्प समाधींत कोणत्याही प्रकारचा द्वैतप्रपंच भासत नसल्यामुळें निर्विकल्प चैतन्यरूप आत्म्याचा स्पष्ट अनुभव जीवास होतो.

त्या निर्विकल्प चैतन्यसुखाच्या अनुभवाचा प्रकार श्रीशंकराचार्य गुरुनींही लघुवाक्यवृत्ति नांवाच्या आपल्या ग्रंथांत निरुपण करून सांगितला आहे——

॥ श्लोक ॥

नष्टे पूर्वविकल्पे तु यावदन्यस्य नोदयः ॥
निर्विकल्पकचैतन्यं स्पष्टं तावद्विभासते ॥ ११॥

अर्थ ॥ मनांत अगोदरचेच जे अनेक प्रकारचे विकल्प असतात ते सर्व निवृत्त होऊन जोपर्यंत दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचे विकल्प त्यांत उत्पन्न झाले नाहींत तोपर्यंत निर्विकार (कल्पनारहित), एक स्वयंप्रकाश, चैतन्य स्पष्ट (कोणताही संदेह न राहतां) भासतें. म्हणजे ज्यावेळीं मनांत कोणतीहि विकल्परूप वृत्ति स्फुरत नाहीं, त्यावेळीं सर्व विकल्पांच्या अभावास प्रकाश करणाऱ्या चैतन्यरूप, निर्विकल्प आत्म्याचा स्पष्ट अनुभव होतो, व त्यावेळीं वृत्तीहि केवळ सुखमय, निर्विकल्प होते, आणि त्यावेळीं कोणत्याहि प्रकारचा विक्षेप प्रतीत होत नाहीं. याकरितां अशी निर्विकल्प वृत्ति होण्यासाठीं अभ्यास करणें योग्य व अवश्य आहे. यावरून असेंहि दिसून येतें कीं, जितके म्हणून विकल्प असतात तितके सर्व अंतःकरणांत राहिलेले असतात, व आत्मा असतो तो स्वभावतःच निर्विकल्प असून, अंतःकरणांतल्या विकल्पांच्या योगानें सविकल्प होत नाहीं. परंतु अशा निर्विकल्प आत्म्याचा बोध सद्गुरुच्या उपदेशानें, वेदांतशास्त्राच्या श्रवणादिकानें व निर्विकल्प समाधीच्या अभ्यासानें ज्याला झालेला

नसतो त्याला आपला आत्मा विकल्पवान् आहे असा भ्रम झालेला असतो या आपल्या भ्रमास निवृत्त करण्यासाठी ब्रह्मनिष्ठ सद्गुरुला शरण जाऊन वेदांतशास्त्राच्या श्रवण-मननिदिध्यासानें "हुं आत्मा निर्विकल्प छुं" म्हणजे आपण आत्मा निर्विकल्प आहों असा दृढ अनुभव करून घेण्यासाठीं त्यानें समाधीचा अभ्यास करणें योग्य व अवश्य आहे.

आतां पुढें उत्तम अधिकाऱ्यास आत्म्याचा साक्षात्कार होण्यासाठी श्रवणमननादि जीं मुख्य साधनें याज्ञवल्क्य-मुनींनीं मैत्रेयी नांवाच्या आपल्या बायकोला उपदेश करून सांगितली आहेत, त्या साधनांसंबंधाने गुरु सांगतात--

हृ. 2-4-5 4-5-6.

॥ दुहो ॥

श्रवण मनन निदिध्यास करी,
करिए साक्षात्कार ॥
सच्चिदानंद परब्रह्म हूं,
कहे छे वेद पुकार ॥ ३६ ॥

टीका ॥ प्रथम वेदांतशास्त्राचें श्रवण करावें. ब्रह्म आणि आत्मा या दोघांच्या ऐक्याचा निश्चय उत्पन्न करविणारी जीं सहा प्रकारचीं लिंगें (गूढार्थास समजावून देणारी लक्षणें) त्याच्या योगानें सर्व वेदांतवाक्यांच्या तात्पर्याचा ब्रह्माच्या ठिकाणी जो निश्चय करणें त्यास श्रवण असें म्हणतात. (33)

शिष्य :— सहा प्रकारचीं लिंगें किंवा लक्षणे जीं आपण सांगितली त्यांची नावे काय ?

A उपक्रमोपसंहारादि सहांची लक्षणे

गुरु :— १ उपक्रमोपसंहार, २ अभ्यास, ३ अपूर्वता, ४ फल ,५ अर्थवाद आणि ६ उपपत्ति, अशी सहा लक्षणांची नांवे आहेत.

शिष्य :— उपक्रम आणि उपसंहार म्हणजे काय ? 1

गुरु :— प्रकरणाच्या योगाने प्रतिपाद्य जो अर्थ त्याचे प्रकरणाच्या आरंभी जें प्रतिपादन करतात त्यास उपक्रम म्हणतात व शेवटी जे प्रतिपादन करतात त्यास उपसंहार म्हणतात. उदाहरणार्थ, छांदोग्योपनिषदाच्या सहाव्या अध्यायांत प्रकरणाच्या योगाने प्रतिपाद्य जी एक, अद्वितीय आणि स्वगत सजातीय व विजातीय, या भेदांवांचून असणारी ब्रह्मवस्तू तिचे प्रतिपादन प्रकरणाच्या आरंभी करून प्रकरणाच्या शेवटीं, हें सर्व जग आत्मरूप आहे, असा उपसंहार केलेला आहे.

अभ्यास लक्षण

शिष्य :— गुरुमहाराज, अभ्यास म्हणजे काय ? 2

गुरु :— प्रकरणात प्रतिपाद्य असे जे अद्वितीय ब्रह्मवस्तु त्याचें प्रकरणामध्ये वारंवार जे प्रतिपादन करणे त्याला अभ्यास म्हणतात. छांदोग्योपनिषदांत उद्दालकमुनींनीं श्वेतकेतु नांवाच्या आपल्या मुलाला 'तें तूं आहेस' (तूं प्रत्यगात्मा तें ब्रह्म आहेस) असा वारंवार नऊ वेळां उपदेश केला आहे. अशा उपदेशाला अभ्यास म्हणतात.

३. ब्रह्माची अपूर्वता

शिष्य :— अपूर्वता म्हणजें काय ?

गुरु :— प्रकरणाने प्रतिपादित अशा अद्वितीय वस्तुचें इतर प्रमाणांनी जें अविषयीकरण=प्रतिपादन होण्याची शक्यता, त्यास अपूर्वता म्हणतात. श्रुतिशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणांनी ब्रह्म अप्रतिपाद्य आहे असें जे उपनिषदांत सांगितलेलें आहे त्यावरून किंवा ब्रह्म स्वप्रकाश रुप असल्यामुळे तें जाणून घेण्याच्या दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणांची जरूरी नाही. त्यावरून ब्रह्माच्या ठिकाणी ही अपूर्वता आहे असें जाणावें.

शिष्य :— फल म्हणजे काय ?

फलाचे लक्षण

गुरु :— प्रकरणाच्या योगाने प्रतिपादित होणाऱ्या आत्मज्ञानाचें किंवा आत्मज्ञानाच्या श्रवणादि साधनांच्या अनुष्ठानाचें जें प्रयोजन व ज्यासंबंधानें श्रुतींत त्या त्या ठिकाणी वचनें ऐकूं येतात, किंवा उल्लेख पाहण्यांत येतात, त्या प्रयोजनास फल म्हणतात. उदाहरणार्थं, " ब्रह्मनिष्ठ आचार्याच्या (गुरुच्या) उपदेशानें पुरुष आत्म्यास जाणतो, " ब्रह्म जाणणारा ब्रह्मरूपच असतो," आत्मतत्त्व जाणणारा शोकसागर तरून जातो, "इत्यादि म्हणजे गुरुद्वारा झालेल्या श्रवणादिक साधनांच्या योगानें तयार होतें म्हणून सांगितलें जाणारें जें ज्ञानप्रप्तिरूप प्रयोजन व त्या ज्ञानाने होणारी जी मोक्षप्राप्ति तिला फल म्हणतात.

अर्थवाद लक्षण

शिष्य :– अर्थवाद म्हणजे काय?

गुरु :– प्रकरणानें प्रतिपादन अशा अद्वितीय ब्रह्मस्वरूपाची त्या त्या ठिकाणीं केलेली जी प्रशंसा (स्तुति), तिला अर्थवाद म्हणतात. उदाहरणार्थ, “ समग्र प्रपंचाचें अधिष्ठान जें ब्रह्म त्याच्या श्रवणाने, श्रवण न केलेला असा सर्व प्रपंच श्रवण केल्यासारखा होतो, त्याचप्रमाणें, “ ब्रह्माचे ज्ञान झाल्याने न जाणलेलें असें सर्व जग जाणल्यासारखें होतें, ” इत्यादि प्रकारची जी प्रशंसा छांदोग्योपनिषदांत केलेली आहे तिला अर्थवाद म्हणतात.

उपपत्ति स्वरुप वर्णन

शिष्य :– उपपत्ति म्हणजे काय ?

गुरु :– प्रकरणानें प्रतिपादित अशा अद्वितीय आत्मवस्तूचें दृष्टांतानें जें प्रतिपादन करणें त्यास उपपत्ति म्हणतात. उदाहरणार्थ; “ मृत्तिकेचा पिंड जाणल्यानें, घटशरावादिक (मातीची निरनिराळ्या तऱ्हांची भांडी) सर्व मृद्धिकार=मृत्तिकामय आहेत असें समजून येतें, व घटादिकांच्या नामरूपांचें मिथ्यात्व समजून येतें; ” तसेंच “ एक सुवर्ण जाणल्यानें, कडी, कुंडलें इत्यादि त्याचे सर्व अलंकार सुवर्णमय आहेत असें समजून येतें, ” कडी, तोडे, कुंडले इत्यादि सर्व विकारांचा केवळ तोंडानें उच्चार करावयाचा आहे, वास्तविक ते खरे नाहींत, खरें तें एक सुवर्णच आहे, इत्यादि दृष्टांत जे छांदोग्योपनिषदांत दिलेले आहेत ते

अशा रीतीनें दृष्टांत देऊन युक्तीच्या विचाराने नामरूपात्मक सर्व जगाच्या खोटेपणाचे निराकरण करून, अद्वितीय ब्रह्माचें जें प्रतिपादन करणें त्याला उपपत्ति म्हणतात. अशा रीतीनें उपक्रमोपसंहारादि सहा लक्षणाच्या योगानें सर्व वेदांतवाक्यांचें तात्पर्य अद्वितीय ब्रह्माच्या ठिकाणी आहे असें समजल्यानंतर, म्हणजेच श्रवण म्हणतात तें केल्यानंतर मग मनुष्यानें मनन करावें.

मननाचें स्वरूप

शिष्य :– मनन म्हणजें काय ?

गुरु :– श्रवण केलेलें जें अद्वितीय ब्रह्मवस्तु त्यासंबंधानें होणाऱ्या असंभावनारूप (संशयरूप) दोषांची निवृत्ति व्हावी एतदर्थ वेदांतानुसार, युक्तीच्या द्वारे, निरंतर जें त्याचें चिंतन, निदिध्यासन करावें.

निदिध्यासनाचें स्वरूप

शिष्य :– निदिध्यासन म्हणजें काय ?

गुरु :– आपण देह नाहीं, आपण स्थूल, कृश, ऱ्हस्व, दिर्घ नाहीं, आपण वर्णाश्रमी इत्यादि नाहीं, अशा मानण्यानें, म्हणजें मागें एका प्रसंगी स्पष्ट सांगितल्याप्रमाणें, विजातीय प्रत्ययांचा तिरस्कार करून आपण प्रत्यगात्मा, द्रष्टा, साक्षी, सच्चिदानंद, शुद्ध, बुद्ध, मुक्त, अजन्मा, अजर, अमर, अक्रिय, असंग, अद्वय ब्रह्मरूप आहों, अशा मानण्यानें उत्पन्न होणाऱ्या सजातीय प्रत्ययांच्या प्रवाहास

मनांत जें स्थिर करणें त्यास निदिध्यासन म्हणतात निदिध्यासनानंतर "करिये साक्षात्कार" म्हणजे आत्म्याच्या निःसंदेह अपरोक्षानुभवरूप साक्षात्काराचें संपादन करावें.

याप्रमाणें दोहऱ्याच्यापूर्वार्धांत श्रवणमनननिदिध्यासन करून आत्म्याचा साक्षात्कार करावा असें सद्गुरूंनीं सांगितलें. आतां पुढें उत्तरार्धांत साक्षात्काराच्या रूपानें सद्गुरुस वर्णन करतात :– 'सच्चिदानंद इति' साक्षात् अपरोक्ष, (अंतःकरणाच्या अहमादि वृत्तींचा प्रकाशक) सच्चिदानंद ब्रह्म आपणच आहों असा जो अनुभव घेणें त्यास साक्षात्कार म्हणतात, असें "वेद पुकार" म्हणजे वेद उच्च स्वरानें सांगतात.

पूर्वी श्रवण, मनन व निदिध्यासन हीं तीन आत्मसाक्षात्कार होण्याचीं साधनें आहेत असें सांगितलें. हीं साधनें, जोंपर्यंत चित्त शब्दादिक विषयांत आसक्त आहे तोंपर्यंत करतां येण्यासारखीं नाहींत. यासाठीं विषयांचा विषाप्रमाणें त्याग करून व शमादि षट् साधनांनीं संपन्न होऊन, ब्रह्मनिष्ठ सद्गुरूस शरण जाणें आणि तद्द्वारा श्रवणमननादि करून आत्मसाक्षात्काराचें संपादन करणें हेंच मोक्षप्राप्तीचें मुख्य साधन आहे. यासाठीं श्रवणादिद्वारा आत्म्याचा साक्षात्कार व्हावा म्हणून सत्पुरुषाचा समागम सदैव करावा. याविषयीं आतां पुढें गुरु सांगतात :–

॥ दुहो ॥

विषय विषयवत् त्याग करी,
करिए साधुसंग ॥
पोते सच्चिदानंद सदा,
जेमनो तेम अभंग ॥ ३८॥

टीका ॥ शब्दस्पर्शरूपरसादि जे निषिद्ध विषय आहेत त्यांचा विषाप्रमाणें त्याग करून, "करिए साधुसंग" म्हणजे ज्ञान, वैराग्य, दया, संतोष, अकाम, अक्रोध, क्षमा, सदाचार, इत्यादि सल्लक्षणांनीं संपन्न अशा श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरूचा समागम करावा. अशा सत्पुरुषांच्या समागमानें आपण स्वतःलाहि क्षमादयासंतोषादि साधनें प्राप्त होतात; व त्या साधनांपासून श्रवणमननादि झाल्यानें आत्मज्ञान होऊन मोक्ष होतो; यासाठीं सज्जनांचा संग सदैव करावा. जीवानें मोक्ष होण्यासाठीं विषयांचा त्याग करून उत्तम साधनें संपादावीं असेंच अष्टावक्रमुनींनींहि जनकराजाला सांगितलें आहे :—

॥ श्लोक ॥

मुक्तिमिच्छसि चेत् तात विषयान् विषवत् त्यज
क्षमार्जवदयातोषसत्यं पीयूषवद्भज ॥ १॥

अर्थ ॥ बा जनकराजा, जर तुला मुक्ति हवी असेल तर शब्दादि पांच विषयांचा विषाप्रमाणें त्याग कर; आणि

क्षमा, आर्जव (सरळपणा), तथा संतोष आणि सत्य या पंचकडीचे अमृताप्रमाणे सेवन कर.

दोह्याच्या पूर्वार्धांत, विषयांचा त्याग करून महात्म्या साधूचा समागम करावा असे सांगितले. आतां पुढे उत्तरार्धांत गुरु निरूपण करतात. "पोते सच्चिदानंद सदा" पोत म्हणजे स्वतः आपण (देह, इंद्रिये, प्राण, मन, बुद्धि, इत्यादिकांचा) प्रकाशक, प्रत्यगात्मा, 'सदा' म्हणजे जाग्रादि तीनहि अवस्थांत, त्याचप्रमाणे भूत–भविष्य–वर्तमानादि तीनहि कालांत 'सच्चिदानंद' म्हणजे ब्रह्मरूप आहो. शिवाय आपण प्रत्यगात्मा "जेमनो तेम" म्हणजे मन आणि वाणी यांस अगोचर, अप्रमेय (प्रत्यक्षादि प्रमाणांस अविषय म्हणजे न कळणारा) स्वतःसिद्ध, स्वयंप्रकाश, जसा आहे तसाच, "अभंग" (ज्यास कधीं भंग नाहीं) अशा प्रकारचा आहों. व "पोते सच्चिदानंद-सदा" या चरणाच्या भावार्थानें असे समजते कीं, सच्चिदानंद रुप परमात्मा सर्व मनुष्यांस स्वात्मरुपे करून सदासर्वदा प्राप्तच असतो. परंतु केवळ अविद्येच्या योगानेंच अप्राप्त आहे असा भास होतो. त्याची प्राप्ति करुन घेण्यासाठीं कित्येक जिज्ञासु, जप, तप, तीर्थ इत्यादि अनेक साधनांची अनुष्ठानें करतात. तरीसुद्धा त्याच्या बाह्यांगाचाहि म्हणजे बरवरची देखील प्राप्ति त्यास होत नाहीं. परंतु जेव्हां त्यांस अत्यंत दयाळू ब्रह्मनिष्ठ सद्गुरु भेटून ते

प्रत्यगात्म्याच्या रूपानें परमात्म्याचा उपदेश करतात तेव्हांच त्यास विद्या प्राप्त होऊन तिच्या योगानें त्यांच्या अविद्येची निवृत्ति होऊन, आत्मा प्राप्त झाला आहे असें त्यास भासू लागतें. पण एवढ्यावरून परमात्म्याची प्राप्ति म्हणजे त्यास पूर्वी नव्हती व ती आतां झाली असें कांहीं होत नाहीं, तर परमात्मा सदा प्राप्तच आहे. एखाद्याचा स्वकंठाभरण (स्वतःच्या गळ्यांतला कंठीसारखा दागिना) गळ्यांतच असून विस्मरणानें तो आपल्याजवळ नाहीं असें जेव्हा त्यास भासतें तेव्हां त्याचा शोध लावण्यासाठीं गळा न शोधतां इतर बाहेरलीं अनेक ठिकाणे तो शोधून शोधून दमतो तरी पण त्याचा शोध बाहेरून त्यास लागत नाहीं, परंतु तेव्हां कोणी शहाणा मनुष्य तो दागिना त्याच्या गळ्यांतच आहे असें त्यास दाखवितो तेव्हां तो दागिना त्यास अगदी प्राप्तच असल्याप्रमाणे भासतो. पण तितक्या-वरून तो दागिना पूर्वी म्हणजे त्यास प्राप्त नव्हता व आता तो प्राप्त झाला, असें कांहीं झालें नाहीं. याच न्यायानें सच्चि-दानंद परमात्मा सदा प्राप्तच आहे, व "जेमनो तेम अभंग" या चरणाच्या भावार्थानें असें समजून येतें कीं, प्रत्यगात्मा स्वभावतःच परमात्मा असून मुक्त आहे, तो म्हणजे पहि-ल्याने जीवरूप असतो व मागाहून परमात्म्याच्या रुपाचा होतो, किंवा तो प्रथम बद्ध असतो, आणि मागाहून मुक्त होतो, अशातला बिलकूल प्रकार नाहीं. सूर्याला ज्याप्रमाणें रात्र व दिवस हीं नाहींत, त्याप्रमाणे निरंतर अचित्य, चैतन्यघन, परिपूर्ण, प्रत्यागात्म्यालाहि परमार्थदृष्ट्या बंध

बृह 4-4-6

मोक्ष हीं दोनहि नाहींत. श्रुतिसुद्धां सांगते कीं, “जो ब्रह्म असेल तोच ब्रह्मास प्राप्त होईल,” “मुक्त असेल तोच मुक्त,” इत्यादि. मनुष्य प्रथम जीवरूप असून कर्मोपासनादि साधनांच्या योगानें पाठीमागून परमात्मरूप होतो असें जर म्हटले तर तें म्हणणे बरोबर नाहीं. कारण, तो पूर्वी परमात्मारूप नसून जर आतां परमात्मरूप झाला आहे, तर केव्हांना केव्हांतरी त्याचा क्षय झालाच पाहिजे. सर्वदा तो तसाच राहूं शकेल असें नाहीं. समज कीं, मूळची धातु तांबे असून मागाहून तिला कोणत्या तरी औषधीच्या रसाच्या संस्कारानें पिवळेपणा येऊन त्याचे सोनें झालें असें भासलें, तरी पण कालांतरानें तिच्यावरील औषधीच्या रसाची शक्ति क्षीण झाली म्हणजे त्यास प्राप्त झालेलें खोटें सोनेंपण कमी होत जाऊन शेवटीं केव्हांतरी अगदी नाहींसें झालेंच पाहिजे. यासाठीं प्रत्यगात्मा स्वभावतःच परमात्मारूप आहे असें जाणावें. कर्मानें किंवा उपासनेनें परमात्मारूप तो होतो असें नाहीं, म्हणून ‘जेमनो तेम अभंग’ आहे असें म्हटले. प्रत्यगात्माचा बोध ब्रह्मनिष्ठ सद्गुरुचा समागम केला असतां होतो म्हणून सदैव सत्संग करावा.

इतिश्रीमद्ब्रह्मचर्याश्रमस्थब्रह्मविद्वरिष्ठाखंडानन्द-
श्रीरामकृतं गुर्जरभाषायां पंचीकरणं समाप्तम्

सत्संगाने संसारबंधनाची निवृत्ति होऊन मोक्षप्राप्ति होते याविषयी श्रीज्ञानगीतेचें प्रमाण सांगतो :—

॥ श्लोक ॥

सत्संगेन परं प्राप्य दुस्तरं तरतेऽचिरात् ॥
तस्मादतिप्रयत्नेन सत्संगं सततं कुरु ॥ १ ॥

अर्थ ॥ 'सत्संगेन' म्हणजे ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच्या समागमानें 'परं प्राप्य' म्हणजे सच्चिदानंद परिपूर्ण, नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त अशा परमात्माच्या ठिकाणी स्वात्मरूपानें प्राप्त होऊन, 'दुस्तर. म्हणजे, समुद्राप्रमाणें तरून जाण्यास कठिण असा जो संसार ते 'अचिरात्,' म्हणजे ताबडतोब 'तरते' म्हणून तरुन (मनुष्य) पार जातो.

संसाराचें समुद्ररूपानें वर्णन

शिष्य :— गुरुमहाराज, संसार समुद्राप्रमाणें तरून जाण्यास कठीण आहे असें आपण सांगितलें, पण समुद्रांत तर भोंवरे, सुसरी मासे इत्यादि असतात, तसे संसारात कोठे असतात तें कृपा करून सांगावें.

सदा सत्संगाची आवश्यकता

गुरु :— समुद्रातल्याप्रमाणें संसारांतहि स्त्रीपुत्राच्या ठायी जो मोह तद्रूप आवर्त (भोवरे) आहेत; त्यांत कामक्रोधलोभाहंकाररूप सुसरी व मासे आहेत; क्षुधा तृषा, हर्ष, शोक इत्यादि त्यांतल्या मोठ्या ऊर्मी (लाटा) आहेत. अध्यात्म, अधिभूत आणि अधिदेव हे तीन ताप मिळून त्यांतला वडवानल आहे निरंतर असणारी दुर्वासना

ही त्यांतला शेवाळ आहे, व अनेक विषय मिळून त्यांत भरलेलें पाणी आहे. असा हा संसारसमुद्र सत्संगद्वारा आत्म्याचा बोध झाल्यानें, अगदीं विलंब न लावतां नौकेच्या योगानें समुद्र जसा पार तरून जातां येतो त्याप्रमाणें, पार जातां येतो.

'तस्मात्' म्हणजे म्हणून, 'अतिप्रयत्नेन' म्हणजे, भगीरथ प्रयत्न करून म्हणजे पुनः वर्णाश्रमादि स्वधर्माच्या अनुष्ठानानें केलेल्या यज्ञ, दान, जप, तप, इत्यादि साधनांनीं अंतःकरणाची शुद्धि केल्यानें विवेकादिसाधनसंपन्न होऊन, आणि एकाग्र चित्तानें ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच्या सदुपदेशाचें ग्रहण करून जेवण्याखाण्यासारख्या आवश्यक गोष्टींचीहि जरूर पडल्यास पर्वा न करतां म्हणजे जेवावयाला बसणार इतक्यांत किंवा जेवतांहि सत्समागमाचा लाभ होत असेल तर जेवणहि तितका वेळ सोडून म्हणजे अर्थात् तें मागें पुढे करून, "सत्संग सततं कुरु" म्हणजे सत्पुरुषांचा संग, बा जीवा ! तूं निरंतर कर. सर्वकाल सद्विचार करण्यासंबंधानें शास्त्राचें प्रमाण सांगतों :--

सदा सद्विचारास प्रमाण

॥ श्लोक ॥

आसुप्तेरामृतेः कालं नयेद्वेदांतचिंतया ॥
दद्यान्नावसरं किंचित्कामादीनां मनागपि ॥१॥

अर्थ ॥ जागा झाल्यापासून निजेतोपर्यंत, त्याचप्रमाणें विवेक झाल्यापासून देहपात होईपर्यंत श्रद्धाभक्तिपुरस्सर वेदांतशास्त्राचा विचार करून मनुष्यानें कालातिक्रमण करीत रहावे व मनांत कामक्रोधादिकांस यत्किंचित् थारा देऊं नयें, तात्पर्य एवढेच कीं सर्वकाल वेदांतविचारांत जर मन असेल तर कामक्रोधादिकां उत्पन्न होण्यास अवसरच मिळणार नाहीं.

दृष्टांत ॥ समज कीं, कोणी एक मनुष्य आपल्या घरांत कांहीं न करतां स्वस्थ बसला आहे; इतक्यांत त्याच्याकडे बाहेरले दुसरे कांहीं दुर्गुणी मनुष्य आले. ते घरांत आल्याबरोबर त्याकडे बघून जर तो घरांत बसलेला मनुष्य त्यांचा आदरसत्कार करील तर ते दुर्गुणी मनुष्य त्याजकडे फिरून फिरून येऊन, त्यांस इकडल्या तिकडल्या खोटयानाटया गोष्टी सांगून त्यास आपल्या स्वतःप्रमाणें दुर्गुणी करून टाकतील. पण आपल्याकडे येणारे मनुष्य अगदी दुर्गुणी आहेत असे ओळखून, ते घरीं आलें असतां त्यांच्याकडे एकवेळहि न पाहतां, कोणते तरी आपलें चांगलें पुस्तक उघडून तो वाचूं लागला, आणि अशा रितीनें त्याने त्यांचा आदरसत्कार न करतां त्याच्याकडे दुर्लक्ष केले, तर ते आलेलें मनुष्य निराश होऊन परत जातील, व क्वचित् पुनः आले असताहि, पूर्वीप्रमाणेंच जर त्यांचा अनादर झाला तर ते पुनश्च म्हणून खचित येणार नाहीत. याच न्यायाने, वेदांतविचाराशिवाय निरुद्योगी जर एकदा मनुष्य बसेल

तर त्या जवळ काम क्रोधादि दुर्गुण अवश्य येतील, व ते आले असतां जर तो मनुष्य त्यांचा आदर करील तर ते कामक्रोधादिक एकसारखे त्याच्याकडे येतच रहातील आणि त्यायोगाने त्यास परमार्थापासून भ्रष्ट करून टाकतील. पण याच्या उलट, जर तो मनुष्य रात्रंदिवस वेदांताचा विचार करीत राहील तर त्याजपाशीं कामादिक येणारच नाहींत व आलेच तर तो विचारी मनुष्य त्यांचा तिरस्कार करील. त्यामुळें अर्थात् त्याजपाशीं न बसतां चालते होतील. यासाठीं कामादिक दुर्गुणांस येण्यास अवकाशच देऊं नये व सर्व कालाचें अतिक्रमण वेदांतविचारानें करावें आणि सत्संग करावा. सत्पुरुषांच्या संगतीनें अनेक जन्मांतलीं पातकें, अध्यात्मादिक अनेक प्रकारचे ताप व दैन्य, हीं सर्व निवृत्त होतात. याविषयीं एका सत्पुरुषाचें वचन पुढें लिहिल्या प्रमाणें आहे.

साधुसमागमाचें महत्त्व

॥ श्लोक ॥

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ॥
पापं तापं च दैन्यं च हरेत्साधुसमागमः ॥ १ ॥

अर्थ ॥ गंगेत स्नान केल्यानें गंगामाई पापाचें क्षालन करतें. चंद्रमा आपल्या शीतल किरणांनीं बाह्यताप नाहींसा करतो. कल्पवृक्ष चिंतीत सुखोपभोग देऊन दैन्याचा नाश

करतो. पण साधूचा (ब्रह्मनिष्ठ सत्पुरुषाचा) समागम तर सर्व पाप, आंतलेबाहेरले सर्व ताप व दैन्य, या तिघांचाही नाश करतो. म्हणून गंगा, चंद्रमा आणि कल्पवृक्ष या तिघांपेक्षांहि सत्संग श्रेष्ठ आहे. यासाठीं जिवांत जीव आहे तोपर्यंत मनुष्यानें सत्संग करीत असावें.

शिष्य :— गुरुमहाराज, जोंपर्यंत आत्मज्ञान झालेलें नसतें तोंपर्यंत तें ज्ञान होण्यासाठीं सत्संग करावा असें आपण सांगितलें हें योग्य आहे. पण बोध झाल्यावरसुद्धां देहपात होईपर्यंत सत्संग करीत असावें असें जें आपण म्हणतां त्याचें कारण काय ?

गुरु :— यद्यपि शास्त्राच्या श्रवणानें आत्मज्ञान होतें, तरी देह आहे तोपर्यंत देहाचे व्यवहार करीत राहिल्यानें मनाची बाह्यवृत्ति होते. तिच्या योगानें, व मन चंचल असते त्यामुळें सर्वकाल सत्संग जर न होईल तर प्रपंचाच्या ठिकाणीं अहंममाध्यासाच्या योगानें, विपरीत बुद्धि होईल तशी ती होऊं नये म्हणून, सर्वकाल सत्संग करीत असण्याची जरुरी आहे आणि आत्म्याचा दृढ निःसंदेह, अपरोक्षबोध झाला आहे अशा मनुष्यांस यद्यपि कांहीं कर्तव्य नसलें तरी त्यांनीं वेदांतशास्त्राचे, गुरुचें व ईश्वराचें सेवन सर्वकाल करीत रहावें अशी शास्त्राची आज्ञा आहे. याविषयीं एक आप्तपुरुषांचें वचन पुढें लिहिल्याप्रमाणे आहे :—

वेदांत गुरु आणि ईश्वर यांस वंदन

।। श्लोक ।।

यावदायुस्त्रयो वंद्या वेदांतो गुरुरीश्वरः
आदौ ज्ञानप्रसिद्ध्यर्थं कृतघ्नत्वापनुत्तये ।।१।।

अर्थ ।। देहपात होईपर्यंत वेदांतशास्त्र, त्याचा उपदेश करणारे सद्‌गुरु व ईश्वर, हे तिघे मनुष्यास वंदन करण्यास योग्य असतात. ज्ञान होण्यासाठी वेदांताचें श्रवण व गुरु आणि ईश्वर यांचें सेवन अगोदर करणें मनुष्यास अवश्य आहे व ज्ञान झाल्यानंतर ज्याच्यापासून ज्ञान प्राप्त झालें त्या वेदांतशास्त्राचे, गुरुचे आणि ईश्वराचें सेवन जर तो न करील तर तो कृतघ्न होईल. म्हणून हा कृतघ्नतेचा दोष उत्पन्न होऊं नये यासाठीं, देह जिवंत आहे तोपर्यंत या तिघांचे सेवन मनुष्यानें करीत राहिले पाहिजे, म्हणजे परिपूर्ण अखंड; एकरस अशा परमात्म्याच्या ज्ञानानें दुस्तर संसारांतून पार जाण्यासाठीं, व कृतघ्नतेचा दोष पदरीं येऊं नये म्हणून, ईश्वर व गुरु यांच्या ठायीं निस्सीम भक्ति ठेवून, वेदांतशास्त्राचा श्रवण-मनननिदिध्यासानें अभ्यास करीतच देह पडेतों मनुष्यानें कालातिक्रमण करीत असावें असें यावरून सिद्ध होते.

उपसंहार

(गीतीवृत्त)

निर्जरवाग ज्ञानां सुखबोधार्थ
कृतं मुमुक्षूणाम् ॥
यैरिह पंचीकरण नरवाण्या
तान् गुरून् सदा वंदे ॥ १ ॥

अर्थ :— संस्कृत भाषेचें ज्ञान तर नाहीं, पण संसार-बंधनापासून मुक्त होण्याची तर दृढ इच्छा आहे, अशा जिज्ञासुजनांना अनायासें सच्चिदानंद आत्म्याचा बोध व्हावा या हेतूनें, ज्या सद्‌गुरुंनीं मनुष्यवाणीनें हें पंचीकरण तयार केलें त्या श्रीरामदासगुरुंना मी सदैव वंदन करतों.

॥ श्लोक ॥

हा ग्रंथ वाचुनि मुमुक्षु भवाब्धितून
जाऊनि पार, निजरूपिं असोनि मग्न ॥
हा शिष्यकाम अवघा पुरवावयास
आहे समर्थ मम सद्‌गुरु राम खास ॥ १ ॥

इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमद-
खंडानंदसरस्वतीरामगुरुशिष्यजय-
कृष्णविदुषा विरंचिता पंची-
करणटीका समाप्ता.